# श्रीदत्तमहाराज कवीश्वर

## यांचे विचारधन

### भाग २











।। श्रीगुरुःशरणम् ।।

# श्रीदत्तमहाराज कवीश्वर यांचे विचारधन

## (भाग-२)

(साधकांचे प्रश्न आणि श्रीदत्तमहाराजांनी त्या प्रश्नांना दिलेल्या उत्तरांचे संकलन)

डॉ. शरद्चंद्र कोपर्डेकर

प्रस्तावना

डॉ. अशोकमहाराज कवीश्वर

इंद्रायणी साहित्य प्रकाशन, पुणे

❐ श्रीदत्तमहाराज कवीश्वर यांचे विचारधन भाग - २
डॉ. शरद्चंद्र कोपर्डेकर
६०१, मेरीलँड कॉर्नर,
डॉ. आंबेडकर रोड,
सायन (पूर्व), मुंबई ४०० ०२२.
दूरध्वनी : ४०७२३६८ / ४०७२११५

❐ ISBN-81-7418 -141 - 5
Shri Dattamaharaj Kavishwar -
Yanche vihardhan (Marathi) Part - 2
Dr. Sharadchandra Kopardekar

❐ प्रकाशक
श्याम दयार्णव कोपर्डेकर
इंद्रायणी साहित्य प्रकाशन
२७३, शनिवार पेठ, पुणे ३०
दूरध्वनी : ४४५८५९८

❐ © सौ. पौर्णिमा कोपर्डेकर

❐ प्रकाशन दिनांक
दत्तजयंती - २२ डिसेंबर, १९९९

❐ मुखपृष्ठ सजावट व मुद्रक
सुगम मुद्रण,
माहीम, मुंबई - १६

❐ सेवाभावी मूल्य ५० रुपये

अठराव्या शतकांत अवतीर्ण झालेले

थोर संत

**श्रीकृष्ण दयार्णव**

यांच्या चरणी

श्रद्धापूर्वक समर्पण

## इंद्रायणी साहित्य प्रकाशन यांनी प्रकाशित केलेली
## श्रीदत्तमहाराजांविषयीची पुस्तके

१. श्रीदत्तमहाराज कवीश्वर - चरित्र आणि विचारधन (सातवी आवृत्ती)
पृष्ठे - ४७०. सेवाभावी मूल्य - ८० रुपये.

२. श्रीदत्तमहाराज कवीश्वर यांचे विचारधन भाग - १ (तिसरी आवृत्ती)
पृष्ठे - २५०. सेवाभावी मूल्य - ५० रुपये.

३. श्रीदत्तमहाराज कवीश्वर यांचे विचारधन भाग - २ (तिसरी आवृत्ती)
पृष्ठे - २३०. सेवाभावी मूल्य - ५० रुपये.

४. श्रीदत्तमहाराज कवीश्वर यांची विचारसंपदा - विचारधन भाग-३
(तिसरी आवृत्ती) पृष्ठे - १९२ सेवाभावी मूल्य - ५० रुपये.

**ही पुस्तके सर्वत्र मिळतात. काही प्रमुख प्राप्ती स्थाने पुढे दिली आहेत.**

**पुणे**

**इंद्रायणी प्रकाशन**
२७३, शनिवार पेठ,
ओंकारेश्वर मंदिरासमोर,
पुणे - ४११ ०३०.
दूरध्वनी - ४४५ ८५९८
४४८ १८६७

**वामन निवास**
तुळजाभवानी आरोग्य धाम,
३७/२, एरंडवणा, कर्वे रोड,
दशभुजा गणपती मंदिरामागे,
पुणे - ४११ ०३८.
दूरध्वनी - ३६८२३१,

**वासुदेव निवास**
४२/१७, एरंडवणा,
गोगटे पेट्रोलपंपामागे,
कर्वे रोड, पुणे - ३०.

**रसिक साहित्य**
अप्पा बळवंत चौक,
पुणे.

**मुंबई**

**आयडियल बुक कंपनी**
छबिलदास हायस्कूल समोर,
दादर, मुंबई - ४०० ०२८.
दूरध्वनी - ४३० २१२६

**मॅजेस्टिक एजन्सीज्**
विष्णु निवास, टिळक पुलाजवळ
सेनापती बापट मार्ग, दादर-२८
दूरध्वनी - ४३० ५९१४

| | | |
|---|---|
| **जालना** | **श्रीदत्त आश्रम**<br>सद्गुरू नगर, नाव्हा रोड,<br>जालना - ४३१ २०३.<br>दूरध्वनी - ०२४८२ - ३६८०५<br>०२४८२ - ३४११७ |
| **नागपूर** | **आर्वीकर वेदपाठशाळा**<br>"श्रुतिसदन", संघकार्यालयासमोर,<br>महाल, नागपूर - ४४० ००२.<br>दूरध्वनी - ७२३३१६/७२३७८२. |
| **अमरेश्वर** | **श्रीदत्त अमरेश्वर मंदिर**<br>औरवाड, नृसिंहवाडी समोर,<br>तालुका - शिरोळ,<br>जिल्हा - कोल्हापूर. |

***

॥ श्रीगुरुःशरणम् ॥

# अनुक्रमणिका


**प्रस्तावना** - डॉ.अशोकमहाराज कवीश्वर - ७

**मनोगत** - डॉ. शरद्‌चंद्र कोपर्डेकर - १९

**प्रकाशकाचे मनोगत** - श्याम कोपर्डेकर - २७

**ऋणनिर्देश** - - ३६

**विचारधन भाग - २ (विभाग 'अ')**

(साधकांचे प्रश्न व श्रीदत्तमहाराजांनी त्या प्रश्नांना
दिलेल्या उत्तरांचे संकलन) - ३७

**विचारधन भाग - २ (विभाग 'ब')**

(चरित्राच्या पहिल्या आवृत्तीत समाविष्ट केलेली
परंतु नव्या आवृत्तीत समाविष्ट न केलेली प्रश्नोत्तरे. ) - ११२

**डॉ. शरद्‌चंद्र कोपर्डेकर यांचे संतसाहित्य** - २३०

# प्रस्तावना

**डॉ.अशोकमहाराज कवीश्वर**

विचारधनच्या या दुसऱ्या भागाला प्रस्तावना लिहिण्याच्या निमित्ताने मनांतील विचार व भावना व्यक्त करण्याचा योग प्राप्त होत आहे. विसाव्या शतकाच्या अगदी अखेरच्या कालखंडात श्रीदत्तमहाराज कवीश्वर यांचे विचारधन तीन भागांतून प्रकाशित होत आहे. जग एकविसाव्या शतकाच्या उंबरठ्यावर उभे असतांना भौतिक विज्ञानाने माहिती तंत्रज्ञानाचा स्फोट घडवून आणून ऐहिक जीवनाचे बाह्य स्वरूप बदलून टाकलेले आहे. अशा वेळी श्रीदत्तमहाराजांनी पुन्हा एकदा वेदवाणी विशुद्ध स्वरूपात जगाला ऐकवावी हा काही योगायोग नाही. धर्मसंस्थापनार्थाय संभवामि युगेयुगे असे भगवंतांनी गीतेत जे अभिवचन दिले आहे त्याचीच ही परिपूर्ती आहे.

प्रत्यक्ष डोळ्यांनी पाहिलेल्या एका अवतारी पुरुषाने वेळोवेळी व्यक्त केलेल्या विचारांचे संकलन म्हणजे 'विचारधन' या पुस्तकाचे तीन भाग होत. साधकांच्या प्रश्नांना उत्तरे देतांना किंवा प्रवचने करतांना श्रीदत्तमहाराजांच्या हातात कधीही संदर्भाचे कागद नसत. विचारधनमधील विचार प्रगट करतांनाही श्रीदत्तमहाराजांच्या हातात कोणतेही संदर्भ ग्रंथ नव्हते. त्या त्या प्रसंगी त्या त्या प्रश्नाला अनुरूप अशी प्रतिक्रिया शब्दांच्या माध्यमातून प्रगट झालेली आहे. श्रीदत्तमहाराजांनी केलेले हे विवेचन उत्स्फूर्तपणे आले ले आहे आणि तरीही विचारधनच्या तीन भागातून जे तत्त्वज्ञान प्रगट झाले आहे ते वाचतांना असे वाटते की भारताचा प्राचीन अध्यात्म विचारच त्याच्या अंगोपांगासह इथे सजीव होऊन उभा राहिलेला आहे. एवढेच नाहीतर विचारधनमध्ये एक सुसंगत, सुसंबध्द आणि सर्वसमावेशक अध्यात्म विचार मांडला गेला आहे. तसेच त्या अध्यात्म विचाराला आजच्या काळाला अनुसरून अभिनव रूप दिलेले आहे.

श्रीदत्तमहाराजांच्या विवेचनात जे अध्यात्म विचार दिसतात त्यात भूतकाळाचा खोलवर जाऊन घेतलेला मागोवा आहे आणि भविष्यात दूरवर फेकलेली एका प्रज्ञावंत भाष्यकाराची दृष्टीही आहे. वर्तमानकाळाचा संदर्भ

तर जागोजागी आहेच. आधुनिक युगाशी जुळेल अशारीतीने श्रीदत्तमहाराजांनी वेदान्तातील तत्त्वज्ञान मांडले आहे आणि मानवी समाजाच्या सांस्कृतिक, धार्मिक आणि आध्यात्मिक जीवनाच्या प्रत्येक अंगाला स्पर्श करणारी एक व्यापक आणि सर्वसमावेशक विचारप्रणाली मानवी समाजापुढे ठेवली आहे.

अध्यात्म हाच भारताचा खरा ठेवा आहे. त्याचे रहस्य ग्रहण करण्यासाठी समाजाची मनोभूमी तयार होण्याची गरज आहे. आधुनिक शिक्षणाचा प्रसार आता सर्व जगभर झाला आहे. दैनंदिन जीवनातील भौतिक गरजाही भागण्याची व्यवस्थाही झाली आहे. पाश्चात्य देशांत तर सुखोपभोगाची नानाविध साधने अमाप प्रमाणात उपलब्ध झालेली आहेत. तथापि इंद्रियांचे लाड करत रहाणे कसे व्यर्थ आहे आणि आत्मिक समाधान लाभण्यासाठी ते किती अपुरे आहे हे सुशिक्षित समाजाच्या आता लक्षात येत चालले आहे. म्हणूनच भारतीय अध्यात्माबद्दल जगभर सर्वत्र मोठेच कुतूहल निर्माण झालेले आहे.

विज्ञानयुगाने प्रभावित झालेल्या तरूण पिढीलाही आता जगात सर्वत्र असे वाटू लागले आहे की भौतिकतेचा हव्यास कमी केल्याशिवाय आणि भारतीय अध्यात्माकडे वळल्याशिवाय खरी मनःशांती मिळणार नाही. अशी मनःशांती देण्याचे फार मोठे सामर्थ्य श्रीदत्तमहाराजांच्या 'विचारधन'मध्ये आहे. ईश्वराची योजना असेल तर नियतीची पावले त्या दिशेन पडत रहातील आणि श्रीदत्तमहाराजांचे 'विचारधन' जगात सर्वत्र पोचून सामान्य लोकांवर शांतीचा वर्षाव करीत राहील.

श्रीदत्तमहाराजांनी मांडलेल्या विचारांमध्ये उदात्तता आणि उदारपणा दिसून येतो. त्याचप्रमाणे ताजेपणा आणि आधुनिकताही दिसून येते. कारण श्रीदत्तमहाराज जे काही बोलले ते त्यांच्या स्वतःच्या प्रत्यक्ष अनुभूतीप्रमाणे होते. म्हणूनच त्यांचे शब्द खोल अंतरंगातून स्वाभाविक प्रवृत्तीने बाहेर आलेले आहेत असे वाटते. गूढ, गहन आणि उदात्त तत्त्वे श्रीदत्तमहाराज सोप्या भाषेत सांगतात. एखादे फूल उमलावे तशा सहजपणे हळूवार शब्दात मांडतात.

जीवनात येणारी सुख-दुःखे, आशा-निराशा, यश-अपयश यांचा स्थिर चित्ताने स्वीकार करून शांतपणे जीवनाची वाटचाल करीत रहावे. दैनंदिन

जीवनातील व्यवहार करतांनाही माणसाने मनाची विशुध्दता आणि आध्यात्मिक धारणा सातत्याने जोपासावी त्यात कमीपणा येऊ देऊ नये. अशाश्वताचा लोभ कमीकमी करत हळूहळू आपले जीवन उन्नत स्तरावर न्यावे. चिरंतनाचे ध्येय पुढे ठेवून जीवन व्यापक करीत रहावे हेच श्रीदत्तमहाराजांचे सांगणे आहे. ऐहिकाच्या सीमेवर थांबू नये. ऐहिकाच्या अतीत जाऊन चिरंतन अध्यात्माच्या मार्गावर पुढे पुढे वाटचाल करीत रहावे हेच श्रीदत्तमहाराजांच्या 'विचारधन'चे सार आहे.

श्रीदत्तमहाराजांच्या जीवनात उच्च स्वरूपाची आध्यात्मिक धारणा आणि कर्मशीलता यांचा उचित समन्वय झालेला दिसतो. त्यांचे मन एका वेगळ्या उच्च पातळीवर असायचे. श्रीदत्तमहाराज चालू लागले म्हणजे धीरोदात्त पावले टाकणाऱ्या वीर पुरुषासारखे दिसत. परंतु त्यांची मुद्रा अतिशय सौम्य आणि प्रगाढ शांतीने भारलेली अशी वाटे. त्यांच्या डोळ्यातील तेज वैदिकऋषींची आठवण करून देणारे होते. त्याचबरोबर दुसऱ्यांबद्दलचा कळवळा दीनदलितांबद्दलची करुणा आणि स्वतःच्या देहाबद्दलची निरपेक्ष वृत्ती त्यांच्या चेहऱ्यावर उमटलेली दिसे. श्रीदत्तमहाराजांचे हे दर्शन भक्तांना भारावून टाकत असे आणि एक प्रकारचा गाढ भक्तिभाव मनात निर्माण करीत असे. मनात उदार मनस्क आणि उदात्त धारणा त्यांच्या शब्दाशब्दात प्रकट होत असे.

श्रीदत्तमहाराज अशा एका कोटीतील होते ज्यांना पार्थिव अशा कशाचा स्पर्श झाला नाही. सद्चित् आणि आनंद या लक्षणांनी युक्त असलेल्या विश्वतत्त्वातूनच त्यांचे मन घडले होते म्हणूनच ते सदैव अलौकिकत्त्वाच्या प्रदेशातच वावरत आहेत असे वाटे. जीवनाची वाटचाल करताना अनेक बरे वाईट उपाधिच्या प्रसंगातून त्यांना जावे लागले. पार्थिवाच्या मृत्तिकेतून घडलेल्या तामसिक प्रकृतीच्या व्यक्तींनी कोलाहलाचे प्रसंग समोर आणले तरीही त्यांची शांत व स्थितप्रज्ञ वृत्ती ढळलेली नाही. निःसंग, विरागी आणि निवृत्तीशील मनावर ओरखडे उमटलेले दिसत नाहीत. जीवनमुक्त अवतारी पुरुषाच्या अंतःकरणाचा स्थायीभाव कसा असतो याचे नितळ निर्मळ दर्शन त्यांच्या वागण्यात व बोलण्यात घडून येते. श्रीदत्तमहाराजांचे वागणे आणि बोलणे उत्स्फूर्त, सहज असे. म्हणूनच त्यांचे दर्शन घेणे आणि त्यांचे शब्द

ऐकणे हा अलौकिक अनुभव वाटायचा. त्यांच्या सूक्ष्म आणि सर्वस्पर्शी विचारात असीम करुणा आणि अखिल प्राणीमात्रांबद्दलचा निर्मळ प्रेमभाव दिसून येतो. प्रवृत्ती वैराग्यशील निवृत्तीला पोषक होती. तरीही या आंतरिक निवृत्तीला थोडासाही धक्का पोचू न देता. तरीही ते सापेक्ष वृत्तीने सतत कर्मशील राहिले आणि आर्तांचे दुःखहरण करीत साधकांना पुढे वाटचाल करतांना मदत करीत करीत प्रवृत्तीच्या क्षेत्रातही सहजपणे वावरत राहिले. ऐहिकातील कामनेचा श्रीदत्तमहाराजांच्या मनाला कधी स्पर्शच झाला नाही. तसेच कोणाचे सहाय्य सहवास किंवा मार्गदर्शनाचा हात त्यांना आधारासाठी घ्यावा लागला नाही. प्रपंचात राहूनही संन्यस्तवृत्तीने आणि आध्यात्मिक धारणेने जीवन व्यतीत करीत असताना स्थिरचित्ताने आयुष्यभर आपली वाट चालत राहिले. उच्च स्तरावरील नितळ आणि अविचल आध्यात्मिक धारणा असलेले अवतारी पुरुषाचे जीवन कसे असते याचे परिणामकारक दर्शन श्रीदत्तमहाराजांच्या जीवनात पहायला मिळते. तसे वावरत असतानाही लौकिकातील अनेक व्यवधाने सांभाळून परस्परांना विरोधी असलेल्या जबाबदाऱ्या पेलत राहिले. तरीही त्यांच्या अंतरंगातील अध्यात्मशीलता सहजपणे स्वाभाविकरित्या तशीच अभंग राहिली हे वैशिष्ट्यपूर्ण आहे.

संसारातील आपले कर्म करा आणि त्या द्वारा ईश्वराचे पूजन करा असा संदेश अनेक संत देत आले आहेत. श्रीदत्तमहाराजांनी त्यात थोडा बदल केला आहे. संसारात भोग घेत रहाणे हे कर्म खऱ्या अर्थाने ईश्वरपूजन नाही. संसारातील सर्व कर्म हे ईश्वरभक्तीवर अधिष्ठित असावे म्हणजे खरे ईश्वरपूजन साधेल असे श्रीदत्तमहाराजांनी सांगितले आहे. भक्ती व ज्ञानाचा व्यापक पाया संसारातील कर्माला त्यांनी दिला आहे. म्हणूनच वरच्या पातळीवर पोहोचणारे भक्ती आणि ज्ञानाधिष्ठीत असलेले कर्म हेच ईश्वरपूजन आहे अशी श्रीदत्तमहाराजांची शिकवण आहे.

ती शिकवण देताना श्रीदत्तमहाराजांनी चौकटीत बंदिस्त झालेला जीर्ण परंपरावादी दृष्टीकोन टाळला आहे आणि आधुनिक विचारांचे स्वागत करणारा उदारमतवादी दृष्टीकोन स्वीकारला आहे. श्रीदत्तमहाराजांनी मांडलेल्या विचारधारेमध्ये 'पूर्व' आणि 'पश्चिम' यांच्यात जे जे सर्वोत्तम आहे त्यांचा

उचित असा समन्वय साधलेला आहे. तसेच कालबाह्य रुढी आणि निर्जीव कर्मकांडात्मक आचार टाळून विश्वकर्म म्हणावे अशी उदात्त आणि सर्वसमावेशक विचारसरणी श्रीदत्तमहाराजांनी मांडली आहे. शाश्वत आणि टिकाऊ स्वरूप असल्यामुळे ही विचारसरणी अनेक शतके जगाला आध्यात्मिक जीवन जगण्यासाठी प्रेरणा देत राहणार आहे. भारताची आंतरिक व स्वभावसिध्द आध्यात्मिकता त्यात व्यक्त झाली आहे. तसेच आधुनिक काळातील 'समता', 'कर्मशीलता', 'व्यक्तीस्वातंत्र्य', 'अस्मिता', आणि 'आंतरिक सामर्थ्य' त्यात व्यक्त झाले ले आहे. सुसंस्कृतता आणि मनाची सहज प्रेरणा यातून आत्मिक विकास घडवावा यासाठी वेदान्ताचा आधुनिक काळातील दैनंदिन व्यवहाराशी श्रीदत्तमहाराजांनी विचारसरणीमध्ये सांधा जळवलेला आहे. म्हणूनच 'विचारधन'मधील तेज व नाविन्य जगात सर्वत्र स्वीकारार्ह वाटेल असेच आहे. त्यांनी हिंदू धर्मातील शाश्वत वेदान्ताचा आधुनिक काळाशी सांधा जुळविला आहे.

भारतीय संस्कृती आणि परंपरा यांच्यातील शाश्वत गाभा त्यांनी आपल्यापुढे ठेवला आहे. कालबाह्य झालेला भाग हलकेच बाजूला सारला आहे. पण तसे करताना ते आक्रमक झालेले नाहीत. अनाग्रही भूमिकेतून त्यांनी सौम्यपणे आपले विचार मांडले आहेत, सर्वसामान्य माणसालाही समजेल अशा साध्या सोप्या भाषेत मांडले आहेत. हे त्यांचे मोठेच वैशिष्ठ्य आहे. विद्यमान कालाला अनुसरून श्रीदत्तमहाराज नव्या विचारप्रवाहांचे उदारमनाने स्वागत करतात. परंतु त्यातही श्रीदत्तमहाराजांची सनातन परंपरानिष्ठ भूमिका सुटत नाही. म्हणूनच श्रीदत्तमहाराजांचे विचार सनातनी परंपरानिष्ठांना जसे स्वीकारावेसे वाटतात, तसेच आधुनिक सुशिक्षित बुद्धीवाद्यांनाही तितकेच स्वीकारार्ह वाटतात. त्यामुळे असे म्हणावेसे वाटते की समाजापुढे आपले विचार कसे मांडावे याचा एक आदर्श श्रीदत्तमहाराजांच्या 'विचारधन'च्या रूपाने पहायला मिळतो.

त्यांच्या वाक्यावाक्यात बुद्धीची सूक्ष्मता, विवेक आणि आध्यात्मिक अनुभूती जाणवतात. लौकिकातील व्यवहार आणि आध्यात्मिक जाणीव यांचा

तोल त्यांच्या शब्दात, त्यांच्या वाक्यावाक्यात आपोआप सांभाळला जातो.

आध्यात्मिक अनुभूतींच्या आनंदाचा स्पर्श करून देण्याचे सामर्थ्य त्यांच्या शब्दांत आहे हे त्यांचे 'विचारधन' वाचताना आजही जाणवते. म्हणूनच सद्चिदानंदरूप अपार शांतीचा अनुभव 'विचारधन' वाचताना येतो असे अनेक साधक सांगतात.

'विचारधन'मध्ये त्यांनी साधकांना दिलेली उत्तरे पूर्णतया तर्कशुद्ध आहेत, बुद्धिगम्य आहेत आणि तरीही त्या वाक्यातून वाचकांना अशा काही आध्यात्मिक अनुभूती मिळतात, ज्या तर्कबुद्धीच्या पलीकडील आहेत, शब्दांच्या अतीत आहेत. 'विचारधन' वाचताना आपण ऐहिकाची सीमा केव्हा ओलांडली आणि अध्यात्माच्या प्रदेशात केव्हा प्रवेश केला आहे हे आपल्या लक्षात येत नाही.

प्राचीन उपनिषदांपासून ते विसाव्या शतकात प्रगट झालेल्या संतांच्या सहज संवादांमध्ये जे जे सत्वपूर्ण आणि चिरंतन आहे ते सर्व समावेश श्रीदत्तमहाराजांनी स्वीकारले आहे. एवढेच नव्हे तर अनेक शतकांच्या कालावधीत प्रगट झालेल्या भिन्न भिन्न विचारप्रणाली आणि आधुनिक विचारवंतांच्या बौद्धिक विचारधारा श्रीदत्तमहाराजांनी अभ्यासल्या आहेत. त्यातील सर्व शाश्वत विचार एकत्र केले आहेत आणि त्यातून एक सुसंबद्ध सर्वस्पर्शी परस्परसंवादी समन्वयात्मक अध्यात्मविचार श्रीदत्तमहाराजांनी मानवी समाजापुढे ठेवलेला आहे. हे कार्य ऐतिहासिकदृष्ट्या महत्त्वाचे अस आहे.

सर्वांभूति एकच ब्रह्म भरून राहिले आह असे अद्वैत तत्त्वज्ञानात सांगितले. हे तत्त्वज्ञान तात्त्विक सिद्धांतरूपाने सर्व संतांनी मान्य केले आहे. या अद्वैत वेदान्ताच्या सिध्दांताचा प्रत्यक्षातील आविष्कार म्हणजे श्रीदत्तमहाराजांनी प्रगट केलेली विचारसरणी जी विचारधनच्यारूपाने आपल्यासमोर आहे. त्यात दैनंदिन व्यवहारातील आचाराशी वेदान्त तत्त्वज्ञानाचा प्रत्यक्ष मेळ घातलेला आहे. हेच श्रीदत्तमहाराजांच्या जीवनाचे महत्त्वाचे फलित आहे.

भारतापुरता विचार केला तर श्रीदत्तमहाराजांनी सनातन शास्त्रांवरील धूळ झटकून त्यातील विशुध्द शाश्वत तत्त्वज्ञान आधुनिक काळाच्या संदर्भात

लोकांपुढे ठेवले. प्राचीन संस्कृतीतील आध्यात्मिक मूल्यांची आधुनिक जगातील वैज्ञानिक विचारांशी सांगड घातली आणि भारताचा भूतकाळ व वर्तमानकाळ यांचा सांधा जोडला. विज्ञानांच्या अफाट प्रगतीने दिपून गेलेल्या आणि ध्येय विसरून भरकटलेल्या आधुनिक तरुणांना शांतीचा मार्ग दाखविला. सर्व धर्म, पंथ आणि संप्रदाय यांच्या अतीत जाऊन संपूर्ण मानव जातीच्या कल्याणाचा विचार जगापुढे मांडला. व्यक्ती, प्राणिमात्र व संपूर्ण मानवजात यांच्या विविध अंगाला स्पर्श करणारे 'विचारधन' मांडून मानवी जीवनाला उन्नत व उदात्त रूप देण्याचा प्रयत्न केला.

श्रीदत्तमहाराजांच्या विवेचनात कर्म, भक्ती, ज्ञान व योग या सर्वांचे उचित असे मिश्रण ठिकठिकाणी आहे. ते जेव्हा निखळ ज्ञानाबद्दल सांगू लागतात तेव्हा त्यांची वाणी तत्त्वगर्भ होते आणि अद्वैताकडे झेप घेऊ लागते. त्यांच्या विवेचनांत बुद्धीला आकलन होऊ शकेल अशा शब्दात ते अद्वैत तत्त्वज्ञान स्पष्टपणे मांडतात किंवा सूचित करतात. परंतु तत्त्वज्ञानातील मूलभूत सिद्धांतावर ते भर देत नाहीत. त्या सिद्धांताचे आचरणांत कसे आणावे हे सांगण्यावर त्यांचा भर आहे आणि त्या दृष्टीने भक्ती, कर्म आणि योग यांचे विवेचन ते सविस्तर करतात आणि आपल्या दैनंदिन जीवनांतील लौकिक पातळीवर उतरतात. मूळ सिद्धांत प्रत्यक्ष आचरणांत कसे आणावे हे सांगतात. तत्त्वज्ञानातील गहन सिद्धांत अगदी थोडक्यात सूचित करून आपल्या रोजच्या जीवनातील लौकिक आध्यात्मिक पातळीशी सहजपणे मेळ घालतात, तो मेळ घालतांना कोणालाही आकलन होऊ शकेल अशा सुबोध भाषेत ते बोलतात. त्यामुळे श्रीदत्तमहाराजांचे विचारधन केवळ तात्त्विक ज्ञान (Theoretical Knowledge) रहात नाही. त्याला उपयोजित ज्ञानाचे (Applied Knowledge) स्वरूप येते. मूळचे तात्त्विक ज्ञान व्यवहारात उतरण्याच्या दृष्टीने योग्य असे रूप धारण करते. त्यामुळे तत्त्वज्ञान आचरणात कसे आणावे याचे आकलन सर्वसामान्य माणसाला होते.

अध्यात्मविद्या आचरणांत कशी आणावी, आपले रोजचे वागणे उदात्ततच्या पातळीवर कसे न्यावे याचा विचार हेच मध्यवर्ती सूत्र श्रीदत्तमहाराजांनी सतत सांभाळलेले दिसते.

त्यामुळे श्रीदत्तमहाराजांनी मांडलेले तत्त्वज्ञान ह बौद्धिक कसरत रहात नाही. ते व्यावहारीक पातळीवर येते. त्यामुळे 'विचारधन'चे अध्ययन करीत राहिले की आपले जीवन त्यामुळे कळत नकळत वरवर उंचावत जाते. ऐहिक जीवनांत श्रेष्ठ काय मानावे हे सांगून आपल्याला श्रीदत्तमहाराज ऐहिकाच्या पलीकडे आध्यात्मिक जीवनाकडे घेऊन जातात. माणसाने आध्यात्मिक वाटचाल करीत राहून स्थितप्रज्ञ कसे व्हावे, गुणातीत कसे व्हावे या ध्येयाकडे माणसाचे आचरण वळाव हाच प्रयत्न श्रीदत्तमहाराजसुद्धा करतात. त्याच्याही पुढे जाऊन वाचकांना सूक्ष्मतरल अशा आध्यात्मिक अनुभूतीपर्यंत आकलनाच्या अंगाने नेण्याची विलक्षण शक्ती श्रीदत्तमहाराजांच्या विवेचनात आहे. गूढ गहन तत्त्वज्ञान श्रीदत्तमहाराजांनी व्यवहारात आणण्यासाठी असे सोपे बनवले आहे. 'विचारधन' वाचतांना आपण ऐहिक जीवनांतूनआध्यात्मिक जीवनाकडे केव्हा वळलो हे वाचकाच्या ध्यानातही येत नाही, हे 'विचारधन'चे फार मोठे यश आहे.

श्रीदत्तमहाराज शब्दप्रभू होते, शब्दसृष्टीचे ईश्वर होते. शब्दांचे व अर्थाचे सूक्ष्म भेद आणि दर्जा यांची त्यांना उत्तम जाण होती. त्याशिवाय शब्दांमागे जी अनुभूती असते त्या शब्दातीत असलेल्या अनुभूतीचे आंतरिक रहस्यही त्यांना पूर्णतया ज्ञात होते. म्हणूनच ते शब्दांच्या प्रतीकात्मक व प्रतिमातून वापर करून बोलू शकले आणि अरूप असलेल्या शब्दातीत असलेल्या आत्मस्वरूपाची प्रचोती आपल्या 'विचारधन'मधून सूचकतेने देऊ शकले. शंकराचार्यांच्या वाङ्मयातून हीच अनुभूती मिळते. ज्ञानेश्वरी, एकनाथीभागवत वगैरे ग्रंथातूनही हीच अनुभूती मिळते. विचारधनच्या माध्यमातून हीच अनुभूती कोणीही घेऊ शकतो. 'विचारधन'चे वैशिष्टय आणि आगळेपण यातच आहे. विचारधन केवळ शाब्दिक वाङ्मय नाही. अरूप, शब्दातीत, आत्मस्वरूपाचा प्रत्यय देणारे ते अक्षर वाङ्मय आहे.

तत्त्वज्ञानाच्या सिद्धांताचे बौधिक पातळीवर गुरूकृपा झाल्याशिवाय पूर्ण आकलन होत नाही आणि सद्गुरूंच्या वाक्यातील खरा अर्थ साधकाला उमगत नाही. अनुभव तर त्याहून कितीतरी दूर असतो. म्हणूनच श्रीदत्तमहाराज सांगायचे साधकाने आध्यात्मिक अनुभूती बौद्धिक

पातळीवरून समजून घेण्याचा प्रयत्न करू नये. श्रद्धा आणि भक्ती यांच्या बळावरच सद्गुरूंच्या कृपेने अल्पकाळात अनक आध्यात्मिक अनुभूती प्राप्त होऊ शकतात आणि अद्वैत अनुभूतीपर्यंत पोचता येते. सद्गुरूंची कृपा झाली तरच सर्व गाठी सुटतात. मग ऐहिक जीवनाच्या कोलाहलात वावरत राहिले तरीही मन अविचलीत रहाते. प्रपंचचातच राहिले तरीही स्नेहसंबंध आणि कौटुंबिक नाती ऐहिकाच्या पलीकडे जातात आणि प्रपंच व परमार्थ यांचा उचित समन्वय घडून येतो. ही अवस्था केवळ सद्गुरू कृपेनेच मिळू शकते. ही अवस्था प्राप्त करून घेण्यासाठी श्रीदत्तमहाराजांचे 'विचारधन' हा एक सोपा सुलभ मार्ग आहे असा अनुभव अनेकांनी घेतला आहे.

भारतीय अध्यात्मधनासंबंधी अनेक पुस्तके विविध भाषांमध्ये उपलब्ध आहेत. त्या सर्वांमध्ये श्रीदत्तमहाराजांचे 'विचारधन'चे एक आगळे स्थान आहे.

म्हणूनच असे म्हणावेसे वाटते की श्रीदत्तमहाराजांचे 'विचारधन' भारतात सर्वत्र पोहोचले पाहिजे. सर्व भाषातून समाजाच्या सर्व स्तरात ते गेले पाहिजे. त्यामुळे भारतातील धार्मिक जीवनाला काही वेगळी दिशा मिळेल.

'विचारधन' व्यापक सर्वकष, समत्त्वयशील आणि मानवी जीवनाच्या मूळ हेतूला डोळयासमोर ठेवून प्रगटलेले आहे. निवृत्ती आणि प्रवृत्ती यांचा उचित समन्वय त्यात आहे. आजचे ऐहिक व सामाजिक व सांस्कृतिक प्रश्न लक्षात घेऊनच श्रीदत्तमहाराजांनी आपले विचार समाजापुढे मांडले आहेत हे तर खरेच आहे. त्याचबरोबर आपले सर्व विचार श्रीदत्तमहाराजांनी स्वतःच्या आचरणात आणून त्यांचे प्रात्यक्षिक आपल्यासमोर स्वतःच्या आचरणाच्या रूपाने ठेवले आहे हेही अत्यंत महत्त्वाचे आहे. त्यामुळे श्रीदत्तमहाराजांची विचारसरणी आपण आपल्या आचरणांत कशी आणायची हे त्यांच्या आचरणांतूनच आपल्याला प्रत्यक्ष पहायला मिळते. म्हणूनच श्रीदत्तमहाराज हे विसाव्या शतकांतील थोर आचार्य आहेत असे म्हणता येईल.

भारतीय तत्त्वज्ञानातील अमूर्त तत्त्वे व मूल्ये श्रीदत्तमहाराजांच्या जीवनांत सहज स्वरूपात प्रत्यक्ष आचरणात आली आहेत. म्हणूनच त्यांचे 'चरित्र आणि विचारधन' चिरंतनाच्या मार्गावर पुढे वाटचाल करण्यासाठी मानवी समाजाला दीर्घकाळ प्रेरणा देत राहणार आहे. सात्त्विकतेची जोपासना करीत समृध्द व

उन्नत जीवन जगावे आणि अनुभूतियुक्त पूर्णावस्थेकडे प्रवास करीत रहावे ही श्रीदत्तमहाराजांची शिकवण दीर्घकाळ तसे जीवन जगण्यासाठी प्रवृत्त करीत रहाणार आहे.

विचारधनमधील तत्त्वज्ञान केवळ भारतापुरते मर्यादित नाही. सर्व मानवजातीला उपयोगी पडेल अशी ही विचारसरणी आहे. म्हणूनच 'विचारधन'चे वर्णन विश्वधर्माचा संदेश (Universal Gospel) म्हणावे असे आहे. भारताची प्राचीन अध्यात्मिक संस्कृती श्रीदत्तमहाराजांच्या जीवनाच्या रुपाने पुन्हा एकदा विसाव्या शतकात साकार होऊन अवतरली आहे. हाही एक चमत्कारच आहे.

लोकांना शांती आणि समाधान देऊन मानसिक व अध्यात्मिकदृष्ट्या अधिक उन्नतीचे जीवन जगायला प्रेरणा देईल असे श्रीदत्तमहाराजांच्या विवेचनात खूप काही आहे. भाषा, वेष, पंथ, दैवत, धर्म, संप्रदाय, आचार आणि उपासनापध्दती यातील विविधता वरवरची आहे हे श्रीदत्तमहाराजांनी ठामपणे सांगितले आहे आणि त्यातील एकत्त्व स्पष्टपणे दाखवून या भेदांच्या पलीकडे जाण्याचा मार्गही दाखविला आहे. विश्वाच्या उत्पत्तीच्या क्षणाला स्पर्श करू पहाणाऱ्या नासदीय सुक्तापर्यंत पोहोचणारी प्रतिभेची झेप श्रीदत्तमहाराजांनी घेतली आणि प्राचीन काळातील ऋषींची उदात्त मंगल वाणी पुन्हा आजच्या भाषेत ऐकवली. म्हणूनच 'श्रीदत्तमहाराजांचे विचारधन' सर्वत्र दूरवर पोहोचले पाहिजे, अनेक भाषांतून जगभर सर्वत्र गेले पाहिजे.

सेंट पॉल व इतर शिष्यांनी अनेक यातनांना तोंड देऊन येशुख्रिस्ताचा संदेश जगात सर्वत्र पोहोचवला होता. स्वामी विवेकानंद आणि इतर शिष्यांनी श्रीरामकृष्ण परमहंसांचे विचारही जगात सर्वत्र पसरवले होते. तसेच काही येथेही ईश्वर इच्छेप्रमाणे घडावे असे अनेक लोकांना उत्कटतेने वाटते आहे. ईश्वराची तशी काही योजना असेल तर नियतीची पावले आपल्याला नकळत इष्ट ती गोष्ट घडवून आणण्याच्या दिशेने पडत रहातील.

प्रस्तुत पुस्तकाचे संकलक डॉ.शरद्चंद्र कोपर्डेकर हे महाराष्ट्रातील एक ख्यातनाम लेखक आहेत. औद्योगिक क्षेत्रात अठरा वर्षे डॉ.कोपर्डेकर यांनी

उच्च पातळीवर अधिकारी म्हणून काम केले असून सुमारे दोन दशके ते शिक्षणक्षेत्रांत कार्य करीत आहेत. शिक्षणक्षेत्रातील कार्याबद्दल त्यांना अनेक राज्य पुरस्कार व राष्ट्रीय पुरस्कारही प्राप्त झालेले आहेत.

डॉ.शरद्‌चंद्र कोपर्डेकर यांची ५५ पुस्तके प्रसिद्ध झालेली आहेत. त्यांतील ३५ पुस्तकें कॉमर्स, इकॉनॉमिक्स , मॅनेजमेंट वगैरे तांत्रिक विषयांवरील असून बहुतेक पुस्तकांच्या अनेंक आवृत्त्या निघत राहिल्या आहेत.बाकीची वीस पुस्तके अध्यात्मविषयावरील आहेत. त्यांनी लिहिलेली संतांची चरित्रे खूपच लोकप्रिय झालेली आहेत. तसेच ज्ञानेश्वरीचा त्यांचा व्यासंग मोठा असून त्यांनी लिहिलेले 'शिकवण ज्ञानेश्वरीची' हे पुस्तकही लोकप्रिय झाले आहे. पातंजल योगदर्शन या त्यांच्या पुस्तकांत त्यांनी सूत्रांचा भावार्थ सोप्या भाषेत दिला असून सर्वसामान्य साधकांसाठी सुबोध विवरण केले आहे. संत श्रीकृष्णदयार्णव यांच्या जीवनावरही ते कादंबरी लिहीत आहेत.

डॉ.कोपर्डेकर यांनी नुकतेच श्रीदत्तमहाराजांचे चरित्र लिहून प्रसिद्ध केले आहे. तसेच साधकांच्या प्रश्नांना श्रीदत्तमहाराजांनी दिलेली उत्तरे संकलीत करून ''श्रीदत्तमहाराज कवीश्वर यांचे विचारधन'' भाग-१, भाग-२ आणि भाग-३ अशी तीन पुस्तके प्रसिद्ध केलेली आहेत. या तीन पुस्तकांच्या मालिकेतील दुसरा भाग म्हणजे प्रस्तुतचे पुस्तक होय.

डॉ. कोपर्डेकर यांचे संत साहित्य मराठी अध्यात्मवाङ्‌मयाचे मोलाचे भूषण ठरले आहे. सर्वसामान्य लोकांचे प्रबोधन करणे. गुरूभक्ती वाढवणे आणि त्यांना प्रत्यक्ष साधना करण्यास प्रोत्साहन देणे हेच उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेवून डॉ.कोपर्डेकर यांनीही पुस्तके लिहिली आहेत.

डॉ. कोपर्डेकर यांना श्रीदत्तमहाराजांनी मंत्रदीक्षा, संकल्पदीक्षा, स्पर्शदीक्षा आणि चाक्षुषी दीक्षाही दिली आहे आणि त्यांचे अध्यात्मजीवन उजळून टाकले आहे. प.पू.सौ.ताईमहाराजांचीही अशीच कृपा त्यांना लाभली आहे.

गुरूकृपेने डॉ.कोपर्डेकर यांना ज्या अनुभूती प्राप्त झाल्या त्यांच्या सूचक खुणा त्यांच्या लिखाणात जागोजागी दिसतात. त्यामुळे साधकांना त्यांचे लिखाण उपयुक्त वाटते. त्यांच्या पुस्तकांमुळे साधकांना पारमार्थिक जीवन

जगण्यासाठी प्रेरणा मिळत आहे हे ईश्वरी कार्याचेच द्योतक आहेत. भगवान दत्तप्रभूच ही सेवा त्यांच्याकडून करून घेत आहेत.

श्रीदत्तप्रभू सर्वांचे मंगल करण्यास समर्थ आहेत. सर्वांचे कल्याण होवो अशी श्रीदत्तप्रभूंच्याचरणी प्रार्थना आहे.

भवदीय,

दत्तजयंती,
२२ डिसेंबर, १९९९

**(डॉ. अशोकमहाराज कवीश्वर)**

'रेणुका निवास',
प्लॉट क्र. १३, अत्रेय कॉलनी,
गोखले नगर चौक, गोखले नगर रोड,
शिवाजीनगर, पुणे - ४११ ०१६.
दूरध्वनी : ०२०-५६५ ८२५७.

# - मनोगत -

डॉ. शरद्चंद्र कोपर्डेकर

श्रीदत्तमहाराज कवीश्वर हे एक अलौकिक विभूतीमत्व होते. अशी विभूती शतकाशतकांतून एखाद्यावेळी जन्माला येते असे म्हटले तर त्यांत निश्चितच अतिशयोक्ती होणार नाही. त्यांच्या विभूतीमत्वाचे वेगवेगळे पैलू न्याहाळायला लागले म्हणजे शोभादर्शक (कॅलिडोस्कोप) पहात राहिल्यासारखे वाटते. अनेक गुणवैशिष्ट्ये दिसायला लागतात. श्रीदत्तमहाराजांजवळ वैदिक ऋषींसारखी शुचिता आणि पावित्र्य होते. शंकराचार्य स्वामीमहाराजांसारखे ते प्रज्ञावंत महाज्ञानी होते. श्रीज्ञानदेवासारखे ते ईश्वरकोटीचे निखळ संत होते. गुरूचरित्रांतील श्रीगुरूंसारखे आर्तांची दुःखे दूर करण्याचे पूर्ण सामर्थ्य त्यांच्याजवळ होते. त्यांचे हृदय गौतमबुद्धांप्रमाणे परमकारुणिक व दयाळुबुद्धीने ओतप्रोत भरलेले होते. चैतन्यमहाप्रभूंसारखे ते भावविभोर, भावतरल भक्त होते. ते भवभूतीसारखे प्रतिभाशाली तत्त्वज्ञही होते.

श्रीदत्तमहाराजांची ही वेगवेगळी रूपे पहाणाऱ्याला मोहून टाकतात आणि मग लक्षांत येते की त्यांच्या विभूतिमत्वात असे अनेक आणखी रंग होते, ज्यांना योग्य उपमेय सापडणेच कठीण जावे. असे अनेक अनोखे रंग आठवतात. प्रसिद्धीपासून दूर रहाण्याची आणि स्वतःला पूर्णतया झाकून घेण्याची त्यांची वृत्ती दुष्प्राप्य वाटावी अशी होती. श्रीदत्तमहाराज अनपेक्ष होते. इतके अनपेक्ष की इतरांपासून काही अपेक्षा करणे, स्वीकारणे ही वृत्तीच त्यांच्या स्वभावांतून नाहीशी झालेली होती. त्या जागी इतरांना कांही देण्यात आनंद मानण्याचा देवदुर्लभ गुण विराजमान झालेला होता. पण जे द्यायचे ते पूर्णतया निरपेक्षबुद्धीने. निरपेक्षपणे दुसऱ्यांना भरपूर द्यायचे आणि स्वतःच विसरून जायचे हा गुण अगदीच विरळा असतो. सज्जन-दुर्जन, सुष्ट-दुष्ट असे भेद न करता समोर येणाऱ्या प्रत्येकाला निरपेक्ष निर्भेळ प्रेम देणारी त्यांची अहेतुक दयाबुद्धी अगदी दुर्मिळतेने आढळणारी होती. आर्त व दुःखितांची दुःखे दूर करण्यातील त्यांची परमकारुणिक तत्परता ईश्वरकोटीतील म्हणावी अशी दुर्लभ होती. दुसऱ्यांचे दोषही गुणरूपाने पहाण्याची त्यांची अदोषदर्शी

वृत्ती तर त्याहून दुर्लभ होती. त्रास देणाऱ्या व्यक्तींवर अधिकच प्रेम करून त्यांच्यावरच जास्त जबाबदाऱ्या टाकण्याची त्यांची वृत्ती तर जवळजवळ अशक्यप्राय वाटावी अशीच होती. कोणी कसाही वागला, काहीही बोलला तरी ते त्याला समजून घेत राहिले आणि वत्सलतेने जवळ करून त्याला निखळ प्रेम देत राहिले. किती अलौकिक गुण सांगावे !

जन्मदात्र्या आईचे वर्णन 'प्रेमस्वरूप आणि वात्सल्यसिंधू' असं करतात. पण प्रत्यक्ष जन्मदात्री आईदेखील आपल्या लेकराचं मन इतकं चांगलं समजून घेणार नाही असं ते सर्वांना समजून घेत राहिले आणि सर्वांशी प्रेमाने वागत राहिले. जवळ आलेल्या प्रत्येकावर ते अपार वात्सल्याचा वर्षाव करीत राहिले. म्हणूनच एका अनामिक ओढीने लोक पुनःपुन्हा दर्शनाला येत राहिले. अशिक्षित आणि सुशिक्षित, सर्वसामान्य आणि उच्चपदस्थ, ग्रामीण आणि नागरी, अल्पवयीन कोवळे आणि अनुभवी वृद्ध .... सारेच पुन्हा पुन्हा येत राहिले. त्यांची बोलीभाषा जाणणारे आणि ती न जाणणारे अन्यवांशिक, अन्यधर्मीय आणि परदेशी लोकही येत राहिले. कारण श्रीदत्तमहाराज सर्वांशी जी भाषा बोलत होते ती भाषा शब्दांची नव्हतीच. ते प्रत्येकाशी संपर्क साधत होते तो शब्दांच्या माध्यमांतून नव्हता, मानवी इंद्रियांच्या पातळीवरील नव्हता.

श्रीदत्तमहाराजांचे दर्शन घेतांना असे वाटायचे डोळ्यांनी दिसणाऱ्या रूपापेक्षा वेगळे काहीतरी अरूप असे काही आपण पहातो आहोत. त्यांचे शब्द ऐकतांना असे वाटायचे की कानांनी आपण जे ऐकतो, त्यापेक्षा वेगळे काही ऐकतो आहोत. त्यांच्या सहवासात असा एक सुगंध जाणवायचा जो नाकाने आपण घेतलेल्या सर्व सुगंधांपेक्षा वेगळा वाटायचा. त्यांच्या चरणांना स्पर्श केला नाही तरीसुद्धा त्यांच्यासमोर जाताच असे वाटायचे की अशा एका पावित्र्याचा आपल्याला स्पर्श झाला आहे, जो देहाने आपण घेऊ शकणाऱ्या सर्व स्पर्शांपलीकडचा आहे.

म्हणूनच श्रीदत्तमहाराजांचे दर्शन घेतांना असे वाटायचे की आपल्या पाचही इंद्रियांच्या पलीकडील एक अनुभूती आपल्याला मिळाली आहे. अरूप, अनाद, अस्पर्श, अनाम, अगंधित असे खूप काही अनुभवले आहे असे वाटायचे. मानवी इंद्रियांनी न जाणता येणारे मानवी इंद्रियांच्या पातळीपलीकडे

असलेले काहीतरी आपल्याला मिळाले असे वाटायचे.

श्रीदत्तमहाराज प्रत्येकाशी अतींद्रिय पातळीवर संपर्क साधायचे. आपल्याला माहिती असलेल्या कोणत्याही भाषेतील शब्दांचा वापर न करता, मानवी इंद्रियांनी जाणता न येणाऱ्या एका इंद्रियातीत पातळीवर ते आपल्याशी संपर्क साधत होते, आपल्या अंतर्मनांत बदल घडवून आणत होते; आणि आपले मन स्वच्छ करीत होते, शुद्ध करीत होते, मनांतील विकार दूर करीत होते आणि पावित्र्य, शुचिता यांची तेथे प्रतिष्ठापना करीत होते. श्रीदत्तमहाराजांचे दर्शन घेतल्यावर पाप व ताप यांचे निवारण व्हायचे, दुःखे व क्लेश नाहीसे व्हायचे, वासना व विकार कमी कमी होत जायचे, एका आंतरिक शांतीचा अनुभव मनाला यायचा. असंख्य लोकांनी त्यांचे दर्शन घेतांना ही अनुभूती घेतली आहे.

श्रीदत्तमहाराजांचे दर्शन घेतांना वाटायचे, एका अपार असीम शांतीसागराच्या किनाऱ्यावर येऊन आपण उभे राहिलो आहोत. त्या सागरावरून येणाऱ्या वाऱ्याच्या सुखद लहरींचा अनुभव घेतो आहोत. त्या शांतीसमुद्राच्या किनाऱ्यावरील लाटांत प्रवेश करतो आहोत. पवित्र पावन झाल्याचा अनुभव घेतो आहोत.

श्रीदत्तमहाराजांचे दर्शन घेतल्यावर संसारांतील दुःखे, अडचणी, त्रास या सगळ्यांचा विसर पडायचा आणि हळुहळु लक्षात यायचे की सांसारिक अडचणी दूर होताहेत, साधनेतील प्रतिबंध दूर होत आहेत. श्रद्धेने जो जो जवळ आला त्याला त्याला श्रीदत्तमहाराजांनी प्रेमाने जवळ घेतले आणि त्याच्यावर मायेचा वर्षाव केला. जवळ घेतलेल्या सर्वांचे पाप व ताप त्यांनी निवारण केले, शोक व रोग दूर केल आणि परमार्थमार्गावर त्यांना पुढे पुढे नेले. असंख्य लोकांना सातत्याने असे अनुभव येत राहिले. अनेकांना दिव्य अनुभूतीही प्राप्त झाल्या. विज्ञानाने ज्याचे स्पष्टीकरण होऊ शकणार नाही असे अनुभव असंख्य लोकांना प्रापंचिक जीवनांतही आले आणि पारमार्थिक जीवनातही आले.

श्रीदत्तमहाराजांची अनेक चरित्रे प्रसिद्ध झाली आहेत हे खरे आहे. तथापि ही सर्व चरित्रे अपूरी आहेत. श्रीदत्तमहाराजांचे संपूर्ण चरित्र आज कोणालाच

ज्ञात नाही. श्रीदत्तमहाराज कोणकोणत्या गावांना गेले, कोणकोणत्या भक्तांच्या सांसारिक अडचणी दूर केल्या, कोणकोणत्या साधकांच्या साधनेतील प्रतिबंध दूर केले, कोणकोणत्या आर्तांची कणव येऊन त्यांची दुःखे दूर केली. कोणाकोणाला काय काय अतींद्रिय अनुभूती दिल्या, परमार्थमार्गावर कोणा कोणाला कसे पुढे नेले, हे सगळं त्यांनी स्वतः कधीच कोणाला सांगितले नाही आणि आता तर ते स्थूल देहानेही आपल्यात नाहीत. गावोगाव हिंडून सर्व संबंधितांना भेटून ही माहिती गोळा करणे अशक्यप्रायच. शिवाय सद्गुरूंनी आपल्याला कसे सहाय्य केले हे अनेक भक्तांना कळलेही नाही आणि सद्गुरूंनी त्यांना तसे सांगितलेही नाही. त्यामुळे आता त्यांचे संपूर्ण चरित्र प्रसिद्ध होणे अशक्यच आहे.

श्रीदत्तमहाराजांकडून विधीवत् दीक्षा घेतलेले शिष्य दहा हजारांहून अधिक असावेत. त्यांचे मार्गदर्शन दीर्घकाळ घेतलेले भक्त व साधक संख्येने त्याहून कितीतरी अधिक आहेत. दर्शन घेऊन गेलेले तर असंख्य. त्यातले बरेचसे लोक श्रीदत्तमहाराजांना पत्रे लिहून आलेले अनुभव प्रांजळपणे निवेदन करीत. श्रीदत्तमहाराजांनी वासुदेवनिवासमध्ये उत्तराधिकारीपद ग्रहण केल्यावर पत्रांची संख्या वाढतच गेली. गेल्या कांही वर्षात तर वासुदेवनिवास येथे आणि रेणुकानिवास येथे रोज दहा पंधरा तरी पत्रे असायचीच. एका अंदाजाप्रमाणे गेल्या पंचवीस वर्षात श्रीदत्तमहाराजांना आलेल्या पत्रांची संख्या लाखाच्याजवळ जाईल असे सांगतात.

श्रीदत्तमहाराजांना आलेली सगळी पत्रे सांभाळून ठेवणे अशक्यच होते. पण वासुदेवनिवासमध्ये विश्वस्तांनी जतन करून ठेवलेली पत्रेही चार पोत्यांहून अधिक आहेत असे म्हणतात. श्रीदत्तमहाराजांन आलेली सर्व पत्रे केवळ श्रीदत्तमहाराज स्वतःच वाचत आणि उत्तरेही स्वतःच आपल्या हस्ताक्षरांत लिहीत. श्रीदत्तमहाराजांना आलेली पत्रे व त्या पत्रांना पाठवलेली उत्तरे त्यांच्याशिवाय दुसरे कोणी बहुधा वाचत नसावे. उत्तरांच्या प्रतीही कोणी ठेवलेल्या नाहीत.

अलिकडे वासुदेवनिवासमध्ये श्रीदत्तमहाराजांना आलेली कांही पत्रे विश्वस्तांच्या संमतीने वासुदेवनिवासी साधकांनी वाचली. तेव्हा त्यांना आढळले

की अनेक पत्रांत लिहिलेले अनुभव थक्क करणारे आहेत. विज्ञानाचे नियम मोडीत काढणाऱ्या घटना अनेकांनी लिहिल्या आहेत. साधनेतील अनेक अनुभव अलौकिक म्हणावे असेच आहेत.

ही पत्रे वरवर चाळली तरी लक्षात येते की साधनेतील कोणतेही प्रतिबंध दूर करण्याचे, परमार्थ मार्गावर साधकांना वेगाने पुढे पुढे नेण्याचे व दिव्य अनुभूती देण्याचे सद्गुरुरूपाचे सामर्थ्य श्रीदत्तमहाराजांच्या ठायी पूर्णत्वाने होते. तसेच सांसारीकांच्या अडचणी व दुःखे दूर करण्याचे ईश्वरी सामर्थ्यही त्यांच्याजवळ पूर्णत्वाने होते.

एखादा बुद्धीवादी म्हणेल- "हे विज्ञानाच्या नियमांत बसत नाही. मानवी इंद्रियांना प्रयोगशाळेत तपासून पहाता येत नाही. ही सगळी अंधश्रद्धा आहे. या अतिरंजित दंतकथा आणि भाबड्या कहाण्या आहेत. निव्वळ योगायोगही असतील".

गुरूचरित्रावर असे आक्षेप घेणारे आहेतच की ! गुरूचरित्र खरे कां मानायचे नाही? श्रीदत्तमहाराजांना येणाऱ्या पत्रांतील अनुभव खरे कां मानायचे नाहीत? पत्रे लिहिणारे बहुसंख्य सुशिक्षित आहेत, काही उच्चपदस्थ व उच्चविद्याविभूषितही आहेत. अशी पत्रें सातत्याने हजारोंच्या संख्येत येत राहिली आहेत. ही अंधश्रद्धा कां मानायची? विज्ञानाला जाणून न घेता आलेल्या अतींद्रिय शक्ती कां मानायच्या नाहीत? संतमहात्मे सांगताहेत ते कां मानायचे नाही? केवळ बुद्धीवादी व विज्ञानवादी यांचेच म्हणणे कां मान्य करायचे? केवळ विज्ञानवाद हा खरा बुद्धीवाद आहे असे कसे म्हणायचे? संतमहात्म्यांचे अतींद्रिय पातळीवरील अनुभव बुद्धीवादच नाही कां? संतमहात्मे तर अनपेक्ष आहेत, सर्वभूतहितेरतः आहेत, सर्वसंकल्पसंन्यासी आहेत. माझ्यासारखा एखादा श्रद्धावंत म्हणेल, " संतमहात्मे सांगताहेत तोच खरा बुद्धीवाद आहे. कारण ते करुणा व दयाबुद्धीने सांगताहेत, आर्तांचा कळवळा येऊन आमच्याच हितासाठी सांगताहेत."

श्रीदत्तमहाराजांना आलेली पत्रे वाचून त्यावरून एखादा एकविसाव्या शतकातील "सरस्वती गंगाधर" पुन्हा एकदा "गुरूचरित्र" लिहू शकेल, जे भारताचे भूषण ठरू शकेल आणि जगांत सर्वत्र शांतीचा वर्षावही करत राहू शकेल.

श्रीदत्तमहाराजांचे संपूर्ण चरित्र आता उपलब्ध होणे शक्य नाही. परंतु आपल्या सर्वांच्या भाग्याने आज ''विचारधन'' या तीन भागांत प्रसिद्ध झालेल्या पुस्तकांमध्ये श्रीदत्तमहाराजांचे आंतरिक चरित्र आहे. ज्ञानेश्वरी हे ज्ञानदेवांचे आंतरिक अनुभव आहेत आणि म्हणून ते त्यांचे आंतरिक चरित्र आहे. तुकाराममहाराजांची 'अभंगगाथा', समर्थांचा 'दासबोध' आणि कृष्णदयार्णवांचा 'हरिवरदा' हे ग्रंथ त्या संतांची आंतरिक चरित्रेच आहेत. स्वतः त्यांनी जे अनुभवले ते त्यांनी या ग्रंथांतून प्रांजळपणे निवेदन केले आहे. स्वतःला कीर्ती, मानमान्यता मिळावी, अर्थलाभ व्हावा म्हणून त्यांनी हे वाङ्मय निर्माण केले नाही. ज्या मार्गाने ते गेले आणि शाश्वत, सुख - समाधान व आनंद त्यांनी स्वतः मिळवला आहे, तो मार्ग या आपल्या ग्रंथातून ते आपल्या सर्वांना दाखवत आहेत. आम्ही सामान्य लोकांनी त्या मार्गाने वाटचाल करून खरा आनंद व सुख मिळवावे म्हणूनच त्यांनी आपले ग्रंथ लिहिले आहेत. श्रीदत्तमहाराजांचे विचारधन तीन भागांत त्याच हेतूने आपल्या सर्वांसाठी अवतीर्ण झाले आहे.

'श्रीदत्तमहाराज कवीश्वर - चरित्र आणि विचारधन' या चरित्रग्रथांची सातवी आवृत्ती आता प्रसिद्ध झाली आहे. सहाव्या आवृत्तीपर्यंत जी प्रश्नोत्तरे त्यांत समाविष्ट होती, ती आता पृष्ठसंख्येच्या मर्यादेमुळे वेगळी काढली असून उरलेली कांही प्रश्नोत्तरे त्यांत समाविष्ट केली आहेत.

श्रीदत्तमहाराजांचे चरित्र व विचारधनचे तीन भाग या चारही पुस्तकांना सौ.ताईमहाराजांचे आशीर्वाद लाभले आहेत. या चारही पुस्तकांचे अंतर्बाह्य स्वरूप सौ.ताईमहाराजांच्या संकल्पनेला साजेसे व्हावे यासाठी जास्तीत जास्त दक्षता घेतली आहे. प्रस्तुत पुस्तकाच्या प्रकाशनाला विलंबही खूप झाला. याला कारण म्हणजे येणाऱ्या अनंत अडचणी. केवळ सौ.ताईमहाराज खंबीरपणे पाठीशी उभ्या राहून सर्व संबंधितांना आंतरिक बळ पुरवीत राहिल्या, सर्व कार्य सुरळीत करून घेत राहिल्या, म्हणूनच या चार पुस्तकांचे कार्य पूर्णत्वाला जाऊ शकले ही वस्तुस्थिती आहे.

ही चार पुस्तके प्रसिद्ध झाली, दूरवर सर्वत्र गेली आणि वाचकांच्या पसंतीला उतरली हे ईश्वरी कार्याचेच द्योतक आहे. यां संपूर्ण कार्यात माझे

कांहीही कर्तृत्व नाही. विचारधनमध्ये एक साधक प्रश्न विचारतो आणि सद्गुरू उत्तरे देतात असे दृष्य दिसते. परंतु हे प्रश्न मी विचारलेले आहेत असे मला मुळीच वाटत नाही. अध्यात्मज्ञान पुन्हा एकदा प्रकट करावे हा श्रीदत्तमहाराजांचाच संकल्प होता. तो त्यांनी पूर्ण केला. प्रश्नही त्यांचेच आहेत व उत्तरेही त्यांचीच आहेत. सौ.ताईमहाराजांच्या संकल्प होता म्हणून प्रस्तुत चार पुस्तकांना सांप्रतचे ''स्वरूप'' प्राप्त झाले व ती सर्वत्र पोचली. या संपूर्ण कार्यातील संकल्पशक्ती, ज्ञानशक्ती व कर्मशक्ती श्रीदत्तमहाराज व ताईमहाराज या दोघांचीच आहे. मला त्यांनी निमित्त केले हेच माझ्या जीवनाचे एकमेव फलीत आहे.

श्रीदत्तमहाराज व सौ.ताईमहाराज यांनी मला या ईश्वरी कार्यासाठी निमित्त केले, यांत माझे कर्तृत्त्व कांहीच नाही. उंच डोंगरावरच्या मंदिरांत भगवंताची मूर्ती वाहून नेण्यासाठी एखादा हमाल किंवा एकादा घोडा बरोबर घेतात आणि त्याच्या पाठीवर मूर्ती ठेवून वर घेऊन जातात. समोर जे हमाल किंवा घोडे उभे असतात त्यांच्यापैकी एकाला त्या कामासाठी निवडतात. प्रसंगी एखादा रेडा किंवा गाढवही ती मूर्ती डोंगरावर वाहून नेऊ शकते. मूर्ती गाढवावरून वर नेत असतांना सर्वजण आदराने नमस्कार करतात तो त्या मूर्तीला असतो. मूर्ती वाहणाऱ्या वाहकाला नव्हे. याची पूर्ण जाणीव माझ्यासारख्या निमित्तमात्र केलेल्याने ठेवावी हेच उचित.

सद्गुरू श्रीदत्तमहाराज सर्व ऐश्वर्यसंपन्न श्रीयुक्त आहेत. शरणागतांचे पाप व ताप दूर करण्याचे आणि पतितांचा उद्धार करण्याचे सामर्थ्य त्यांच्याजवळ पूर्णत्वाने आहे. आम्हा श्रोत्यांची तेच सावली आहेत. आर्तांची तेच माऊली आहेत. आम्हा सांसारीकांचा तेच खरा आधार आहेत, खरी गती आहेत. त्यांची चरणधूळी श्रद्धेने मस्तकी धारण करणारा परमपदाला जाईल, त्यांचे चरणतीर्थ श्रद्धेने सेवन करणारा ब्रह्मपद पावेल एवढा श्रीदत्तमहाराजांचा महिमा आहे.

श्रीदत्तमहाराजांच्या या महिम्याची जाणीव मला झाली खरी. परंतु या जन्मी देहाने श्रीदत्तमहाराजांपासून दूरच रहावे लागले. काही दास्य- सेवा माझ्या हातून घडलीच नाही. कारण दास्य-सेवा मिळण्यासाठी लागणारे पुण्यबळ माझ्याजवळ नव्हते.

श्रीदत्तमहाराजांचे बाह्यरूप आता अंतर्धान पावले असल्यामुळे या जन्मी त्यांची दास्यसेवा आता मला मिळण्याची आशा राहिलेली नाही. म्हणून एवढेच म्हणावेसे वाटते की सद्गुरूंनी माझ्यावर कृपा करावी आणि माझ्या सर्व दुरितांचा व दुष्कृतींचा भार दूर करावा. केवळ पुण्यकर्मेच माझ्या हातून घडावीत. मात्र त्या पुण्यकर्मांचे फळ म्हणून ऐहिक वैभव, उच्च पद असे काही मिळू नये. ते पुण्यबळ श्रीदत्तमहाराजांची दास्यसेवा मिळण्याइतके होईपर्यंत साठतच रहावे.

श्रीदत्तमहाराज पुन्हा जेव्हा देहाने अवतीर्ण होतील, तेव्हा त्यांची सेवा मिळण्याएवढे पुण्यबळ साठलेले नसले तर श्रीदत्तमहाराजांनी मला या जन्मासारखे दूर ठेवू नये. त्यांच्या निवासस्थानाच्या प्रांगणांत एखादा निरुपद्रवी किडा - मुंगी म्हणून कुठेतरी मला वास्तव्य करू द्यावे. श्रीदत्तमहाराज तेथे देहाने वावरत असतांना दुरून मला त्यांचे दर्शन घेता यावे आणि त्यांची पावले जेथे उमटली आहेत त्या धुळीमध्ये लोळण घेण्याचे भाग्य तरी मला मिळावे. तसे घडले तरी सर्व काही मला मिळाले, मी भरून पावलो असेच मला वाटेल.

**डॉ. शरद्चंद्र कोपर्डेकर**

दत्तजयंती,
२२ डिसेंबर, १९९९

६०१, मेरीलॅन्ड कॉर्नर,
डॉ.आंबेडकर रोड, सायन सर्कलजवळ,
सायन (पूर्व), मुंबई-४०० ०२२.
दूरध्वनी-४०७ २३६८/४०७ २९१५

# - प्रकाशकाचे मनोगत -

*श्याम कोपर्डेकर*

श्रीदत्तमहाराज कवीश्वर यांचे विचारधन भाग - २ हे पुस्तक प्रकाशित करतांना आम्हाला आनंद वाटतो आहे. श्रीदत्तमहाराज कवीश्वर यांचे चरित्र आणि त्यांनतर श्रीदत्तमहाराजांच्या 'विचारधन' या पुस्तकाचे तीन भाग अशी एकूण चार पुस्तके आंम्ही प्रकाशित केली आहेत. या पुस्तकांना जो वाचकांचा उत्तम प्रतिसाद मिळाला त्याचे मुख्य कारण म्हणजे श्रीदत्तमहाराजांचे विभूतीमत्व आणि त्यांच्याबद्दल भारतात सर्वत्र लोकांच्या मनांत असलेला पूज्य भाव.

आधुनिक काळात विज्ञानवाद आणि बुध्दीवाद यांना महत्त्व प्राप्त झाले आहे. ते अयोग्य आहे असे नाही. तथापि माणसाला पाच इंद्रियांच्याद्वारे जेवढे आकलन होते तेवढेच खरे मानायचे असा बुध्दीवाद जो काही लोक मांडतात तो बरोबर नाही असे आम्हाला वाटते. माणसाला पाच इंद्रियांच्याद्वारे आकलन होत नाही असे खूप काही या जगात आहे. अतींद्रिय शक्ती निश्चितच आहेत. अनेक अतींद्रिय अनुभव लोकांना सातत्याने येतात ही वस्तुस्थिती आहे. अध्यात्म शास्त्राची उभारणी अशा अतींद्रिय शक्तींवरच झालेली आहे.

पाश्चात्य जगात अनेकजण अतींद्रिय गोष्टी मानत नाहीत. त्याला ते लोक बुध्दीवाद म्हणतात. सुदैवाने भारतात हा असला बुध्दीवाद तितकासा रुजलेला नाही ही आनंदाची गोष्ट आहे. भारतात अगदी प्राचीन काळापासून अतींद्रिय शक्ती मानलेल्या आहेत. इंद्रियांपलीकडील गोष्टींबद्दल आत्यंतिक श्रध्दाभाव आहे, म्हणूनच हजारो वर्षे भारतात वैदिक ऋषींचा आध्यात्मिक वारसा श्रध्दापूर्वक जतन केला गेला आहे. दिव्यगुण आणि दिव्य अनुभव यांनी युक्त असलेले थोर महापुरुष भारतात सतत अवतीर्ण होत आले आहेत हेच याचे एकमेव कारण आहे. या महापुरुषांच्या अद्‌भूत अनुभूती आणि अलौकिक शक्ती भारतीय लोकांना अनेक वेळा प्रत्यक्ष पहायला मिळाल्या आहेत. त्यामुळेच भारतीय जीवन प्राचीन काळापासून अध्यात्मिकतेच्या खंबीर पायावर उभे राहिलेले आहे. थोर अवतारी महापुरुषांच्या उपदेशाप्रमाणे धर्माचा प्रत्यक्ष लाभ करून घेण्यासाठी भारतीय लोक नेहमीच उत्सुक राहिले आहेत. ईश्वरलाभ

करून घेणे हे जीवनाचे ध्येय आहे असेच लोक मानत आले आहेत. या ध्येयाला अनुसरूनच भारतीय समाजात अनेक प्रथा आणि रूढी निर्माण झाल्या आहेत आणि शतकानुशतके श्रध्देने त्यांचे पालन होत आहे. म्हणूनच आजही भारतीय अध्यात्म आणि धार्मिक विचार इतके सजीव आणि प्रभावी राहिले आहेत. परकीयांची आक्रमणे, परकीयांचे राज्य आणि विज्ञानाची अफाट प्रगती यामुळे आमच्या आध्यात्मिकतेला जराही धक्का पोहोचलेला नाही ही समाधानाची गोष्ट आहे असे आम्हाला वाटते.

भारतातील अध्यात्म ज्या थोर महापुरुषांमुळे असे जिवंत राहिले त्या महापुरुषांच्या मालिकेतील अगदी अलिकडचे एक तेजस्वी रत्न म्हणजे श्रीदत्तमहाराज कवीश्वर. श्रीदत्तमहाराज कवीश्वर हे विसाव्या शतकांत अवतीर्ण झालेले थोर संत, तत्वज्ञ, आणि योगी आहेत. भारतात सर्वत्र त्यांच्या विभूतिमत्वाबद्दल पराकोटीचा आदरभाव आहे. त्यामुळे आम्ही प्रकाशित केलेल्या श्रीदत्तमहाराज कवीश्वर - चरित्र आणि विचारधनच्या भागांना वाचकांचा असा उत्तम प्रतिसाद मिळाला नसता तरच नवल! अशा थोर विभूतीची सेवा आमच्या हातून आणि आमचे बंधू डॉ.शरद्चंद्र कोपर्डेकर यांच्या हातून घडली याचा आम्हाला अत्यंत आनंद वाटतो.

'विचारधन'मधोल श्रीदत्तमहाराजांच्या विवेचनाला वेदान्ताचा खंबीर पाया आहे हे सर्वांना माहितीच आहे. साधकांच्या प्रश्नांना उत्तर देतांना श्रीदत्तमहाराजांनी वेदान्तातील तत्त्वज्ञानच सोप्या भाषेत मांडले आहे. आजच्या सुशिक्षित तरुणांनाही कळेल आणि आवडेल अशा आधुनिक विचारशैलीच्या स्वरूपात वेदान्तातील तत्त्वज्ञान 'विचारधन'मध्ये प्रगटलेले दिसते. वेद व उपनिषदे यातून आत्मज्ञानाची अमृतधार सतत वहात आहे. हीच अमृतधार नवे रूप घेऊन श्रीदत्तमहाराजांच्या जीवनांत आणि त्यांनी प्रतिपादन केलेल्या तत्त्वज्ञानात प्रगटलेली आहे.

विचारधनमध्ये ज्ञान, कर्म, भक्ती आणि योग याचे तर्कशुद्ध विवेचन आह हे खरे आहे. तथापि सामान्य माणसाच्या दृष्टीने श्रीदत्तमहाराजांनी भक्ती शास्त्राच्या विवेचनावर अधिक भर दिला आहे. अद्वैत भक्ती, ज्ञानी भक्ताची अवस्था, सगुणावरील संतांचे प्रेम आणि ईश्वरनामाचे महात्म्य

'विचारधन'च्या अभ्यासाने चांगले समजून येते. त्यामुळे वेदान्त तत्त्वज्ञानाचेही स्पष्ट आकलन होण्यास मदत होते.

आजचे वैज्ञानिक विश्वाच्या बाह्य बाजूचा आणि इंद्रियांना समजणाऱ्या दृष्य अंगाचाच प्रामुख्याने अभ्यास करतात. परंतु वैदिक ऋषींनी विश्वातील अदृश्य अतींद्रिय अंगावरही कसे चिंतन केले आणि त्यामागील शाश्वत व प्रेरक तत्त्व कसे शोधून काढले हे विचारधनच्या अभ्यासाने चांगले समजून येते. वेदान्तामध्ये प्रतिपादन केलेल्या आत्मवस्तूचा अनुभव कोणालाही येऊ शकतो आणि त्यामुळे शाश्वत आनंदाची प्राप्ती होऊ शकते असे वैदिक ऋषींनी सांगितले आहे. सर्व संत तेच सांगत आहेत. श्रीदत्तमहाराजांनीही 'विचारधन'मध्ये तेच पुन्हा सांगितले आहे.

श्रीदत्तमहाराजांनी वेदान्त दर्शनातील अनुभूतींचा अनुभव स्वतः घेतला आहेआणि वेदान्ताचे मर्म स्वतःच्या आचरणांत पूर्णपणे आणून वेदान्ताचे जिवंत उदाहरण आजच्या जगापुढे ठेवले आहे. मनुष्य, जग आणि ईश्वर या त्रयींचे मूळ स्वरूप व त्यांचा परस्परसंबंध यावर वेदान्तदर्शन झगझगीत प्रकाश टाकते. तसेच खरा आनंद विज्ञानाने कां मिळत नाही आणि खरा आनंद मिळवण्यासाठी धर्माचरणाचाच मार्ग का अवलंबावा लागतो हेही श्रीदत्तमहाराजांनी स्पष्ट करून सांगितले आहे.

तत्त्वज्ञानाच्या सिद्धांताचे बौधिक पातळीवर संपूर्ण आकलन झाल्याशिवाय सद्गुरूंच्या विधानातील खरा अर्थ साधकाला उमजत नाही. अनुभव तर त्याहून कितीतरी दूरच असतो. म्हणूनच श्रीदत्तमहाराज सांगायचे की साधकाने बौद्धिक पातळीवरून अध्यात्म समजून घेण्याचा प्रयत्न करू नये. हे श्रीदत्तमहाराजांचे प्रतिपादनही अत्यंत महत्त्वाचे आहे.

पाश्चात्य संस्कृतीतील चंगळवाद आणि भोगवादाचे भारतीय समाजावर विशेषतः तरुणांवर फार मोठे आक्रमण होत आहे. त्यामुळे ऐहिकातील इंद्रिय भोगांबद्दल सर्वच भारतीयांना, विशेषतः तरुणांना, एक प्रकारचा मोह पडत आहे असे दिसते. या मोहापासून भारतीयांना वाचवायचे असेल तर श्रीदत्तमहाराजांच चरित्र आणि 'विचारधन' भारतात सर्वत्र पोचले पाहिजे. विज्ञानयुगाच्या आहारी जाऊन भारताने आपले अध्यात्मधन गमावता कामा

नये. जगाला देण्यासारखे असे भारताजवळ असे केवळ अध्यात्मधनच आहे. म्हणूनच श्रीदत्तमहाराजांच्या प्रबोधनाचा प्रकाश भारतभर पसरला आणि भारताच्या सीमा ओलांडून जगातील अनेक देशात गेला तर मानवी समाज जीवनाला एक वेगळी उंची प्राप्त होऊ शकल आणि सात्त्विकतेची जोपासना होऊन विज्ञानयुगातही श्रीदत्तमहाराजांची वाणी सर्वत्र शांतीचा शिरकावा करीत राहील. त्यामुळे माणसाच्या मनातील मालीन्य कमी होत जाईल आणि मानवी जीवनाला खरा अर्थ प्राप्त झाल्यासारखे वाटेल असे आम्हाला वाटते.

श्रीदत्तमहाराजांचे विचार जनसामान्यापर्यंत सर्वत्र पोहोचले तर त्यामुळे भारतातील धार्मिक जीवनाला काही निराळी दिशा मिळेल आणि या समाजाचे पुनरुत्थान अल्पकाळात घडून येईल असेही म्हणावेसे वाटते. त्यामुळे असंख्य लोकांना खऱ्या मन:शांतीचा लाभ होऊ शकेल.

मानवी जीवनात दु:खे येतच रहाणार. ते कोणालाही टाळता येणार नाही. अशा दु:खाच्या प्रसंगी माणसाच्या मनाला दिलासा देणे, शांती देणे हे केवळ अध्यात्मामुळेच घडू शकते. खूप धन व सुखसाधने मिळवून आणि संपन्नता मिळवूनही माणसाला जी पोकळी जाणवते, जो रितेपणाचा अनुभव येतो, जी विमनस्कता सोसावी लागते, ती दूर करण्याचा एकमेव मार्ग म्हणजे अध्यात्म हाय. निराशा, अपयश आणि प्रिय व्यक्तींचा विरह निर्माण करणाऱ्या प्रसंगातही मनुष्य खंबीरपणे उभा राहू शकतो तो केवळ अध्यात्मामुळेच. हजारो वर्षे अनेक आक्रमणे आणि आघात होत राहिले तरीही भारतीय संस्कृतीतील आध्यात्मिक विचारधारा टिकून राहिली आहे आणि जगात सर्वत्र बुद्धिवाद्यांच्याही आकर्षणाचा विषय होत राहिली आहे याचे कारण भारतीय अध्यात्मशास्त्रांतील शाश्वत व चिरंतन गाभा हेच आहे. त्यामुळे विज्ञानयुगाने प्रभावित झालेली तरुण पिढीही जगात सर्वत्र भौतिकतेचा हव्यास सोडून देऊन मन:शांतीसाठी भारतीय अध्यात्माकडे आशेने पहात आहे. श्रीदत्तमहाराज अवतीर्ण झाल्यामुळे ती आशा नव्या तेजाने उजळून निघाली आहे.

श्रीदत्तमहाराजांनी सनातन विचारधारा आणि आधुनिक जीवन यांची योग्य सांगड घातली आहे. आध्यात्मिक जीवनाचे ऐहिक जीवनाशी असलेले

अविभाज्य नाते श्रीदत्तमहाराजांनी आधुनिक तरुणांच्या मनावर उचित शब्दात योग्यप्रकारे ठसविले आहे. नीतिमूल्ये, जीवनमूल्ये, सांस्कृतिक मूल्ये आणि आध्यात्मिक मूल्ये यांचा योग्य प्रमाणात एकात्म स्वरूपात स्वीकार केला पाहिजे हे त्यांनी लोकांपुढे उचित शब्दांत प्रभावीपणे मांडले आहे. नीतितत्त्वांचे अनुसरण करणे, मन विशाल आणि उन्नत बनविण्यासाठी अधिकाधिक प्रयत्न करीत रहाणे, दुःखितांबद्दल करूणा बाळगणे आणि चर आणि अचर सर्वांबद्दलच प्रेमभाव बाळगणे किती आवश्यक आहे हे सांगून श्रीदत्तमहाराज थांबत नाहीत ते कसे करावे म्हणजे आध्यात्मिक अनुभूती येतात आणि आत्मज्ञान प्राप्त होऊन पूर्णावस्थेकडे माणसाचा प्रवास सुरू होतो हे श्रीदत्तमहाराजांनी सोप्या शब्दात आपल्यापुढे मांडले आहे. जीवनाची वाटचाल करताना भौतिक उन्नती साधत असतांनाच आध्यात्मिक उन्नतीही कशी साधावी हे श्रीदत्तमहाराजांनी अगदी सोप्या शब्दांत आपल्यापुढे मांडले आहे. त्यामुळे श्रीदत्तमहाराजांचे जीवन आणि कार्य साऱ्या मानवजातीसाठी आहे असेच म्हणावे लागेल. म्हणूनच विचारधनमध्ये संकलन केलेले प्रश्न आणि त्या प्रश्नांना श्रीदत्तमहाराजांनी दिलेली उत्तरे त्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाची आहेत असे आम्हाला वाटते.

श्रीदत्तमहाराजांनी दिलेली उत्तरे कांही ठिकाणी विस्तृत आहेत तर कांही उत्तरे मोजक्या शब्दांत, थोडक्यात दिलेली आहेत. तथापि या सर्वच उत्तरांतून श्रीदत्तमहाराजांच्या आत्मानुभवाच्या खुणा जागोजागी प्रकट झालेल्या दिसतात.आपल्या पूर्वायुष्यात श्रीदत्तमहाराजांनी वेद, पुराणे, उपनिषदे, भागवत, महाभारत, इत्यादी शास्त्रग्रंथांचा सखोल अभ्यास केलेला आहे. तथापि, ''तैसी दशेची वाट न पाहता । वयसेचिया गावा न जाता । बाळपणीच सर्वज्ञता । वरी तयात।।'' या ज्ञानेश्वरीतील सुप्रसिद्ध ओवीमध्ये वर्णन केल्याप्रमाणे बालपणापासूनच श्रीदत्तमहाराज स्वतः पूर्णपुरुष आहेत. पातंजल योगसूत्रांत भगवान पंतजलीनी सांगितलेली ऋतंभराप्रज्ञा आणि ज्ञानेश्वरीमध्ये श्रीज्ञानेश्वरमहाराजांनी सांगितलेली सिद्धप्रज्ञा श्रीदत्तमहाराजांना बालपणापासूनच प्राप्त आहे. त्यामुळे श्रीदत्तमहाराजांचे मन बालपणापासूनच विद्यासंपन्नच होते असे दिसते. त्यामुळेच

श्रीदत्तमहाराजांच्या वागण्यातून व बोलण्यातून त्यांच्या आध्यात्मिक अनुभूती सतत प्रकट झालेल्या दिसतात. साधकांच्या प्रश्नांना त्यांनी दिलेल्या उत्तरांमध्ये त्यांच्या सिद्धप्रज्ञेची आणि अनुभूतींची प्रभा अनेक ठिकाणी प्रकटलेली दिसते.

श्रीदत्तमहाराजांच्या शिकवणुकीत भौतिक विकास व आध्यात्मिक विकास यांचा समन्वय आहे. प्रत्येकाला सुख हवे असते आणि आनंद हवा असतो. हा आनंद मिळावा म्हणून लोक देहसुखाच्यामागे लागतात. परंतु देहसुखाच्या साधनाने मिळणारा आनंद क्षणिक असतो. खरे सुख किंवा शाश्वत आनंद बाहेरच्या परिस्थितीवर, जीवनांतील घटनांवर किंवा भोवतालच्या व्यक्तींच्या वागण्याबोलण्यावर अवलंबून नसतो. खरा आनंद आपल्या अंतरंगातच असतो. स्वानंद किंवा खरा आनंद हेच आपले मूळ रूप आहे. अंतरंगातच तो अनुभवता येतो. म्हणूनच ज्ञानीमहात्मा प्रतिकूल परिस्थितीतही आणि देहसुखाची साधने जवळ नसतांनाही अत्यंत सुखी असतो असे श्रीदत्तमहाराज सांगतात. धर्माचरणाने न्याय मिळेलच असे नाही, लौकीक यश आणि संपत्ती मिळेलच असेही सांगता येत नाही. पण धर्माचरणाने खरा आनंद व खरे समाधान निश्चितपणे मिळू शकते. म्हणूनच कितीही वैज्ञानिक प्रगती झाली तरी मानवी जीवनांत धर्मभावना अत्यंत आवश्यक आहे असे श्रीदत्तमहाराज सांगतात. सर्वांनाच अंतर्मुख करतील असे हे विचार आहेत.

गृहस्थाश्रमी माणसालाही संसार सांभाळून व दैनंदिन कर्तव्ये उत्तमप्रकारे पारपाडून अद्वैत अनुभूती घेता येते आणि मुक्त होता येते असे श्रीदत्तमहाराज सांगतात आणि त्यासाठी गृहस्थाश्रमी माणसाने कोणती साधना करावी याचेही विवेचन करतात. परमार्थ मार्गावरील एका टप्प्यावर साधक आला म्हणजे सर्व जग नाहीसे झाल्याचा जो अनुभव येतो त्याचेही सविस्तर विवेचन श्रीदत्तमहाराजांनी केले आहे. सर्व गृहस्थाश्रमी साधकांना हे विवेचन मार्गदर्शक वाटेल असा आम्हाला विश्वास वाटतो.

**'दिगंबरा दिगंबरा श्रीपादवल्लभ दिगंबरा ।'** या मंत्रामध्ये केवढा मोठा अर्थ भरला आहे याचे सविस्तर विवेचन श्रीदत्तमहाराजांनी केले आहे.



श्रीदत्तमहाराज
जालना येथे संध्यावंदन
करताना



सौ. आईसाहेबांची तुला
श्रीवासुदेवनिवास येथे
झाली त्यावेळी
सौ. आईसाहेबांची
सहस्त्रचंद्रदर्शन शांती
(८१ वर्षे)
हा सोहळा होता.



श्रीदत्तमहाराज
श्रीवासुदेव निवासमधील
औदुंबराखाली बसलेले
असताना



श्रीदत्तमहाराज
जालना येथे
भक्तमंडळी समवेत
प्रसाद घेतेवेळी

श्रीशंकराचार्यमहाराजांनी सांगितलेल्या अद्वैत अनुभूतीची अवस्था या मंत्रात अभिप्रेत आहे आणि ती अवस्था मला प्राप्त व्हावी अशी प्रार्थनाही या मंत्रात केलेली आहे. हे विवेचनही साधकांना अत्यंत उद्बोधक वाटेल असे आम्हाला वाटते.

तत्त्वज्ञान विषयक प्रश्नांची उत्तरे देतांना श्रीदत्तमहाराजांनी वापरलेली तर्कशुद्ध विवेचनपद्धती अतिशय सप्रमाण व प्रभावी आहे. त्यामुळे श्रद्धेचा अभाव असलेल्या नास्तिकालाही श्रीदत्तमहाराजांचे विवेचन अंतर्मुख करते. मोकळ्या मनाने विचार करणाऱ्या प्रत्येक व्यक्तीला भक्ती आणि स्वधर्म याकडे ओढण्याचे सामर्थ्य श्रीदत्तमहाराजांच्या विवेचनांत आहे हे खरे आहे. तथापि विचारधनमध्ये संकलित झालेल्या श्रीदत्तमहाराजांच्या विवेचनाचे महत्त्व यापेक्षा अधिक आहे. त्यांच्या विवेचनांत सनातन शास्त्रांचे सारच प्रकटले आहे. वेद, उपनिषदे व पुराणे या प्राचीन ग्रंथांतील आध्यात्मिक तत्त्वज्ञानाचे सार श्रीदत्तमहाराजांनी आजच्या बोली भाषेत साधकांना समजेल अशा पद्धतीने सोप्या शब्दांत मांडले आहे.

साधकांच्या मनांत येणाऱ्या जवळजवळ सर्व शंका व अडचणी यांची उत्तरे श्रीदत्तमहाराजांनी दिलेली आहेत. अध्यात्मसाधनेबद्दल विवेचन करतांना त्यांनी आधुनिक काळांतील सामाजिक व सांस्कृतिक जाणीवांचे सतत भान ठेवलेले आहे. आजच्या काळात आध्यात्मिक मार्गावर वाटचाल करू पाहणाऱ्या साधकांना त्यांनी येणाऱ्या अडचणींतून कसा मार्ग काढावा हे सांगितले आहे. आध्यात्मिकक्षेत्रांत नेहमी वापरल्या जाणाऱ्या अनेक पारिभाषिक संज्ञांचा अर्थ श्रीदत्तमहाराजांनी आजच्या साधकांना समजेल अशा सोप्या भाषेत सांगितला आहे. संतांच्या अनेक वचनांचा व अभंग पंक्तींचा भावार्थ समजावून सांगितला आहे. ज्ञानेश्वरीतील काही ओव्यांचा गुढार्थ त्यांनी सांगितला आहे. विशेषतः -

> "करणे का न करणे । हे आघवे तोचि जाणे ।
> विश्व चळतसे जेणे । परमात्मेनि ॥"

या श्रीज्ञानेश्वरीच्या बाराव्या अध्यायातील सुप्रसिद्ध ओवीचा श्रीदत्तमहाराजांनी सांगितलेला गूढार्थ चिंतनशील साधकांचे संपूर्ण जीवन

पालटू शकेल असा आहे आणि म्हणूनच साधकांना तो विशेष मोलाचा वाटेल.

श्रीशंकराचार्यांच्या वाङ्मयांतील व उपनिषदांतील काही गूढ वचनांचा श्रीदत्तमहाराजांनी सांगितलेला भावार्थही असाच साधकांना अनमोल वाटेल. "ब्रह्म सत्य, जगन्मिथ्या ।" या सुप्रसिद्ध वचनावर श्रीदत्तमहाराजांनी केलेले भाष्य साधकांना खूपच आवडेल असे आम्हाला वाटते. म्हणूनच विचारधन पुस्तकाचा हा दुसरा भागही मुमुक्षुंना कामधेनूसारखाच वाटेल असा आम्हाला विश्वास वाटतो.

'श्रीदत्तमहाराजांची अनेक वाक्ये सूत्रमय आहेत. साधकांना या सूत्रमय वाक्यांचे पुनःपुन्हा चिंतन करावेसे वाटेल. त्यांतील मर्म लक्षात येण्यासाठी ती पुनःपुन्हा वाचावी व मनन करावे असे साधकांना वाटेल. 'विचारधन'मधील काही सूत्रमय वाक्यांमागील अनुभूती प्रत्यक्ष घेता आली तर साधकांना धन्य झाल्यासारखे वाटेल.

साधकांच्या शंकांचे निवारण करतांना श्रीदत्तमहाराजांनी अनेक प्रमाण वचने आणि अनुभवांतून आलेले सिद्धांत सोप्या शब्दांत मांडले आहेत. आत्मसाक्षात्काराच्या प्रक्रियांवर त्यांनी सर्वसामान्य माणसालाही समजेल असे विवेचन सोप्या भाषेत केले आहे. श्रीदत्तमहाराजांचे विवेचन जात, धर्म, संप्रदाय, पंथ इत्यादी कुंपणे ओलांडून पलीकडे जाते. श्रीदत्तमहाराजांचे शब्द त्यांच्या स्वतःच्या अनुभूतीतून आलेले आहेत. म्हणूनच आत्मानुभवाची प्रभा त्यांच्या विवेचनांत अनेक ठिकाणी प्रकटलेली दिसते. वेद व उपनिषदे या सनातन ग्रंथात प्रकट झालेल्या आध्यात्मिक अनुभूती आजही स्वतः कशा घेता येतील याचे श्रीदत्तमहाराजांनी आजच्या बोलीभाषेत केलेले विवेचन हे या ग्रंथाचे प्रमुख वैशिष्ट्य आहे. आत्मसाक्षात्काराच्या प्रक्रिया व आध्यात्मिक क्षेत्रातील अनेक गूढरहस्ये यावर श्रीदत्तमहाराजांच्या उत्तरातून चांगला प्रकाश पडतो. ज्ञान आणि भक्तीचा तर या पुस्तकांत सुकाळच झालेला आहे. अध्यात्म मार्गावर पुढे जाऊ इच्छिणाऱ्या आणि परमपदाला पोहोचण्याची इच्छा असलेल्या साधकांनाही 'विचारधन'मधून अत्यंत उपयुक्त मार्गदर्शन मिळेल. आत्मसत्ता

माझ्यात कशी विलसत आहे याचा अनुभव साधकांना देण्याचे सामर्थ्य श्रीदत्तमहाराजांच्या विवेचनांत आहे. म्हणूनच प्रस्तुत पुस्तकालाही मराठी वाचकांचा उत्तम प्रतिसाद मिळेल असा विश्वास आम्हाला वाटतो.

या पुस्तकाला डॉ. अशोकमहाराज कवीश्वर यांची मर्मग्राही व अभ्यासपूर्ण प्रस्तावना लाभली हे या पुस्तकाचेही भाग्य आहे आणि संकलक व प्रकाशक यांचेही भाग्य आहे अशी आमची धारणा आहे.

डॉ. अशोकमहाराज कवीश्वर यांना आम्ही प्रस्तावना लिहिण्याची विनंती करताच त्यांनी ती मान्यही केली आणि अल्पकाळात अत्यंत अभ्यासपूर्ण प्रस्तावना लिहून आमच्याकडे पाठवली याबद्दल वाटणारा आनंद आणि डॉ.अशोकमहाराजांबद्दल वाटलेला कृतज्ञताभाव शब्दांत व्यक्त करणे अशक्यच आहे. आमच्या भावना शब्दातीत आहेत.

महाराष्ट्रातील थोर संत श्रीकृष्णदयार्णव यांच्या चरणी हे पुस्तक अर्पण केले आहे. हे पुस्तक संतशिरोमणी श्रीकृष्णदयार्णव यांना अर्पण करण्यात मोठेच औचित्य साधले गेले आहे असे आम्हाला वाटते. श्रीदत्तमहाराज कवीश्वर यांच्या मनांत श्रीकृष्णदयार्णव यांच्याप्रती आत्यंतिक श्रद्धाभाव व प्रेम होते हे त्याचे एक महत्त्वाचे कारण आहे. शिवाय श्रीकृष्णदयार्णव यांनी 'हरिवरदा' या ग्रंथांत भक्तीशास्त्राचे जे विवेचन केले आहे त्याचे स्वरूप श्रीदत्तमहाराजांनी भक्तीशास्त्रासंबंधी केलेल्या विवेचनाशी खूपच जुळणारे आहे. या दोन्ही संतपुरुषांमध्ये एक आगळा आंतरिक भावबंध असावा असे आम्हाला वाटते. म्हणूनच श्रीकृष्णदयार्णव यांना हे पुस्तक अर्पण केल्याने आता सूक्ष्म देहांत गेलेल्या श्रीदत्तमहाराजांना निश्चितच आनंद वाटेल असे आम्हाला वाटते.

प्रस्तुत पुस्तकाचे अध्यात्मक्षेत्रांतील अनन्यसाधारण महत्त्व लक्षांत घेऊन व आमच्या बंधूंची श्रीदत्तमहाराजांच्या चरणी असलेली आत्यंतिक निष्ठा जाणून आम्ही हे पुस्तकही सेवाभावी मूल्य ठेवून वितरीत करीत आहोत.

इंद्रायणी साहित्य प्रकाशन
ओंकारेश्वर मंदिरासमोर,
२७३, शनिवार पेठ, पुणे ३०.

**श्याम कोपर्डेकर**

॥ श्रीगुरुःशरणम् ॥

# - ऋणनिर्देश -

माझ्या इतर पुस्तकांप्रमाणेच याही पुस्तकाच्या लेखनकार्याचे सचिवपद माझ्या पत्नी सौ. पौर्णिमा कोपर्डेकर यांनी उत्तमप्रकारे सांभाळले. श्री.भाऊसाहेब वाकडे आणि श्री. अजितराव कवीश्वर यांचे मार्गदर्शन व उत्तेजन असल्यामुळे हे काम पूर्णत्वाला जाऊ शकले हे मुद्दाम नमूद करावेसे वाटते. सर्वश्री शरद्चंद्र भालेराव, विद्याधर फडके, प्रसाद पाटणकर, संतोष चाटुफळे , नाराणराव दाते, रघुनाथ सुर्वे, रविंद्र सुंभे, संदीप केळकर, कु. रत्नमाला शेडगे, अपर्णा कवटकर, स्वप्ना चित्राव यांची मदत असल्यामुळेच पुस्तकाचे अंतर्बाह्य स्वरूप श्रीदत्तमहाराजांच्या कार्याला साजेसे ठेवणे शक्य झाले. श्री. अविनाश भोपटकर यांनी श्रीदत्तमहाराजांची विविध चित्रे या पुस्तकासाठी उपलब्ध करून दिली. या चित्रांचा समावेश झाल्यामुळे या पुस्तकाचे मोल खूपच वाढले आहे. श्री. सुनील महाशब्दे यांनी निर्मिती व छपाईची व्यवस्था चोख सांभाळली. माझे बंधू श्री. श्यामराव कोपर्डेकर यांनीही हे पुस्तकही मोठ्या उत्साहाने आकर्षक स्वरूपात प्रकाशित केले आणि माझ्या सद्गुरूंच्या चरणांप्रती असलेल्या भावना लक्षात घेऊन सेवाभावी मूल्यही ठेवले आणि सेवाभावी वृत्तीने ते सर्वत्र मोठ्या प्रमाणावर वितरीतही केले याबद्दल वाटणारा आनंद शब्दात व्यक्त करणे कठीण आहे. श्री. महेश खाजगीवाले - श्रीपद्मा पब्लिसिटी यांनी जाहिरातींची व्यवस्था चोख सांभाळली. त्यामुळे या पुस्तकाची माहिती अनेक वाचकांपर्यंत पोचू शकली.

सर्वांची सेवा सद्गुरूचरणी रूजू झालेली आहे. सर्वांचे कल्याण होवो ही सद्गुरूचरणी प्रार्थना.

**डॉ. शरद्चंद्र कोपर्डेकर**

# विचारधन भाग - २ (विभाग 'अ')

*(श्रीदत्तमहाराज कवीश्वर यांना साधकांनी विचारलेले प्रश्न आणि श्रीदत्तमहाराजांनी दिलेली उत्तरे यांचे संकलन)*

***प्रश्न : महाराज, साधकाने धनाचा संग्रह करू नये असे कांहीजण सांगतात.***

उत्तर : धनामध्ये आसक्त व्हायचं नाही. आसक्ती हा दोष आहे. धनाचा संग्रह करायचाच नाही असं कसं चालेल? स्वतःला, समाजाला, राष्ट्राला त्या धनाचा उपयोग झाला पाहिजे.

संग्रह जर फक्त स्वतःकरताच केला तर तो दोष आहे. धन कितीही मिळालं, कितीही संग्रह झाला तरी मनाचं समाधान होत नसेल तर तो दोष आहे. हे मी मिळवलेलं आहे, हे मांझं एकट्याचं आहे अशी बुद्धी असेल तर तो दोष आहे. मी प्रयत्न केलेला आहे, यांत कुणाचाही संबंध नाही, ही बुद्धी दोष आहे.

एकेक वेळेला तर नुसता संग्रह करतात. स्वतःही त्याचा उपभोग घ्यायचा नाही, इतरांनाही द्यायचा नाही. फक्त संग्रह करून ठेवायचा. संग्रह दुसराच कोणी घेऊन जातो आणि उपभोगतो.

घ्यायचं आणि द्यायचं लोकांना, याकरिता धनाचा संग्रह करणे दोष नाही. संग्रह माझ्या एकट्याकरताच आहे ही बुद्धी सोडली म्हणजे संग्रह करणे हा दोष होत नाही. संग्रह दानाकरता आहे ही वृत्ती पाहिजे. आसक्ती ठेवून संग्रह केला तर दुःख होते. अकिंचन वृत्ती पाहिजे. संग्रह असला काय आणि नसला काय?

***प्रश्न : महाराज, काहीजण सांगतात, साधकाने गृहस्थाश्रम स्वीकारु नये. साधकाच्यादृष्टीने ग्रहस्थाश्रम स्वीकारणे दोष आहे.***

उत्तर : गृहस्थाश्रम स्वीकारणे हा दोष नाही. संसारात आसक्ती व ममता वाढली तर तो दोष आहे. हे माझं आहे अशी आसक्ती माणसानं कोठेही ठेवू नये. माझी पत्नी, माझी मुलं, माझं धन अशी आसक्ती असेल तर मनुष्य अडकतो. आसक्ती व ममता यामुळे विनाश होतो. संसारांत आसक्ती नसेल तर संसारात राहणे हा दोष नाही.

देहाचे सुख स्वर्गात, नरकांत आणि मृत्यूलोकांत सगळीकडे सारखंच आहे. त्या सुखाची इच्छा करून ते मिळवण्यासाठी प्रयत्न करणं बरोबर नाही. 'प्रयत्नाशिवाय सुख मिळेल' असा सिद्धांत अवधूत सांगतात. दुःखाकरता कोणी प्रयत्न करतो का? मी आजारी पडावं, मला ताप यावा यासाठी कोणी प्रयत्न करतो कां? पण आजारपण येते, ताप येतो. दुःख प्रयत्न न करता मिळतं. त्याचप्रमाणे सुखही मिळणे शक्य आहे. दैव याला म्हणतात. पूर्वीचं कर्म असेल तशी सुख-दुःखं मिळतात. पुर्वकर्माचे पाप असले की जसं दुःखं मिळते, तसं पूर्वकर्माचं पुण्य असले की सुखही मिळणे शक्य आहे. तेवढे धैर्य पाहिजे. आपल्याजवळ तेवढं धैर्य नसतं.

जे मिळेल ते घ्यावे. मनांत संतोष असावा. माझं पूर्वकर्म चांगले असेल तर सुख मला बसल्या जागी मिळेल. मी प्रयत्न न करताही मिळेल. ही वृत्ती असली पाहिजे. प्रारब्धाने जे मिळेल त्यांत संतुष्ट असावे, प्रसन्न चित्त असावे.

गांभीर्य पाहिजे. उतावीळपणा उपयोगाचा नाही. समृद्धी आली तरी कांही नाही. त्याबद्दल अहंकार नाही. सगळी समृद्धी गेली तरीही कांही नाही. असं गांभीर्य भगवदभक्तालाच शक्य आहे. हर्षही नाही. विषादही नाही. आत्मानंदाकडेच लक्ष आहे. तो आत्मानंद मिळविण्याचा प्रयत्न आहे. जितक्या आशा व वासना मनांत उत्पन्न होतील तितकं दुःख आहे. वासना कमी कमी होऊन अंतःकरण पूर्ण निर्वासन होणे हेच खरं सुख आहे.

***प्रश्न : महाराज, साधकाने दुसऱ्या साधकाची संगती करावी काय? साधना सर्वांच्याबरोबर करावी का एकट्याने करावी?***

उत्तर : चार मंडळी एका ठिकाणी राहून साधन करू लागली की मतभेद होतात, कलह होतात. म्हणून चार मंडळींनी मिळून साधनाभ्यास करू नये म्हणतात. अगदी दोघेजणच जरी असले तरी गोष्टी बोलण्यांतच वेळ जातो. मला असा अनुभव आला. त्याला तसा अनुभव आला. साधन बाजूलाच राहतं. असंग रहावं. एकट्यानेच साधनाभ्यास केला तर मन लवकर स्थिर होतं. मनाची एकाग्रता अधिकाधिक वाढली पाहिजे. म्हणजे मनातले सगळे दोष जातात.

मन स्थिर झालं म्हणजे पूर्ण शांती प्राप्त होते. मन इतकं एकाग्र झालं

पाहिजे की बाहेरच्या कोणत्याही गोष्टीकडे लक्ष जाता कामा नये. मनाची योग्यता जितकी वाढवावी तेवढी वाढते आणि श्रेष्ठता प्राप्त होते. सत्वगुण विकसित झाला, मनोजय झाला की आपोआप प्राणजय होतो. म्हणून साधकाने नेहमी असंग रहावे, मनाने सदैव एकांतातच असावे असे सांगतात.

***प्रश्न : महाराज, संसारात राहूनही मनाने असंग रहाता यावे म्हणून आम्ही काय करावं?***

उत्तर : अनात्म गोष्टी बाजूला कराव्या. आत्मानंदाचं चिंतन करावं. त्यामुळे मन स्थिर होतं. मगच साक्षात्कार होतो. जीवभाव नाहीसा होऊन ईश्वरभाव त्याला प्राप्त होतो. ध्यानाचा हा प्रभाव आहे. जो ध्यास आपण घेतो तसा अनुभव येतो. आत्मानंद प्राप्त होण्याकरतां अखंड त्याचं चिंतन झालं पाहिजे. मन या अनात्म वस्तू पासून बाजूला झालं पाहिजे.

संतमहात्म्यांनी आपल्या ग्रंथातून सगळं स्पष्टीकरण केलेलं आहे. वर्णधर्म, आश्रमधर्म, लिंगधर्म जे आहेत त्याचं ईश्वरार्पण बुद्धीत जो आचरण करेल, त्याचं चित्त शुद्ध होतं. द्वैतबुद्धी जी आहे, भेदबुद्धी जी आहे, ती गेली पाहिजे.

***प्रश्न : महाराज आम्हाला जे दुःख भोगावे लागते ते कशामुळे ? आमच्याच कर्मामुळे का इतरांनी दुःख दिले म्हणून?***

उत्तर : कोणी दुःखं दिले हे कसे सांगायचे? कर्मांनी दुःख होते अस लोक म्हणतात. दुर्जन दुःख देतात असेही कोणी म्हणतात.

***प्रश्न : महाराज, सत्कर्म करण्याचे महत्व एवढे का सांगतात?***

उत्तर : सत्कर्म - चांगली कर्म केली तर त्यांचे फळ मिळते हे कलीयुगाचे महात्म्य आहे.

***प्रश्न : महाराज, गृहस्थाश्रमी साधकाने कसे वागावे?***

उत्तर : गृहस्थाश्रमांत साधकाने कसे वागावे ते भागवतात सांगितले आहे.

भागवतकार म्हणतात, गृहस्थाश्रमी माणसाने ईश्वरार्पण बुद्धीने संत सज्जनांची सेवा करावी. भगवत् चिंतन, चरित्र, कथा वारंवार ऐकाव्या. आतून विरक्ती निर्माण व्हावी. गृहस्थाश्रमात अनुमोदन देण्याची वृत्ती फार चांगली.

संघर्ष होण्याचे टळतात. अधिक संग्रह करू नये. द्रव्य चांगल्या कामाकरिता खर्च करावे. भाद्रपद महिन्यात वाडवडिलांचे स्मरण करून श्राद्ध करावे.

संतोष वृत्तीने राहाणाऱ्याला जे समाधान मिळते ते इतर कोणालाही मिळत नाही. संसारात राहून आपल्या परिवाराचेच फक्त पोषण करणे व त्याकरिता नीती अनीतिचा विचार न करणे हेही एक पाप आहे. ते पाप करू नये. शरीर, मन, वाणी यांनी वाईट कृत्य करू नये.

द्रव्य हे एकट्याचेच नसते तर सर्वांकरिता असते अशी भावनातरी ठेवावी. मी मोठा, माझे सर्व धन अशी वृत्ती असू नये. एकदा त्याग बुद्धी निर्माण झाली कि सर्वांचा विश्वास संपादन करता येतो.

कोणालातरी मारण्याने, रागावण्याने राग शांत होतो. पण लोभ म्हणजे असमाधान काही शांत होत नाही. याकरिता सद्गुरुंच्या ठिकाणी भक्ती असावी लागते. तरच हे मनातील सर्व दोष दूर होतात.

***प्रश्न : महाराज, लोक म्हणतात आमच्या सुधारलेल्या जगात धर्माचरणाचा काय उपयोग आहे?***

उत्तर : धर्माचे पालन व्हायला पाहिजे. धर्मपालनाने समाजाचे - जगाचे रक्षण होत असते. निव्वळ शरीर भोगाची भावना व त्या भावनेचे अनुयायी वाढत राहिले तर समाधानवृत्तीचा नाश होईल.

समाजाच्या आणि व्यक्तीच्या सुसंगत विकासासाठी आणि समाजजीवन आणि व्यक्तिजीवन यांच्या स्थैर्यासाठीच ईश्वराने धर्मशास्त्र निर्माण केले आहे. भावना अवस्थाप्रमाणे धर्मशास्त्राचे व्यापकत्व उत्तरोत्तर विशाल होत गेले आहे. त्या त्या भूमिकेवर राहणाऱ्या लोकांना तो तो धर्म आहे. ही भावना दृढ करावी, धर्मानुकूल वृत्ती ठेवावी, धर्मशास्त्र पालन करीत वागावे. असे वागले म्हणजेच वैयक्तिक जीवनांत शांती आणि समाधान लाभेल आणि समाजजीवनही स्थिर राहील, सुरक्षित राहील आणि संस्कारीत राहील.

***प्रश्न : महाराज, क्षेत्रक्षेत्रज्ञविवेक म्हणजे काय?***

उत्तर : देहाला क्षेत्र असे नांव दिले आहे. देहापेक्षा आत्मा वेगळा आहे. आत्मा हा क्षेत्रज्ञ आहे. हे समजून घ्यावयाचे आहे.

शरीरापेक्षा मी वेगळा आहे हे समजून घेणे याला क्षेत्रक्षेत्रज्ञविवेक म्हणतात. आपण शरीराशी इतके तादात्म्य होऊन गेलो आहोत की, शरीर म्हणजेच मी असेच समजून आहोत. त्यामुळे शरीराच्या जन्माच्या पूर्वी काही नाही आणि नंतरही काही नाही अशीच आपली बुद्धी संकुचित होऊन रहाते. शरीराचा नाश झालेला आपण पहातो. प्रत्यक्ष डोळयांनी ते दिसते म्हणून मान्यही करावे लागते. म्हणजे शरीर विनाशी आहे मानावेच लागते. तरीसुद्धा शरीर मी आहे ही भावना काही कमी होत नाही.

ही भावना कमी होण्यासाठी त्यांनी 'शरीरापेक्षा मी वेगळा आहे' ही दुसरी भावना सांगितली आहे. हा तत्व सिद्धांत आहे. हे विचारांती बुद्धीला पटू शकते. पण हा सैद्धांतिक विचार बुद्धीमध्ये स्थिर राहू शकत नाही. काही क्षण हा विचार स्मशान वैराग्यासारखा बुद्धी मान्य करते. पण दुसऱ्या क्षणी याचा विसर पडतो.

शरीर म्हणजे मी नाही असे म्हटल्यांनतर शरीराचा संबंधही आपल्याला सोडायला लागतो. हे पटल्याशिवाय आणि पटूनही पक्के झाल्याशिवाय बुद्धीचा निश्चय होत नाही. शरीरापेक्षा आपण वेगळे आहोत. काही काळानंतर आपल्याला शरीराचा संबंधसुद्धा तोडणे अपरिहार्य आहे. हे जे नित्यस्मरण म्हणजे क्षेत्रक्षेत्रज्ञविवेक.

***प्रश्न : महाराज, क्षेत्रक्षेत्रज्ञविवेक मिळावावा असे कां सांगतात?***

उत्तर : ईश्वराचे दर्शन व्हावे, त्याची कृपा व्हावी यासाठी तळमळ लागली पाहिजे. ईश्वर भक्तीची ओढ वाटली पाहिजे.

मी शरीर आहे अशी कल्पना दृढ झाल्यामुळे फुलाची माळ शरीराला घातली तर वाटते ''मला माळ घातली !'' आणि या कल्पनेने समाधानही होते. आपल्याला कोणी अपशब्द बोललेले तर देहाला बोललेले असतात. पण समजतो तो मलाच अपशब्द बोलला आणि आपण लगेच असंतुष्ट होतो. ही देहात्म बुद्धी पक्की असल्याने असे वाटत असते. हे शरीराशी तादात्माचे लक्षण आहे. शरीराला उद्देशून स्तुती झाली. निंदा झाली की माझी निंदा झाली, असं सारखं चालू असते. मनाचा क्षोभ-प्रसन्नता यावर अवलंबून आहे.

ज्यांना 'क्षेत्रक्षेत्रज्ञविवेक' झाला आहे त्यांचे अशा गोष्टीकडे लक्षही जात नाही. "मानापमानयोस्तुल्यः" असे ते रहात असतात. निर्विकार अवस्था हे ज्ञानाचे महत्त्व आहे. हे ज्ञान मिळविण्याकरिता साधनेचा अभ्यास करीत राहिले पाहिजे. साधन मार्गात निरंतर राहिल्याने हळूहळू आपली बुद्धीही दोषरहित होते. दैवी संपत्ती हे गुण संपादन करता येतात. एखाद्या ज्ञानी महात्म्याची गाठ पडून जास्तीतजास्त मार्गदर्शन मिळून विकास होतो.

ज्ञानी मडंळी ईश्वराचे स्वरूप केवढे मोठे आहे ते सांगतात. तो विश्वरूपी आहे. त्याचे स्वरूप म्हणजे विश्व आहे. त्यात केवळ मानवच येतील असं नाही. मानव आहेत त्याचप्रमाणे पशुपक्षीही त्याचीच स्वरूपे आहेत. ही वृत्ती या ज्ञानी मंडळींच्या अंतःकरणात उत्पन्न झाल्यामुळे त्यांचा आणि अहंकाराचा काहीही संबंध नाही. म्हणून त्यांची वृत्ती निरभिमान झालेली असते. त्यांच्या वृत्तीत अहंकार कधी पहायलासुद्धा मिळत नाही. अहंकार हा दोष पार गेला तर परमेश्वराच्या कृपेने संसारसागरातून तरून जाता येते असे सर्व संतमहात्मे सांगतात.

***प्रश्न : महाराज, पूर्वीच्या काळी अनेक ऋषीमुनी, संतमहात्मे जंगलात जाऊन तपश्चर्या करायचे. कुणी फलाहार करून रहायचे तर कुणी गवत, पाने वगैरे खाऊन रहायचे. कुणी केवळ पाण्यावरही रहायचे आणि कोणी अगदी निराहार राहूनही तपश्चर्या करायचे. अशा अनेक कथा आहेत. अशी तपश्चर्या करणे कसे काय शक्य होते?***

उत्तर : सगळी भूमिका तयार असली, निर्भयता असली म्हणजे पूर्वसुकृतानुसार अनेकांनी अरण्यात जाऊन अशी तपश्चर्या केलेली आहे. शुकाचार्यांनी त्यांच्या तपश्चर्येचे वर्णन केले आहे.

ईश्वराची आराधना करायची तर पाचही कोषांपासून बाजूला झाले पाहिजे. अन्नमय कोष, प्राणमय कोष, मनोमय कोष, विज्ञानमय कोष आणि आनंदमय कोष. या सगळ्या कोषांपासून बाजूला झाले पाहिजे. केवळ ईश्वराबद्दल तळमळ अंतःकरणात उत्पन्न झाली पाहिजे. देह राहिला तरी हरकत नाही, गेला तरी जाऊ दे इतकी सारी तयारी झालेली असली म्हणजे सद्गुरूंच्या कृपेने अशी तपश्चर्या होते.

अरण्यात कोण जेवायला घालणार? अन्न तर नाहीच. अरण्यात अन्नाचा आहार शक्य नाही. केवळ फळांचा आहार घ्यायचा. मनाचा तेवढा निग्रह झालेला असला पाहिजे. शास्त्रकार सांगतात, कोणाचाही आहार हित, मित आणि पवित्र असावा. परिमित आहार शरीराला व्यवस्थित राखू शकतो. अरण्यात काही कुस्ती वगैरे व्यायाम करायची नाहीए. अंतःकरण शांत असले म्हणले झाले. त्या अंतःकरणाच्या शांत स्थितीमध्ये ईश्वराचे ध्यान करायचे, प्राणायाम, जप, नामस्मरणादि साधन करायचे आहे. मनाच्या समाधानामुळे, केलेल्या निग्रहामुळे चार दिवस, आठवडा, एक महिना उलटून गेला तरी ईश्वराचे दर्शन झाले नाही म्हणून मनामध्ये काही निराशा उत्पन्न झाली नाही पाहिजे. हेही मोठे आहे. सद्गुरूकृपेने ही सगळी साधनं मिळावी लागतात. मानस शुद्धी झालेली असली म्हणजे तपश्चर्या सोडून देण्याचे विचार मनात येत नाहीत. आपण इतके निराहार राहिलो, एक महिनाभर काही खाल्ले, प्यायले नाही असे वाटतही नाही. आपले अनंत जन्म गेलेले आहेत. त्या दृष्टीने महिना म्हणजे काय आहे? किती आहे? केवढा काल आहे? इतके जन्म आपण घालवले त्याची काही आपल्याला कल्पना नाही. पण त्या करता निराशा नाही. जो मार्ग आपल्याला सद्गुरूंनी सांगितलेला आहे त्या मार्गाने आपल्याला जायचे आहे. फल पदरात पडेपर्यंत साधन चालू ठेवायचे, एवढाच निश्चय आहे. अमुक इतक्या दिवसांत झाले पाहिजे असे म्हणायचा आम्हाला तरी काय अधिकार आहे? आमच्या साधनाची शुद्धी किती? काय? आम्ही वर्णन करून उपयोग नाही.

फळे मिळाली तरी मिळाली. नाहीतर फक्त झाडाची खाली पडलेली पाने तेवढी खायची. ध्यान, धारणा, पूजा व्यवस्थित करीत रहायचे. मूर्तीची पूजाही करायची आणि ईश्वरभावना धारण करून ईश्वराची मूर्ती मनांत आणून मानसिक पूजा, ध्यान करीत रहायचे. परिमित आहार घेतल्यामुळे किंवा निराहार राहिल्यामुळे ग्लानी येणे वगैरे मनाचीच अवस्था आहे. इतका आहार पुरे म्हटला नंतर पुरे झाला पाहिजे इतकी मनाची जर समाहित स्थिती झाली, समाधानी स्थिती झाली तर त्या माणसाला हे काही अशक्य नाहीये.

तृणपर्ण वगैरे खाऊन तपश्चर्या केली तर त्याचा प्रभाव इतका असतो की मानसिक शक्तीचा विकास होऊन सर्व चराचर विश्वाचे ज्ञान त्यांना बसल्या ठिकाणी होऊ शकते.

सद्गुरूकृपेने मनाचा निग्रह वाढत गेला आणि ईश्वरदर्शनाची तळमळही वाढत गेली म्हणजे झाडाच्या पानांचा आहारही करावासा वाटत नाही. फक्त पाणी प्यायचे. नुसत्या जलावरही शरीर राहू शकते.

देहाला अन्नमय कोष असे म्हणतात. क्षुधा आणि तृषा हे प्राणमय कोषाचे विकार आहेत असे वेदान्तात सांगितले आहे. मी शरीर आहे असे म्हटले म्हणजेच शरीरालाक्षुधा आणि तृषा यांची जाणीव होते. मान झाला, अपमान झाला ही भावना शरीराच्या ठिकाणीच असते. पण देहापेक्षा मी वेगळा आहे, प्राणमय कोषापेक्षा मी वेगळा आहे, क्षुधा आणि तृषा यांचा आणि माझा काहीही संबंध नाही असे चिंतन करीत राहिले म्हणजे देह आणि प्राणमय कोष बाजूला होतात, क्षुधा आणि तृषा यांचा आणि माझा काहीही संबंध नाही ही अनुभूती येते.

मग ईश्वरस्वरूपाचा अनुभव येतो. तो सर्व कर्मांचा भोक्ता आहे, तो सर्वांचा नियामक आहे, तो सर्वांचा सुहृद आहे हे ज्ञान होते. वृत्ती निश्चिंत होऊन जाते. शांती प्राप्त होते. ध्यान, ध्यानानंतर समाधी आणि तिच्या नंतर साक्षात्कार होतो.

***प्रश्न : महाराज, अतींद्रिय शक्तींचे ज्ञान म्हणजे काय?***

उत्तर : जगांत अनेक वस्तू आहेत. पण सूक्ष्म वस्तूचासुद्धा साक्षात्कार होण्याकरता संयम म्हणून योगशास्त्रकारांनी साधन सांगितलेले आहे. समाधीपर्यंत चित्तवृत्ती गेली तर त्या वस्तूचा साक्षात्कार त्याला होऊ शकतो. शरीरातल्या सर्व इंद्रियांचे ज्ञान तरी कुठे आहे आपल्याला? प्रत्यक्ष काहीच नाहीये. स्थूल शरीरामध्ये आंत काय काय आहे हे कुठे आम्हाला सर्व समजलंय? मग इंद्रिय तर बाजूलाच राहिली. इंद्रिय स्वतः तर अतींद्रिय आहेत. ज्या इंद्रियांवर प्रत्यक्ष प्रमाण म्हणून जास्त विश्वास आमचा आहे, ती इंद्रिये स्वतः गुप्त आहेत. डोळ्यांतील आतला भाग दिसत नाही. बाहेरचा आकार फक्त दिसतो. बाहेरचा आकार आंधळ्याला सुद्धा आहे. बहिऱ्या माणसालासुद्धा बाहेरचे कान असतात. कान हेच जर क्षोत्रेंद्रिय म्हटले तर बहिऱ्या माणसाला ऐकायला कां येत नाही? म्हणजे क्षोत्रेंद्रिय म्हणून जी शक्ती आहे. ती वेगळी आहे. ती अतींद्रिय आहे. म्हणजे इंद्रिय स्वतःच जिथे अतींद्रिय

आहेत, त्या इंद्रियांनी होणारे ज्ञान आपण खरे मानतो आणि ते ज्ञान झाले नाही म्हणजे सगळे खोटे मानतो. म्हणजे सर्व पदार्थ पहाण्याची शक्ती इंद्रियांजवळ आहे का हा विचार आमच्या मनांत येतो का?

ईश्वर विश्वरूप आहे. ''आता विश्वात्मके देवे'' अशीच दृष्टी संतांची आहे. तर त्या विश्वरूप झालेल्या परमात्म्याचे ज्ञान आपल्याला करून घ्यायचंय. ''ईशावास्यमिदं सर्वम्'' म्हणून हाच उपदेश केला आहे. तर संपूर्ण जे विश्व ईश्वरस्वरूप कसे आहे ते समजून घेण्याकरिता त्या ईश्वराच्या विश्वरूपाने आविर्भाव कुठे कुठे झाला आहे हे अगोदर सांगताहेत - म्हणजे ईश्वराचे हे दृष्यस्वरूप नाहीये. विभूतीसुद्धा ईश्वराचाच नित्यरूप नाही. परंतु हे रूप समजून घेण्याकरता म्हणून त्या स्वरूपाचे ध्यान करून त्या बुद्धीची एकाग्रता साधायची आहे आणि नंतर त्या स्वरूपाचे पुढे ज्ञान करून घ्यायचंय. अतींद्रिय शक्तीचे ते ज्ञान करून देतात.

***प्रश्न : महाराज, आजच्या काळात एक व्यक्ती सर्वज्ञ असणे शक्य आहे का? एकाच व्यक्तीला सर्व ज्ञान प्राप्त होणे शक्य आहे का?***

उत्तर : ज्ञान म्हणजे काय? ज्ञान या शब्दाची व्याख्या करतांना सांगतात - आत्म अनात्म सर्व विषय पदार्थ ज्ञानम् - केवळ ज्ञान म्हणजे सर्वज्ञत्त्वच आहे. आत्म आणि अनात्म या सर्व पदार्थांचा अनुभव म्हणजे ज्ञान. ही केवढी मोठी शक्ती आहे. अशक्य कशाकरता मानायचे हे. बुद्धिवादाने हे शक्यच नाही असा एकदम निर्णय कसा घ्यायचा? हे आता प्रत्यक्ष भगवान सांगताहेत. त्यांची व्याख्या करणारे मोठे मोठे अनुभवी लोक आहेत. तर ते अशक्य का समजायचे? तर आम्हाला हे शक्य नाही. आमच्यापैकी कोणीच समर्थ नाही म्हणून हे अशक्य का मानायचे?

ज्ञान शब्दाची व्याख्या शास्त्रकारांनी 'सर्व विषय ज्ञानम्' अशी केली आहे. आत्मस्वरूप आहे, अनात्मस्वरूप आहे, सगळ्याचे ज्ञान व्हावे. गुरूकृपेने हे ज्ञान प्राप्त होते. अनेक ज्ञानी महात्म्यांना गुरूकृपेने ज्ञान झाले होते आणि ते सर्वज्ञ असल्याची परीक्षाही झाली होती. अशा अनेक कथा उपनिषदांत, पुराणांत, महाभारतात आहेत. असे सर्वज्ञ महात्मे अनेक होऊन गेले, आजही आहेत.

***प्रश्न : महाराज, साधकाने शुद्ध अन्न घेण्याबद्दल दक्ष रहावे, परान्न घेऊ नये असे का सांगतात?***

उत्तर : उपनिषदकार सांगतात, आपण जे अन्न खातो त्याच्यापासून मन तयार होते. ते अन्न जितके पवित्र असेल, शुद्ध बुद्धीने तयार केलेले असेल तर अन्नातला सेवनाने तयार होणारे मनही शुद्ध, निर्भय व सात्त्विक होते.

पंचमहायज्ञात ज्यावर संस्कार घडले आहेत ते अन्न घ्यायला हरकत नाही. आचारसंपन्न विप्र, आपले गुरू, श्वशुर, शिष्य, आपले आजोबा अशा ठिकाणी भोजन केले तर तो दोष नाही. आचारहीन जो आहे त्याच्याकडे मात्र अन्न घेऊ नये. आपले कर्म सोडून दुसऱ्या कर्मामध्ये प्रवृत्त झाले त्याचेही अन्न घेऊ नये. दुसऱ्याच्याकडे नेहमी भोजन करीत राहिले तर आपले तेज नष्ट होते. अन्नदोषामुळे संकटे येतात.

वाटेल ते अन्न खायला मनाची तयारी होत नाही. शुचिता रहात नाही. मन शुद्ध राहिलं पाहिजे. संयमाला फार महत्त्व आहे. एकदा का संयम सुटला की गेलेच सगळे. आम्ही म्हणतो मन पवित्र असले की झाले सगळे. कुठेही काहीही खायला काही हरकत नाही. अशी आम्हीच आपली समजूत करून घेतो. आपले मन पवित्र आहे अशी आम्हीच समजूत करून घेतो. पण एकदा को एखाद्याच्या संगतीने सुरूवात झाली की संपले सगळे. एकदा का कापावरून पाय घसरला की शिखरावर जाता येत नाही.

***प्रश्न : महाराज, शास्त्रात अनेक प्रकारचे आचारधर्म सांगितले आहेत. सकाळी उठल्यापासून ते रात्री झोपेपर्यंत काय आचरण करावे व काय करू नये हे सगळे शास्त्रांत दिलेले असते. मात्र ते एकत्र सर्व वाचायला मिळत नाहीत. किती व काय पाळायचे आणि काय न पाळले तरी चालेल असाही प्रश्न मनांत येतो. याबाबत आपण मार्गदर्शन करावे अशी प्रार्थना आहे.***

उत्तर : मोठ्या महाराजांनी सर्व आचारधर्म लिहून ठेवले आहेत. त्यावर टीकाही लिहिलेली आहे व सर्व खुलासाही केलेला ओ. त्यांत प्रामुख्याने कर्मकांड आहे. उपासना हा कर्माचाच एक भाग आहे. कर्म करीत असतांना अकर्मबुद्धी

यावी आणि आत्मज्ञान व्हावे यासाठी कर्मयोग सांगितला आहे. कर्म केलीच नाहीत तर कर्मापासून मुक्ती मिळणार नाही. भगवंतांनी अर्जुनालासुद्धा हाच उपदेश केला आहे. कर्ममार्ग फार कठीण आहे. कर्म करीत असतांनाच अकर्मबुद्धी ठेवायची हे साधणे सोपे नाही. पण ज्याला ईश्वराच्या आज्ञेप्रमाणे वागायचे आहे त्याला काही कठीण नाही. सगळे शास्त्र समजून घ्यायचे आणि त्याप्रमाणे वागायचे यासाठी खूप वाचायला पाहिजे. त्यापेक्षा सोपे म्हणजे शास्त्र समजून घेऊन त्याप्रमाणे वागणारे जे कर्मनिष्ठ लोक आहेत त्यांचे आचरण हे देखील शास्त्राने प्रमाण मानले आहे. ते तसे वागतात त्याप्रमाणे वागायचे. पुस्तके वाचायला नकोत, काही नको. ते कसे वागतात, त्यांची वाणी कशी आहे, त्यांची मनोवृत्ती कशी आहे, त्यांच्या शरीराने काय काय कर्मे होतात हे सगळे पाहून त्याप्रमाणे आपण आपले आचरण ठेवायचा प्रयत्न करावा. घरांत लहान वयाची मुलगी सून म्हणून आली की सासरच्या वडीलधाऱ्या मंडळींच्या वागण्यावरून आपोआप शिकणे, घरातील लहान मुले मोठ्यांचे व्यवहार पाहून आपोआप शिकतात. परंपरा हेच ज्ञानाचे एक साधन आहे. शिष्टाचार, सदाचार हे एक स्वतंत्र प्रमाण आहे असे शास्त्रकार मानतात. ज्येष्ठ मंडळी कशी वागताहेत हे पाहून आपण तसे वागायचे.

***प्रश्न : महाराज, आम्हाला संसारांत राहून कर्मे करावीच लागतात. ती कर्मे करीत असतांनाच कर्मबंधनांतून आम्हाला कसे सुटता येईल?***

उत्तर : कर्म हे अज्ञानापासून निर्माण झाले आहे. मी हा देह आहे. मी अमक्या कुटुंबात जन्माला आलो आहे. मी अमुक वर्णाचा आहे. अमुक आश्रमाचा आहे. माझ्यावर अमुक अमुक जबाबदारी आहे अशी मनाची भूमिका असते. म्हणून कर्मबंधन करणारी कर्मे निर्माण होतात.

मी देह नाही, मी आहे आत्मा. आत्मा असंग आहे, निर्विकार आहे, सद्‌चिदानंदघन आहे. माझा कोणाशीही संबंध नाही. मला कसलाचा संबंध नाही. एकमेव अद्वितीय आहे. आत्मरूप मी आहे हे ज्ञान झाले आणि या ज्ञानभूमिकेवर जो स्थिर झाला आहे त्याला कर्मबंधन नाही.

जोवर मी हा देह आहे हे अज्ञान आहे तोवरच कर्म आहे आणि त्या कर्माचे बंधन आहे.

मी देह आहे हे अज्ञान दूर करायचे आहे. मी असंग आत्मा आहे याचा अनुभव घ्यायचा आहे. मग अज्ञानातून निर्माण झालेले हे कर्म करीत राहिले तर हे अज्ञान जाईल का? खरा मी काय आहे याचे ज्ञान होईल का? अज्ञानांतून उत्पन्न झालेले कर्म अज्ञानाचा नाश करेल का? भांडे मातीने मळलेले असते. ते भांडे स्वच्छ करण्यासाठी मातीच वापरतात. माती योग्य तऱ्हेने वापरली तर ते भांडे मातीच्या योगाने आणखी मलीन होत नाही. उलट ते स्वच्छ होते. तसे अविद्येतून, अज्ञानांतून निर्माण झालेले कर्म योग्य तऱ्हेने केले तर अविद्येचा, अज्ञानाचा नाश करण्याचा मार्ग पुष्कळसा मोकळा होतो. कर्म योग्य तऱ्हेने करणे याचा अर्थ शास्त्रांत सांगितल्याप्रमाणे कर्माचे आचरण करणे.

कर्माने अज्ञानाचा नाश होत नाही. पण अज्ञान जाण्यासाठी जे आत्मज्ञान मिळवावे लागते ते आत्मज्ञान कर्मानेच मिळते.

शास्त्रात सांगितल्याप्रमाणे कर्माचे आचरण केले की बुद्धीवर संस्कर होतात. बुद्धी शुद्ध होते. बुद्धीतील दोष दूर होतात आणि बुद्धीमध्ये दैवी गुणसंपत्ती निर्माण होते. दैवी शक्ती बुद्धीत निर्माण होते.

इंद्रियनिग्रह करणे, विवेक प्राप्त करून घेणे, वैराग्य मिळवणे यासाठी शास्त्राने सांगितल्याप्रमाणे कर्माचे आचरण करावे लागते. त्यामुळे ज्ञान होते.

कर्म करीत असतांना मनात ईश्वराबद्दल भक्ती हवी. ज्ञानयोगाच्या वेळेलाही भक्ती हवी, भक्तीयोग हवा. त्यासाठी भगवंतांनी कर्मयोगाचा पुरस्कार केला आणि स्वतः कर्मयोगाचेच आचरण केले.

बुद्धी शुद्ध झाली, आत्मज्ञान झाले म्हणजे मग कर्म करण्याची गरज रहात नाही. मग लोककल्याणासाठी कर्म केले तरी त्या कर्माचे बंधन होत नाही. म्हणून आत्मज्ञान झाल्यावरसुद्धा लोकांना धडा घालून देण्यासाठी श्रेष्ठ पुरुष कर्मच करीत रहातात, शास्त्र प्रमाण मानून त्याप्रमाणे कर्माचे आचरण करीत रहातात.

***प्रश्न : महाराज, शास्त्रे वाचणे व त्याप्रमाणे कर्माचे आचरण करणे आम्हाला शक्य होत नाही. मग आम्ही काय करावे?***

उत्तर : प्रथम आत्मा हा देहापेक्षा वेगळा आहे हे समजले पाहिजे. त्याशिवाय बाकी काही कळणे शक्य नाही. म्हणूनच भगवान श्रीकृष्णांनी गीतेमध्ये

आरंभालाच सांगितले की देह निराळा आहे आणि त्या देहामध्ये जो देही रहातो तो देही म्हणजे आत्मा. निराळा आहे. देह विनाशी आहे. पण आत्मा अमर आहे, अविनाशी आहे. हे अगोदर सांगितले व नंतर गीताज्ञान सांगितले.

भगवान सांगतात देह म्हणजे मी नाही. मी या देहात आलेला आहे. या देहातून मला पुढे जायचे आहे. देह टाकल्यावरसुद्धा पुढे पुष्कळ प्रवास करायचा आहे. नंतर भगवंतांनी पुष्कळ काही सांगितले आहे. पुष्कळ युक्तीवाद केला आहे. मार्ग कसा आहे, त्याचे गुणदोष कोणते आहेत, ते कसे पहायचे हे अगोदर शिकावे लागते. आमच्या बुद्धीला वाटेल तो दोष, आमच्या बुद्धीला वाटेल तो गुण असे म्हणता येणार नाही. आपले गुणदोष खरेच काय आहेत हे समजले पाहिजे. हे सगळे समजून घेतले पाहिजे. आपली बुद्धी अशुद्ध असते. मलीन बुद्धीने ते समजून घेणे शक्य नाही. म्हणून योग्य मार्गदर्शक महात्म्यांची संगती व्हायला पाहिजे.

ज्यांनी हे ज्ञान आत्मसात केले आहे, ज्यांची श्रद्धा पूर्णपणे दृढ आहे अशांची संगती झाली पाहिजे. नास्तिकांची संगळी झाली तर त्यांच्या बुद्धीवादाने तसे संस्कार होतात. त्यांची संगती टाळली पाहिजे.

शास्त्राने सांगितलेली दृष्टी उत्पन्न व्हावी यासाठी शास्त्रांनी सांगितलेल्या परंपरेवर जो ज्ञानपूर्वक श्रद्धा ठेवतात त्यांची संगती झाली पाहिजे. महात्म्यांची संगती, त्यांची कृपा झाली तरच आत्मज्ञान होते.

बुद्धी शुद्ध व्हावी, बुद्धीचे संरक्षण व्हावे यासाठीच ऋषीमुनी, संतमहात्मे यांचा प्रयत्न आहे. त्यासाठीच भगवंतांनी गीताज्ञान सांगितले. त्यासाठीच शास्त्रे सांगितली आहेत.

***प्रश्न : महाराज, अनेक पंडितांनी शास्त्राभ्यास केलेला असतो, पण ते अभिमानानेच मिरवतात. त्यांची बुद्धी शुद्ध झालेली असते का?***

उत्तर : शब्दज्ञान वेगळे, विद्या निराळी आणि बुद्धी निराळी. शास्त्राभ्यास करणारे ज्ञान मिळवणारे पुष्कळ असतात. पण त्यांचे ते ज्ञान शब्दांपुरतेच मर्यादित रहाते. शास्त्रांतील बाह्य अर्थाकडे लक्ष देऊन शास्त्रार्थच करतात, वादविवादच करतात ते खरे ज्ञानी नव्हेत. ज्ञान झाल्यावर आचरण करणे ही पुढची पायरी आहे. अज्ञान दूर करणे, लोकांना सन्मार्गाला लावणे, त्यांचे

संरक्षण करणे यासाठी संतमहात्मे आपले ज्ञान, धन आणि आपली शक्ती यांचा वापर करीत रहातात. म्हणून तर त्यांना संतमहात्मे म्हणायचे.

कोणाचाही अवमान करायचा नाही, द्वेष करायचा नाही, सर्वत्र भगवंत एक आहे ही संतमहात्म्यांची भूमिका आहे. अपकार करणाऱ्यांकडे, द्वेष करण्यांकडे, अपमान करणाऱ्यांकडेही ते भगवंत म्हणूनच पहाताहेत. ही भगवंतांची खरी भक्ती आहे असे ज्याचे आचरण आहे त्यांनाच खरे वेदज्ञान झाले आहे. कर्तव्यकर्म करून जो लाभ होईल त्यात संताषाने रहाताहेत, जास्त अपेक्षा नाही, वासना नाही, काही नाही.. सर्व भूतांबरोबर साधुवृत्तीने रहाताहेत. सर्व भूतांबद्दल मनांत सौहार्द्र, प्रेम, दया, मैत्री आहे. निरहंकारी आहेत तेच खरे ज्ञानी आहेत.

***प्रश्न : महाराज, जीवनांत दुःखे कां भोगावी लागतात?***

उत्तर : दुःखे भोगावी लागतात याला कारण आपली पापकर्मे. पुण्यकर्मांचे फळ म्हणून सुख मिळते. पापकर्मांचे फळ म्हणून दुःख मिळते. शास्त्रांत हे सगळे दिलेले आहे. शब्दांत केलेली पापकर्मे, वाणीत केलेली पापकर्मे, मनाने केलेली पापकर्मे असतात. पापकर्मे स्वतः केलेली असतील, दुसऱ्याकडून करवून घेतलेली असतील किंवा स्वतः अनुमोदन दिलेली असतील ती पापकर्मेच आहेत. त्यांचे फळ हे दुःखच आहे. आज आम्ही जी दुःखे भोगतो आहोत, ती केवळ आमच्या पापकर्मामुळेच .

***प्रश्न : महाराज, शास्त्रकारांनी कोणती कर्मे पापकर्मे म्हणून सांगितली आहेत?***

उत्तर : पापकर्मे असंख्य आहेत. तरीही शास्त्रकारांनी पापकर्मांचे दहा प्रकार सांगितले आहेत. शास्त्रकार प्रथम शारीरिक पापे सांगतात. दुसऱ्याने न दिलेली वस्तू घेणे, दुसऱ्याची हिंसा करणे आणि परदारागमन ही तीन प्रकारची शारीरिक पापे सांगितली आहेत. शास्त्रकार वाणीची पापे सांगतात. कठोर बोलणे, खोटे बोलणे, चहाड्या करणे आणि असंबद्ध बडबड करणे ही चार प्रकारची वाचिक पापे सांगितली आहेत.

शास्त्रकार मानसिक पापकर्मेही सांगतात - मनाने दुसऱ्याचे अनिष्ट चिंतणे, खोटा अभिनिवेश धारण करणे आणि दुसऱ्याची वस्तू बळकावण्याचा विचार

करणे ही तीन प्रकारची मानसिक पापकर्मे सांगितली आहेत. ही पापकर्मे स्वतः केली तरी ती पापेच आहेत किंवा दुसऱ्याकडून करवली तरी ती पापकर्मेच आहेत.

दुसऱ्याला ही पापकर्मे करायला अनुमोदन देणे हेही पापकर्म आहे. पापकर्मे शारीरिक असोत, वाचिक असोत किंवा मानसिक असोत, त्यांचे फळ दुःखे हेच आहे. ते दुःख भोगावेच लागते.

सर्व कर्मे सारखी नसतात. पापकर्मांचे फळ म्हणून किती दुःख भोगावे लागेल, केव्हा भोगावे लागेल हे सर्व ईश्वराधीन आहे. ज्याचे जसे कर्म असेल तसे फळ त्याला ईश्वराकडून मिळते हा शास्त्रांचा सिद्धांत आहे.

***प्रश्न : महाराज, आमच्या हातून जी पापकर्मे पूर्वी घडली आहेत त्यांचा परिहार आम्ही कसा करावा?***

उत्तर : पूर्वी आपल्या हातून कोणती कर्मे झाली, त्याचा परिपाक केव्हा होईल, त्यांचा परिहार कसा होईल असा विचार आपल्याला करता येत नाही. पूर्वकर्मांचे आपल्याला स्मरणही नाही. पूर्वकर्मांचे जे काय फळ मिळेल ते मिळेल. पण यापुढे आपल्यात सुधारणा कशी करायची, दुःखांचा प्रतिकार कसा करायचा याचा विचार आपण केला पाहिजे.

पूर्वी झालेल्या पापकर्मांचे जे फळ दुःख आम्हाला भोगावे लागते ही पीडाच आहे. त्यावर औषध योगशास्त्रकार सांगतात, सोसत रहायचे, प्रारब्ध भोगत रहायचे.

यापुढे आपल्याला दुःखे येऊ नयेत म्हणून मुख्यकर्मेच करायची. पापकर्मे करायची नाहीत. या जन्मांत पूण्यकर्मे केली, व्यवस्थित वागलो तर पुढे उन्नती होऊ शकेल, चांगले सुख मिळू शकेल. पापकर्मांपासून बुद्धीला परावृत्त करण्यासाठी ज्ञानाचा उपयोग करायचा. पापकर्मांचे फळ भोगण्यासाठी पुन्हा जन्म घ्यावा लागतो. जन्म आला की दुःखे आलीच असे या जन्मांतून त्या जन्मांत भ्रमण चाललेले आहे; हाच संसार.

***प्रश्न : महाराज, जन्ममरणापासून सुटका नाही म्हणून काय करावे ?***

उत्तर : शास्त्रज्ञान संपादन करून घेतले पाहिजे. त्याप्रमाणे आचरण घडले

पाहिजे. त्यासाठी संतमहात्म्याची संगती करावी, त्यांच आचरण पहावे, त्यांचा उपदेश ऐकावा.

जीव जो आहे त्याची कर्म केवळ त्यांच्या बुद्धीने होतात असे नाही. ज्याची जशी प्रकृती असेल, जसे संस्कार त्याच्या बुद्धीत असतील, जशा वासना असतील, तशी कर्मे घडतात. म्हणून बुद्धीवर चांगले संस्कार करावेत.सात्त्विक बुद्धी बनवावी. राजस व तामस बुद्धीचे निरसन करावे. कोणती कर्मे करावी आणि कोणती कर्मे करू नयेत हे सगळे शास्त्रांत मांडून ठेवलेले आहे. काय सोडायचे, काय घ्यायचे हे सगळे शास्त्रांत दिलेले आहे. ते समजून घेण्यासाठी मार्गदर्शक महात्म्यांची संगती घडली पाहिजे. पुण्यकर्म घडली म्हणजेच अशी महात्म्यांची संगती घडते.

राजस, तामस अशी जी आमची प्रकृती झाली आहे. त्या प्रकृतीचे रूपांतर म्हणजे बुद्धीतत्त्व आहे. आपली बुद्धी ही प्रकृतीचे रूप आहे. त्या बुद्धीची सुधारणा करायची आहे. त्यासाठी सज्जनांचा, महात्म्यांचा आश्रय सांगितला आहे. त्यांच्या सहवासांत बुद्धीवर चांगले संस्कार होतात, मग आपोआप आपले अंतःकरण व इंद्रिये चांगल्या कर्माकडे प्रवृत्त होतात. महात्म्यांची कृपा झाली की आपल्या बुद्धीत सुधारणा होऊन चांगली कर्मे घडायला लागतात.

आचार कसा असावा, प्रायश्चित काय घ्यावे हे लोकांना शिकवण्यासाठीच अवतारी पुरुषांचा अवतार होत असतो. आपण केलेल्या पापकर्माबद्दल पश्चाताप झाला तर आपण शुद्ध होतो. संसारात आसक्त असलेल्या माणसाला संतांची भेट होऊन त्यांच्या उपदेशाचा परिणाम झाला, केलेल्या कर्मांचा पश्चाताप झाला तर वैराग्य उत्पन्न होते. मग त्याचे संस्कार बदलतात. तो चांगल्या मार्गाने जातो.

***प्रश्न : महाराज, शास्त्रांत कोणती प्रायश्चिते सांगितली आहेत?***

उत्तर : प्रायश्चित्ते नाना प्रकारची सांगितली आहेत. प्राणायम करणे, तीर्थस्नान करणे, निरनिराळी दाने देणे, गायत्री जप, यज्ञ, याग, अनुष्ठाने, मंत्रजप, अशी अनेक प्रायश्चित्त आहेत. दोष जावा यासाठी अनेक मंत्र आहेत. त्या मंत्रांचा जप विधीपूर्वक झाला तर निश्चित फळ मिळते.

शरीराची आसक्ती कमी व्हावी यासाठी व्रते सांगितली आहेत. चांद्रायण व्रत आहे. शुक्लपक्षाच्या प्रतिपदेला एक घास भोजन घ्यायचे. रोज एक घास वाढवत जायचे. पौर्णिमेच्या दिवशी पंधरा घास घ्यायचे. कृष्णपक्षाच्या प्रतिपदेपासून एकएक घास रोज कमी करीत यायचे. याला चांद्रायण व्रत म्हणतात. त्याने शुद्धी होते. अशी अनेक व्रते आहेत.

पंचगव्य प्रायश्चित सांगतात - ''मध, गोमूत्र, दूध, दही व तूप एकत्र केले की पंचगव्य होते. त्यात दर्भोदक मिसळून हवन करायचे आणि पंचगव्य प्राशन करायचे. त्यामुळे सर्व पापांची शांती होते. ही सगळी प्रायश्चिते वेदांमध्ये दिलेली आहेत.

पण प्रायश्चित घेणारा भगवद्भक्त असेल तरच शुद्धी होते. कर्मकांडाला भक्तीचे सहाय्य घ्यावेच लागते असा शास्त्रसिद्धांत आहे. भगवद्भक्ती नसेल तर प्रायश्चितांनी पापनिवृत्ती होत नाही. हे सगळे अतींद्रिय आहे. आपल्या बुद्धीने इंद्रियांनी हे समजून घेण्याचा हा विषय नाही. संतमहात्म्यांना अतींद्रिय ज्ञान असते. म्हणून त्यांची बुद्धी मान्य केली पाहिजे.

***प्रश्न : महाराज, वेदांमध्ये सांगितलेली प्रायश्चित कर्मे, यज्ञयाग आजच्या युगांत आम्हाला कठीण वाटतात. आम्ही काय करायचे म्हणजे आमची शुद्धी होईल? दुसरे सोपे उपाय नाहीत कां महाराज?***

उत्तर : संतमहात्मे सांगतात - प्रथम वाणीचा विरोध केला पाहिजे. खरेही नाही, खोटेही नाही, चांगलेही नाही, वाईटही नाही. बोलायचेच नाही मुळी. वाणीचा निरोध हा दरवाजा आहे असे सांगतात. मित आहार, मित झोप असे ठेवायचे. नामस्मरण हे साधन दिसायला सोपे आहे पण त्याचे फळ फार मोठे आहे. नामस्मरणाने अनेक जन्मांची पापे जळून जातात. या जन्मांतलीही जातात आणि मागल्या जन्मांतलीही जातात. म्हणून सर्व संतांनी नामस्मरणाचा मार्ग सांगितला आहे.

भस्मधारणाचे महत्त्व सांगतात. यथाविधी भस्म धारण केले तर तो जीवात्मा जीवनमुक्त अवस्थेपर्यंत पोचू शकतो. यज्ञयाग झाल्यावर जे मिळते ते भस्म धारण करावे. मंत्र म्हणून शरीराच्या निरनिराळ्या अवयवांना लावावे. त्याचा

सर्व विधी शास्त्रांत दिला आहे. ज्याला शास्त्राचे ज्ञान नाही अशा अज्ञानी माणसाने भक्तीने, श्रद्धेने भस्मधारण केले तरी त्याच्या योगाने पापक्षय होतो आणि व्याधींचाही नाश होतो. तीर्थस्थान, जपणाऱ्या इत्यादि कर्मांपेक्षा भस्मधारण अधिक फळ देणारे आहे.

भगवद्‌भक्ती हे सर्वांत सोपे व परिणामकारक साधन आहे. वृत्ती अंतर्मुख झाली पाहिजे. बाहेरच्या जगाचा विचार बंद करून वृत्ती अंतर्मुख करावी आणि भगवंताची प्रार्थना करावी, नामस्मरण करावे म्हणजे दुष्कृत्यांचा निरास होत जातो, पापे नाहीशी होतात आणि संसाराबद्दलचा भ्रम नाहीसा होतो.

***प्रश्न : महाराज, ईश्वराबद्दलची भक्ती व प्रेम आमच्या मनांत कशी निर्माण होईल?***

उत्तर : जीव संसाराच्या आसक्तीत अनंत जन्मे सापडला आहे. त्या संसारासक्त मनाला ईश्वराबद्दलचा अनुराग व प्रेम निर्माण होते. पूर्वपुण्याईमुळे किंवा संतांच्या कृपेमुळे. कोणत्या तरी जन्मांतल्या पु ण्याईमुळे किंवा संतांच्या कृपेनेच मनांत भगवद्‌प्रेम निर्माण होते.

***प्रश्न : महाराज, अनेक जीवांना भगवद्‌भक्तीची ओढ लागते पण वर्णाश्रमाची आणि संसाराची बंधने पडतात, व्यवहार सांभाळावा लागतो. इतर कुटुंबीयाच्या निरोधामुळे भगवंताची सेवा करण्याची इच्छा मनांत दाबावी लागते.***

उत्तर : मुळात भगवद्‌प्रेम निर्माण झाले, ईश्वराची सेवा करण्याची उत्कट इच्छा निर्माण झाली तर ती इच्छा पुरी करायला भगवंत समर्थ आहेत. व्यवहार आड येणार नाही. संसाराची वर्णाश्रमाची बंधनेही आड येणार नाहीत. भगवंतावर दृढ निष्ठा असेल तर मनांतील ईश्वरश्रद्धा कोणालाही घालवता येणार नाही. आमचे अंतःकरण जर परमेश्वराकडे लागलेले आहे तर आम्ही कशाला ते मागे वळवायचे? आमचा मार्ग योग्य आहे हा विश्वास पाहिजे. कारण भगवंताची त्याला अनुमती आहे. सखुबाई भगवद्‌प्रेमात तन्मय झाली. संसार विसरून गेली, नियंत्रण करणारी बंधने विसरून गेली.

संत सखूबाईला पांडुरंगाचे दर्शन घेण्याची तळमळ लागली. पतीने आणि सासूने कोंडून घातले, कुलुप लावले. पांडुरंग स्वतः आले, तिला दर्शनासाठी

संतमंडळींबरोबर पंढरपूरला पाठवून दिले. स्वतः सखूचे रूप घेऊन त्या अंधारकोठडीत उभे राहिले. तिची इच्छा पूर्ण केली. सखूबाई पांडुरंगाचे दर्शन घेऊन मुक्त झाली. गोपालकृष्णांच्या प्रेमाने गोपी सर्व बंधनाच्या पलीकडे गेल्या मुक्त झाल्या.

भगवंत अंतर्यामी आहेत, नियामक आहेत. जीवात्म्यांच्या उद्धार करायला, प्राणीमात्रांवर अनुग्रह करायला ते संतमहात्म्यांच्या रूपाने पुनःपुन्हा अवतीर्ण होत आहेत. आमचीच तेवढी दृढ निष्ठा नाही.

***प्रश्न : महाराज, भगवद्‌भक्ती जर मनांत उत्पन्न झाली तर पूर्ण आनंद मिळतो का? संसारात ऐहिक संपन्नता नसली तरी जीवन आनंदमय होईल का?***

उत्तर : आम्ही संसारांतच आसक्त आहोत म्हणून समजतो आहोत की सर्व सुखे, सर्व आनंद विषयांपासून मिळतो. पण हा आमचा भ्रम आहे. संसारातील सुख, विषयांमुळे मिळणारा आनंद हा विषयांपासून मिळालेला नसतो. ते सुख, तो आनंद आत्मानंदच आहे असा सिद्धांत आहे. इच्छित विषय मिळाल्यावर चित्त स्थिर झाले आणि तो आत्मानंद चित्तामध्ये दिसतो. हा आनंद अंशरूप असतो. विषयापासून आनंद मिळतच नाही. विषय आनंददायक नाहीतच.

भगवंत आनंदरूप आहेत. भगवद्‌भक्तीमुळे तो आनंदरूप परमात्मा चित्तांत येतो, रहातो. आनंदरूप परमात्माच जर चित्ताला आला तर पूर्ण आनंद मिळाल्याशिवाय कसा राहील? संतमहात्मे भगवद्‌भक्ती करताहेत, हा पूर्ण आनंद घेताहेत.

***प्रश्न : महाराज वासनाक्षय म्हणजे सगळ्या वासनांचा क्षय करायचा का? शुभवासनांचाही क्षय करावा लागतो का?***

उत्तर : मनाचा निग्रह झाला पाहिजे. कोणत्याही वासना मनामध्ये उत्पन्न होऊन उपयोग नाही.

अशुभ वासनेमुळे स्वतःचे आणि दुसऱ्याचे नुकसान आहे. त्याला असुरच म्हटले आहे. विषयाकडे नेहमी लक्ष आहे. ''विषय भोगप्रधान वृत्ती'' त्याला असुर म्हणतात. या अशुभ वासना मनामधून गेल्या म्हणजे चांगले आहे.

शुभ वासना असाव्यात काय हा प्रश्न आहे. उत्सव व्हावेत, देवाचं अखंड नामस्मरण घडावं, दानधर्म आपल्या हातून घडावा, काही तप करावं, कायिक-वाचिक-मानसिक तप घडावं इत्यादी सर्व चांगल्या वासना आहेत. या असल्या तर काय हरकत आहे?

पण ज्ञानी महात्मा जो आहे, उच्च भूमिका असलेला, ज्याचे अंतःकरण निर्वासिन झालेले आहेत, ज्याला भगवंताने 'सर्वसंकल्पसंन्यासी' म्हटले आहे. त्याला काही वासनाच नाही आहे. अशुभ तर नाहीच पण शुभही नाहीत. हे असं व्हावं, तसं व्हावं ही काही इच्छाच नाही.

**प्रश्न : महाराज, तुकाराममहाराज म्हणतात --**

**''न मिळो खावया न वाढो संतान । परि हा नारायण कृपा करो''**

**'विटंबो शरीर होते का विपत्ती । परी राहो चित्ती नारायण''.**

**....ही मागणी जगावेगळी नाही कां?**

उत्तर : जगाच्या कितीतरी विरूद्ध ही मागणी आहे. तुकाराममहाराजांना काही कळत नव्हते म्हणून त्यांनी असे लिहून ठेवले असे वाटते. आपल्याला-व्यवहारात आपल्याला वाटतं, खायला प्यायला पाहिजे. संपत्ती वाढली पाहिजे. संकट-आपत्ती-विपत्ती कधी येऊ नये. मानसन्मान मिळावा. पण तुकाराममहाराजांना असं वाटत का नाही? याचा विचार आपण केला पाहिजे.

तुकाराममहाराज म्हणतात मला संपत्ती नको, धनधान्य नको, काही नको-पण ''परि राहो चित्ती नारायण'' हे एवढे पाहिजेच. हे त्यांनी मनोगत व्यक्त केले आहे.

''तुका म्हणे सगळे रे नाशवंत । आठवे गोपाळा तेचि दृश्य ''

या शेवटच्या चरणात तुकाराममहाराजांनी कारण सांगितले आहे. हे सगळे नाशवंत आहे आणि ईश्वर शाश्वत आहे. तेव्हा संपूर्ण नाशवंत गोष्टींच्या संग्रहाची इच्छा न बाळगणे हा खरा बुद्धीवाद आहे. सच्चिदानंद परमात्म्याचे स्मरण राहो, त्याची आठवण राहो, हे मागणे - मागणे हा खरा बुद्धीवाद आहे? त्यांनी सांगितले आहे की उद्वेग करून उपयोग नाही. दुःखाचे कारण म्हणजे पूर्वकर्म आहे.

सुख आणि दुःख येते आणि जाते. आलेले सुख किंवा दुःख जाणारच आहे. या विचारांनी मनुष्य सहन करतो. हे सहन करण्याचे जे धैर्य आहे त्याला तितिक्षा म्हणतात. व्यवहारात आजारी असताना म्हणतो तो ''औषध चालू आहे. बरा होईन मी.'' या नुसत्या विचारांनी सुद्धा मनुष्याला समाधान वाटते. आजच्या पेक्षा उद्या वेदना कमी होईल या आशेवरच आपण जगत असतो ? व्यवहारामध्ये सुद्धा प्रत्येक गोष्टीत आपण आशेवर समाधान मानतो. तेच समाधान या ठिकाणी विवेक करून मानायला सांगितले आहे. परमेश्वराची भक्ती केली की खरे सुख मिळते हा संतांचा बुद्धीवाद आहे.

''जे जे भेटे भूत। ते ते मानिजे भगवंत'' असा भक्तीयोग ज्ञानदेवांनी सांगितला आहे. हा बुद्धीवादच आहे. चांगलं वागावं, चांगल्या वासना कराव्यात, एवढ्यानेच काम भागत नाही. त्याचे फळ देणारा ईश्वर आहे. ईश्वराची भक्ती केली पाहिजे.

संतांनी हे विचारपूर्वक समजून घेतले. त्यामुळे ते सुखी झाले.

***प्रश्न : महाराज, शांती मिळण्यासाठी तत्वज्ञानाचे ग्रंथ साधकाने वाचावे का? त्या वाचनाचा फायदा त्याला होतो का?***

उत्तर : आत्मतत्त्वाचं ज्ञान जोवर झालेले नाही तोवर काही ऐकले काय आणि नाही काय? त्याचा उपयोग नाही. सर्व परिवार विनाशी आहे. हरीच्या लीला ऐकाव्या, त्यांच अखंड स्मरण करावे हेच शास्त्राचे सार आहे. जन्मभर भगवंताच स्मरण करावे म्हणजे अंतकाळी भगवंताचे स्मरण होते.

शुकाचार्य एवढे गुणातीत होते. ब्रह्मज्ञानी होते. स्थितप्रज्ञ होते. निर्गुण निराकार, ब्रह्मतत्त्वाचे चिंतन करणारे होते. पण त्यांना शांती लाभली नव्हती. भागवताच्या आरंभालाच शुकाचार्य सांगतात, भगवंताच्या लीला कानावर पडल्या तेव्हाच कळले की भगवद्गीतेनेच शांती लाभते. भगवंताचे स्मरण राहिले तरच कल्याण आहे. म्हणूनच सर्व संतमहात्म्ये भगवंताची भक्ती करायला सांगताहेत.

हरिभक्ती हेच श्रेष्ठ साधन आहे. सर्वांना प्रेरणा करणारा तो भगवंत त्याची भक्ती करावी. भगवंताचे स्मरण करीत रहावे. शरीर राहिलं काय किंवा पडले काय? तीव्र भक्तीयोग झाला पाहिजे. मनांतला संसार पूर्णपणे विसरला पाहिजे.

***प्रश्न : महाराज, दंभ म्हणजे काय?***

उत्तर : भगवान श्रीशंकराचार्यांनी 'स्वधर्मप्रकटीकरणं दंभः' अशी दंभ याची व्याख्या केली आहे. आपल्या सत्कर्माची आपल्या मुखाने जाहिरात करणे म्हणजे दंभ असा याचा अर्थ आहे. दंभ हा जीवांचा नैसर्गिक दोष आहे. आम्हाला वाटते आम्ही नेहमी योग्यच वागतो. कधीही चुकत नाही. 'सर्वकांतमात्मीय पश्यति' असा अभिमानच आहे. आम्ही हे पुण्यकर्म केले, आम्ही हे अनुष्ठान केले असे स्वतःच्या तोंडाने सांगणे हा सगळा दंभच आहे. भगवान श्रीकृष्णांनी दंभ हा दोष असुरी संपत्तीमध्ये पहिल्या क्रमांकात घातला आहे.

***प्रश्न : महाराज, आम्ही आमचा दंभ कसा दूर करायचा?***

उत्तर : संतमहात्म्यांची चरित्रे वाचावीत. त्यांच्या चरित्रांचे चिंतन करावे. ते वीतराग असतात. गुणातीत असतात. अलौकीक कार्ये हातून घडत असूनसुद्धा त्याबद्दल कणभरही अभिमान त्यांना वाटत नाही. हे पहिले म्हणजे आपला अभिमान लगेच गळून पडतो आणि आपल्या गुणांची फुशारकी मारणेही बंद होते. त्यामुळे आपले चित्त स्थिर होते. समाधानी होते.

***प्रश्न : महाराज, सर्व परिस्थितीत मन शांत ठेवणं हे कसं काय मिळवावं?***

उत्तर : कसाही प्रसंग जरी आला तरी त्याप्रसंगी आपलं मन शांत ठेवणं या गुणाला असंमोह असे म्हणतात. कधी मनाची चलबिचल न होणं, ही मनाची स्थिती आहे. ती ईश्वराच्या कृपेनंच प्राप्त होते. भगवान श्रीकृष्ण गीतेत "मत्त एवं" असे म्हणतात - हे गुण माझ्यापासूनच मिळतात- मीच देतो म्हणाले. दुसऱ्या प्रयत्नांनी नाही. ईश्वराची कृपा व्हावी यासाठी ईश्वराची उपासना किंवा महात्म्यांची संगती, त्यांचं मार्गदर्शन याची अतिशय जरूरी असते.

***प्रश्न : महाराज, सत्कर्मयोगे वय घालवावे, असे समर्थ कां सांगतात?***

उत्तर : सत्कर्माच्या योगाने मनांतले, बुद्धीतले दोष दूर होतात आणि चांगले गुण उत्पन्न होतात. म्हणून समर्थ सांगतात . सत्कर्मयोगे वय घालवावे. काही काळ सत्कर्मे करायची असे नाही. पण संपूर्ण आयुष्यच्या आयुष्य म्हणजे एक जन्म नव्हे तर जितकेही जन्म येतील त्या सर्व जन्मांतही सत्कर्म झाली पाहिजेत आपल्या हातून.

***प्रश्न : सत्कर्मे हातून घडावीत म्हणून आम्ही काय करावे महाराज?***

उत्तर : मनांत, बुद्धीत सुधारणा होण्याकरिता सत्कर्म हातून घडण्याकरता ईश्वराची उपासना करायची.

***प्रश्न : महाराज सत्कर्मे कशी ठरवायची? अमुक कर्म हे सत्कर्म आहे हे ज्ञान आम्हाला कोठे आहे?***

उत्तर : चांगली कर्मे हा निर्णय आपल्या बुद्धीने करायचा नाही. आमच्या बुद्धीला कांहीही चांगलं वाटलं तर? अर्जुनाला युद्धातून जाऊन भिक्षा मागावी हेच चांगलं वाटलं होतं ना? पण भगवंतांनी सांगितलं तो अधर्म होईल. ही दया नाही. हा अहंकार आहे म्हणाले.

बुद्धी शुद्ध झाल्याशिवाय चांगलं कर्म कोणतं आणि वाईट कर्म कोणतं हे बुद्धीला ठरवता येत नाही. सद्गुरूंच्या उपदेशाप्रमाणे सत्कर्मे हातून घडली पाहिजेत. चांगली कर्मे कोणती ते संत सांगताहेत, शास्त्रेही सांगताहेत.

***प्रश्न : महाराज, केवळ सत्कर्मे करून परमार्थ साधेल कां?***

उत्तर : केवळ कर्म हे सिद्ध रहात नाही. ईश्वराला ते कर्म निवेदन करायचं. अर्पण करायचं. प्रार्थना करायची. कर्माबरोबर भक्ती उपासनाही जरुरी आहे. ईश्वराच्या भक्तीशिवाय कर्मही व्यवस्थित होत नाही, पूर्ण होत नाही. म्हणून शास्त्रकारांनी कर्म आणि भक्ती यांचा समुच्चय सांगितला आहे. ईश्वराची आज्ञा म्हणून कर्म करतोय, या भावनेनं निष्काम कर्म केलं तर कर्मयोग हा स्वतः भक्तीयोगच होतो. ईश्वरभक्तीनेच होते.

***प्रश्न : महाराज, आमची बुद्धी शुद्ध कशी करता येईल?***

उत्तर : बुद्धीतील रजोगुण आणि तमोगुण गेले की बुद्धी शुद्ध होते. सत्त्वगुण वाढवला पाहिजे. साधकाने त्यासाठी काय करायचे ते सद्गुरूच सांगणार. गीतेच्या बाराव्या अध्यायात शुद्ध बुद्धीची लक्षणे सांगितली आहेत. अद्वेष्टा सर्वभूतानाम वगैरे. सद्गुरूंच्या उपदेशाप्रमाणे वागले तर बुद्धी तितकी शुद्ध करता येईल.

***प्रश्न : महाराज, वृक्ष ही सुद्धा जीवयोनीच आहे कां?***

उत्तर : वृक्ष ही सुद्धा एक जीवांची योनी आहे. शास्त्रकार सांगतात की

ज्यांच्याकडून जास्तीत जास्त पापकर्म घडते, त्यांना पुढील जन्मांत वृक्ष शरीर मिळतं. हे संशोधन पूर्वीच्या शास्त्रकारांचं आहेच आहे. पण अलीकडे बोसांनीही वृक्ष ही जीवांची योनि आहे हे सिद्ध केले आहे आणि सगळ्या शास्त्रज्ञांनी ते मान्यही केले आहे.

***प्रश्न : महाराज, परोपकाराने साधते कां?***

उत्तर : परोपकार खरोखरच होतो कां? परोपकार झाला म्हणायचं. समजूत करुन घेतो आपण. परंतु स्वार्थ पूर्णपणे सुटल्याशिवाय खरा परोपकार घडत नाही. "आता उरलो उपकारापुरता" हे जे ठामपणे सांगू शकतात त्यांनीच परोपकार करावा. स्वार्थ ज्यांना कांहीही राहिलेला नाही त्यांनी परोपकार करावा. नाहीतर सगळं व्यर्थ होतं. भागवतांत मुचकुंद राजाची कथा आलेली आहे. मुचकुंद मोठा पराक्रमी राजा होता. देवांनी आपल्या संरक्षणासाठी त्याला मुद्दाम स्वर्गलोकाला बोलावून घेतलं. परोपकार करण्याची बुद्धीने त्याने अनेकवेळा दैत्यांचा पराभव करून त्यांना बाहेर घालवून दिलं. देवांनी मुचकुंद राजाला सांगितलं, 'काय पाहिजे तो वर मागून घे.' कैवल्य म्हणजे मोक्ष मात्र आम्ही देऊ शकत नाही. मोक्ष देण्याचं सामर्थ्य फक्त भगवान श्रीहरींचे आहे." पुढे त्याला भगवान श्रीकृष्णांचं दर्शन झालं. त्याने प्रार्थना केली, "देवांना साहाय्य केलं पुष्कळ, परंतु आयुष्य माझं सगळं फुकट गेलं. तुमची सेवा कांही घडली नाही. तेव्हा आता मला दुसरा वर कांही नको. आपली कृपा व्हावी. आपली सेवा घडावी, स्मरण नेहमी घडावे एवढीच माझी इच्छा आहे.

तो भगवान श्रीकृष्णांना शरण गेला तेव्हांच त्याला शांती मिळाली.

***प्रश्न : महाराज, "अंते नारायणःस्मृती" असे कां सांगतात?***

उत्तर : मनुष्य जन्म मिळाल्याचा खरा लाभ कोणता आहे? तर 'अंते नारायणःस्मृतीः ।' अंतकाली नारायणाचे स्मरण व्हावे. म्हणजे जन्म सफल झाला. सार्थक झाला असं समजावं. अंतकाली नारायणाचे स्मरण व्हायचे म्हणजे आरंभापासून अभ्यास पाहिजे.

प्रल्हादजींनी लहानपणापासूनच भगवत्‌भक्ती करायला आरंभ केला. भगवत्‌भक्ती लहानपणापासून केली म्हणजे आपल्या आयुष्याचा शेवटचा काळ सार्थकी लागतो.

याचसाठी केला होता अट्टाहास।
शेवटचा दिस गोड व्हावा।

मृत्यू समीप आलेला आहे. सगळं इथंच सोडून जायचं आहे. त्यात अर्धा सेकंदही जास्त मिळायचा नाही. ठरलेल्या घटकेला जावं लागतं. त्या शेवटच्या क्षणी ईश्वराचं स्मरण झालं पाहिजे असं संत महात्म्यांचं सांगणं आहे.

***प्रश्न : महाराज, संसारांत राहूनही आम्ही आमचं मन कसं बनवावं म्हणजे साधेल?***

उत्तर : आपल्याला कुठे जायचंय? नारायणाकडे जायचंय. त्या नारायणामध्ये संपूर्ण पृथ्वी, भूतमात्र अंतर्भूत आहेत. त्या नारायणाकडे जीवाला जायचं आहे. त्या नारायणाची भक्ती भीष्माचार्यांच्या अंतःकरणात केवढी होती! मन कसं बनवावं ह्याचा आपल्यासमोर एक आदर्श ठेवला आहे त्यांनी. ब्रह्मचर्याचे पालन केले. राज्याची आसक्ती सोडून दिली. पुन्हा वासना मनामध्ये नाही. एकदा निश्चय झाल्यावर पुन्हा तिकडे प्रवृत्ती नाही. वैराग्य उत्पन्न होण्याकरता किती तरी अभ्यास करावा लागतो. दोषदृष्टी विषयांबद्दल निर्माण झाली पाहिजे. प्रत्येक ठिकाणी दोष आहे. तो पक्का समजला म्हणजे त्याचा त्याग होतो. वैराग्य नंतर येते.

ही मनामध्ये असणारी विरक्त वृत्ती आहे. भीष्माचार्य कुठे सोडून गेले? राहिले. शब्द, स्पर्श, रूप, रस, गंध सगळे समोर आहेत. पण त्यांचा भीष्माचार्यांच्या चित्तावर कांहीही प्रभाव पडू शकला नाही. त्यांची तटस्थ वृत्ती आहे. कर्तव्यदक्षता आहे. हा इतका मनोनिग्रह त्यांनी केलेला आहे. ज्ञान झाल्यावरसुद्धा तत्त्वज्ञान, मनोनाश, वासनाक्षय या तिघांचा अभ्यास त्याला पुढे चालूच ठेवावा लागतो, म्हणतात. चवथ्या भूमिकेवर तत्त्वज्ञान झालं तरी पाचवी आणि सहावी भूमिका आहे. सहावी व्युत्थान अवस्था जी आहे त्या व्युत्थान अवस्थेमध्ये मन हे अनात्म पदार्थाकडे जाऊ नये ह्या करता वासनाक्षयाचा आणि मनोनाशाचा अभ्यास हा त्या ज्ञानी महात्म्यालाही चालू ठेवावा लागतो.

भीष्माचार्य प्रपंचामध्ये होते आणि असं असूनसुद्धा त्यांच्या मनामध्ये कांहीही वासना नाहीयेत. राज्याची आसक्ती नाही. कनक आणि कांता हे

दोन्हीही त्यांनी मनातून काढून टाकलेले आहेत. ही केवढी योग्यता त्यांनी मिळवली ! त्यांनी किती अभ्यास केला असेल ! महाभारतातले शांतीपर्व म्हणजे भीष्माचार्यांचे किती दिव्य ज्ञान आहे याचे निदर्शक आहे.

***प्रश्न : महाराज, मन भगवंताच्या ठिकाणी कसं स्थिर करता येईल ?***

उत्तर : जर मन ममतेपासून मुक्त विमुक्त असेल तरच ते भगवंताच्या ठायी स्थिर राहू शकते. हे माझं आहे, ते माझं आहे अशी ममता आमच्या ठायी असते. महाराज एका स्तोत्रात म्हणतात -

देही अहंता जडली न मोडवे ।
गृहात्मजस्त्री ममता न सोडवे ।
त्रिताप दावानळ पोळितो मला ।
दत्ता कृपा साउली दे नमू तुला ।

त्रितापदावानपळाची कारणं त्यांनी दाखिवली आहेत. देहाच्या ठिकाणी अहंता हाही संग आहे. देहाच्या ठिकाणीच मन बसलेले आहे. चांगदेवांसारख्या योगी पुरुषाने १४ वेळा मृत्यू परतावून लावला. पण देहाचा संग सुटला नाही. मी मोठा. ज्ञानदेव लहान असवेच वाटले. देहाचा संग होता म्हणूनच तसे वाटले. देहाच्या संगामुळे स्त्रीपुत्र, आप्तेष्ट, घरदार, चेतन अचेतन सगळ्याबद्दलच ममता उत्पन्न होते हा एक संग आहे. मनांतून हे दोन्ही संग गेले पाहिजेत. भगवंताच्याशिवाय मनात दुसरा विषय नाही. ही एवढी मोठी भूमिका मिळायला ईश्वरी कृपा लागते.

***प्रश्न : महाराज, केवळ परोक्ष ज्ञान किंवा शास्त्रज्ञान संपादन करणे उपयोगाचे नाही, अनुभव आला पाहिजे असं सांगतात. मग नुसते शास्त्रज्ञान संपादन करण्याचा उपयोग आहे कां?***

उत्तर : परोक्ष ज्ञान सिद्धांताचाही उपयोग आहे. नाही असं नाही. नुसतं परोक्ष ज्ञान म्हणून त्याचा उपहास करण्यात कांही अर्थ नाही. शब्द प्रमाणाने उत्पन्न होणारे ते ज्ञान आहे. वेदशास्त्र हे शब्दप्रमाण आहे आणि ते परमेश्वराचे रूप आहे ना! शब्दब्रह्म त्याला म्हणतात. हे ज्ञान जरी उत्तमरित्या संपादन केले तरीसुद्धा पापक्षय होतो असं शास्त्रकार सांगतात.

परोक्ष ज्ञान का होईना! पण परोक्ष ज्ञानसुद्धा पूर्ण पाहिजे. परोक्ष ज्ञानाने सुद्धा पापक्षय होतो असं पंचदशीकार सांगताहेत. बुद्धिपूर्वक जी पाप घडलेली असतात, ती पूर्ण परोक्ष ज्ञानाने नष्ट होतात. अपरोक्ष ज्ञानाच्या दृष्टीने त्याला कमीपणा असेल. परंतु परोक्ष ज्ञानसुद्धा ज्याला मिळालं नाही त्याने परोक्ष ज्ञानाची निंदा करून उपयोग नाही. अपरोक्ष ज्ञान झालेल्या माणसाने म्हटलं तर शोभेल. परोक्ष ज्ञान हे सुद्धा शास्त्रच आहे. त्या शास्त्राप्रमाणे जर उत्तम गुरूपासून ज्ञान मिळवलेलं असेल, त्याच्यामध्ये सुद्धा त्याची जर तपश्चर्या झाली असेल तर त्याचाही त्याला चांगला उपयोग होतो. योगक्षेम तर चालतोच पण ईश्वरसाक्षात्कारसुद्धा त्याला होऊ शकतो.

***प्रश्न : महाराज, परोक्ष ज्ञानाचा अभिमान निर्माण होऊ शकतो असे सांगतात. तो अभिमान निर्माण होऊ नये म्हणून काय करावे?***

उत्तर : भक्ती उत्पन्न झाल्यानंतर परोक्ष ज्ञान जरी उत्तम असले तरी त्याचा अभिमान होत नाही. ज्ञानालासुद्धा नियंत्रण करणारी भक्ती आहे. ती भक्ती ज्ञानाभिमान होऊ देत नाही.

***प्रश्न : महाराज, इतरांचे जे गुणदोष असतात त्यासंबंधी साधकाने कोणती दृष्टी ठेवावी?***

उत्तर : भगवान शंकरांच्याप्रमाणे गुणदोषांकडे दृष्टी ठेवावी. दुसऱ्याकडे चांगले गुण असतील तर अगदी मान हालवून शाबासकी देऊन त्याचा सत्कार करावा. दोष असेल तर कंठाच्या वर बाहेर येऊ देऊ नये. दोष असे ज्ञानी माणसाचे नाव आहे. ज्ञानी माणसाला दुसऱ्याचे दोषही समजतात तरच तो ज्ञानी आहे ना ! पण दोष समजले तरी कंठाच्या बाहेर काढायचे नाहीत.

त्याला दृष्टांत त्यांनी शंकरांचा दिलेला आहे. चंद्र हा प्रकाश देणारा आहे हा त्याचा गुण पाहून त्याला मस्तकावर घेतले शंकरांनी आणि जे हलाहल विष उत्पन्न झाले समुद्रातून, ते कंठातच ठेवलं. बाहेर काढलंच नाही.

***प्रश्न : महाराज, भगवंत स्वत: निजानंदामध्ये मग्न आहेत. मग त्यांनी ही सृष्टी कां निर्माण केली?***

उत्तर : भगवान निजानंदामध्ये आहेत. आनंदरूप आहेत ना ते ! आपल्या

स्वतःच्या सुखस्वरूपामध्ये ते निमग्न आहेत. इतकं जग, अनंत ब्रम्हांड निर्माण झाली. कार्य चाललेलं आहे. परंतु शंकराचार्य-स्वामीमहाराज सांगतात नित्यशुद्ध बुद्ध मुक्त आहेत. विश्वाची उत्पत्ती, स्थिती आणि संहार हे कार्य अखंड चालू आहे. ही त्यांची विलक्षण शक्ती आहे. निजानंदामध्ये असणाऱ्या भगवंतांना लीला करायची इच्छा झाली. त्यामुळे अनंत ब्रह्मांड निर्माण झाली. संकल्प झाल्याबरोबर सगळं झालं. पंचमहाभूत निर्माण झाली. विश्व निर्माण झाले. सगुणही तोच आहे आणि निर्गुण निराकारही तोच आहे. हा एक महत्त्वाचा सिद्धांत आहे.

***प्रश्न : महाराज, भगवान दत्तात्रेयांचे "स्मर्तृगामी" असे एक नाम सहस्त्रनामांत दिलेले आहे. स्मर्तृगामी म्हणजे काय?***

उत्तर : भगवान दत्तात्रेयांना स्मर्तृगामी हे विशेषण दिलेले आहे. स्मरण केल्याबरोबर येणारे. ते स्मरण मात्र अधिकारीभक्ताचं पाहिजे आहे. तसे केल्याबरोबर भगवान येताहेत आणि त्यांचा उद्धार करताहेत.

***प्रश्न : महाराज, साधकाने देवाकडे काय मागावे ?***

उत्तर : साधकाने देवाकडे काय मागावं हे सांगणारं सद्गुरू वासुदेवानंद-सरस्वती-स्वामीमहाराजांचं एक पद आहे. भजनाच्यावेळी वगैरे म्हणतात. त्याच्यामध्ये हा खुलासा केलेला आहे.

दत्ता मजला प्रसन्न होसी
जरी तू वर देसी
तरी मी आन न मागे तुजसी
निर्धारुनी मानसी

दुसरं मला काहीही मागायचं नाही. ईश्वराचं स्मरण अखंडीत राहिलं पाहिजे. "तुझा विसर न व्हावा" तुकाराम महाराजांनीसुद्धा हेच मागितलं आहे. विस्मरण कधीही होऊ नये. अखंड स्मरण अंतःकरणात राहायचं म्हणजे संसाराची आसक्तीही चित्तातली कमी झाली पाहिजे, मोकळं चित्त झालं पाहिजे. आणखी मग ते ईश्वराकडे लागलं पाहिजे.

सर्व भक्तीमध्ये स्मरणभक्ती श्रेष्ठ म्हणून सांगतात. श्रवण, अर्चन, कीर्तन, वंदन, दास्य, आत्मनिवेदन असे भक्तीचे अनेक प्रकार आहेत. शरीराने केली

जाणारी, वाणीने होणारी, मनाने होणारी. या भक्तीमध्ये स्मरण हे मोठे आहे. चित्ताला ईश्वराचं स्मरण रहाणं.

अखंड भगवंताचं स्मरण घडावं आणि वाणीने तुझ्या गुणांचे वर्णन करावे. वाणीला हा विषय आहे. म्हणजे दुसरा व्यवहारात वाणीचाही काही विनियोग नाही आणि मनाचाही विनियोग नाही.

*प्रश्न : महाराज, ही मनाची भूमिका कशी तयार होईल?*

उत्तर : मन जर संसारामध्ये आसक्त झालेलं असेल तर ईश्वराचं स्मरणभक्ती वगैरे कशी घडणार? मन तिकडेच जाणार ! स्मरणभक्ती अतिशय कठीण आहे. वाणीने एखादे वेळेला काही भजन केले तरीसुद्धा मन दुसरीकडे चाललेले असते. परंतु अखंड स्मरण घडायचे, ध्यान घडायचे म्हणजे त्याला मन दुसरीकडे जाऊन उपयोगी नाही. इतकी मनाची भूमिका होण्याकरता अनासक्ती प्राप्त व्हायला हवी. मनातली विषयांची आवड कमी झाली पाहिजे. अनासक्ती हे एक साधन सांगितलेले आहे.

**प्रश्न : महाराज, अनासक्ती निर्माण व्हावा यासाठी आम्ही काय प्रयत्न करावे?**

उत्तर : मन विषयाकडून बाजूला काढायचं. इंद्रियांवर ताबा मिळवायचा आणि ईश्वराचे अखंड स्मरण करायचे. हे आपल्या प्रयत्नांनी होत नाही.

कर्तृत्त्वशक्ती ईश्वराची आहे. मी करणार आहे, मी सगळं करू शकेन हे होत नाही ! इंद्रियांचा अधिपती परमेश्वर आहे. हृदयस्थ म्हणतात त्याला. अंतर्यामी म्हणून उपनिषदांमध्येही सांगितले आहे. त्याने आमची इंद्रिय, मन वळवावं, आपल्याकडे लावावं ही सुद्धा प्रार्थना करावी लागते.

*प्रश्न : महाराज, संसारात वावरत असतांना विषयांचे स्मरण सुटावे यासाठी आम्ही काय करावे?*

उत्तर : विवेक आणि सत्संगती ही एक मोठी साधना आहे.

विवेक पाहिजे ! नित्य अनित्य हा विवेक पाहिजे. जगात स्थिर काय आहे. अस्थिर काय आहे ! हा विवेक पाहिजे. क्षेत्रक्षेत्रज्ञविवेक पाहिजे. शरीरादिक पदार्थ आणि त्यांचा द्रष्टा. आत्मा, जीवात्मा मी वेगळा आहे.

शरीर म्हणजे मी नाही. हाही विवेक पाहिजे. हेय उपादेय विवेक पाहिजे. काय घ्यावे आणि काय सोडावे हे समजले पाहिजे. बुद्धीची तयारी इतकी झाली पाहिजे. हे सगळे विवेकाचे प्रकार जर जवळ असतील म्हणजेच विवेक संपन्न बुद्धी झाली तर तो जीवात्मा सर्वत्र सुखी आहे.

त्याकरिता सत्संगती सांगतात ! विवेक सांगणारे, विवेक दाखवणारे असे माहात्मे भेटले पाहिजेत. त्यांच्या संगतीमध्ये राहीले म्हणजे आपोआप ज्ञान होते. त्यांचे आचरण पाहून तो विवेक आपल्या चित्तामध्ये मिळतो. विवेक आणि सत्संगती यामुळे चित्तांत ईशभक्ती निर्माण होते.

***प्रश्न : महाराज, संसारांत राहूनही हे परमार्थाचे फळ मिळू शकेल कां?***

उत्तर : अनेक संतमहात्मे गृहस्थाश्रमी होते. संसार हा ईश्वराचा आहे. आपले काहीही नाही ही भूमिका त्यांची होती. विवेकपूर्ण असल्यामुळे संसाराची आसक्ती गे ली होती. अखंड ईश्वराचे स्मरण चाललेले होते. असे महात्मे आम्ही आहोत. ईश्वराची कृपा त्यांच्यावर झाली असल्यामुळे अखंड भगवंताचे स्मरण त्यांना घडते. पूर्ण सुख, दुःख निवृत्ती ही विवेकाने होते आहे.

त्यामुळे अंतःकरणात पूर्ण समाधान आहे म्हणजे सुख आहे. साधने नसतानाही विवेकाने जीव सुखी राहू शकतो, समाधान मानू शकतो. साधने असतानाही विवेक नसला म्हणजे असमाधान, दुःख आहे.

विवेक, सत्संगती वगैरे याने अनासक्ती प्राप्त होते, इंद्रियांचा ताबा मिळतो, मन ताब्यात येते आणि त्या मनाला एक भगवंताचे अखंड स्मरण हा विषय मिळाला की झालं ! पूर्ण आनंद आहे, दुःख नाही. मोक्ष या ठिकाणीच मिळाला. मोक्ष म्हणजे कुठं दुसऱ्या जागेत जायचे ही जागा सोडून असा त्याचा अर्थ नाही. इथेच मोक्ष मिळाला. इथेच स्वर्ग मिळाला.

***प्रश्न : महाराज, आमचे मन फार चंचल आहे. मनात संदिग्धता असते. मनाची ही चंचलता आम्ही कशी घालवायची?***

उत्तर : अंतःकरण म्हणून जे तत्त्व ईश्वराने निर्माण केले आहे त्याला मन किंवा बुद्धी असे म्हणतात. अवस्था भेदाप्रमाणे ही नावे आहेत. प्राथमिक अवस्थेमध्ये निर्णय काही नाही. अशा अवस्थेमध्ये त्याला ''मन'' असे म्हणतात.

संदेहात्मक बुद्धी आहे आणि ''बुद्धी'' ही अवस्था निर्णयात्मक आहे. तो निर्णय चांगला अथवा वाईट कसाही असो. निश्चय झाला म्हणजे त्याला ''बुद्धी'' असे नाव आहे. बुद्धीमान याचा अर्थ काहीतरी निश्चय आहे. जो मार्ग त्यांनी आपल्या बुद्धीने निश्चित ठरविलेला आहे, त्यातून ते मागे सरत नाहीत. सद्‌बुद्धी, असद्‌बुद्धी हा वेगळा विचार आहे. पण निश्चय हे बुद्धीचे लक्षण आहे.

निश्चयात्मक बुद्धी जी आहे तिचे सहाय्य घेऊन. मनाचे चांचल्य दूर करावे असे करायचे आहे. अमूक मार्गाने जायचे आहे, अमूक अनुष्ठान करायचे आहे असा जो निश्चय म्हणून म्हणतात ते बुद्धीचे स्वरूप आहे त्या बुद्धी स्वरूपाचा आपल्याला उपयोग करून घेता येईल.

निश्चयाचे बळ।
तुका म्हणे तेची फळ।

निश्चय जर करता आला तर मनाचे चांचल्य दूर करता येते.

*प्रश्न : महाराज, ही निश्चयात्मक बुद्धी कशी मिळते?*

उत्तर : ही निश्चयात्मक बुद्धी ईश्वरकृपेनेच मिळते. दृढ भक्ती ईश्वराची करायची आहे, एक ध्येय ठरविलेले आहे. ही स्थिती जेव्हा जीवाला प्राप्त होईल त्या वेळेला साधकदशा मिळणार आहे.

साधकदशेत जे आहेत त्यांच्यात निर्माण करायची आणि मग त्याच्याकडून साधनाभ्यास करून घ्यायचा हे कार्य सद्‌गुरू अवताराकडून सतत चाललेले आहे. त्यांना मार्गदर्शन करणं, प्रतिबंध दूर करणं, निश्चयी वृत्ती त्यांची बनवणं, ही कार्य करण्याचं काम सर्व ठिकाणी सद्‌गुरू करीत आहेत.

*प्रश्न : ईश्वराच्या ठिकाणी चित्त स्थिर कसे करावे महाराज?*

उत्तर : परमात्म स्वरूपाचे अखंड चिंतन घडले पाहिजे. ते स्वरूप कसे आहे? ते पूर्णरूप आहे, आनंद आहे, सर्व देशांमध्ये आहे, अविनाशी आहे, सर्व काळात आहे. त्याला आकार मर्यादा कांहीही नाही आहेत. असं हे ईश्वर स्वरुप आहे याची चित्ताला जाणीव होणं म्हणजे तिथे चित्त स्थिर होणं. सर्व

देशांत व सर्व कालात असणाऱ्या ईश्वराचं चिंतन करण्याची योग्यता चित्ताला येण्याकरता ईश्वराने सगुण साकार रूपे धारण केली आहेत. सगुण साकार रूपाच्या ठिकाणी एकदा चित्त स्थिर झालं म्हणजे मग त्या चित्ताचा विकास जसजसा होत जाईल तसतसे ईश्वर सर्वत्र आहे हे ध्यान, चिंतन करता येईल.

*प्रश्न : महाराज, ईश्वराची कार्ये वेगळी असतात आणि सद्‌गुरूंची कार्ये वेगळी असतात असे आपण एकदा सांगितले होते. मग ते वेगवेगळे आहेत का?*

उत्तर : विश्व निर्माण करणे, त्याचं संरक्षण करणे आणि पुन्हा त्याचा उपसंहार करणे ही कार्य ईश्वराची आहेत. जीवाच्या बुद्धीतील दोष काढून टाकणे, त्यांची बुद्धी, मन हे स्थिर करणे, त्या बुद्धीमध्ये आत्मप्रकाश -ईश्वरस्वरूपाचा प्रकाश करणं हे कार्य सद्‌गुरूंचे आहे. ईश्वराचे ऑफिस निराळं आहे आणि सद्‌गुरूंचं ऑफिस निराळं आहे. याचा अर्थ ते वेगवेगळे नाहीत? कार्य करणारी रूपं वेगळी वेगळी आहेत.

सद्‌गुरू स्वरूपाने हे कार्य परमात्मा करतो आहे. दत्तात्रेय, श्रीपाद श्रीवल्लभ, नृसिंह सरस्वती, वासुदेवानंद सरस्वती-स्वामीमहाराज, शंकराचार्य महाराज ही सगळी ईश्वराची रूपं आहेत. सद्‌गुरूरुपांनी आलेली आहेत. अज्ञानातून जीवाला बाहेर काढायचं हे कार्य त्यांच्या पुढे आहे आणि ते कार्य अखंड चालायचे आहे.

*प्रश्न : महाराज, वित्तभ्रम गेला पाहिजे असे का सांगतात?*

उत्तर : वित्तभ्रम मोठा कठीण आहे. ईश्वराच्या स्वरूपाचं चित्तांत अखंड चिंतन करणं अशी भूमिका असूनही जर तो वित्तभ्रम निर्माण झाला तर साधक त्याच्या निश्चयापासून ढळतो. त्याला मिळालेली बुद्धी अवस्था जाते.

द्रव्याचा भ्रम आहे. संपूर्ण संसार, ज्याला आपण वित्त समजतो. सर्व स्थावर जंगम, आप्त, इष्ट हेही वित्तच आहेत. एकत्र जमलेले मानुष वित्त आहे. स्थावर जंगम इत्यादी सर्व द्रव्य आपल्याला अधिकाधिक मिळावं, मिळालेलं सुरक्षित राहावं, योग आणि क्षेम. अप्राप्याची प्राप्ती व्हावी, प्राप्त असलेल्याचं संरक्षण व्हावं हा सगळा भ्रमच आहे. संरक्षण आम्ही करतो अशी एक भ्रांति आहे.

संतांच्या अंतःकरणांमध्ये हा भ्रम नाहीये. याची उत्पत्ती कोणी केली? नाश कोण करणार आहे? हे काही आपल्याला माहीत नाही. जड असो, चेतन असो, त्याची उत्पत्ती आपण केली नाही किंवा नाशही आपण करू शकत नाही. संरक्षण आम्ही करतो हा एक भ्रम आहे. तो गेला पाहिजे. उत्पत्ति आणि विनाश करणारी शक्ती वेगळीच आहे एवढे ईश्वराचे आम्हाला ज्ञान आहे. हे अंशज्ञान झाले. पूर्ण ज्ञान नाही. संरक्षण करणाराही ईश्वरच आहे ही निश्चित बुद्धी झाली पाहिजे, ती बुद्धी झाली की सर्व संपले. मग भीती नाही. संरक्षणाचा अहंकार आम्ही आमच्यावर घेतल्यामुळे आम्हाला भ्रांती निर्माण होते. हा वित्तभ्रम गेला पहिजे.

तोच सर्वत्र रक्षण करणारा आहे. संरक्षण करणारा आणि नाश करणारा एकच आहे. ही निश्चयात्मक बुद्धी असल्याने कोणत्याही परिस्थितीत संतमहात्म्यांना भिती वाटत नाहीये. ''ठेविले अनंते तैसेची रहावे चित्ती असू द्यावे समाधान'' यात म्हटल्याप्रमाणे समाधानी अवस्था त्यांना यामुळे मिळालेली आहे.

***प्रश्न : महाराज, उपासनेचाही भ्रम होऊ शकतो कां?***

उत्तर : विद्या उपासनेलाही दैववित्त असे म्हणतात. सगुण असो किंवा अन्य कोणती उपासना असो, त्या उपासनेबद्दल भ्रम निर्माण होतो. साधनेचा, उपासनेचा भ्रम गेला पाहिजे.

साधनकालामध्ये आपल्याकडून काहीतरी साधना होत आहे त्याबद्दल भ्रांती आपल्याला उत्पन्न होते. माझ्या साधनेत मला असे अनुभव येतात, माझी अशी अशी प्रगती झाली, अशी माझी चांगली तयारी झालेली आहे, असे मनात विकल्प उत्पन्न होतात. परंतु हाही भ्रम गेला पाहिजे. ईश्वराच्या उपासनेने खरे ईश्वर दर्शन होते. तो ईश्वर सर्वत्र आहे, सर्वकालात आहे, उत्पत्ति, स्थिती आणि लय करणाराही तोच आहे. सर्वस्वरूपी तो आहे. त्याच्या खऱ्या दर्शनाने कोणत्याही परिस्थितीत टिकेल असे समाधान मिळते. पण साधनाभ्यासाच्या वेळी मात्र जर आपल्या मनात भ्रांती निर्माण झाली की मी मोठा उपासक आहे, माझी उपासना अशी चालू आहे, प्रगती आहे; तर काही होत नाही. हा भ्रम गेला पाहिजे. ईश्वराची साधना करणं हे आपलं कर्तव्य

आहे, कशी का घडेना; कमी घडेल, जास्ती घडेल तिकडे लक्ष द्यायचं नाही. कारण आपल्या सर्व ज्ञानेंद्रियांना, मनाला, बुद्धीला प्रेरणा देणारी एकच ईश्वराची शक्ती आहे हे जर का एकदा पटले असेल, निश्चित बुद्धी झालेली असेल तर कमी चाललेलं आहे किंवा जास्ती चाललेलं आहे याचा विचार तरी कशाला करायचा आपण! आरंभाला साधकदशा आहे. शेवटी सिद्धावस्था-परमात्मदशा आहे. साधकदशेतसुद्धा ईश्वरच सर्व आहे हे पटलेलं असेल आणि तशी बुद्धी निश्चित झाली असेल तर खरं ईश्वरदर्शन होऊ शकतं त्या ईश्वरदर्शनापर्यंत जो महात्मा गेलेला आहे तो ईश्वरापेक्षा भिन्न रहात नाही.

***प्रश्न : अशी निश्चयात्मक बुद्धी आम्हांला कशी प्राप्त होईल महाराज?***

उत्तर : ही निश्चयात्मक बुद्धी भगवंतच देणार, तोच ती कायम ठेवणार ती भगवंताकडेच मागावी लागते.

तशी प्रार्थना त्या ईश्वराजवळ करायची आहे. ईश्वराच्या कृपेने ही बुद्धी मिळते. तळमळ लागली पाहिजे म्हणजे ती तशी बुद्धीप्राप्त होणार आहे.

***प्रश्न : महाराज, ध्यान चांगले लागत नाही. ध्यान चांगले लागावे म्हणून काय करावे?***

उत्तर : विषयाच्या ठिकाणी जाणारी इंद्रिय बुध्दीने आवरावी, विषयाच्या ठिकाणी जाणारे मन भगवंताच्या ठिकाणी स्थिर करावे. भगवंताच्या मूर्तीच्या अवयवांचे ध्यान करावे. त्या ध्यानामुळे रजोगुण व तमोगुण कमी होतात.

प्रथम आसनजय झाला पाहिजे. मन निस्संग झाले पाहिजे. कोणाचाही संग मनात रहाता कामा नये. समोर हे विश्व दिसते आहे, हा परमेश्वराचा देह आहे. हे जीवात्मे, त्यांची शरीरं, भगवंताचेच स्वरूप आहे. पाताळ वगैरे सगळे लोक त्या भगवंताचेच अवयव आहेत असे ध्यान करायचे. त्यासाठी मन स्थिर झाले पाहिजे. विश्वरुपी परमेश्वराचे ध्यान करायचे. मन ध्यानात स्थिर होण्यासाठी वैराग्य आले पाहिजे. मनांत देहाची चिंता रहाता कामा नये. काही लोक भगवंताच्या मूर्तीचे ध्यानही करतात.

***प्रश्न : महाराज, ध्यानाच्या वेळी नामस्मरण केले तरी संसाराचे विचार मनांत येतच रहातात. अगदी मनाने ठरवून ध्यानाला बसले तरी संसाराचे विचार मधून मधून येतातच. काय करावे?***

उत्तर : अहंकार हे मूळ कारण आहे. अहंकाराचे कार्य म्हणजे सगळी सृष्टी आहे. त्या अहंकारामुळे जीवांची बुध्दी झालेली आहे. बुध्दीमध्ये अहंकार असल्यामुळे बुध्दीचं व मनाचे लक्ष ईश्वराकडे जात नाही. आपण वेगळे आहोत असे अहंकारामुळे वाटते. अहंकारामुळेच आपण समर्थ आहोत असे वाटते आणि आपल्या सामर्थ्याने आपण स्वतःचे कल्याण करून घेऊ इतरांचे कल्याण करू, हे केवळ या अहंकारामुळे वाटते. स्वतः सुखी होऊ, इतरांना सुखी करु असे केवळ आपल्या अहंकारामुळेच वाटत. भगवंताचे प्रेम अंतःकरणांत निर्माण करून घ्यायचे भगवंताच्या कृपेने. संतांचा संकल्प म्हणजे भगवंताचाच संकल्प आहे.

*प्रश्न : महाराज, अहंकार कसा दूर करावा?*

उत्तर : अहंकार दूर करणे फार कठीण आहे. कारण अहंकारोचे बुध्दीशी तादात्म्य झालेले आहे. ईश्वराची कृपा झाली म्हणजे अहंकार दूर व्हायचा. संसार दुःखापासून सुटायचं असेल तर अहंकार सोडून संतांचे प्रेम संपादन करणे याशिवाय दुसरा उपाय नाही. वेदान्त शास्त्रांत आसक्तीची जी निंदा आहे ती देहाची आसक्ती, देहाचा मोह यांची निंदा आहे.

भागवतकार सांगतात - देहाच्या आसक्तीनं आंम्ही संसाराच्या जाळयातच गुंतत जातो. पण तीच आसक्ती संतांच्या ठिकाणी ठेवली तर मोक्षाचे दार उघडते. संत भगवंत स्वरूप आहेत. त्यांच्यावर प्रेम करणे म्हणजे भगवंतावर प्रेम करणेच आहे. त्यांच्या ध्यानाने, प्रेमाने जीव शुध्द होतो. विषयाची आसक्ती सोडली आणि ती संतांचे ठायी अर्पण केली म्हणजे तो पुरुष मुक्त होतो असे भगवंत गीतेत सांगतात.

***प्रश्न : महाराज, धर्मशास्त्रांत पतीची सेवा, पतिव्रत्यधर्म , पतीची आज्ञा पाळणे, स्वयंपाक करणे अशी स्त्रियांची कर्तव्ये सांगितली आहेत. आजच्या व्यक्तीस्वातंत्र्याच्या, बुध्दीस्वातंत्र्याच्या काळांत काही स्त्रियांना ते पटत नाही. स्त्रीमुक्ती आंदोलनाच्या पुरस्कर्त्यांचा तर त्याला विरोधच आहे.***

उत्तर : मन हे शरीरातील इतर इंद्रियांपेक्षा निराळे आहे. स्त्रियांना, पुरुषांना व बालकांना ही सगळी कर्तव्ये धर्मशास्त्रांत जी सांगितली आहेत ती मनाची

शक्ती वाढवण्यासाठी आहेत. मानसिक शक्तीचा विकास झाला पाहिजे.

उपनिषदकार सांगतात - आपण जे अन्न खातो त्याच्यापासून मन तयार होत असत. ते अन्न पवित्र असेल, शुध्द बुध्दीने तयार केलेले असेल तर त्या अन्नाच्या सेवनाने तयार होणारे मनही शुध्द, निर्भय आणि सात्विक होते. स्त्रीने जर शुचितेने, पवित्र भावनेने स्वयंपाक केला आणि शुध्द भावनेने प्रेमाने वाढला तर त्या अन्नाच्या सेवनाने मन पवित्र होते. अशी सर्वांची मने पवित्र व्हावीत म्हणून स्त्रियांनी स्वयंपाक करावा हे सांगितले आहे. अन्न केवळ उदरभरणासाठी नाही. ज्या शरीराकरता आपण अन्न खातो ते अन्न गेल्यावरही मन मागे रहाते. ते मन पवित्र व्हावे, निर्भय व्हावे यासाठी वाटेल ते अन्न भक्षण करून चालणार नाही.

वेदांमध्ये गृहिणींना सम्राज्ञी म्हटले आहे. पती, सासु-सासरे, दीर वगैरे सर्वांची तू नियामक आहेत, सम्राज्ञी आहेस अशी वेदांमध्ये स्तुती केली आहे. गृहिणी व लक्ष्मी यात शास्त्राने फरक केलेला नाही. मग स्त्री मुक्त नाही, तिला स्वातंत्र्य नाही, असे कसे म्हणायचे?

गृहिणीला राग आला तर तो तिने शांत करावा, संयम ठेवावा हे सांगतात, कारण सहनशीलता हा स्त्रियांचा एक स्थायी भाव आहे. त्याला अनुसरून स्त्रियांची कर्तव्ये सांगितली आहेत. त्यांचे पालन केल्यामुळे स्त्रियांच्या बुध्दीचे संरक्षण होते आणि मानसिक शक्तींचा विकास होतो. पुरुषाजवळ एवढा संयम नसतो. पुरुषांचा संयम बुध्दीचे सामर्थ्य वाढवण्यासाठी असतो. त्याप्रमाणे शास्त्रांनी पुरुषांची कर्तव्ये सांगितली आहेत.

भगवान अर्जुनाला सांगतात " तस्मात शास्त्रं प्रमाण ते ।" शास्त्र हे सर्वांना प्रमाण आहे. हे शास्त्रप्रमाण्य सोडले तर धर्माचाही ऱ्हास होतो आणि तपःसामर्थ्याचाही ऱ्हास होतो. मनाच्या शक्तीचा ऱ्हास, मने दुर्बल होणे, निर्भयता जाणे याला कारण केवळ शास्त्रे प्रमाण न मानणे हेच आहे.

***प्रश्न : महाराज आज स्त्रियांना स्वातंत्र्य हवे आहे.***

उत्तर : स्त्रियांना स्वातंत्र्य हवे आहे ना! स्वातंत्र्य ईश्वर प्रेमाने उत्पन्न होत. परमेश्वराच्या प्रेमाने सर्व पुरुषांना सुधारण्याची शक्ती स्त्रियांना मिळते. पुरुषांना.

नियम्य व्हावे लागेल. पुरुषांना नियम्य करायचं असेल तर स्त्रियांनी अस नियम्य करायचं. व्यवहारामध्ये स्वातंत्र्य मिळवून काही उपयोग नाही. आर्थिक स्वातंत्र्य, पापपुण्यापासून स्वातंत्र्य सर्व प्रकारचे स्वातंत्र्य जर स्त्रियांना हवे असेल तर त्याचा स्त्रियांनाही उपयोग नाही आणि पुरुषांनाही उपयोग नाही.

ईश्वर भक्तीने ईश्वरालासुध्दा नमवण्याचे स्वातंत्र्य स्त्रियांना प्राप्त होते.

***प्रश्न : महाराज, काही लोक म्हणतात, शास्त्रांनी स्त्रियांना ज्ञानसाधनेचा अधिकार दिलेला नाही. त्या वेदमंत्र म्हणू शकत नाहीत असे आहे कां?***

उत्तर : शास्त्रांनी स्त्रियांना ज्ञानाचा अधिकार दिला आहे. पूर्वी अनेक स्त्रियांनी आत्मानात्मज्ञान प्राप्त केले होते. वेदान्त शास्त्रात त्या निष्णात झाल्या. याज्ञिक पती मिळाले. गुरूंच्या आशीर्वादाप्रमाणे ब्रह्मविचार करण्यास योग्य अशा झाल्या. गार्गी, मैत्रेयी, चुडाला अनेक नांवे सांगतात. यज्ञ करणाऱ्याच्या पत्नीला काही मंत्र श्रवण करण्याचा अधिकार मिळतो. इष्टीच्या वेळेस ती बाजूला बसू शकते. काही मंत्र उच्चारावे लागतात तिला. आत्मानात्म विचार करणारी पतिव्रता स्त्री इतरांना मार्गदर्शनही करू शकत होती. अशा अनेक अधिकारी स्त्रिया होऊन गेल्या आहेत. आजही आहेत.

***प्रश्न : महाराज, संशय हा मोठा दोष कां मानतात?***

उत्तर : संशय हो मोठा दोष आहे. एखाद्यावेळी संशय आला तर तो फार मोठा दोष आहे असे म्हणता येणार नाही. परंतु संशय कायम राहिला तर तो फार मोठा दोष आहे. संशयात्मा विनश्यती असे म्हणतात. नुसती चिकित्सा करीत बसले, माझ्या बुद्धीला पटलं पाहिजे असे म्हणत बसले तर कांहीच होणार नाही.

***प्रश्न : संशय कसा घालवावा महाराज?***

उत्तर : सद्गुरू ही पूर्ण शक्ती आहे. या पूर्ण शक्तीची जी आज्ञा होईल त्याप्रमाणे वागायचे ही भूमिका असली की मनांत कोणताच संदेह रहात नाही. सद्गुरूंची आज्ञा म्हणून धर्माचरण करीत रहावं म्हणजे मनांत संशय येत नाहीत. सद्गुरूंवर पूर्ण श्रद्धा ठेवावी, श्रद्धा मार्गच सोपा व कमी वेळात साक्षात्कारापर्यंत नेणारा मार्ग आहे असे संतमहात्मे सांगतात.

***प्रश्न : महाराज, अज्ञान हा स्वतंत्र पदार्थ आहे का?***

उत्तर : अज्ञान हा स्वतंत्र पदार्थ आहे असे शास्त्रकार सांगतात- ज्ञान झाल्यावर अज्ञानही जाते व ज्ञानही जाते. गढूळ पाण्याला निवळीची बी लावली की पाण्याचा मलीनपणाही नाहीसा होतो आणि ती निवळीची बी सुद्धा नाहीशी होते. ज्ञानेश्वरमहाराज सांगतात - ज्ञान झाल्यावर अज्ञानही जाते आणि ज्ञानही जाते.

***प्रश्न : महाराज, जीवनांत दुःखे भोगावी लागतात याचा अर्थ ईश्वराने आमची उपेक्षा केली अस म्हणायचं कां?***

उत्तर : ईश्वराने उपेक्षा केली असे वाटायचे कारणच नाही. सर्व दयाशक्ती ईश्वराचीच आहे. सर्वांवर उपकार करणे हा ईश्वराचा स्थायीभाव आहे. भक्तवत्सल आहे ईश्वर ! दयासागर आहे तो ! प्रारब्धकर्मा प्रमाणे दुःखे येतात. ती भोगूनच प्रारब्ध संपवायचे. काही नामस्मरणाने संपवायचे. दुःखे असली तरी धर्माचरण श्रध्देने करीत राहिले पाहिजे. भगवंताची भक्ती असेल तर ज्ञान, कर्म काही लागत नाही. भगवंताबद्दल आत्यंतिक प्रेम पाहिजे. मनांत कोणताही संदेह न येता ईश्वराची भक्ती झाली पाहिजे. भक्तीने सत्कर्म करीत राहिले तर, धर्माचरण करीत राहिले तर भगवंताला दया आल्याशिवाय रहात नाही.

***प्रश्न : महाराज, देवदेवतांची सहस्त्रनामावली स्तोत्रे म्हणायलाका सांगतात? त्याने साधनेला कसे काय सहाय्य होते?***

उत्तर : ईश्वराची अनेक रूपं आहेत, अनेक अवतार आहेत. तो अवतार धारण करून अनेक कर्म केलेली आहेत. त्या कर्मांचा विचार करणं हे तपच आहे. सहस्त्र नामावली स्तोत्रे कित्येक देवांची आहेत, देवींचीही आहेत. विष्णुसहस्त्रनाम आहे, गणेशाचे आहे, सुर्याचे आहे, सगळयांची आहेत. त्यानाामावरून सुध्दा काही काही चरित्राचा उल्लेख होतो. गौण नाम त्याला म्हणतात. गुणप्रयुक्त नांव. कृष्णाचे नाव दामोदर असे आहे. दावे . दाव्याने उदराला ज्याच्या बांधले आहे तो दामोदर. म्हणजे हे सगळे चरित्र डोळयासमोर येत. दाव्याने कृष्णाला बांधले? त्याच्या आईने? काय कारण घडले । ईश्वराच्या सर्व चरित्रांचे आलोचन नामावर नाही करता येत. गोविंद नाम आहे. हेही भगवान श्रीकृष्णांच गौण नाम आहे. गोकुळातल्या लोकांनी आपली पूजा

केली नाही म्हणून रागावून अहंकारामुळे इंद्रांनी जेव्हा पाऊस पाडायला सुरुवात केली, त्यावेळी गोपाळकृष्णांनी गोवर्धन पर्वत धारण करून सर्व गोकुळोचे रक्षण केले, गायीचे, गोपाळांचे, गोपींचे सगळ्यांचे संरक्षण केले. मग इंद्राचा अहंकार दूर झाला व तो शरण आला. कामधेनू घरी आली आणि गोपाळकृष्णाला म्हणाली तुम्ही होता म्हणून आमच संरक्षण झाले. आमचे इंद्र तुम्हीच आहात. गायींचा इंद्र तो गोविंद, तो गोपाळकृष्ण. अशी नांव आहेत - त्या नांवावरूनसुध्दा सर्व चरित्र लक्षात येतेय.

दिव्य चरित्र आहे परमेश्वराचे. त्या दिव्य चरित्राचे चिंतन करणे, मनाने नावाचे चिंतन करणे, अवताराचे, चरित्राचे चिंतन करणे, रूपाचे चिंतन करणे, हाही 'तप' शब्दाचा अर्थ आहे.

***प्रश्न : महाराज, आपण सांगितले होत संसारात अनासक्त वृत्तीने रहाणे हाच परमार्थ. आमच्यासारख्या सामान्य माणसाने अनासक्त रहायचे म्हणजे कसे रहायचे?***

उत्तर : याचना करायची नाही. गृहस्थाश्रमांत द्रव्याची जरुरी असते. पण विरक्ती असली म्हणजे याचना करावीशी वाटतच नाही. यदृच्छेने जे येईल ते येईल. त्यातच गुजराण करायची. त्यातच संतुष्ट रहायचे. संतोष मनेंत असला म्हणजे संसारात काही कमी आहे असे वाटतच नाही. आहे त्यातच संतोष आहे. कमी असले तरी संतोष आहे. कमी नसले तरी संतोष आहे. हाच अभ्यास आहे. असंतोष मनांत असला म्हणजे कितीही मिळाले तरी संसारात काही कमी पडते आहे असे वाटत रहाते. त्यामुळे समाधानी वृत्ती रहात नाही. संतोषवृत्ती असणे हीच खरी भगवंताची कृपा आहे.

हा संसार जो उत्पन्न झाला आहे तो वासनांमुळे, अविवेकामुळे झाला आहे. जीव हा ईश्वराचा अंश आहे. वास्तविक जीव व ईश्वर एकच आहेत. पण जीवाला अज्ञानामुळे मी देह आहे असे वाटते. या अज्ञानामुळे तो सुखी होतो, दुःखी होतो. देहाच्या आसक्तीमुळे तो संसारात आसक्त होतो आणि सुख आणि दुःखं निर्माण होतात. म्हणून तो बंधनात सापडतो. शोक, मोह, सुख, दुःख हे सगळे मायेमुळे निर्माण होते.

सद्गुरूकृपेने ज्ञान झाल की कळून येत संसार हा भ्रम आहे. ती एक भ्रांती आहे. जग असे काही नाहीच आहे. एक परमात्माच सर्व व्यापून राहिला आहे. अनेक नामरूपांनी तो परमात्म्यात नटला आहे हे ज्ञान ज्याला झाले तो मुक्त झाला. त्याला सुखदुःख, मोह शोक असे काही नाहीच. मग संसारात काही आसक्तीच रहात नाही. अनासक्त वृत्तीने तो रहातो. मनांत काही इच्छा येतच नाही. काही मिळवावेसे वाटतच नाही. ईश्वर चिंतनातच तो निमग्न रहातो. विधीने जे काही मिळेल ते मिळेल. चांगल अन्न मिळो, वाईट अन्न मिळो, मानाने मिळो, अपमानाने मिळो. त्यांचा संतोष बिघडत नाही. आनंदातच रहातो. दुःख सगळी संपून गेलेली आहेत, अयाचित वृत्तीने जो लाभ होईल त्यात संतुष्ट आहे. साधुवृत्तीने रहातो आहे . सर्वांच्याबद्दल सौहार्द भावना आहे. निरहंकारी आहे. मान करणारांशी सौहार्दाने वागतो आहे, अवमान करणारांशी, द्वेष करणाऱ्यांशीही सौहार्दाने वागतो आहे. सर्व ईश्वर आहे. अवमान करणारे, द्वेष करणारेही परमेश्वरच आहेत. ही बुध्दी आहे मग राग, द्वेष अस काही मनात येईलच कसे?

***प्रश्न : महाराज, अनासक्त रहायचे म्हणजे भगवंताकडे परमार्थातलेही काही मागायचे नाही का?***

उत्तर : भगवंताला आपली परिस्थिती सांगावी, काही मागून घ्यावे अशी इच्छाच होणार नाही. ईश्वराकडे काही मागावसे वाटत नाही. ऐहिकही काही मागावेसे वाटणारच नाही, पारमार्थिकही काही मागावेसे वाटत नाही. मागायचेच कशाला. ईश्वर सर्वज्ञ आहे. सर्व काही तो जाणतो आहे. ईश्वराकडे सुध्दा मागावेसे वाटणार नाही. मग इतरांकडे मागावेसे वाटेलच कसे? न मागता कोणी आणून दिलं तरी ते घेण्याचीही इच्छा होत नाही. आहे हे सर्व ईश्वराची योजनाच आहे असा विश्वास आहे. अशी निष्काम वृत्ती ज्ञान झाल्यावर येते. क्षेत्रक्षेत्रज्ञ विवेक पूर्ण झाल्यावरच अशी निष्काम वृत्ती प्राप्त होते.

***प्रश्न : महाराज, प्रल्हादजींनी मनांत इच्छा येऊ नये असा वर का मागितला?***

उत्तर : प्रल्हादजींनी नृसिहांना म्हटले मन इंद्रिय हे सगळे आपल्या ताब्यात आहे. त्याची सुधारणा तुम्हीच करायची आहे. आम्ही कितीही प्रयत्न केला

तरी तुमची इच्छा असेल तरच आमच्या प्रयत्नाला यश येणार. कोणतीही इच्छा आपल्या मनांत येऊ नये, अंतःकरण निष्काम व्हावे हेच मागितले प्रल्हादजींनी. मनांत काही इच्छा नसणे, काही वृत्ती नसणे हेच मुक्तीचं स्वरूप आहे. तेव्हा अंतःकरण निष्काम व्हावे असे प्रल्हादजींनी मागितले. मनांत काही इच्छा येऊ नये हाच वर द्या म्हणाले.

सर्वकामनिवृत्ती ज्याला मिळाली, मनांत काही इच्छा नाही, शमसिध्दी झाली. कोणतीही इच्छा आपल्या मनांत न येणं, अंतःकरण निष्काम रहाण हेच मुक्तीचं स्वरूप आहे. सर्व कामनिवृत्ती यालाही मुक्ती म्हणतात. मनांत काही इच्छाच नाही वासनाच नाही. अंतःकरण वासनाशून्य झाले, निर्वासन अंतःकरण झाले म्हणजेच जीवभाव संपला ईश्वरस्वरूपच झाला तो असे स्पष्टीकरण प्रल्हादजींनी दिलेले आहे.

***प्रश्न : महाराज, आमच्या मनांत इच्छा असतात म्हणूनच आम्हाला दुःखे होतात का?***

उत्तर : अंतःकरणात काही वासना नसली म्हणजे मग सर्वदुःख निवृत्ती होते. दुःख असेल तर भगवंताकडे जाऊन काही मागावे असे वाटते. पण मला दुःख आहेच कोठे?

***प्रश्न : महाराज, श्रीतुकाराममहाराजांसारखे संत भगवंताच स्मरण करीत रहातात. संसारात दारिद्रय असल तरीही त्यांना दुःख का वाटत नाही.***

उत्तर : भगवंताचे अखंड स्मरण मला होत आहे, त्याअर्थी दुःख नाहीच. दुःखाचे कारण असणारी दृष्टीच नाहीशी आहे. देवाने मला या अवस्थेत ठेवले आहे यांत देवाचा काही हेतू आहे. ऐहिक ऐश्वर्य मला मिळाले तर माझ्या मनांत मद उत्पन्न होईल, मी उन्मत्त होईन, मनात वासना पुन्हा निर्माण होतील, माझी बुध्दी बिघडून जाईल. माझ्या मनांत वासना उत्पन्न होऊ नयेत यासाठी देवाने या स्थितीत मला ठेवले आहे. हीच देवाची दया आहे. देव दयाळु आहे. माझी मनोवृत्ती शुध्द रहावी याकरिता मला अशी परिस्थिती दिली आहे. भगवंताची माझ्यावर पूर्ण कृपा आहे. संसारात धन, मान, ऐहिक ऐश्वर्य असे काही मिळाले नाही हेच बरे झाले अशीच बुध्दी आहे. आपल्याला पुन्हा मोह होऊ नये म्हणून देवाने ही योजना केली आहे हीच देवाची मोठी कृपा आहे

असे वाटते आहे. ईश्वरापर्ण वृत्तीने धर्माचरण करताहेत. मी धर्माचरण करतो ही भावनाही मनात नाही. अर्थ आणि काम हे हेतू मनांत नाहीतच. पण धर्माचरणाचा अभिमानही नाही. अकिंचन आहेत. भगवत प्रेम तेवढे अंतःकरणात आहे. दुसरं काहीही नाही.

***प्रश्न : महाराज, श्रीतुकाराम महाराजांनी भगवंताच अखंड स्मरण रहावे असे मागणे कां मागितले?***

उत्तर : भगवंत भक्तवत्सल आहे. त्याचे दास्य जन्मोजन्मी मिळावे एवढीच इच्छा मनांत आहे. अनंत गुणसंपन्न भगवंताचे अखंड स्मरण रहावे, त्याच्या भक्तांची संगती व्हावी एवढेच त्यांचे मागणे आहे. जन्म पुन्हां आला तरी चालेल, मुक्तीची इच्छा नाही. कर्मक्षय व्हावा अशीही इच्छा नाही. तो समर्थ आहे, परमात्म्यात दानाने, तपाने तो प्राप्त होत नाही. ज्याच्यावर भगवंताची कृपादृष्टी पडली त्यालाच भगवंताची प्राप्ती होते. इतरांना प्रयत्न करूनही होत नाही. भगवंतानीच मला जवळ केले आहे. माझा अंगिकार केला आहे. भगवंतांनी ज्याचा अंगीकार केला त्याचे पूर्ण कल्याण आहे हा विवेक आहे. अंगीकार ज्याचा केला नारायणे । निंद्य तेही वंद्य झाले ।। तुकाराममहाराज सांगताहेत अजामिळ, कान्होपात्रा या सगळ्यांचा भगवंतांनी अंगीकार केला म्हणूनच ते वंद्य झाले हेच समाधान आहे.

***प्रश्न : महाराज एखाद्या भक्ताला समृध्दी प्राप्त झाली तरी त्याचे समाधान टिकून राहिल कां?***

उत्तर : अहंकारादि दोषही भगवंताच्या कृपेनं दूर होतात. मग ज्या भक्तांना अहकांर नाही, विकार नाहीत ते संतोषानेच रहाणार. समृध्दी नसली तरी समाधान आहे. समृध्दी मिळाली तरी काही फरक नाही. सुख मला मिळालेले आहे, आनंद मला मिळालेला आहे असे समजणे हाही विकार आहे. निर्विकार आहे ते मिळालेले आहे ते रहावे, त्याचे संरक्षण व्हावे ही देवाची कृपा नाही. जे मिळवले आहे त्यापेक्षा आणखी जास्त मिळावे ही तर देवाची कृपा नाहीच आहे. असा मनांत पूर्ण विवेक आहे असेही संतमहात्मे होऊन गेले आहेत. माझ्या हातून काहीच सेवा घडली नाही तरी एवढी सुबुध्दी मला दिली आहे. जे आहे ते सर्व ईश्वराचेच आहे, ईश्वररूप आहे ही जाणीव मनांत पूर्ण आहे. ही

समृध्दी टाकून द्यावी असेही मनांत येत नाही. पत्नीची इच्छा म्हणून, मुलाची इच्छा म्हणून, इतरांची इच्छा म्हणूनच ऐश्वर्यातच राहिलो आहोत. पण मनांतून त्याग आहे. 'तेन त्यक्षेन भुंजीता' या वृत्तीने रहाताहेत. भगवंताचे अखंड ध्यान चालले आहे. त्या समृध्दीचा मनावर काही फरक नाही. तेच समाधान आहे. अशी वृत्ती मिळणे हीच देवाची खरी कृपा आहे.

भगवान श्रीकृष्ण सांगतात, 'असे जे भक्त आहेत, अनासक्त वृत्तीने राहताहेत, संसारांत आहेत पण अलिप्त मनाने राहताहेत अयाचित वृत्तीने मिळेल त्यांत संतुष्ट राहताहेत, साधुवृत्तीने सर्वांशी सौहार्दाने राहताहेत त्यांना मी शिरोधार्य मानतो. त्यांना मी पुन्हा पुन्हा वंदन करतो, त्यांनी मला पराजित केले आहे. भक्तांकडून असे पराजित होण्यांत भगवंताला आनंद वाटतो.' असे भगवंत स्वतःच सांगताहेत.

असे अनेक भक्त होऊन गेले, आजही आहेत.

***प्रश्न : महाराज, तितिक्षेचे महत्त्व एवढे का सांगतात?***

उत्तर : आत्मज्ञान होण्यासाठी तितिक्षा पाहिजे. तितिक्षा नसेल तर ज्ञान प्राप्त होणार नाही. प्राप्त झाले तरी ते टिकणार नाही. दुर्जनांनी कितीही अपमान केला, बोलले, मारले, बांधून ठेवले तरीसुध्दा खरे कल्याण प्राप्त करून घ्यायचे असेल तर सगळे सहन करायला हवे. आत्मानुसंधान करायचे असेल तर सहन करावेच लागेल. आत्मानुसंधान करण्यासाठी बुध्दी स्थिर पाहिजे, विवेकसंपन्न पाहिजे. मानापमानाकडे लक्ष गेलं, तितिक्षा गेली तर त्याने मला त्रास दिला त्याला त्रास द्या हे संपत नाही कधी. तितिक्षा असेल तरच हे संपते.

***प्रश्न : महाराज, दुर्जनांनी त्रास दिला तर सहन करणे आम्हाला कठीण वाटते?***

उत्तर : हे कठीण आहे. दुसऱ्यानं त्रास दिल्यावर सगळ सहन करायचं हे कठीण आहे. दुर्जनांनी निंदा कितीही केली तरी ज्याच्या मनावर कोणताही परिणाम होत नाही तो संत असतो तोच साधु आहे. त्रास देणं हा दुर्जनांचा स्वभावच आहे. सहन करणं हा सज्जनांचा स्वभाव आहे असं असेल तरच आत्मज्ञान राहील.

*प्रश्न : महाराज, इतरांचे दोष पाहू नयेत असे का सांगतात?*

उत्तर : हा गुण आहे, हा दोष आहे याला सोडावे हा बुध्दीचा दोष आहे. निवृत्ती जितकी जितकी होईल आणि मन परमेश्वराच्या ठिकाणी निमग्न राहील तो खरा गुण आहे.

*प्रश्न : महाराज, अमुक माणूस बुद्धीमान आहे, अमक्याला बुद्धी नाही असे आम्ही म्हणतो. बुद्धी म्हणजे काय?*

उत्तर : बुद्धी शब्दाची व्याख्या करतांना सांगतात अंतःकरणस्थ सूक्ष्मार्थ विवेक सार्थम् । सूक्ष्म पदार्थांचे चिंतन विवेचन करण्याचे सामर्थ्य म्हणजे बुद्धी.

बुद्धीमध्ये अनेक प्रकारच्या शक्ती आहेत, ज्ञान ग्रहण करण्याची जी शक्ती आहे तिला ग्रहणशक्ती म्हणतात. पण ज्ञान ग्रहण झालं तरी ते धारण करता येईलच असे नाही. त्यासाठी धारणाशक्ती वेगळी सांगितली आहे. या सर्व शक्ती ईश्वराकडूनच मिळतात.

*प्रश्न : महाराज, आम्ही ईश्वराची प्रार्थना करतो - ''आमची बुद्धी स्थिर ठेव.'' स्थिरबुद्धी म्हणजे काय?*

उत्तर : प्रत्येक वेळेला ईश्वरशक्तीची जाणीव राहणे हीच खरी स्थिरबुद्धी आहे. ही जाणीव आम्हाला नेहमी वाटत रहात नाही. पुष्कळ कार्य आपल्या बुद्धीशक्तीच्या बाहेरची घडून येतात. त्या वेळेला आम्ही म्हणतो ईश्वराने केले म्हणून तर वाचलो. ईश्वरानेच संरक्षण केलें. असें सगळें मानतो. प्रार्थना करतो, ईश्वराची पूजा करतो. परंतु पुन्हा असे कार्य घडले म्हणजे माझ्या बुद्धीने झाले, आम्ही केले असे म्हणायची आमची तयारी आहे. हा स्वभाव कांही बदलत नाही. ज्या ज्या घटना घडत असतील त्या सगळ्याही ईश्वराच्या इच्छेने घडताहेत असं ते नेहमी म्हटलं पाहिजे.

दैवीसंपत्तीसंपन्न भगवद्भक्त जे महात्मे आहेत त्यांना नेहमी जाणीव असते ती घडणाऱ्या सगळ्या घटना ईश्वराच्या शक्तीने घडताहेत याची. म्हणून ते निश्चित असतात. संसाराची काळजी नसते. त्यांना आम्हाला संसाराची काळजी वाटते, आमच्या मुलाचे कसे होईल. आमच्या ह्याचे कसे होईल ही काळजी वाटते आम्हाला. याचाच अर्थ ईश्वरीशक्तीवर आमचा पूर्ण विश्वास नाही. काही

काही वेळेपुरता आमचा पूर्ण विश्वास बसतो. पुन्हा कमी कमी होत जातो. प्रत्येक वेळेला ईश्वरशक्तीची पूर्ण जाणीव असणे, ईश्वरशक्तीवर पूर्ण विश्वास असणे हीच खरी स्थिर बुद्धी आहे.

आत्मशक्तीवर पूर्ण विश्वास हेच ईश्वरी शक्तीचे स्वरूप आहे. मनांत कधीही संदेह नाही. माझ्या हातून होईल की नाही. अमूक होईल की नाही, असे म्हणणारी जी बुद्धी आहे ती जीवाची बुद्धी आहे. संकल्प झाल्याबरोबर जे कार्य होणार आहे ते ईश्वरीशक्तीचे लक्षण आहे. म्हणून संतांचा पूर्ण विश्वास ईश्वरशक्तीवर आहे. त्या अनंताची शक्ती विलक्षण आहे. आमच्या कर्माप्रमाणे आमची व्यवस्था लावणारी ईश्वरीशक्ती आहे. त्याने जशी व्यवस्था लावलेली असेल त्याला आम्ही मान्यता दिलीच पाहिजे. तिथे विरोध करून चालणार नाही, अतिरेकीपणा चालणार नाही. कांहीही चालणार नाही.

ज्या ज्या घटना घडताहेत त्या सगळ्याही ईश्वराच्या इच्छेप्रमाणे घडताहेत असे सतत वाटले पाहिजे. ईश्वशक्तीची जाणीव सदैव ठेवली पाहिजे. म्हणजे कशाची काळजी वाटत नाही. निश्चिंत रहाता येते. भगवद्भक्तांनी असे रहावे म्हणूनच तुकाराममहाराज सांगताहैत - 'ठेविले अनंत तैसेचि रहावे। चित्ती असू द्यावे समाधान।'

***प्रश्न : महाराज, आमची बुद्धी सुधारता येणार नाही कां? आमची बुद्धीशक्ती वाढवता येणार नाही कां?***

उत्तर : अगोदर आमची शक्ती अगदी कमी आहे हे समजले पाहिजे. सर्वांत मोठी शक्ती ईश्वराची आहे हेही तितकेच पक्के समजले पाहिजे. आमच्या शक्तीवर फाजिल विश्वास उपयोगाचा नाही.

आमची बुद्धी सगळे समजणारी आहे अशी समजूत करून घेऊन काय उपयोग आहे? मानवाची शक्ती, मानवाची बुद्धी किती अपूर्ण आहे याची कल्पना पाहिजे. बुद्धीची पूर्णता आपल्याकडे नाही हे कबूल केले पाहिजे.

बुद्धीची पूर्णता असलेले महात्मे आजही जगात आहेत. प्रपंचातच ते असले तरी त्यांनी बुद्धीची श्रेष्ठता प्राप्त करून घेतली आहे. आम्हाला समोर प्रपंच दिसतो आहे. संसार समोर दिसतो आहे. तो बुद्धीच्या सहाय्याने मनांतून काढून

टाकायचा आहे. महात्म्यांनी तो मनांतून काढून टाकला आहे. म्हणूनच त्यांना महापुरुष म्हणायचे.

आपली बुद्धीशक्तीही वाढू शकते. अगोदर फलाबद्दल विश्वास असला पाहिजे. ईश्वराच्या कृपेने सर्वही प्राप्त होऊ शकते असा प्रथम विश्वास असला पाहिजे. तसा विश्वास असेल तरच प्रयत्न करण्याकडे प्रवृत्ती होणार! नाही तर कशी होणार? या मार्गावर विश्वास असला म्हणजे मग संतमहात्म्यांनी सांगितलेल्या उपायांकडे प्रवृत्ती होणार. मगच आपली बुद्धीशक्ती वाढू शकणार.

बुद्धी पूर्ण विकसित झाली पाहिजे. सर्व दुःखे दूर करता आली पाहिजेत. पूर्ण आनंद आपल्याला घेता आला पाहिजे. हे सगळं बुद्धीने करून घेता येते. अशी बुद्धी मिळवणं हाच प्रयत्न आहे. पूर्ण विश्वास ही त्या प्रयत्नांची सुरुवात आहे.

***प्रश्न : महाराज, आम्हाला हा पूर्ण विश्वास कसा प्राप्त करून घेता येईल.***

उत्तर : महात्म्यांनी अनेक जन्म पुष्कळ प्रयत्न करून ईश्वराच्या कृपेने, सद्गुरूंच्याकृपेने असा विश्वास मिळवलेला आहे. त्यांचे आयुष्य काही एवढेच नाही. अनेक जन्म त्यांनाही प्रयत्न करावा लागलेला आहे. आधीच्या जन्मांत केलेला प्रयत्न पुढच्या जन्मांत पुढे सुरू होतो. आपल्याला पूर्वीचा प्रयत्न आठवत नसला तरी सद्गुरूंना तो दिसत असतो. आपण चालू केलेला प्रयत्न फुकट जात नाही. केलेले पाप किंवा पुण्यकर्म कधीही फुकट जात नाही. पुण्य केले की त्याचेही फळ मिळणार. पाप केले की त्याचेही फळ निश्चित भोगावे लागणार. ते चुकणार नाही. त्यामुळे पुन्हा जन्म आला तरी तसेच संस्कार, तशाच वासना घेऊन तो जन्माला येता. पुन्हा त्याला कोणी ज्ञानी महात्म्याची संगती मिळणे, त्यांच्याकडून मार्गदर्शन होते आणि पुन्हा प्रयत्न सुरू होतो.

हा काही अंधविश्वास नाही. जीवात्म्याचा प्रयत्न किती काळ चालला पाहिजे हेही शास्त्राने सांगितले आहे.

महात्म्यांनी पूर्ण आनंद मिळवलेला आहे. सच्चिदानंदघन भगवंताची प्राप्ती त्यांना झालेली आहे. संसारही पूर्ण विसरून गेले आहेत आणि अहम्ही पूर्ण विसरून गेले आहेत. कांही संबंध नाही. असंग आहेत. आत्मचैतन्य हे

आनंदरूप असंग आहे. कोणाचाही संबंध नाही. हा विवेक ते पूर्णपणे प्राप्त करून घेतलेला आहे. तो विवेक ते दुसऱ्याला देऊ शकतात आणि दुसऱ्यांचीही बुद्धी सुधारून त्यांना विवेकसंपन्न बनवतात आणि आपल्याबरोबर या मार्गावर घेऊन जातात. हे त्यांचे सामर्थ्य आहे.

***प्रश्न : महाराज, आम्ही वाईट प्रारब्ध घेऊन आलेली सामान्य माणसे आहोत. अनेक पापकर्मेही हातून घडलेली आहेत. आम्हाला उद्धाराची आशा आहे कां? आमची बुद्धी सुधारणार कां?***

उत्तर : बुद्धीचा उपयोग कसा करायचा, कशासाठी करायचा, हे सगळे समजावून सांगणारे महात्मे भेटले पाहिजेत. अशा महात्म्यांची भेट होणे फार कठीण आहे. महापुरुष संश्रय फार कठीण आहे. दुसऱ्याची बुद्धी बरोबर ओळखणारे, त्याच्या बुद्धीतले दोष जाणून ते कसे जाऊ शकतील हे बरोबर सांगू शकणाऱ्या ज्ञानी महात्म्यांना भवरोगवैद्यच म्हणतात. आपल्यासमोर आलेला जीवात्मा कोणते कर्म घेऊन आलेला आहे, त्याचा भवरोग कसा घालवायचा याचे त्यांना पूर्ण ज्ञान असते. त्यांच्या दृष्टीने असाध्य रोग नाहीच आहे. याची सुधारणा होणार नाही असे ते कधीच म्हणत नाहीत. आपणा सारखे करीती तत्काल हे सामर्थ्य आहे. आपली जशी योग्यता आहे तशी योग्यता दुसऱ्यात निर्माण करू शकतात म्हणून त्यांना महापुरुष म्हणायचे.

***प्रश्न : महाराज, आत्मज्ञान होण्यासाठी सद्‌गुरूंची कृपा व्हावी लागते असे कां सांगतात?***

उत्तर : मोक्ष मिळवण्यासाठी शास्त्रकारांनी तप, योगाभ्यास, प्राणायाम असे अनेक मार्ग सांगितले आहेत. पण स्वतःच्या बुद्धीनेच जर ते केले तर त्याचे फळ मिळत नाही म्हणतात. पुष्कळ कष्ट केले, तप केले, साधनाभ्यास केला पण सन्मार्ग दाखवणारे गुरू मिळाले नाहीत तर मोक्ष मिळत नाही. सद्‌गुरूंची कृपा पाहिजे. त्याची भक्ती पाहिजे तरच या साधनांचा उपयोग होतो. नम्रपणे गुरूंकडे गेले पाहिजे. नम्रतेने परिश्रम केले पाहिजेत, सद्‌गुरूंची सेवा केली तरच गुरूंचा प्रसाद होतो आणि आत्मज्ञानाचा लाभ होतो.

***प्रश्न : महाराज, गुरूस्वरूप हे ईश्वरस्वरूप आहे हे आम्हाला कां समजत नाही?***

उत्तर : आचार्यमहाराज सांगतात, सद्गुरू निरूपमः । ज्ञानदान करणारे जे सद्गुरू आहेत, भवसागरांतून सोडवणारे, उद्धार करणारे जे सद्गुरू आहेत त्यांना जगामध्ये दृष्टान्त नाही, त्यांना उपमा नाही, परमात्मस्वरूप अतींद्रिय आहे, व्यक्त झाल्यावर ते इंद्रियांना दिसते. पण त्यांची परीक्षा करण्याकडेच बुद्धी गेली तर त्यांचे खरे दर्शन कधीच व्हायचे नाही. त्यांचे खरे स्वरूप कधीच समजून यायचं नाही.

संसारात मन आसक्त असले म्हणजे सद्गुरू हे ईश्वरस्वरूप आहेत हे ज्ञान होत नाही. ते आपल्यासारखेच आहेत असे वाटते. तेही बोलतात, चालतात, पहातात. आम्ही जसे वागतो तसे तेही वागतात. असेच आम्हीही वागतो. आमच्याप्रमाणेच त्यांचे सर्व आहे असे वाटते.

मनांत संसाराच्या अशुभ वासना भरून राहिल्या असल्या म्हणजे गुरूस्वरूप समजत नाही आणि गुरूसेवाही घडत नाही.

साधकांची लक्षणे सांगतांना भगवंतांनी सांगितले आहे. मान नाही, मत्सर नाही, असूया नाही. कार्यदक्ष आहे. गुरूसेवेत निमग्न झालेला आहे. गुरूंचे आज्ञापालन करण्याशिवाय दुसरा विचार मनांत नाही. देहासक्तीही नाही. फक्त सद्गुरूंची सेवा करायची आहे. सेवेशिवाय दुसरे मनांत काही नाही.

***प्रश्न : महाराज, सद्गुरूंकडे येणाऱ्या सर्वांनाच आत्मज्ञान का मिळत नाही?***

उत्तर : आत्मज्ञान निधी द्यायचा आहे. पण हा निधी दिला तर त्याचे तो शिष्य संरक्षण करू शकेल किंवा नाही हे पाहण्यासाठी अगोदर त्याची परीक्षा घ्यावी लागते. शिष्याची बुद्धी इंद्रिये वगैरे कशी आहेत याची गुरू तपासणी करतात. ज्या बुद्धीत ज्ञानाचे संक्रमण करायचे आहे ती बुद्धी शुद्ध आहे कां नाही हे पाहिल्याशिवाय ज्ञान कसं देणार?

उत्तम सांगणारे आहे. सांगणाऱ्याने सांगितले पुष्कळ. ऐकत असतांना मनात काही संशय रहात नाही. पण चित्तशुद्धी झालेली नसेल तर ते ज्ञान रहात

नाही. बुद्धी शुद्ध असल्याशिवाय ज्ञान द्यायचे नाही हे त्यासाठीच सांगतात. योग्यता असल्याशिवाय सद्‌गुरू ज्ञान देत नाहीत.

***प्रश्न : महाराज, आमची योग्यता नाही म्हणूनच तर आम्ही गुरूंकडे जातो ना? योग्यता यावी म्हणून आम्ही काय करावे?***

उत्तर : आपल्याजवळ योग्यता नसली तरी गुरूसेवेने ती योग्यता प्राप्त होते. बुद्धी शुद्ध होण्यासाठी गुरूसेवा करावी असे म्हणतात. गुरूस्वरूपाचे स्मरण करीत रहावे हीच खरी गुरूसेवा आहे अशा शिष्यावरच कृपा होते आणि तो आत्मसुखाचा अधिकारी होतो.

आत्मज्ञान मिळण्यासाठी प्रारब्धकर्म संपावे लागते. पापक्षय व्हावा लागतो. बुद्धी शुद्ध व्हावी लागते. प्रारब्धकर्म गेल्याशिवाय आत्मज्ञान नाही. पापक्षय मानवाच्या प्रयत्नांनी होणे कठीण असते. सद्‌गुरूंची कृपा झाल्याशिवाय आत्मज्ञान होत नाही. त्यासाठीच गुरूसेवा सांगतात. गुरूसेवेनेच प्रारब्धकर्म हे सगळेही नाहीसे होते.

मनांतले दोष दूर करायचे, अहंकार वगैरे दूर करायचे हे कार्य सद्‌गुरूच करू शकतात, अहंकाररूपी अंधःकार दूर करायला बाहेरचा कोणताच प्रकाश उपयोगी पडत नाही. अज्ञानाचा अंधकार दूर करण्याची शक्ती फक्त सद्‌गुरूंजवळ आहे, महात्म्यांजवळ आहे. सद्‌गुरू स्वतःच्यासारखेच करून सोडतात. आपली जी योग्यता आहे तीच योग्यता शिष्याची करणे हे फक्त सद्‌गुरूंचेच सामर्थ्य आहे. पण तशी सेवा घडावी लागते. तशी भक्ती असावी लागते.

***प्रश्न : ईश्वरप्राप्ती होण्यासाठी श्रद्धा असावीच लागते का? आस्तिक्यभाव असल्याशिवाय ईश्वरप्राप्ती होत नाही का?***

उत्तर : आनंदघनस्वरूप परमात्मा सर्वव्यापी आहे. तो सर्वव्यापी आहे म्हटल्यावर तो अमुक ठिकाणी आहे, अमुक ठिकाणी नाही असे म्हणता येत नाही. परमात्मस्वरूपाला कोणतीच क्रिया नाही, गती नाही आणि एका ठिकाणी स्थित असणे हेही नाही. मूळ आत्मस्वरूपाने भगवंताचे सर्वत्र वास्तव्य आहे. पण ते रूप अदृष्य आहे.

जशी आपण भावना करावी तसे वाटते. नास्तिक माणसाला ईश्वरप्राप्तीची बुद्धी नाही. त्याच्या बुद्धीने सगळेच नाहीसे झाल्यामुळे तो स्वतःच नाहीसा होता म्हणजे अधोगतीला जातो असे उपनिषदकार सांगतात. पण ईश्वर आहे म्हटल्यावर भगवंतांनी सांगितलेला सगळा साधनामार्गही आहे. ही आस्तिक्य बुद्धी असणारा जो आहे, तो त्याप्रमाणे आचरण करतो आणि फलप्राप्ती करून घेतो बुद्धीनेच सगळे मिळवायचे आहे. ''ईश्वर नाही'' अशी बुद्धी झाली की सगळे गेले. साधनेही गेली. साध्यही गेले.

बुद्धीवर ज्याप्रमाणे संस्कार असतील त्याप्रमाणे तो परमात्मा आहे. ईश्वरावर विश्वास ठेवावा, श्रद्धा ठेवावी असे शास्त्र सांगते. श्रद्धावान लभते ज्ञानम्। मुख्य अंतरंग साधन म्हणजे श्रद्धा आहे. बाकीच्या साधनांपेक्षा श्रद्धा हे साधन मुख्य आहे.

ज्ञान देणारे समर्थ आहेत. सर्वज्ञ संतमहात्मे आहेत. ईश्वराच्या इच्छेने ते ज्ञान देत आहेत. सांगणारे ''शाब्दे परेच निष्णात'' महात्मे आहेत. पण आमची 'बुद्धी तशी तयर नाही. तीव्र जिज्ञासा उत्पन्न व्हायला पाहिजे. सद्गुरूंची भेट व्हावी, मार्गदर्शन व्हावं, आत्मोन्नतीचा मार्ग कोणता आहे हे कळावं अशी तीव्र इच्छा उत्पन्न झाली पाहिजे. तरच तशा सद्गुरूंची भेट होऊन कार्य होतं.

***प्रश्न : महाराज, सद्गुरूंची सेवा कशी करावी?***

उत्तर : सद्गुरूंची सेवा कशी करावी हे कोणत्याच अहं माणसाला कळले नाही. ते कोणीही समजू शकत नाही म्हटले तरी चालेल. सद्गुरूंची सेवा करणे याचा अर्थ सद्गुरूंनी दिलेले नाम श्रद्धापूर्वक अखंड घेत रहाणे. सद्गुरूंनी दिलेले नाम श्रद्धापूर्वक अखंड घेत रहाणे हीच सद्गुरूंची सेवा आहे. सद्गुरूंचे स्मरण करीत रहाणे ही सद्गुरूंची सेवा आहे. सद्गुरूंची अशी सेवा करण्यासाठी वाटेल ते कष्ट घेतले पाहिजेत.

***प्रश्न : अनेक लोक सद्गुरूंवर श्रद्धा ठेवून त्यांनी सांगितलेली उपासना करतात. पण काही काळाने आम्हाला फळ मिळाले नाही म्हणून निराश होतात. आम्ही एवढी भक्ती केली, सेवा केली पण सद्गुरूंनी आमची उपेक्षा केली असे म्हणतात. उपासनामार्ग सोडून देणारेही काहीजण असतात.***

उत्तर : सद्गुरू भक्तवत्सल आहेत. केव्हाही त्यांच्याकडे गेले तरी भक्तवात्सल्यच अनुभवता येते अशी दृढ भक्ती पाहिजे. भक्ती असते, प्रेम असते पण भक्ताचे प्रेम दृढ आहे की नाही याची परीक्षा सद्गुरू करतात. त्यांचे ऐकले पाहिजे.

''आमच्याजवळ भक्ती आहे'' असे नुसते समजून भागत नाही. ''भक्तीने आम्ही खूप सेवा केली'' असे नुसते म्हणून भागत नाही. आमच्या बुद्धीत असलेले दोष दूर व्हायला पाहिजेत आणि मग सेवा घडली पाहिजे. त्या सेवेचे फळ भक्ताला केव्हा मिळाले? आमची उपेक्षा केली असे मनांतसुद्धा येणार नाही अशी अवस्था प्राप्त होणे हेच खरे फळ आहे.

ही सुद्धा चांगली स्थिती आहे. देवाने दिलेली स्थिती चांगलीच आहे असे खऱ्या भक्ताला नेहमीच वाटत असते. भक्तांनी, साधकांनी, उपासकांनी हा विचार नेहमी मनांत ठेवला पाहिजे की देव भक्तावर कधीच रागावत नाही. देव भक्तांची कधीही उपेक्षा करत नाही. ही बुद्धी पाहिजे. रागावणे, उपेक्षा करणे हे अल्प सामर्थ्याचे लक्षण आहे. देवाचे परिपूर्ण सामर्थ्य आहे ही जाणीव एकदा पक्की झाली म्हणजे देव रागावला, त्याने लक्ष दिले नाही असे कधीच वाटणार नाही.

''जैसी स्थिती आहे तैशापरी राहे । कौतुक तू पाहे संचिताचे ॥'' आपल्या संचिताकडे लक्ष द्या, कर्माकडे लक्ष द्या असे संत सांगताहेत. भगवंताला भक्ती प्रिय आहे असे संत सांगताहेत. श्रद्धा पाहिजे. वादविवाद करीत राहून चिकित्सा करीत राहून फळ मिळत नाही. फळ मिळाल्याशिवाय श्रद्धा ठेवायची नाही असे म्हणून कसे चालेल? आमची श्रद्धा असल्याशिवाय फळ मिळायचे नाही. संतमहात्मेश्रद्धा ठेवायला सांगताहेत. स्वतः अनुभव घेऊन सांगताहेत. त्यांचा प्रत्यक्ष अनुभव आहे. शब्दप्रमाण आहे ते.

बुद्धी शुद्ध असेल तरच त्या शब्दप्रमाणावर विश्वास ठेवावासा वाटतो, श्रद्धा उत्पन्न होते आणि सद्गुरूंच्या मार्गदर्शनाप्रमाणे साधकांचे अनुष्ठान, उपासना अखंड चालू रहाते.

***प्रश्न : महाराज, सद्गुरू कोणाला जवळ करतात?***

उत्तर : शुद्ध भक्ती, प्रेम, श्रद्धा यांचे मोठेच महत्त्व आहे. जो श्रद्धेने, भक्तीने मोठा तोच खरा मोठा मानला जातो. व्यावहारिक लहानमोठेपण, योग्यायोग्यता

यांचा विचार सद्गुरूंजवळ नाही. निर्मळ भक्ती पाहिजे. शुद्ध प्रेम पाहिजे. प्रल्हादजींनी आपल्या मित्रांना उपदेश करतांना शेवटी हेच सांगितले. शुद्ध भक्ती पाहिजे, दुसऱ्या कोणत्या कार्याकरता भक्ती नको. हे मिळावे, ते मिळावे म्हणून जर भक्ती करीत असेल तर ती खरी भक्ती नव्हे.

***प्रश्न : महाराज, आत्मज्ञान झाले म्हणजे मनातील इच्छा, वासना आपोआप नाहीशा होतात का?***

उत्तर : वासनाक्षयाचा स्वतंत्र अभ्यास करावा लागतो. तत्त्वज्ञान झाले. मीच ब्रह्मरूप आहे, सर्वव्यापी मी आहे, अनन्यस्वरूप मी आहे हे कळले. सर्व दुःख गेले. परंतु मनांत असणाऱ्या सर्व वासनांचा क्षय होण्याकरता पुन्हा अभ्यास करावाच लागतो. मनाचा निग्रह करावाच लागतो. मनांत येणाऱ्या वासनांचा रोध करावाच लागतो. मनांतील इच्छा, वासना विषयभोगाने कधीच तृप्त होत नाहीत. उलट त्या वाढतात. जितके भोग घ्यावेत तितक्या इच्छा वाढत जातात. म्हणून काम, वासना, इच्छा यांचा क्षय करण्याचा अभ्यास करावाच लागतो. वासना घालवाव्याच लागतात. त्या नाहीशा करण्यासाठी बाह्येंद्रिये यांचा प्रथम निरोध करावाच लागतो. असा निरोध केला म्हणजे पूर्वीच्या साठलेल्या वासनाच रहातात. नवीन वासनांची भर पडत नाही.

भगवंताच्या नामस्मरणाने, चिंतनाने, वाचनाने वासनसाचा क्षय करायचा. तो स्वतंत्र क्षय केल्याशिवाय मुक्ती लाभत नाही. देहसंबंध यायचा सुटत नाही.

***प्रश्न : महाराज, गुरूकृपेने साधकाला समाधी अवस्था प्राप्त झाली तर साधकाचा वासनाक्षय होतो का?***

उत्तर : समाधीअवस्था प्राप्त झाली तरी प्रारब्धकर्माचा प्रतिबंध असेल तर ती समाधी टिकत नाही. मनांत पुन्हा वासना येतातच. इंद्रियांनी विषयांचा भोग घेतला तर वासना वाढतच जातात. विषयांचा उपभोग घेऊन इच्छा थांबत नाहीत. वासना थांबत नाहीत. तृप्ती होत नाही. भोगाने वासनाक्षय होऊ शकत नाही. वासनाक्षय करण्यासाठी उपभोग हा मार्गच नाही.

मनोनिग्रह करण्यासाठी, वासनाक्षय करण्यासाठी भगवंताची भक्ती करणे हा एकच उपाय आहे.

***प्रश्न : महाराज, सद्गुरू केल्याशिवाय अध्यात्मज्ञान मिळतच नाही का?***

उत्तर : अध्यात्मशास्त्र हे प्रयोगशास्त्र आहे. तिथे आपल्या बुद्धीने वाटेल तो अभ्यास करून चालत नाही. ज्ञान मिळविण्याकरिता सद्गुरूंची अत्यंत जरूरी आहे. साधकाची योग्यता आणि सद्गुरूंची कृपादृष्टी यामुळे ज्ञान प्राप्त होते. सद्गुरू हेच माझे कुलदैवत आहे असे वाटले पाहिजे. त्यांचीच मी भक्ती करतो आहे. श्रद्धेने करतो आहे. तेच परमेश्वर आहेत. सर्व जगाची माझ्यावर अवकृपा झाली. सर्व जीव जरी रागावले तरी माझे सद्गुरू सर्वांचा कोप दूर करायला पूर्ण समर्थ आहेत.सद्गुरूच माता, सद्गुरूच पिता, सद्गुरूच त्राता, सद्गुरूच अधिपती, तेच योगक्षेम करताहेत. सर्व संबंध सद्गुरूंच्या ठिकाणी जोडले गेले पाहिजेत. माता, पिता, संरक्षक तेच आहेत. तरच आत्मज्ञान होते.

देव जरी झाले तरीसुद्धा त्यांनी गुरूभक्ती केली. बृहस्पतीची सेवा केली. प्रभु रामचंद्र, श्रीकृष्ण, अश्विनीकुमारांनी गुरू सेवा केली. सद्गुरूंची सेवा करणारा जो आहेत त्याला कलीचा कोणताच दोष नाही. गुरूभक्ती ज्याला पूर्वसुकृताने मिळाली त्याला कली काही करू शकत नाही. सद्गुरू आत्मज्ञान देऊन शिष्याचे पूर्ण कल्याण करू शकतात. आमची भक्ती तशी नाही. आमची श्रद्धा तशी नाही.

***प्रश्न : सद्गुरूंच्या चरित्राचे पुन:पुन्हा वाचन करावे, अध्ययन करावे असे का सांगतात?***

उत्तर : वासुदेवानंद-सरस्वतीस्वामीमहाराजांचे त्रिशती म्हणून काव्य आहे. त्यात स्वामीमहाराजांनी सद्गुरूंची पूर्ण कृपा झालेला शिष्य कसा असतो, भक्त कसा असतो याचे वर्णन केले आहे. सद्गुरूंचे चरित्र हेच अमृत आहे. हे अमृत मला मिळाल्यामुळे आणि त्याचाच आस्वाद मी घेत असल्यामुळे सगळ्या वासना संपल्या आहेत. सगळ्या इच्छा शांत झालेल्या आहेत.

सद्गुरूंच्या चरित्राने स्थितप्रज्ञ अवस्था प्राप्त होते. कृतकृत्य अवस्था प्राप्त होते. मला आता काहीही करायचे नाहीए.

सद्गुरूच्या चरित्ररूपी अमृताचा आस्वाद घेण्यात मी नित्य निमग्न असल्यामुळे ईश्वराचा साक्षात्कार झालेला आहे. त्यामुळे परमानंद आहे. सगळी

दुःखे माझी गेलेली आहेत. हे भूपृष्ठ, हे विश्व हेच माझे घर आहे. जे काही विधीने मिळेल त्यात मला आनंद आहे. चांगले अन्न मिळो, मानाने मिळो, अपमानाने मिळो, वाईट अन्न मिळो, संतोष माझा काही बिघडत नाही आणि सर्वात जास्त फायदा म्हणजे भगवान सद्गुरूमहाराज नेहमी माझ्याबरोबर आहेत. सद्गुरूंच्या चरित्र पठणाचे हे फळ स्वामीमहाराजांनी सांगितलेले आहे.

***प्रश्न : महाराज, सद्गुरूंचे शब्द नेहमी सत्य होतात असे म्हणतात. असे का होते?***

उत्तर : ज्ञानी महात्मे असत्य कधीच बोलत नाहीत. सद्गुरू म्हणजे मूर्तिमंत सत्य. त्यांच्या वाणीतून जे निघते तसे घडून येते. ही एक सिद्धीच आहे. अमावास्येला चंद्रोदय होईल असे सद्गुरूंनी म्हटल्यावर खरोखरीच चंद्रोदय झाला अशी काही उदाहरणे विदर्भात घडल्याचे गुलाबरावमहाराज सांगतात. सत्य हे परमात्म्याचे स्वरूप आहे. भगवान सत्यस्वरूप आहेत. म्हणूनच सद्गुरू हे मूर्तिमंत सत्य आहे.

सद्गुरूंचे जे काही कर्म आहे ते दिव्य आहे याची जाणीव आपल्याला पाहिजे. वल्लभाचार्य म्हणतात, ''मधुराधिपते अखिलं मधुरम्।'' भगवान श्रीकृष्णांचे सर्व काही मधुर आहे. काहीही चूक त्यात काढता येणार नाही. तशी दृष्टी पाहिजे, ती श्रद्धा पाहिजे. तिथे बुद्धीची अपेक्षा नाही.

***प्रश्न : महाराज सद्गुरूंची कृपा झाली तर प्रारब्धकर्म संपून जाते कां?***

उत्तर : भक्ताच्या उद्धारासाठीच तर ते अवतीर्ण झाले आहेत ना ! कोणता भक्त अडचणीत आहे, कोणत्या भक्ताला त्याची कर्मे प्रतिबंध करताहेत हे सगळे बघून त्याला त्यातून सोडवायच आहे. सद्गुरूंच्या केवळ दृष्टीक्षेपानेही प्रारब्धकर्म संपून जाते.

ईश्वराच्या इच्छेनेच तर प्रारब्धकर्मे फळ देतात. ईश्वराची इच्छा नसेल तर प्रारब्धकर्मे काहीही करू शकणार नाहीत. ईश्वरानेच नियम घालून दिलेले आहेत ना! सद्गुरूस्वरूप हे ईश्वररूपच आहे. अशक्य असे काहीच नाही त्या शक्तीला. त्यांचा दृष्टीपात झाल्यावर प्रारब्धपाप राहील तरी कसे?

श्रीपादवल्लभांच्या हस्तस्पर्शाने त्यांचे पांगळे बंधू चालायला लागते. आंधळ्या बंधुंना दृष्टी उत्पन्न झाली. आपलं मूळ स्वरूप त्यांनी मातेला दाखवले. दत्तात्रेय स्वरूपाचे तिला दर्शन झाले. त्या स्वरूपाचे तू नित्य चिंतन करत जा म्हणजे तुला सायुज्य मुक्ती प्राप्त होईल म्हणाले. ही सगळी हकीगत गुरू चरित्रांत दिलेली आहे.

ते सद्‌गुरूस्वरूप आपल्याला दिसण्याची आज आपली योग्यता नाहीए. पण देवाने ती योग्यता आम्हाला द्यावी, आपले खरे स्वरूप दाखवावे अशी प्रार्थना करायला काय हरकत आहे? हे खरेच नाही, खोटेच नाही असे म्हणून बसायचे. चिकित्सा करीत बसायचे. म्हणजे मूळांतून सगळी अश्रद्धा बाळगून काहीच फायदा होत नाही.

***प्रश्न : महाराज, आम्हाला आत्मसाक्षात्कार कां होत नाही?***

उत्तर : आत्मसाक्षात्कार करून घ्यायचा म्हणजे साधनचतुष्ट्य संपत्ती पाहिजे. साधनचतुष्ट्य संपत्तीत पहिला नित्यानित्यविवेक आहे. नित्य काय आहे, अनित्य काय आहे हा विवेक झाला पाहिजे. केवळ भगवंतच एक नित्य आहे, सत्य आहे, शाश्वत आहे. बाकी सगळे अनित्य आहे, जाणारे आहे, नाहीसे होणारे आहे. यालाच नित्यानित्यविवेक म्हणतात. तो पाहिजे.

इहमूत्रार्थपरलोक विचार पाहिजे. दम, शम, उपरति, तितिक्षा, समाधान व श्रद्धा ही षट्संपत्ती पाहिजे आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे तीव्र मुमुक्षा पाहिजे.

ही साधन चतुष्ट्य संपत्ती ज्याने मिळवली तो क्रमाने श्रवण, मनन आणि निदिध्यासन करू लागतो. आत्मानात्मविचाराकडे त्याची प्रवृत्ती होते. मग पुढे आत्मसाक्षात्कार होतो.

***प्रश्न : महाराज, श्रवण करायचं म्हणजे संतमहात्म्यांची प्रवचने ऐकायची का? कां त्यांचे ग्रंथ वाचायचे? कां संतमहात्म्यांना प्रश्न विचारायचे?***

उत्तर : श्रवण, मनन आणि निदिध्यासन या विचारांच्या तीन भूमिका आहेत. श्रवणभूमिका ही पहिली भूमिका ज्ञान प्राप्त करून घेण्यासाठी आहे. उपनिषदांमध्ये ईश्वरस्वरूप सर्व मांडून ठेवले आहे. आत्मा, परमात्मा सगळे त्यात दिलेले आहे. आत्मा, परमात्मा एकच आहे ते. आत्मस्वरूप असंग

आहे, निर्विवाद आहे, साक्षी आहे, उदासीन आहे. सर्व इच्छाशक्ती, ज्ञानशक्ती, क्रियाशक्ती ईश्वराचीच आहे. सर्व भूतांचा कर्ता परमात्मा आहे. सर्व विश्व त्यानेच निर्माण केले आहे. सर्व विश्व त्यांचेच रूप आहे. विश्वरूपी तो आहे. सर्वांचा आहे, तो परमात्मा आहे. वेदांनी त्या परमात्म्याचेच प्रतिपादन केले आहे. संतमहात्मेही तेच सांगताहेत. हे ज्ञान करून घेणे.

हेच श्रवण आहे. श्रवण आणखी कोणते?

***प्रश्न : मननाचे एवढे महत्त्व कां सांगतात महाराज?***

उत्तर : ज्ञान दृढ करण्यासाठी मननभूमिका ही दुसरी विचारभूमिका सांगतात. आत्मस्वरूप कसे आहे याचे ज्ञान मिळवून त्याचे मनन करीत रहायचे. मनांतून सर्व असंभावना निघून गेली पाहिजे. हे शक्य नाही, ते शक्य नाही हे सगळे विचार मनांतून निघून गेले पाहिजेत. एक परमात्माच सत्य आहे. तोच परब्रह्म ही भावना मनन भूमिकेमुळे दृढ होते. उपनिषदांनी परमात्म्याचे स्वरूप वर्णन करून सांगितले आहे. शब्दप्रमाण आहे ते. हा दृढ विश्वास मनांत उत्पन्न झाला म्हणजे मग त्याचे साधन सुरू होते.

***प्रश्न : महाराज, निदिध्यासन म्हणजे काय?***

उत्तर : निदिध्यासन म्हणजे ध्यान. परमात्म्याचे ध्यान. जो परमात्मा आहे, परब्रह्म आहे. त्याचं ध्यान सुरू झाले पाहिजे. भगवंताच्या सगुण साकार रूपाचे ध्यान करायचे. एक परमात्म्याचे आहे. सर्व विश्व हे त्याचेच रूप आहे. हे जे काही दिसते आहे. ते सर्व वासुदेवरूपच आहे ही बुद्धी होण्यासाठी त्या विश्वरूपी परमात्म्याचे ध्यान करायचे.

विश्वरूपाच्या ध्यानामध्ये मन स्थिर झाले म्हणजे बुद्धीतील दोष निघून जातात. बुद्धीतील मलीन भावना नाहीशा होत जातात. मनांतील सर्व विकार कमी कमी होऊ लागतात. अहंकार कमी होऊ लागतो. काम, क्रोध, लोभ, मोह, मद, मत्सर हे सर्व विकार कमी कमी होत जातात. ममता कमी होत जाते. हे माझे आहे, ते माझे आहे, हे मी मिळवले आहे, मी याचे संरक्षण करणार आहे ही सगळी ममतेची भावना कमी कमी होऊ लागते.

अहंकार, कामक्रोधादि सर्व विकार, ममता हे दोषच आहेत. ते दोष गेले

पाहिजेत. ते सगळे दोष कमी करण्यासाठी निदिध्यासन ही भूमिका आहे. सगुण परमेश्वराचे ध्यान सुरू झाले की बुद्धीतले सर्व दोष जातात.

पुढे निर्गुण स्वरूपाच्या ठिकाणी चित्त स्थिर झालं की झालं. ध्यान करणे याचाच अर्थ मनाची स्थिरता आहे. मनाची स्थिरता झाली म्हणजे वासना कमी कमी होत जातात, इच्छा नाहीशा होऊ लागतात. वासनाक्षय होऊन मनावरचे सगळे वाईट संस्कार नाहीसे होतात. त्यासाठी ध्यान आहे.

***प्रश्न : महाराज, संतांच्या ग्रंथांचे एवढे वाचन करूनही आमचा वासनाक्षय कां जात नाही?***

उत्तर : आमचा वासनाक्षय न होण्याचे कारण असे आहे की आमच्या अनेक जन्मांच्या वासना पक्क्या झाल्या आहेत. त्या वासना पक्क्या करण्याकरताच पुन्हा आम्ही विषयभोग घेतो आहोत. संसारांत पडतो आहोत. म्हणजे वासना वाढतच जाताहेत. आमचे मनच स्थिर नाही. त्यामुळे त्या विषयवासनांचाच जास्तीत जास्त विचार होतो आहे. त्यांचाच सारखा विचार मनांत असल्यामुळे त्या वासना अधिकच पक्क्या होत जाताहेत.

***प्रश्न : महाराज, आम्ही वासनाक्षय कसा करायचा?***

उत्तर : ज्ञानभूमिकेवर आल्यावर वासनांचा क्षय होऊन जातो आणि मनाची स्थिरता होते. सगुण ध्यानामध्ये परमात्म्याच्या त्या सगुण साकार रूपाचे भक्तीप्रेम आहे. निर्गुण निराकार अशा प्रकारच्या आत्मस्वरूपाच्या ठिकाणी मन स्थिर होणे ही सुद्धा एक प्रकारची भक्तीच आहे. मन अनन्य झाले. मन भगवंताच्या ठिकाणी स्थिर झाले की मन दुसरीकडे कुठे जातच नाहीए. ईश्वरभक्तीनेच सर्व वासना जातात. ईश्वरभक्ती हा एकच मार्ग आहे, दुसरा मार्ग नाही.

***प्रश्न : महाराज, शास्त्रकार सांगतात, 'मातृदेवोभव', 'पितृदेवोभव', 'आचार्यदेवोभव' त्याचा अर्थ काय?***

उत्तर : 'मातृदेवोभव', 'पितृदेवोभव', 'आचार्यदेवोभव', 'अतिथीदेवोभव' असे सांगतात. ही सगळ्या देवतांची उपासना म्हणजे प्रत्यक्ष मूर्तींचीही उपासना होईल किंवा त्याचा दुसराही अर्थ होईल. माता, पिता, आचार्य, अतिथी या

प्रतीकांच्या ठिकाणी देवत्त्वबुद्धी धारण करावी आणि त्यांची उपासना करावी असाही त्याचा अर्थ होईल. ही देवाचीच उपासना आहे मानावं असाही अर्थ होईल. त्यानेसुद्धा अंतःकरणाची शुद्धी होते. मनांतील विकार नाहीसे होतात. अहंकार जातो. ममता जाते.

पुंडलीकाने माता व पिता यांची ईश्वरभावाने सेवा केली ही ईश्वराचीच उपासना झाली. भगवान विठ्ठल त्या सेवेने प्रसन्न झाले. अशा अनेक कथा सांगतात. आचार्य हे ईश्वराचेच रूप आहे अशी श्रद्धा असेल तरच ज्ञान मिळते. ''श्रद्धावान लभते ज्ञानम्'' भगवान श्रीकृष्ण सांगताहेत. 'अतिथी देवो भव' असे शास्त्रकार सांगतात. भगवंत अतिथीरूपाने आल्याच्या अनेक कथा आहेत. अनुसुयामातेची परीक्षा घेण्यासाठी ब्रह्माविष्णुमहेश अतिथी रूपानेच आले होते. अतिथीदेवोभव ही श्रद्धा होती म्हणूनच भगवंतांची कृपा झाली. भगवान दत्तात्रेय अतिथीरूपाने मध्यान्हकाळी भिक्षेसाठी येतात असे सांगतात.

***प्रश्न : महाराज, अवतार घेण्याचा एक हेतू परित्राणाय साधुनाम असा भगवान श्रीकृष्ण सांगतात. ते का?***

उत्तर : भगवंतांना धर्मसंरक्षण करायचे आहे. धर्माचे संरक्षण केले म्हणजे विश्वाचे संरक्षण होते. धर्मसंरक्षण करणे म्हणजे धर्मशील अशा सज्जनांचे संरक्षण आणि धर्मविरोधी प्रवृत्तींचा नाश. त्यासाठी भगवंत प्रत्येक युगात येताहेत. त्यासाठी संतमहात्मे अवतीर्ण होताहेत. ही सगळी भगवंताची लीला आहे. कशाकरता भगवंत लीला करताहेत हे सांगता येत नाही.

***प्रश्न : महाराज, आयुष्य ठरलेले असते असे सांगतात. आमचे आयुष्य वाढवणे शक्य असते का?***

उत्तर : आयुष्य ठरलेले असते असे सांगतात. परंतु पापकर्मे केली म्हणजे आयुष्य कमी होते. अधिक पुण्यकर्म घडले तर त्याच्यायोगाने आयुष्य ठरल्यापेक्षा वाढू शकते. रूद्रपठणामुळे पातकांचा नाश होतो. म्हणून भक्तीने यथाविधी रूद्रपठण केले, रूद्राभिषेक केला तर आयुष्य वाढते असे शास्त्रकार सांगतात.

***प्रश्न : संतमहात्म्यांकडे केवळ पारमार्थिक मार्गदर्शनच मागावे असे काहीजण सांगतात. त्यांची मदत केवळ पारमार्थिक योग्यता***

*वाढवण्यासाठीच घ्यावी काय?*

उत्तर : महात्म्यांची भेट झाल्याने ऐहिक व पारलौकिक दोन्ही कर्मे सिद्ध होतात. सांसारीक सुख पाहिजे असेल तर तेही ते महात्मे देऊ शकतात. संसारांतून मुक्त करण्याचे सामर्थ्यही त्यांच्याजवळ असते. त्यांच्या कृपेने सगळी दुःखे, ताप, पाप, रोग, शोक, क्लेश, सर्व काहीनाहीसे होऊ शकतात आणि पारमार्थिक योग्यताही वाढते. लोकांचा उद्धार करण्यासाठीच संतमहात्मे अवतीर्ण होतात. लोकांचा उद्धार करण्याचे त्यांचे कार्य सतत चालले आहे. त्यांची कृपा झाली म्हणजे प्रपंच व परमार्थ दोन्ही साधतात.

**प्रश्न : महाराज, ज्ञानदेव सांगतात, ‘‘बहुत सुकृताची जोडी । म्हणुनी विठ्ठली आवडी । आमच्या हातून पुण्यकर्मे घडली म्हणूनच ईश्वराची भक्ती आम्हाला मिळाली ना! मग ईश्वरी कृपा झाली तरच ईश्वराची भक्ती प्राप्त होते असे कां म्हणायचं? पुण्यकर्मांने भक्ती प्राप्त होते असे म्हटल्याने लोकांमध्ये पुण्यकर्म करायची बुद्धी आणि प्रयत्न वाढायला मदत होणार नाही का?**

उत्तर : पूर्वकर्म काय आहे, ते नाहीसे कसे करायचे याचे ज्ञान आम्हाला नसते. म्हणजे आम्ही बुद्धीवादी असलो, प्रयत्नवादी असलो तरी आपल्या बुद्धीने काही करू शकतो का? प्रतिबंध कां होतो, कसा होतो हेच जिथे कळत नाही तिथे प्रतिकार करणार कसा? जीव असमर्थ आहे तरी मी आपल्या बुद्धीने पुण्यकर्म करू शकतो असे आपण म्हणतो. पुण्यकर्माचा अभिमान वाटला तर ईश्वराच्या कृपेचे फळ आहे असे वाटणारच नाही. पुण्यकर्म स्वतःचे आहे. मी हे पुण्यकर्म केले आहे असा अभिमान धरून जर ते चार लोकांना सांगितले तर त्या पुण्यकर्माचे सर्व फळ निघून जाते. आपण केलेल्या धर्माचे आपणच इतरांजवळ वर्णन केले तर तो धर्म नाहीसा होतो असे शास्त्रकार सांगतात. पण तीच मुक्ती पापाकरिता सांगतात. जर आपल्याकडून घडलेले पाप स्वतःच्या मुखाने इतरांना सांगितले तर ते पाप नष्ट होते.

पाप जाण्याकरता स्वतः ते इतरांना सांगणे हा एक उपाय आहे. पण तेवढे आपल्याजवळ धैर्य पाहिजे. आपण केलेले पाप आपण झाकून ठेवतो आणि पुण्य मात्र लोकांना सांगत रहातो. आपण शुद्ध आहोत, निरपराधी आहोत

असे सांगितल्याने ते पुण्यकर्म नष्ट होते. ईश्वराची प्रेरणा असल्याशिवाय धर्माकरिता अनुकूल बुद्धी उत्पन्न होत नाही, धर्माचरण घडत नाही. पुण्यकर्मे हातून होत नाहीत.

भगवंताची भक्तीसुद्धा ईश्वराच्या प्रेरणेशिवाय होत नाही. सत्कर्मे करावीत, सुकृत घडावे अशी बुद्धी देणारा तो परमात्मा आहे. सर्वांनी सत्कर्मे करावी हे मार्गदर्शन करण्याकरिता ''बहुत सुकृताची जोडी'' असे ज्ञानदेव सांगतात. तुम्ही सत्कर्मे करा. ती सत्कर्मे करायची बुद्धी देणारा भगवंत आहे. ही जाणीव ठेवून सत्कर्मे करावी. मी सत्कर्म करतो आहे असा अभिमान धरू नये. धर्माचरण घडूनसुद्धा त्याबद्दल कोणताही अभिमान नसणे हीच मोठी योग्यता आहे.

मी ही पुण्यकर्मे केली, मला हे फळ मिळावे अशी अपेक्षा ठेवून महात्म्यांकडे गेले तर फळ मिळायचं नाही. कर्म ईश्वरार्पण करावे. स्वतःचे सर्व काही विसरून जावे. दया ईश्वराने करावी, तो समर्थ आहे. अशा विश्वासाने महात्म्यांकडे जावे, ईश्वराकडे जावे म्हणजे त्याचे फळ मिळते.

***प्रश्न : महाराज, आमचे मन शांत कसे होईल? आम्हाला शांती कशी लाभेल?***

उत्तर : आसक्ती गेली पाहिजे. हे पाहिजे, ते पाहिजे असे काही नसेल तरच मन शांत होते. आसक्तीमुळे शांतता मिळत नाही. मनांत अनेक वासना असतील तर मन शांत कसे होणार?

मन शांत झाले आहे याचाच अर्थ वासनाक्षय झालेला आहे. शंकराचार्य-स्वामीमहाराज सांगतात, वासना कमीकमी होत जाणे म्हणजे शम आहे, शांती आहे. साधनचतुष्ट्य संपत्तीमध्ये वासनाक्षयाला मुख्य महत्त्व आहे. जितक्या वासना कमी तितके सुख अधिक आहे. बाकीची साधने अंगभूत आहेत, कमी महत्त्वाची आहेत असे म्हणतात आचार्य महाराज.

वासनाक्षय झाला की शांती प्राप्त होते. साधनचतुष्ट्यामध्ये विरक्ती सांगितली आहे ती विरक्ती तीव्र पाहिजे. केव्हा एकदा या मायेतून मी सुटेन असे तीव्र वैराग्य निर्माण झाले पाहिजे. त्याचे उदाहरण सांगतात- मध्यरात्री



श्रीदत्तमहाराज जालना येथे मुलांना मंत्रदीक्षा देतेवेळी



सौ. ताईमहाराजांची "वारुणीशांती" - ५६ वा वर्धापनदिन श्रीवासुदेवनिवास येथे साजरा झाला. त्यावेळी श्रीदत्तमहाराज आणि सौ. आईसाहेबही उपस्थित होत्या.



श्रीदत्तमहाराजांची पेढयाची तुला जालना येथे (श्रीदत्तआश्रम मंदिर) मध्ये केली. श्रीदत्तमहाराजांच्या रौद्रीशांतीनिमित्त हा सोहळा साजरा केला.



रेणुका निवास : श्रीदत्तमहाराजांचा ८८ वा वर्धापन दिन

घराला आग लागली. जीव वाचवण्यासाठी खिडकीतून खाली उडी मारली . घरात बायको आहे, मुले आहे. संपत्तीने भरलेली तिजोरी आहे, याकडे लक्ष जात नाही. स्वतःचा जीव वाचवावा हीच एक उत्कट इच्छा आहे. तसे संसारांतून सुटावे असे तीव्रतेने वाटले पाहिजे. त्याशिवाय शम साध्य होत नाही आणि शांती मिळत नाही.

***प्रश्न : महाराज, अयाचित वृत्ती म्हणजे काय? त्याचे एवढे कां महत्त्व सांगतात?***

उत्तर : जे मिळेल त्यावर संतोषाने रहायला पाहिजे. निर्वाहाला काही फार लागत नाही. संतांनी देवाजवळ "निर्वाहापुरते द्या" असेच मागितले आहे. क्षणोक्षणी आपले स्मरण घडावे, निर्वाहासाठी मिळवण्याच्या व्यापामध्ये आमचा वेळ जायला नको म्हणून निर्वाहापुरते संतांनी मागणे मागितले आहे. रहायला एखादी जागा आणि मध्यान्हकाळी भिक्षा, भोजन हे एवढेच मागणे आहे त्यांचे. पण ते मागणे देवाकडे आहे. दुसऱ्या कोणाजवळ नाही.

माणसे देताना एखादी गोष्ट देतात. पण ती उपकाराच्या भावनेतून देतात. त्यामुळे देणारा आणि घेणारा यांच्या संबंधाचे स्वरूप वेगळे होते. देणाऱ्याचा अहंकार वाढत जातो. घेणाऱ्याचीही वृत्ती त्यातच गुंतत जाते. म्हणून अयाचित वृत्ती सांगतात.

अयाचित वृत्ती धारण करून रहाणाऱ्यांचे धैर्यही मोठे आहे. कोणाजवळही काही मागायचे नाही. जे येईल ते येईल. जे येईल ते देणाराही दता भगवंतच आहे. दाता एक भगवंतच आहे ही फार मोठी निष्ठा आहे. हे पाहिजे, ते पाहिज असे काहीही नाही. यामुळे काही आसक्ती रहात नाही. मन शांत हाते. मन शांत होणे याचाच अर्थ वासनाक्षय झालेला आहे. वासना कमीकमी होणे म्हणजेच शम, म्हणजेच शांती. भक्ती व ज्ञानाचा तो अधिकारी आहे.

***प्रश्न : महाराज, पारमार्थिक भूमिका येण्यासाठी ईश्वरभक्ती करा हे संतांचे सांगणे समजू शकते. पण संसारात सुखी होण्यासाठी ईश्वरभक्ती केली पाहिजे असे कां सांगतात?***

उत्तर : ईश्वर सर्वज्ञ आहे. सर्व शक्ती संपन्न आहे. सर्वज्ञान त्याला आहे. कोणी कोणी किती कर्म केलीत, कोणाचे किती जन्म झालेत, हे सर्व तो जाणता.

ईश्वर असा सर्वज्ञ आहे हे संतांना माहिती आहे. म्हणून ईश्वराची भक्ती करायला ते सांगतात.

ईश्वराची कृपा संपादन करण्याकरता पुष्कळ प्रयत्न करावा लागतो. जीव परतंत्र आहे. जीवाकडे आपल्या इच्छेप्रमाणे करायचे सामर्थ्य नाहीये. जीवाची शक्ती अल्प आहे. ईश्वराचे सहाय्य हे जीवाला अत्यंत आवश्यक आहे. त्याने जर प्रयत्न केला, ईश्वराची भक्ती केली तर ईश्वरही त्याला सहाय्य करतो. त्याच्या इच्छेप्रमाणे ईश्वर फल देतो. मानवाने इच्छा कोणती कराची हे ठरविण्याकरतासुध्दा ईश्वराची कृपा पाहिजे. नाही तर आपल्या समोर जे सुख दिसेल तेच मिळावेसे वाटते ना! मनाची चंचल स्थिती असेपर्यंत आपल्याला कांही ठरविता येत नाही. मनाच्या, बुद्धीच्या या चंचलतेमुळे कोणते सुख आपण घ्यायचे हे देखील आपल्याला समजत नाही. म्हणून साधू महात्म्यांचा प्रयत्न आहे. नोकरी मिळवण्याकरता ते उपाय सांगत नाहीत. त्यांच्या ग्रंथातून हेच सांगितले आहे की ईश्वराची कृपा संपादन करा. स्वधर्माचरण तुम्ही केलेत तर त्याची कृपा होऊन तुमच्या सर्व इच्छा पूर्ण होतील असंच ते सांगतात. परमेश्वराच्या उपासनेचा मार्ग साधूसंतांनी स्वतः आचरण करून आम्हा भारतीयांच्या पुढे ठेवला आहे. केवळ अर्थ आणि काम संपादन करत आम्ही सुखी होणार नाही. ईश्वरभक्तीने आपण सुखी होऊ हे त्यांना पटले आहे. म्हणून ते या भक्तीमार्गाकडे वळले आहेत.

संत म्हणतात, सगळी सुखं देवाजवळ मागा. 'दाता एक रघुनंदन'. तोच सगळं सुख देणारा आहे. मागितलेली सगळी सुखं तुम्हांला मिळाली तरी परमेश्वराचे भजन सोडू नका. कोणालाही ईश्वराचे विस्मरण होऊ नये. जर सर्व सुखं मिळाली तर अहंकार उत्पन्न होणार, सत्तेचा मद उत्पन्न होणार आणि सत्तेचा मद उत्पन्न झाल्यावर ती सत्ता आपली कायम राहिली पाहिजे अशी प्रबल इच्छा उत्पन्न झाली तर विरोध करणारा जिवंत रहात नाही. आपल्या हातात सगळी सत्ता राहिली पाहिजे अशी इच्छा प्रबल झाल्यावर कित्येक हत्या होतात, कितीतरी वाईट कर्म होतात. ती बुद्धी चांगली राहण्याकरता ईश्वराचे भजन करा हे मुद्दाम संतमहात्म्यांनी सांगितले आहे. बुद्धी शुद्ध राहिली तरच प्रपंच परमार्थ ईश्वरकृपेने दोन्ही साधतात.

***प्रश्न : शिष्याने काय करावे म्हणजे गुरुकृपा होते?***

उत्तर : शिष्याने सद्गुरुंच्या ठायी पूर्ण श्रद्धा ठेवावी. सद्गुरूंच्या सावलीप्रमाणे रहावे. सद्गुरूंची आज्ञा तंतोतंत पाळावी. स्वतःच्या मनाने काहीही करू नये.

गुरूकृपेसाठी बुद्धी तयार करावी लागते. शिष्यानेच ती बुद्धी तयार करायची असते. शिष्याने स्वतःची बुद्धी शुद्ध केली की गुरुकृपा होते.

***प्रश्न : शिष्याने स्वतःची बुद्धी कशी करावी ?***

उत्तर : सद्गुरूंची सेवा करणे हा शिष्याची बुद्धी शुद्ध करण्याचा उत्तम मार्ग आहे. सद्गुरूंची सेवा करणे याचा अर्थ सद्गुरूंचे नाम श्रद्धेने सतत घेत राहणे. सद्गुरूंची आज्ञा तंतोतंत पाळणे हाही बुद्धी शुद्ध करण्याचा मार्ग आहे. सद्गुरुच ते विकल्प दूर करून शिष्याची बुद्धी शुद्ध करतात. शुद्ध बुद्धी म्हणजे शिष्याची प्रज्ञा असे म्हणता येईल. दुर्वास ऋषींनी धर्मराज वनवासांत असतांना त्यांच्याकडे येऊन त्यांच्यासाठी व शिष्यांसाठी जेवण मागितले. धर्मराज कोठून त्यांना जेवण देणार? द्रौपदीने भगवान श्रीकृष्णांचा धावा केला. ती शिष्य प्रज्ञा म्हणजे शिष्याची शुद्ध बुद्धी त्यामुळेच संकट टळले. निंद्य ते सर्व शिष्याने सोडून दिले पाहिजे. संतांची चरित्रे श्रद्धेने वाचणे हाही बुद्धी शुद्ध करण्याचा एक मार्ग आहे. त्यामुळे शिष्याची प्रज्ञा तयार होते.

***प्रश्न : महाराज, स्वतःच्या प्रयत्नाने बुद्धी शुद्ध करता येणार नाही कां?***

उत्तर : बुद्धी शुद्ध करण्याचे कार्य ईश्वराशिवाय कोणी करू शकत नाही. तपश्चर्येने बुद्धी शुद्ध होऊ शकते. पण तपश्चर्येचाच अभिमान उत्पन्न झाला तर काय करायचे? यातून सुटायचे आहे. शुद्ध बुद्धीने ईश्वराजवळ जायचे आहे ते मानवाच्या प्रयत्नांनी कसे होणे शक्य आहे? कोणी शिकवून तरी ते कसे शक्य होणार? त्यासाठी ईश्वराची उपासनाच करायला पाहिजे. अखंड भजन चालू ठेवावे. भगवंताचे सहाय्य पाहिजेच. केवळ आपल्या प्रयत्नांनी होत नाही. ईश्वराची भक्ती करावी. ईश्वराचे सहाय्य मागण्यासाठी प्रार्थना करावी. तोच बुद्धी शुद्ध करू शकेल.

***प्रश्न : महाराज, संसारात आम्हाला एवढे मानसिक क्लेश का भोगावे लागतात?***

उत्तर : आमच्या मनात अनंत वासना आहेत, इच्छा आहेत. त्या पूर्ण करण्यासाठी आमचा सारखा प्रयत्न आहे. मनांत सतत राग द्वेषादि विकार आहेत. हे सर्व दोषच आहेत. देह म्हणजे मी आहे ही गैरसमजूत आहे. भ्रांती आहे. त्यामुळे ही पुढची सर्व दुःखे निर्माण होतात. मी देह आहे ही बुध्दि काही जात नाही. मी काळा आहे, मी गोरा आहे, मी सुंदर आहे, मी शरीर आहे आणि शरीराला उद्देशूनच हे सर्व समजतो.

असा हा देहात्मवाद बळावला की, इतर कुठे लक्ष जात नाही. फार काय, घरातल्या माणसांकडेही लक्ष जात नाही. फार मोठा अभिमान उत्पन्न होतो. 'मी मिळवणारा आहे. मी कुटुंब प्रमुख आहे. माझ्या आज्ञेत सर्वांनी राहिले पाहिजे.' ज्यांचे पालनपोषण आपण करतो त्यांच्याबद्दल सुध्दा अभिमान आहे. त्यांनी जरा आपल्या मनाविरूद्ध केले की, आपल्याला राग येतो. मग ईश्वर, संत इत्यादी बाजूलाच राहिले. हे स्वाभाविक क्लेश मानलेले आहेत आणि यामुळे सगळी कर्मेही दोषी होतात. शुध्द कर्म होत नाही. या सगळ्याला, मी देह आहे ही भ्रांती, अज्ञान कारणीभूत आहे.

देहापेक्षा मी निराळा आहे. मी अजरामर आहे. आत्मा अविनाशी आहे. असे अनेक देह मी धारण केलेले आहेत. देहाचा आणि माझा संबंध काही काळापुरता आहे. अशी जर भावना असली तर कोणी मानसन्मान केला तरी त्याच्याबद्दल मैत्री वाटणार नाही. निंदा केली तर त्याच्याबद्दल शत्रुत्व वाटणार नाही. पण मुळामध्ये अविद्या, भ्रांती आहे. त्यालाच क्लेश मानले आहे.

देहात्मवाद सुटल्याशिवाय निर्भयता उत्पन्न होत नाही. आपल्या कर्माबद्दल विचारही होऊ शकत नाही. देहात्मवादापुढे दैववादाला काही थारा नाही. आपण कर्म करायचे आणि आपण सुखी व्हायचे म्हणजे देहाला सुखी करायचे. पूर्वीच्या कर्माचा, पापपुण्याचा, नीतीअनीतीचा कशाचा विचार नाही, संबंध नाही. मला सुख मिळाले पाहिजे. न्याय अन्याय काही पाहिले जात नाही आणि अशी कर्मे होऊन जातात.

एकाला असे कर्म करताना पाहून दुसराही तेच करतो. त्याला जर या अशा वागण्याने सुख मिळते मग मीही तसेच का करू नये? त्यामुळे सामुदायिक दुरिते तयार होतात. वैयक्तिक दुरिते तर आहेतच. त्यात आणखी सामुदायिक

दुरिते तयार होतात. परिणाम सगळ्यांचे दुरित एकवटून आले की समाजावर मोठ्या आपत्ती येतात. समाजातले सुखही नाहीसे होते. स्वतःच्या जीवनांतही सुख नाही, समाजातही सुख नाही.

*प्रश्न : महाराज, जीवनातील क्लेश दूर व्हावेत म्हणून आम्ही काय करावे?*

उत्तर : क्लेश दूर करण्याची शक्ती ईश्वराशिवाय कोणाच्यातही नाही. लौकिक जगातला कोणीही अधिकारी करू शकत नाही, अगदी पंतप्रधानही नाही आणि राष्ट्रपतीही नाही. त्यांच्याकडेही ही शक्ती नाही. केवळ ईश्वरच ते करू शकतो. भक्तांची सर्व दुःखे, क्लेश, पीडा दूर करण्याचे सामर्थ्य केवळ ईश्वराजवळ आहे.

*प्रश्न : आपण जर पुण्यकर्मे केली तर पापे नष्ट होऊन मानसिक क्लेश दूर होऊ शकतात का?*

उत्तर : आपण कितीही पुण्यकर्मे केली तरीही सर्व पापे नष्ट होतातच असे नाही. काही पापे जातात. पण ती पुण्यकर्मे मध्येच बंद पडली तर काय करायचे? त्या पुण्यकर्माचा अभिमान उत्पन्न झाला तर काय करायचे? पुन्हा त्यातही विघ्ने येतात. त्यापासून संरक्षण करा अशी प्रार्थना ईश्वरालाच करावी लागते. साधनेत येणारे प्रतिबंध ईश्वरच दूर करतो. साधना पूर्ण झाली आणि तिचे फळ मिळाले तर मी हे केले असा अहंकार उत्पन्न होतो. ईश्वर बाजूलाच राहतो. पहिल्यापासून शेवटपर्यंत आमची बुद्धी निर्दोष ठेवणारा ईश्वरच आहे.फळ मिळाल्यानंतरही त्याचा अभिमान उत्पन्न न होऊ देणार ईश्वरच आहे. खऱ्या भक्तांनी हे जाणलेले आहे. म्हणूनच ते ईश्वराची भक्ती करीत राहतात. सगळ्या वासना नाहीशा करणे, आहे त्या परिस्थितीत सुख मानणे आणि आपले मन शांत ठेवणे हे सर्व केवळ ईश्वराच्या कृपेनेच जमू शकत. त्यासाठी ईश्वराची प्रार्थना करावी असे सांगतात.

*प्रश्न : महाराज, एकलव्याने द्रोणाचार्यांची मूर्ती समोर ठेवून धनुर्विद्या आत्मसात केली असे सांगतात. त्यावेळी द्रोणाचार्य तेथे नव्हते. एकलव्याने धनुर्विद्या स्वतः मिळवली का द्रोणाचार्यांनी ती त्याला दिली?*

उत्तर : एकलव्य जेव्हा धनुष्यविद्येचा रानांत अभ्यास करीत होता तेव्हा द्रोणाचार्य देहाने तेथे नव्हते हे तर सत्यच आहे. परंतु एकलव्याने द्रोणाचार्यावर पूर्ण निष्ठा ठेवली म्हणूनच त्याला द्रोणाचार्याकडून विद्या मिळाली हेही सत्यच आहे. गुरूवर निष्ठा ठेवली तरच विद्या मिळते. गुरूवर निष्ठा ठेवण्याचे फार महत्त्व आहे. शिष्याच्या बुद्धीला प्रेरणा देणारा सद्गुरूच असतो. म्हणून शिष्याने मी काही केले अशी भावना मनांतही आणू नये, मला कळते, मी केले असे शिष्याच्या मनांत आले की संपले.

*प्रश्न : महाराज, आमचे कर्म कसे सुटेल?*

उत्तर : कर्म सुटणे एवढे सोपे आहे कां? कर्म सुटायला ज्ञान प्राप्त व्हावे लागते. ज्ञानप्राप्ती झाल्याशिवाय अज्ञान जात नाही. ज्ञान झाल्यावरच जीव कर्मबंधनातून सुटेल व मुक्त होईल. मगच कर्म सुटते. मी आत्मा आहे, असंग आहे, सच्चिदानंदघन आहे असे ज्ञान झाल्याशिवाय कर्म सुटायचे कसे? अज्ञान आहे तोवर कर्म करावेच लागणार.

कर्माविषयी अकर्मता निर्माण होण्यासाठी कर्मयोग सांगितला आहे. कर्मे केलीच नाहीत तर कर्मापासून मुक्ती मिळणार नाही आणि कर्म सुटणार नाहीत. शास्त्रकार ज्या उपासना, अनुष्ठाने, व्रते वगैरे सांगतात हा सगळा कर्माचाच भाग आहे. त्यातून अकर्मता मिळवायची आहे. कर्ममार्ग तर फार कठीण आहे. पण ज्याला ईश्वराच्या आज्ञेप्रमाणे वागायचे आहे त्याला काही कठीण नाही.

कर्म निर्माण होते अविद्येतून. अविद्या घालवण्यासाठी ज्ञान मिळवावे लागते. आत्मज्ञान मिळवण्यासाठी विशिष्ट कर्मे करावी लागतात असे शास्त्रकार सांगतात. देवपूजा, जप स्नानसंध्या वगैरे नित्यकर्मे आहेत. त्याशिवाय कुळधर्म कुळाचार अनुष्ठाने, यज्ञयाग वगैरे नैमित्तिक कर्म शास्त्रकारांनी, सांगितल्या आहेत. श्रद्धापूर्वक कर्मे करावीत. शम वगैरे साधने आहेत. साधनचतुष्ट्य सांगितलंय. विवेक, वैराग्य, मोक्ष मिळावा लागतो. तसे होईपर्यंत कर्म करावेच लागते. शास्त्रकार सांगतात आपले कर्मे ईश्वराचे स्मरण करून श्रद्धापूर्वक व आदराने करावीत. भगवंताचे नाम घेऊनच करावी आणि भगवंताला अर्पण करावी. त्यामुळे संस्कार होतात. बुद्धीतील दोष दूर होतात. बुद्धी गुणसंपन्न होते. बुद्धीत दैवी संपत्ती निर्माण होते.

पण कर्म शेवटपर्यंत करावे लागते असे मात्र नाही. आत्मज्ञान झाले की अविद्या नाहीशी होते. कर्म अविद्येपासूनच निर्माण झालेले आहे. ज्ञान झाले की अविद्या नाहीशी होते. कर्म सुटते हाच खरा संन्यास. ज्ञान झालेल्या ज्ञानयोगी पुरुषाला कर्माची आवश्यकता नाही.

पण याचा अर्थ ज्ञानयोगी कर्म सोडतोच असे नाही. भगवान श्रीकृष्णांनी कुठे कर्म सोडलं? शेवटपर्यंत कर्म करीत राहिले. त्यांना काय ज्ञान झालेलं नव्हतं? ज्ञानयोगीच ते. पण लोकसंग्रहासाठी कर्म करीत राहिले शेवटपर्यंत. श्रेष्ठ पुरुष कसा वागतो हे सगळेच पाहात असतात. मग त्यानेच उदाहरण घालून द्यायला नको का? तोच जर कर्म सोडू लागला, शास्त्र मानेनासा झाला, देवपूजा नको असं म्हणायला लागला तर लोकांवर काय परिणाम होईल? ज्ञानयोग्याची बुद्धी एक मिथ्या झाली. पण सगळयांची तशी कशी होणार?

गुणातीत बुद्धी झाल्यावर कर्म करण्याची गरज रहात नाही. पण तरीही त्याने कर्म सोडू नये म्हणतात. लोकसंग्रहासाठी ते करावे लागते. लोकसंग्रह बिघडू नये म्हणून कर्म करावे त्याने, असे सांगतात. नाहीतर त्याचे पाहून अधिकार नसलेले लोकही कर्म सोडतील व भ्रष्ट होतील. हेही नाही तेही नाही. यासाठी कर्मयोग आहे. कर्म सुटणं अवघड आहे.

***प्रश्न : महाराज, संसारात असलेल्या ज्ञानी महात्म्यांवर मोठी आपत्ती येते, कुटुंबीयांचा मृत्यु होतो, तेव्हाही ते शांतचित्त तेवढेच राहू शकतात का?***

उत्तर : संसारही आहे मनामध्ये आणि ईश्वराचं अनुसंधानही आहे, असं दोन्ही होऊ शकत नाही. संपूर्ण संसार, धनलोभ म्हणून जो आहे तो त्यांच्या मनांतून पूर्णपणे गेलेला आहे. त्याच्याकडे लक्षच नाहीये. ठेविले अनंते तैसेची रहावे, हा एक त्यांचा मोठा गुण आहे. संसाराचा विचार बिलकूल त्यांच्या मनांत येत नाहीत. पूर्ण आनंदरुप झालेले आहेत. संसारांतून मन बाजूला काढून घेतलेलं आहे आणि ईश्वरस्वरूपाच्या ठिकाणी लावलेलं आहे. मन पूर्णतया शांत आहे. राग नाही, मोह नाही, शोक नाही, कांही नाही. अहंकार गेलेला आहे. त्यामुळे राग, द्वेष असे विकार येत नाहीत.

हैद्राबादला भटजीबापू म्हणून एक महाराज होते म्हणतात. मोठे शिवभक्त होते आणि उत्तम गवई होते. भगवान शंकरांचे पार्थिव लिंग करायचं, त्याची पूजा करायची आणि मग गाण्याला सुरुवात करायची. समाधी अवस्थाच ती. कोणीही आलागेला, त्याला जेवायला घालायचं. त्याचा आदर सत्कार करायचा. एकुलता एक मुलगा होता. तोही गेला त्यांचा. काही परिणाम नाही. 'त्याचा इतकाच संबंध होता, गेला.' म्हणाले. त्या मुलाला न्यायची तयारी चाललेली होती. हे स्वस्थ बसले होते. तयारी झाली की जायचं. कारण ह्यांच्या हातून पुढचे संस्कार होणार. त्या वेळेला विदर्भातून कोणी मंडळी त्यांचं गाणं ऐकायला आली. ती मंडळी म्हणाली, 'महाराज, आम्ही आपलं गाणं ऐकण्याकरता आलोय.' हे म्हणाले, बरंय. तंबोरा आणतो आणि गाणं म्हणायला लागले.

मनामध्ये जर संसार असता तर शक्य झालं असतं? किती शोक झाला असता? राग आला असता! या वेळेला गाणं ऐकता काय तुम्ही! पण नाही. संसार नाहीच मनामध्ये. मग मुलगा राहिला काय आणि गेला काय. संसाराबद्दल पूर्ण उपेक्षा. संसार नाहीच मनांत. मुलगा गेला तरी नाही, असला तरी नाही.

संसारातून ते मोकळं झालेलं मन ईश्वराच्या ठिकाणी स्थिर होतं. ते पुन्हा संसाराकडे येत नाही. हा एक मोठा चमत्कार आहे. त्यांची उपेक्षा बुद्धी इतकी झालेली आहे की संसाराबद्दल कसलीच आसक्ती नाही. इतकी विरक्ती आहे. ही अत्यंत मोठी विलक्षण वृत्ती आहे. उदासीन अवस्था आहे. पुन्हा ईश्वराच्या ठिकाणी तितकीच तन्मयताही आहे.दोन्ही आहे आणि अशा दोन्हीही अवस्थेमध्ये असणारे ज्ञानी महात्मे जगाचं कल्याण करण्याची पूर्ण शक्ती त्यांच्याजवळ आहे.

***प्रश्न : महाराज, अशी गुणातीत अवस्था आम्हाला कशी प्राप्त करून घेता येईल?***

उत्तर : परमात्म्याच्या ठिकाणी मन स्थिर करणं आणि संसारांतून मन बाजूला काढणं ही दोनच साधनं आहेत. या दोन साधनांनीच सगळं कल्याण होत असतं. ही दोन साधनं उत्पन्न होण्याकरिता मात्र सहाय्याची जरुरी आहे. सद्गुरूचं सहाय्य पाहिजे.

वैयक्तिक आपलं कल्याण झालं पाहिजे असं पक्क ध्येय ठरवून त्याप्रमाणे प्रयत्न सुरू करायचा. महात्मे ईश्वराच्या प्रेरणेने कार्य करताहेत. त्यांच्या आज्ञेप्रमाणे आपण वागण्याचा प्रयत्न करायचा. महात्म्यांवर पूर्ण विश्वास ठेवून तो मार्ग आपल्याला मिळावा म्हणून ईश्वराची प्रार्थना करायची. संसार आणि परमार्थ दोहोंचीही सिद्धी प्राप्त होते, ती केवळ श्रद्धा आणि शक्ती यामुळेच. सर्व भक्तांजवळ श्रद्धा असल्यानेच त्यांच्यावर गुरूकृपा होते आणि सद्गुरूंचा प्रभाव काय आहे हे त्यांना पहायला मिळते.

शंकराचार्यमहाराजांनी ईश्वराला पावसाची उपमा दिली आहे. पर्जन्याप्रमाणे ईश्वर आहे. उत्तम जमिनीमध्ये पाऊस पडला तर उत्तम पीक येईल. खडकावर पडला, समुद्रात पडला तर फुकट जाईल. तो दोष त्या पावसाचा नाही. जमीन कशी आहे, कोणत्या जमिनीत तो पाऊस पडलाय त्या जमिनीचा तो गुण आहे. सद्गुरुरूपही ईश्वराचेच रूप आहे. ज्याची जशी भक्ती असेल तसा कृपालाभ होतो. जसा भाव असेल तसे फळ मिळते.

जन्मांधाला सूर्य दिसत नाही. पण सूर्य पहाण्याची आपली योग्यता नाही हे तो मान्य करीत नाही. तो सूर्यच नाही म्हणतो. सूर्याचे अस्तित्व तो मान्यच करीत नाही. अभक्तांची तशीच स्थिती असते. पण भक्ताची श्रद्धा असेल, महात्म्यांची कृपा, ज्ञान, सामर्थ्य पूर्ण आहे असा विश्वास असेल तर त्याला तशी अनुभूती येते. त्याचा उद्धार होतो.

परमात्म्याच्या ठिकाणी मन स्थिर करणं आणि संसारांतून मन बाजूला काढणं ही दोनच साधने आहेत. ही दोन साधने उत्पन्न होण्याकरता सद्गुरूंचे सहाय्य पाहिजे. ईश्वरभक्ती, गुरूभक्ती म्हणून पाहिजे. वैदिकधर्मामध्ये याला फार महत्त्व दिले आहे. सर्वांना भक्तीचा अधिकार आहे. ईश्वराची उपासना, सद्गुरूंची उपासना सर्वांनाच करता येते पण आत्मकल्याण करून घ्यायचे इकडे दृष्टी पाहिजे. ते ध्येय पक्कं ठेवून सद्गुरूंच्या आज्ञेप्रमाणे वागण्याचा प्रयत्न करायचा. त्यांच्यावर विश्वास ठेवून ते ज्या मार्गाने गेले त्या मार्गावर पुढे जायचे.

महात्म्यांची कृपा झाली तर संसार बाजूला होतो. संसार मनांतून जाणे शक्य आहे आणि मग ईश्वराच्या ठिकाणी चित्त स्थिर होतं. भक्ताची सगळी जबाबदारी घेण्याची शक्ती आणि योग्यता सद्गुरूंच्या ठिकाणी आहे.

***प्रश्न : महाराज, ज्ञानी महात्मे देवाकडेही कांही मागत नाहीत असे म्हणतात. देवाकडेसुद्धा काही मागायचं नाही असं कां म्हणतात?***

उत्तर : अशीही कंही मंडळी असतात. मनांत कोणतीही कामना नाही. कोणतीही वासना नाही. धनाची इच्छा नाही. मानाची इच्छा नाही. आपल्याला काही हवं आहे असं वाटतच नाही. केवळ ईश्वरार्पण बुद्धीने कर्म चाललेलं आहे.परमेश्वराकडे कांहीही मागण्याची इच्छा होत नाही. मागितलं तर मिळण्याची सोय असूनही त्यांना मागायची इच्छा होत नाही. कारण मागणारा जो आहे त्याच्याकडे भगवंताचं खरं लक्ष जात नाही. भगवंत तेवढ्यापुरतं देऊन टाकतांत आणि म्हणतात- 'त्याच्या मनांत वासना आहेत त्यामुळे मागतो आहे. याचा अर्थ संसारातून मोकळा होण्याची याची योग्यताच नाही. वासनाक्षय करण्याचा प्रयत्नही नाही आणि त्याबद्दल त्याला खेदही वाटत नाही. म्हणून त्याला माझ्याकडे मागायची इच्छा होते आहे. आपली परिस्थिती चांगली असावी असं त्याच्या मनांत येतंय, म्हणजेच आत्मा देहातीत आहे, देहाच्या पलीकडे आहे हे कळलेलं नाही, क्षेत्रक्षेत्रज्ञविवेक झाला आहे असं म्हणता येत नाही'.

वासनाक्षय करायला पाहिजे असं वाटलं तर मागण्याची इच्छाच होणार नाही. कोणाकडेही नाही. अगदी ईश्वराकडेही नाही. न मागता जरी कोणी काही आणून दिलं तरी ते घेत नाहीत. परत करून टाकतात. शिवाजीराजांनी तुकाराममहाराजांकडे रत्नांनी भरलेली ताटं पाठविली. तुकाराममहाराजांनी ती परत करून टाकली. नको म्हणाले. माझं देवाकडचं लक्ष कमी करण्याचा तुमचा प्रयत्न आहे, म्हणजे खरं प्रेम तुमचं नाहीच आहे असं म्हणाले.

ज्ञानी महात्मा निष्काम आहे म्हणजेच त्याला पूर्ण ज्ञान झालेलं आहे. क्षेत्रक्षेत्रज्ञ विवेक पूर्ण झालेला आहे.

जोपर्यंत मनांत कांही इच्छा आहेत तोपर्यंत त्याला ज्ञानी महात्मा असं कसं म्हणायचं?

***प्रश्न : महाराज, ज्ञानी महात्मे देवाकडे मुक्ती, मोक्ष असं पारमार्थिक मागणंही मागत नाहीत कां?***

उत्तर :देवाकडे स्वर्ग मागितला तर मिळेल, मोक्ष मागितला तर तोही मिळेल.

पण तोही मागावासा वाटत नाही. दुःख असेल तर देवाकडे दुःख निवृत्ती मागायची. मोक्ष मागायचा कशाला! मला दुःख आहेच कोठे? दुःखाचं कारण असलेलं दुरदृष्टही नाही, कांही नाही. मग कशाला मागायचं कांही? देवाकडे मोक्षतरी कां मागायचा?

भगवंत सर्वज्ञ आहेत. सर्व ज्ञान त्यांना आहे. भगवंताचं दर्शन हाच एकमेव लाभ आहे. बाकी मला काय करायचंय! ऐहिक समृद्धीही नको. दैवी संपत्तीही नको. मोक्षही नको. मुक्तीही नको, काही नको. संपत्ती दिली तर मनांत वासना येतील. अंतःकरण जे निर्वासिन झाले आहे, त्यांत इच्छा येतील. माझं मन शुद्ध रहावं म्हणूनच भगवंतानी मला समृद्धी दिलेली नाही. मुद्दाम दरिद्री ठेवलं आहे हीच देवाची दया आहे. मला मोह होऊ नये म्हणूनच देवानं ही व्यवस्था केली आहे.

अशी अवस्था हीच खरी देवाची खरी कृपा आहे.

***प्रश्न : महाराज, भगवान श्रीकृष्ण गीतेत म्हणतात–***

***पत्रं पुष्पं फलं तोयं यो मे भक्त्या प्रयच्छति ।***
***तदहं भक्त्युपहृतमश्नामि प्रयतात्मनः ॥[१]***

***महाराज भगवंत असं कां म्हणतात?***

उत्तर : भगवान गोपाळकृष्ण म्हणतात-भक्तानं थोड दिलं तरी माझी तृप्ती होते. अभक्तांनी कांहीही दिलं तरी नाही. शुद्ध ज्याचं अंतःकरण आहे अशा भक्तानं मला कांही दिलं, तुळशीपत्र दिलं, पुष्प दिलं, फळ दिलं, अगदी थोडं जल दिलं तरी त्याच्या योगाने मला संतोष होतो. भक्तीने दिलेलं आहे की नाही एवढंच मी पाहतो म्हणाले.

भगवंत नित्यतृप्त आहेत.त्यांना काय कमी आहे? श्रीयुक्त आहेत. सर्वऐश्वर्ययुक्त आहेत. त्यांना कसलीच इच्छा नाही. पण भगवंत भक्तवत्सल आहेत. प्रेमाने दिलेलं संतोषाने घेतात. शुद्धभक्ती ज्याची आहे त्याचं आपलेपणाने मागून घेतात. सुदाम्याने प्रेमाने कोरडे पोहे आणले होते. भगवान

---

*तळटीप- [१] भावार्थ - जो मला पान, फूल, फळ अथवा पाणी भक्तीनेअर्पण करतो; त्या शुद्ध चित्ताच्या मनुष्याचें भक्तिपूर्वक आणलेलें ते (पानफूल इत्यादि) मी सेवन करतो.*

श्रीकृष्णांनी आपणहून त्याच्याकडून मागून घेतले आणि खाऊन तृप्त झालो म्हणाले. विश्वव्यापक परमात्मा, विश्वरूपी परमात्मा त्या मूठभर पोह्यांनी तृप्त झाला.

***प्रश्न : महाराज, स्वर्गात केवळ सुखेच असतात. दुःखे नसतातच असे सांगतात. मग ज्ञानी महात्मे स्वर्गात जागा नको, स्वर्गसुख नको असे का म्हणतात?***

उत्तर : स्वर्गलोक श्रेष्ठ असे जर मनाला वाटले तर तो प्राप्त करून घेण्याकरता योगयागादिक कर्मामध्येच मनुष्य गुंतून राहील. ज्ञानाचा विचार तो कधी करणार नाही. ईश्वर भक्तीकडे त्याचे लक्ष जाणार नाही. म्हणून शास्त्रकारांनी स्वर्गलोक कसा आहे याचे वर्णनही केले आहे. स्वर्गलोकामध्ये सर्व सुखसाधनं आहेत. सर्व सुखसमृद्धी आहे. काही कमी नाही. मनामध्ये इच्छा झाल्याबरोबर देहाची सर्व सुखे प्राप्त होतात. सुखाची साधनं प्राप्त होतात.'' असे पुष्कळ वर्णन केले आहे. तेथे फक्त देहाची सुखे आहेत. देहाकरिता दुःखे नाहीत. पण मानसिक दुःखे, क्लेश आहेतच. तिथेही उच्चनीचपणा आहे. पुण्यकर्मातसुद्धा कमीजास्तीपणा आहे. सामान्य यज्ञ करणं, अश्वमेधासारखे यज्ञ करणं. राजसूय यज्ञासारखे यज्ञ करणं. ज्यांनी मोठे मोठे यज्ञ केलेत असे जीवात्मे तिथे श्रेष्ठ ठरतात. पृथ्वीतलावरसुद्धा आणि स्वर्गातसुद्धा श्रेष्ठकनिष्ठ भाव आहे. कमी पुण्य असणाऱ्यांना सुख मिळतं. पण त्यांचा दर्जा कमी मानला जातो.

जशी इथे स्थिती आहे तिथे तशीच तिथे आहे. इथे श्रीमंत माणसांचा मोठा बंगला असतो. त्याच्या बंगल्यातील सुखसामुग्री उत्तम प्रकारची असते. सामान्य मनुष्य असेल तर झोपडपट्टीत रहातो. त्याच्यापेक्षा थोडा मध्यम असेल एखादा तो छोट्या जागेत रहातो. ही स्थिती सुखामध्ये, सुखाच्या साधनांमध्ये इथे आहे. स्वर्गलोकातही देव ज्या ठिकाणी राहातात त्या ठिकाणी अशीच अवस्था आहे. एकमेकांबद्दल स्पर्धा आहे. हा मोठा की तो मोठा, माझ्यापेक्षा त्याला जास्ती सुख आहे वगैरे. इथे जशी स्पर्धा आहे, तशीच तिथेसुद्धा स्पर्धा आहेच. जास्ती सुख भोगणारा देवात्मा जो असेल त्याच्याबद्दल इतर देवांना असूया वाटते. ही मानसिक दुःखे, क्लेश मोठे आहेत आणि दुसरी गोष्ट म्हणजे पुण्य जितके संपादन केले असेल तितका वेळच स्वर्गामध्ये राहाता येते. पुण्य संपले की लगेच खाली यावे लागते. तिथे कायम वास्तव्य नाही करता येत.

ज्ञानी महात्मा म्हणेल, "जर कर्मानुष्ठान केले तर तो स्वर्गलोकामध्ये जाऊन राहू शकतो. पुण्य संपलं की झालं. परत मृत्यूलोकावर यावं लागेल, पुन्हा इथे पुण्यकर्मे कन पुण्य मिळवावं लागेल. मग काय तिथं जाऊन येऊन उपयोग?" ईश्वराची उपासना करायची. ईश्वराची कृपा संपादन करायची. मनांत अनेक प्रकारच्या इच्छा, वासना बाळगायच्या, त्या वाढवायच्या, त्या पूर्ण होण्याकरता दैवी, व्यावहारिक प्रयत्न करायचे आणि त्या प्रयत्नाने मिळालेले इथले सुख कायमचे नसते. स्वर्गातले वास्तव्य स्वर्गातली सुखेसुद्धा कायमची मिळत नाही! असलं सुखही आम्हाला नको आणि सुखाची साधनंही नकोत. जे पूर्ण सूख आहे, ज्या सुखामध्ये आणखी मर्यादा नाहीये, कमी जास्तपणा नाही ते हवंय.

***प्रश्न : महाराज हे पूर्ण शाश्वत सुख कसे मिळेल?***

उत्तर : ज्याच्या मनामध्ये कांहीही वासनाच नाहीये असा अकाम, श्रोत्रीय महात्मा आहे. त्याच्या मनांत कांहीही इच्छा नाही. ही स्थितप्रज्ञाची भूमिका आहे. भगवद्गीतेच्या दुसऱ्या अध्यायाच्या शेवटी भगवंतांनी ती भूमिका सांगितली आहे. मी आनंदरूप आहे. ज्याला आनंदरूप आत्मस्वरूप समजलेले आहे त्याला सगळे आनंद प्राप्त होतात. सर्व आनंदांचा अंतर्भाव ज्याच्यामध्ये झालेला आहे असा आनंद ज्ञानी महात्म्यांना मिळवायचा आहे. स्वर्गातला आनंद नको आहे. दैवी प्रकृती याला म्हणतात. सात्त्विक प्रकृती ज्ञानी महात्मे असे असतात.

***प्रश्न : महाराज, देवपद स्वीकारायलाही ज्ञानीमहात्मे तयार नसतात असे आपण सांगितले होतेत. ज्ञानीमहात्मे देवपद स्वीकारायला कां तयार नसतात?***

उत्तर : शास्त्रकार सांगतात-जीवाने पुण्यकर्मे केली, यज्ञयाग केले तर देवपद मिळते, स्वर्गलोकांत देव म्हणून वास्तव्य मिळते. पण देव होता आले, स्वर्गातील सर्व सुखसाधने मिळावी तरी ती देहाचीच सुखं मिळतात. सुख मिळालं तरी ते विनाशी सुख आहे. सर्वकाल टिकणारं सुख पदरात पडत नाहीये. यज्ञयाग वगैरे करुन स्वर्गात जातात, देव होतात, पण जीवभाव जाईल कसा हा विचार करु शकत नाहीत. देवांना ज्ञानाचा अधिकार आहे. सर्व

योगसिद्धी त्यांच्याजवळ असतात. वेदाध्ययन वगैरे त्यांना स्वतंत्र करावं लागत नाही. उपनयन वगैरे संस्कारांची त्यांना आवश्यकता नसते. वेद वगैरेची त्यांना परिस्फूर्ती असते. पण इतकही असून या भक्तीमार्गाकडे, ज्ञानयोगाकडे देवांचे लक्ष नाही. कर्मयोगाची तर देवांना जरुरीही नाहीये.

सगळं पुण्यकर्म करुन देवपद मिळालं. स्वर्गात गेले, सुख मिळाले, पण ते सुख अविनाशी नाही. ' क्षीणेपुण्ये मर्त्ये लोकेविशंति' पुण्य असेपर्यंत ते स्थान आहे आणि पुण्य संपले की ते स्थान रहात नाही. स्वर्गात राहाण्याचा अधिकार संपलेला आहे. अशारितीने देवपद मिळाले तरी कष्ट काही संपत नाहीत. देव झाले तरी मानसिक क्लेश आहेत. देवपद मिळालं तरी कर्म संपत नाही आणि त्यांचे भोग सुखदुःख हे संपत नाही. हे संपवण्याची योग्यता येत नाही. ज्ञानी महात्मा यासाठी देवलोक नको म्हणतो. महात्म्याच्या मनांत कोणतीही इच्छा, वासना राहिलेली नाही. आत्माच आनंदरुप आहे हे त्याला कळलेले आहे.

***प्रश्न : महाराज, वेद अनंत आहेत असे म्हणतात. एका जन्मांत सर्व वेदांचा अभ्यास शक्य नाही असे म्हणतात. वेद अनंत म्हणजे किती आहेत?***

उत्तर : ऋग्वेदाच्या एकवीस शाखा आहेत. एकशेएक यजुर्वेदाच्या आहेत आणि सामवेदाच्या तर सहस्त्र शाखा आहेत. अथर्ववेदाच्या नऊ शाखा आहेत. एकएक संहिता पुन्हा त्याच्या उपशाखा, त्या प्रत्येक शाखेची संहिता, प्रत्येक शाखेचा ब्राह्मण ग्रंथ, उपनिषद ग्रंथ असे कितीतरी आहे. अनंत वाङ्मय आहे. ऋग्वेदाचे प्रत्येक उपवेद वेगवेगळे आहेत. ऋग्वेदाचा उपवेद 'आयुर्वेद' म्हणून आहे. संपूर्ण शरीरशास्त्राचा त्यात विचार केला आहे. या सगळ्या देवता आहेत. नुसते वेद म्हणजे वाङ्मयरूप नव्हे. धनुर्वेदामध्ये युद्धशास्त्राची संपूर्ण माहिती आहे. व्यूह रचना कशी करायची, जवळ असतांना कोणते बाण मारायचे, वेगवेगळ्या शस्त्रांचा उपयोग कसा करायचा ते सर्व समजावले आहे. सामवेदाचा उपवेद गंधर्ववेद आहे. संपूर्ण गायनशास्त्र त्याच्यामध्ये आले आहे. शिवाय शिल्पशास्त्र किंवा तंत्रशास्त्राचाही उपवेदांमध्ये उल्लेख आहे. व्यक्तीच्या पर्यायाने समाजाच्या उन्नतीचा विचार वेदवाङ्मयात केलेला आहे.

संपूर्ण एका वेदाचा अभ्यास कोणाही एका मनुष्याला करणे शक्य नाही. पूर्वीची ऋषी मंडळी मेधाशक्ती वाढवण्यासाठी प्रयत्नशील होती. मेधाशक्ती वाढवण्यासाठी शास्त्रकारांनी काही प्रयोग सांगितले आहेत. कांही मंत्रांचा जप, हवन वगैरे शास्त्रीय पद्धतीने केले म्हणजे बुद्धीची धारणाशक्ती वाढते. ती धारणाशक्ती असल्याशिवाय पुष्कळ वेद वाचले, ऐकले तरी मनामध्ये कसे राहातील? नुसती पुस्तके छापून वेदांचे संरक्षण होत नसते. वेदांचे पठण करायची पद्धती, अर्थ लावण्याची पद्धती यांचेही स्वतंत्र शास्त्र आहे.

सर्व वेदांनी ज्याचे वर्णन केलेलं आहे, त्या परमात्म्याची प्राप्ती करून घ्यायची आहे. किती मार्ग आहेत! किती ज्ञान पाहिजे, केवढा अभ्यास पाहिजे!

***प्रश्न : महाराज, रोज किती वेळ नामस्मरण करावे?***

उत्तर : अखंड स्मरण राहिले पाहिजे. श्वासोच्छ्वास आपला ज्याप्रमाणे अखंड चालू आहे, त्याप्रमाणे ईश्वराचे विस्मरण कधीही होऊन उपयोगी नाही. इतकी तन्मय अवस्था झाली पाहिजे. त्या ईश्वराचे नाम सतत घ्यावे, त्याचे सतत स्मरण करावे. श्वासोच्छ्वास घ्यायला आपल्याला काय विचार करावा लागतो का? तसे ईश्वराचे नामस्मरण जर अखंड झाले तर ईश्वर कुठेही गेलो तरी जवळ आहे.

ईश्वर स्वतंत्र आहे. तो सर्वशक्तीसंपन्न आहे. त्या ईश्वरी शक्तीवर पूर्ण विश्वास किंवा श्रद्धा ज्यांची आहे तेच ईश्वराची उपासना करून पूर्ण कृतार्थ होतात. जगाला उपदेश करतात. मार्गदर्शन करून जगाचा उद्धार करायला तेच महात्मे समर्थ होतात.

# *विचारधन भाग - २ (विभाग 'ब')*

*''श्रीदत्तमहाराज कवीश्वर - चरित्र आणि विचारधन'' या पुस्तकाच्या पहिल्या सहा आवृत्त्यांमध्ये या विभागातील प्रश्नोत्तरे समाविष्ट केलेली होती. चरित्राच्या सातव्या आवृत्तीपासून ही प्रश्नोत्तरे पृष्ठ मर्यादेमुळे वगळली आहेत. ही सर्व प्रश्नोत्तरे येथे संपूर्ण दिली आहेत.*

***प्रश्न : महाराज, संतमहात्मा कोणाला म्हणायचे?***

उत्तर : असेही महापुरुष असतात ज्यांनी संसार मनातून काढून टाकला आहे. अहंकार मनांतून काढून टाकला आहे. सर्व विकार मनांतून पूर्णपर्ण काढून टाकलेले आहेत. बुद्धी विवेकपूर्ण असल्याने सर्व ईश्वररूप आहे हे त्यांनी समजून घेतलेले आहे. कोणाचाही उपमर्द करीत नाहीत. कोणाचाही अपमान करीत नाहीत. कोणाचाही द्रोह करीत नाहीत. तीच खरी ईश्वराची पूजा आहे. त्यांच्याजवळ परिपूर्ण आनंद आहे. त्या आनंदात कोणतीही न्यूनता नाही. त्यांच्याजवळ विवेकबुद्धी आहे. इतरांनाही ते विवेकसंपन्न बनवू शकतात आणि या मार्गावर बरोबर घेऊन जाऊ शकतात. असे संतमहात्मे अनेक होऊन गेले. आजही आहेत.

***प्रश्न : महाराज, संत जन्ममृत्युच्या पलीकडे गेलेले असतात का?***

उत्तर : ते शरीरापासून बाजूला झालेले असतात. शरीराचा संबंधच नाही. त्यांची कर्मे संपलेली आहेत. पुन्हा जन्म नाही, मृत्यु नाही, काही नाही.

***प्रश्न : महाराज, अशा संतांच्या दर्शनाने आमची दुःखे दूर होतील काय?***

उत्तर : संतांच्या सान्निध्याने दुःखे दूर होतात. त्यांच्या दर्शनानेही सगळी दुःखे दूर होऊ शकतात. मानसिक दुःख, शारीरिक दुःख, भौतिक दुःख सगळी दूर होऊ शकतात, असे त्यांचे सामर्थ्य आहे.

***प्रश्न : महाराज, संतांच्या सानिध्याने आमची सगळी दुःखे कायमची नाहीशी होतील कां?***

उत्तर : दुःखे कायमची नाहीशी होणं म्हणजे मोक्षच. सर्व दुःखांची अशी



श्रीवासुदेव निवास - श्रीस्वरुपानंद शंकराचार्य यांनी (द्वारका पीठाचे) भेट दिली त्यावेळचा फोटो



रौद्रीशांती निमित्त जालना येथे पेढयांची तुला केली. त्यावेळचा फोटो



श्रीदत्तमहाराजांचा जालनाकरांनी भव्य सत्कार केला
(रौद्रीशांती निमीत्त) त्याप्रसंगी एका विचारमग्न भावमुद्रेत !



श्रीदत्तमहाराज जालना येथे आपल्या लेकींसमवेत
सौ. सुमनताई, सौ. सुलभाताई व सौ. शैलाताई

कायमची निवृत्ती होऊ शकते. संतांच्या मार्गदर्शनाने सर्व दुःखांपासून कायमचे मुक्त होता येते. मोक्ष मिळू शकतो.

***प्रश्न : महाराज, संतमहात्मे आपल्यासारखी योग्यता सामान्य जीवालाही देऊ शकतात का?***

उत्तर : समोरच्या जीवात्म्याची बुद्धी कशी आहे, त्या बुद्धीत कोणते दोष आहेत, ते दोष कसे जाऊ शकतील हे संतमहात्मे ओळखू शकतात. समोरचा जीव कोणती कर्मे घेऊन आला आहे हे त्यांना समजते. ते त्याला विवेकसंपन्न बनवू शकतात आणि त्याची बुद्धी शुद्ध करून आपल्याबरोबर घेऊन जाऊ शकतात. 'आपणासारखे करीती तात्काळ' असे त्यांचे सामर्थ्य आहे. आपली योग्यता जशी आहे तशी योग्यता ते दुसऱ्याची बनवू शकतात. त्यासाठी त्यांची कृपा व्हावी लागते.

***प्रश्न : महाराज, संतमहात्म्यांची कृपा आम्ही कशी संपादन करायची?***

उत्तर : त्यांची कृपा त्यांच्याच इच्छेने होणार. श्रद्धा ठेवली पाहिजे. विश्वास पाहिजे. दृढ निश्चय झाला पाहिजे. शुद्ध प्रेम ठेवून जर भक्ती केली, प्रार्थना केली तर त्यांची कृपा व्हायला वेळ लागत नाही.

***प्रश्न : महाराज, निर्हेतुक भक्ती म्हणजे काय?***

उत्तर : ईश्वराची कृपा कशासाठी संपादन करायची? काही मिळवण्यासाठी प्रल्हादजी कां? प्रल्हादजींची भक्ती निर्हेतुक होती. काहीही मिळवायचे नाही. देवाकडे काहीही मागायचं नाही. वर मिळावा म्हणून मी भक्ती करीत नाही असे प्रल्हादजी म्हणाले. ही निर्हेतुक भक्ती. मनांत काहीही इच्छा नाही अशी भक्ती झाली पाहिजे. मनांत काहीही वासना नाहीत, काहीही इच्छा नाहीत अशी भक्ती झाली म्हणजे त्याला निर्हेतुक भक्ती म्हणतात.

***प्रश्न : महाराज, आमच्या मनांतील वासना व इच्छा आम्ही कशा घालवायच्या?***

उत्तर : संतांची चरित्रे वाचायची. त्यांच्या उपदेशांचे मनन, चिंतन करायचे. संतांचे आचरण पाहिले म्हणजे समजून येते की ते मानापमानाच्या पलीकडे गेले आहेत. विकारांच्या कसे पलीकडे गेले आहेत. क्षमाशील आहेत. त्याचा आपल्या बुद्धीवर परिणाम होतो. सद्गुण वाढीस लागतात. सात्त्विक बुद्धी

असली म्हणजे मनांत राजस, तामस विचार येतच नाहीत. कोणी कसेही वागले तरी त्याचे काही वाटत नाही. क्षमाशील वृत्ती वाढीस लागते. विकार नाहीसे होत जातात. मनातल्या इच्छा कमी कमी होत जातात.

***प्रश्न : महाराज, ज्यांच्या मनात संसाराची इच्छा असते त्यांनी ती भगवंताकडेच मागावी ना?***

उत्तर : सद्गुरू वासुदेवानंद सरस्वती-स्वामीमहाराजांनी एकदा सांगितले होते, 'संसाराची इच्छा असली तर साधकाने ती परमेश्वराकडेच मागावी. आपल्या प्रयत्नांनी संसारात सुखी होण्याचा प्रयत्न करू नये. तसं केलं म्हणजे परमेश्वराचे लक्ष आपल्याकडे रहातो.'

परमेश्वर म्हणतो, 'याने मागितले म्हणून कां होईना पण आपण याला संसारसुख दिलं आहे. आता याला आपणच यातून काढलं पाहिजे.'

म्हणजे परमेश्वराचे त्याच्याकडे लक्ष रहाते. परमेश्वराची कृपा झाली तर तो त्याला त्यातून बाहेर काढतोही.

श्रीज्ञानेश्वरमहाराज सांगतात, "संसाराची इच्छा भगवंताकडेच मागा. पण ती इच्छा पूर्ण झाल्यावर त्या इच्छा पूर्ण करणाऱ्या भगवंताला विसरू नका. "किंबहुना सर्व सुखी। पूर्ण होऊनी तिन्ही लोकी । भजिजो आदिपुरुषी । अखंडीत ।। सगळी सुखं तुम्हाला मिळू देत. पण ती सुखं देणाऱ्या भगवंताला विसरू नका.

***प्रश्न : महाराज, मनांत इच्छा निर्माण होणं हा मोठाच दोष आहे असं कां सांगतात?***

उत्तर : मनांत इच्छा निर्माण होणं हा मोठाच दोष आहे असे शास्त्रकार सांगतात. अमुक एक मला मिळालं पाहिजे अशी इच्छा मनांत उत्पन्न झाली की मग मनातली ती इच्छा प्रबळ होत जाते. त्या इच्छेला काम म्हणतात. इच्छा अशी प्रबळ झाली की न्याय अन्याय कसलाच विचार होत नाही. इच्छा पूर्ण होण्याला कोणी प्रतिबंध केला की लगेच मनांत क्रोध निर्माण होतो. इच्छेला प्रतिबंध करणारा आपला शत्रू आहे अशी भावना होत जाते. मनांतली इच्छा पूर्ण झाली की जे काही आपल्याला मिळालं, त्याच्यापेक्षाही अधिक मिळावं अशी

इच्छा मनांत उत्पन्न होते. इच्छेप्रमाणे लाभ व्हायला लागला की लोभ निर्माण होतो. लोभ कधीच तृप्त होत नाही. लोभ कधीच संपत नाही. म्हणूनच नृसिंह प्रसन्न झाले आणिं 'हवा तो वर मागून घे' असे प्रल्हादजींना म्हणाले, तेव्हा प्रल्हादजी म्हणाले, "मी तर भक्त अकाम आहे. मला काहीच इच्छा नाही."

खूप आग्रह केला तेव्हा प्रल्हादजी म्हणाले, 'माझ्या मनांत कोणतीच इच्छा निर्माण होऊ नये असा वर द्या.'

कोणतीही इच्छा न होणे म्हणजे अकाम भक्त. जीवनमुक्तीचीच ती अवस्था आहे. स्थितप्रज्ञ झाला तो. इच्छा काहीही नसणे हे संतांचे मुख्य लक्षण आहे.

***प्रश्न : महाराज, संसारातून मुक्त होण्यासाठी शास्त्रकार अद्वैत बुद्धीचा अभ्यास सांगतात. आम्हाला गृहस्थाश्रमात राहूनही अद्वैत बुद्धीचा अभ्यास कसा करावा याचे मार्गदर्शन करावे अशी प्रार्थना आहे.***

उत्तर : संसारातून मुक्त होण्यासाठीच अद्वैत बुद्धीचा अभ्यास आहे. अद्वैत बुद्धीचा अभ्यास केवळ संन्याशांनाच करता येतो असे नाही. गृहस्थाश्रमात राहून अद्वैत बुद्धीचा अभ्यास कसा करावा याचे मार्गदर्शन नारदांनी केले आहे.

गृहस्थाश्रमात राहून अद्वैत बुद्धीचा तीन प्रकारे अभ्यास करावा असे नारद सांगतात - **भावाद्वैत, क्रियाद्वैत, द्रव्याद्वैत** असे हे अद्वैत बुद्धीचे तीन प्रकार आहेत. आजही आपल्या आचरणांत ते आणता येण्यासारखे आहेत. या अद्वैत बुद्धीचा अभ्यास पक्का झाला तर गृहस्थाश्रमात राहूनही संसारातून मुक्त होता येते असे शास्त्रकार सांगतात.

**भावाद्वैत** हा अद्वैत बुद्धीचा पहिला अभ्यास आहे. पंचमहाभूतांपासून तयार झालेले भौतिक पदार्थ जगात पुष्कळ आहेत. ही पंचमहाभूतेच विश्वातील सर्व पदार्थ बनली आहेत. सोनेच अलंकार बनते तसे पंचमहाभूते हे कारण आहे. सर्व भौतिक पदार्थ हे कार्य आहे. कार्य व कारण एकच आहे. कार्याकडे कारणरुपाने पहाणे याला भावाद्वैत म्हणतात. जे पदार्थ समोर दिसताहेत ते पंचमहाभूतेच आहेत हे पहाणे म्हणजे मनाच्या समाधानाकरिता व शांतीकरता हा भावाद्वैताचा अभ्यास अत्यंत उपयोगी आहे.

**क्रियाद्वैत** हा अद्वैत बुद्धीचा दुसरा अभ्यास आहे. सर्व क्रिया शेवटी एकरूप होतात. पापपुण्य हा भेद रहात नाही. शरीराने, वाणीने आणि मनाने सारखी कर्मे चालू असतात. अनेक जन्म झाले तरी कर्म बंद होत नाहीत. काही कर्मे चांगली असतात. त्यांना पुण्यकर्म म्हणतात. काही कर्मे वाईट असतात. त्यांना पापकर्म म्हणतात. पण हा भेद केव्हा जातो? जी जी कर्मे आपल्या शरीराने, वाणीने, मनाने घडतात ती सर्व कर्मे भगवंताच्याच प्रेरणेने होताहेत असे पटले म्हणजे ही भेदबुद्धी जाते. कर्ता तो आहे. देवाने बुद्धी दिली तसे केले. सर्वही कर्मे त्याचीच आहेत.ही बुद्धी उत्पन्न झाली तर पापपुण्य असा भेद रहात नाही. सोनाराला सगळे दागिने एकच. ते दागिने वितळवून सोनार त्यांचे सोने करतो. त्याला सोने आणि सोन्याचे दागिने वेगळे वाटत नाहीत आणि चांगले सोने, वाईट सोने हा भेद वाटत नाही. त्याला सगळे सोने एकच वाटते तसे सर्व कर्मे ईश्वराला अर्पण केली की पापपुण्य हा भेदच नाहीसा होतो.

**द्रव्याद्वैत** हा अद्वैत बुद्धीचा तिसरा प्रकार आहे. मी व्यवसाय किंवा नोकरी करतो आहे, मी सगळा पैसा मिळवला आहे, मी प्रमुख आहे, ही भावना झाली की संघर्ष निर्माण होतो. संपत्ती मिळवणाऱ्याने हे ध्यानांत ठेवले पाहिजे की जो पैसा त्याने मिळवला तो केवळ स्वतःसाठी खर्च करायचा नाही. पत्नी, मुले, घरांतील आप्तेष्ट, समाजातील दुःखी व पीडित या सर्वांच्यासाठीच द्रव्य खर्च करायचे आहे. मी हे द्रव्य माझ्या एकट्याच्या प्रयत्नांनी मिळवले असे म्हणता येणार नाही. प्रयत्न आणि प्रारब्ध या दोन्हींमुळे द्रव्य मिळते. सगळेच द्रव्य मिळविण्यासाठी प्रयत्न करतात. पण काहींना कमी द्रव्य मिळते तर काहींना जास्त मिळते. लक्षाधीश तर एखादाच होतो. द्रव्य मिळवण्याच्या प्रयत्नांत काहीजणांना असलेले द्रव्यही गमवावे लागते. या सगळ्याला कारण म्हणजे प्रारब्ध. पुण्यकर्मे असली तर द्रव्य मिळते. पुन्हा प्रारब्ध म्हणजे पुण्यकर्मे एकट्याचीच असतात असे नाही. घरातील सगळ्या आप्त मंडळींचे प्रारब्ध द्रव्य मिळण्याला कारण असते. सगळ्यांचे पुण्यकर्म म्हणजे प्रारब्ध अनुकूल असेल तर द्रव्य मिळत असते. म्हणून द्रव्याचे स्वामित्त्व माझेच आहे असे मानू नये. त्या द्रव्याचा विनियोग सर्वांच्याकरिता करावा ती बुद्धी मनात उत्पन्न झाली पाहिजे.

द्रव्य हे एक साधन आहे. साध्य नव्हे. साधन म्हणूनच धनाचा उपयोग केला पाहिजे. धनाबद्दल अनासक्त वृत्ती ठेवावी. जे येईल ते येईल. जे जाईल ते जाईल. जे द्रव्य आले त्याचा योग्य विनियोग केला पाहिजे. सगळ्यांसाठी ते खर्च करायचे आहे अशी वृत्ती झाली पाहिजे. गृहस्थाश्रमी पुरुषाने द्रव्याद्वैत बुद्धी मुद्दाम निर्माण करावी असे शास्त्रकारांनी सांगितले आहे. अशा अद्वैत बुद्धीने वागले तर समाजाचे कार्य, राष्ट्राचे कार्य आपोआप होते.

***प्रश्न : महाराज, म्हणजे कुटुंबप्रमुखाने संसारांत काहीच नियंत्रण ठेवायचे नाही कां?***

उत्तर : मी कुटुंबाचा प्रमुख आहे ही वृत्ती ठेवू नये, अनुमोदन देण्याची वृत्ती ठेवावी असे शास्त्रकार सांगतात. गृहस्थाश्रमात संघर्ष करू नये, आपल्या मनाने ठरवलेले तेच योग्य असे म्हणू नये. "बालादपि सुभाषित ग्राह्यम्" अशी वृत्ती ठेवावी. लहान मुलाने सांगितलेलेही मान्य करायची तयारी पाहिजे असे भारतीय संस्कृती सांगते.

गृहस्थाश्रमात असतांना अनेक प्रसंग आपल्या मनांत प्रतिकूल होतात. पण ते सगळं अनुकूल असं करावं, असं वागावं असे नारदांनी भागवतात सांगितले आहे. गृहस्थाश्रमी कुटुंबप्रमुखाने सगळ्यांना अनुकूलता दाखवावी. बरं आहे, तुमचंही चांगलं आहे, योग्य आहे म्हणावं. म्हणजे काही आग्रह रहात नाही आणि त्यांचेही समाधान होते, असे नारद सांगतात.

मी देहापेक्षा वेगळा आहे, इंद्रियापेक्षा वेगळा आहे, हे जसं खरं आहे, तसेच मी बाह्य घरदार, प्रपंच या सगळ्यांपेक्षा वेगळा आहे हेही खरे आहे. हे सगळं माझं आहे असे वाटणे ही आसक्ती आहे. ही आसक्ती कमी कमी झाली पाहिजे. संसाराबद्दलची आसक्ती दान व त्याग करत राहिले म्हणजे कमी कमी होत जाते. जी ममता वाटते ती ममता कमी कमी झाली पाहिजे. संसारातली कर्तव्ये करीत रहायचं. पण ती कर्तव्य करताना हर्ष, विषाद उपयोगाचा नाही 'संकल्पावी माया संसाराची' असे तुकाराममहाराज सांगताहेत.

बाह्य घरदार, वस्तू, प्रपंच या सगळ्यां-। मी केवळ साक्षी आहे अशी वृत्तीहोणे याला 'अतिथी' म्हणतात. गृहस्थाश्रमी माणसाने प्रपंचात

अतिथीसारखे राहिले पाहिजे. अतिथी नुसता प्रेक्षक असतो. जसा बाहेरचा मनुष्य अतिथी म्हणून वागतो. तसेच घरातल्या माणसालाही अतिथी होता आले पाहिजे. सगळे अधिकार असूनही काही बोलायचे नाही. 'निर्ममो निरहंकारः' अशी वृत्ती झाली पाहिजे. निर्मम होणे फार कठीण असते. त्यामुळे गृहस्थाश्रम ही साधकासाठी एक शाळाच आहे.

संसार देवाचा आहे, आपला नाही, असे मनात बिंबवले म्हणजे संसाराबद्दलची ममता कमी होते. हे ऑफिसमध्ये काम करण्यासारखे आहे. ऑफिसात आपण काम करतो. पण ऑफिसात आपले काहीच नसते. ऑफिसातील नफा-नुकसानीची जबाबदारी आपली कधीच रहात नाही. तसेच संसारातही राहिले पाहिजे. संसारात असे रहावे आणि भावाद्वैत, क्रियाद्वैत व द्रव्याद्वैत या नारदांनी सांगितलेल्या अद्वैतबुद्धीचा अभ्यास करावा. हा अभ्यास पक्का झाला म्हणजे गृहस्थाश्रमी संसारातून मुक्त होतो.

***प्रश्न : महाराज, चांगल्या इच्छा सुद्धा मनांत ठेवायच्या नाहीत का?***

उत्तर : चांगली इच्छा सुद्धा बंधनच आहे ना? चांगली इच्छा म्हणजे शेवटी आग्रहच होतो ना? आग्रह कसलाच नाही. चित्ती असू द्यावे समाधान. झालं देवाच्या इच्छेने तर ठीक, नाही तर नाही अशी संतांची वृत्ती असते.

***प्रश्न : महाराज, जग हे आभास आहे असा अनुभव केव्हा येतो?***

उत्तर : परमात्मा जो आहे तो सर्वव्यापी आहे, सर्वस्वरुप आहे. अज्ञानाचे आवरण त्याच्यावर आले तर हा जगदाभास म्हणजे सगळा व्यवहार दृढ होतो. परमात्मा आवृत्त झाला, आच्छादित झाला तर अज्ञानाचे कार्य म्हणजे आभास होतो. सगळा व्यवहार तेथे येतो. परंतु जेव्हा परमात्म्यावरचे अज्ञानाचे आवरण नाहीसे होते, तेव्हा परमात्मा दिसायला लागतो. मग सगळा विश्वाभासच नाहीसा होतो. विश्वाकडे पहाण्याची ही दृष्टी परमात्मरुप आहे. सर्व जगाकडे तसे पहाणे हे ज्ञानी पुरुषाचे लक्षण आहे. बाहेरच्या एकंदर सर्वही विश्वाला परमात्मरूपाने पहाणे हे ज्ञान झाल्यावरच येते.

***प्रश्न : महाराज, शक्तिपात म्हणजे काय?***

उत्तर : सद्गुरू मनानेच जीवाला शक्ती देऊन टाकतात, जीवाची शक्ती जागृत

करतात. शक्तीपात याचा अर्थ शक्ती जागृत होणं. सद्गुरूंच्या मानसिक संकल्पशक्तीनेच जीवाची शक्ती जागृत होऊ शकते, सगळा वासनाक्षय होतो, सगळं होतं आणि तो जीव वरच्या भूमिकेवर जातो. अशी लोकोत्तर गुरूशक्ती आहे.

*प्रश्न : महाराज, भगवान सर्व भूतांचा सुहृद आहे असे म्हणतात याचा अर्थ काय?*

उत्तर : सुहृद याचा अर्थ आचार्य महाराजांनी केला आहे, "प्रत्युपकार निरपेक्षता उपकारिणाम् ।"

मला चांगले म्हणावे, माझी स्तुती करावी म्हणून आपण दुसऱ्यावर उपकार करतो. हा सर्वसामान्य व्यवहार आहे. परंतु भगवंताला प्रत्युपकाराची अपेक्षा नाही. काय मागेल ते भगवंत देतात. आपण जर भक्ताला काही दिलं, तर भक्त माझ्याकरता काय करणार आहे असे भगवंत कधीच म्हणत नाहीत. भक्त आपल्याकरिता काय करतो आहे हा विचारच भगवंताजवळ नाही. सकाम भक्तांची कामना ते पूर्ण करतात. निष्काम भक्तांची योग्यता ते अधिकाधिक वाढवत नेतात. परंतु त्याबद्दल भक्ताने काही करावे अशी काहीही अपेक्षा नसते.

परमात्मा निरपेक्ष आहे. त्याला काहीही द्यावे लागत नाही. आपल्यावर परत लोकांनी उपकार करावेत, आपली लोकांनी पूजा करावी, आपला लोकांनी मानसन्मान करावा अशी भगवंताची काहीही अपेक्षा नाही. म्हणून भगवंत हा सर्वांचा सुहृद आहे असे म्हटले आहे.

*प्रश्न : महाराज, कर्मबंधन जाणे म्हणजे काय?*

उत्तर : सर्व कर्मांचा भोक्ता परमात्मा आहे. कर्म करणाराही परमात्म्याच्या स्वरूपामध्ये अंतर्गत आहे. म्हणून कर्म करतानासुद्धा सर्व कर्मांचा कर्ता आणि भोक्ता परमात्मा आहे, ही भावना अंतःकरणात उत्पन्न झाली पाहिजे. मी कर्ता आहे अशी भावना असेपर्यंत भोक्ता परमात्मा आहे ही भावना होणार नाही. कर्ता एक आणि भोक्ता दुसरा असे कसे असू शकेल? जो कर्ता असतो तोच भोक्ता असणार. म्हणून कर्तृत्त्वभावना गेली पाहिजे.

मी कर्ता आहे ही भावना सोडणे म्हणजे परमात्माच भोक्ता आहे अशी जाणीव निर्माण होणे. कर्ताही तोच आहे. कर्तृत्त्वबुद्धीही त्याच्याच कृपेने उत्पन्न होते. म्हणजे कर्तृत्त्व त्याचेच आहे. अशी भावना झाली की मग कर्मबंधन नाही. एकनाथमहाराज सांगतात -

ऐसा कर्तृत्वाचा मदु। आणि कर्मफाळाचा आस्वादु।
या दोहोंचेही नांव बंधु। कर्मासाठी ॥

कर्ताही तोचे आणि भोक्ता, आस्वादुही तोच आहे याची जाणीव झाली की कर्मबंधन जाते.

***प्रश्न : महाराज, "तुझी चिंता त्यासी सर्व आहे" असे कां म्हटलयं?***

उत्तर : भगवंत सर्वज्ञ आहेत, सर्वशक्तीसंपन्न आहेत. म्हणून जीवाने चिंता करण्याचे काही कारण नाही असे संत सांगतात. आपण इच्छा केल्यानंतर जर भगवंतांनी दिलं किंवा दिलं नाही तर आपली चित्तवृत्ती बिघडून जाण्याचा संभव असतो.मी एवढी भक्ती करतो. पण भगवंताचे माझ्याकडे लक्षच नाही असे वाटायचा संभव असतो. परंतु संत सांगतात, भगवंताना सर्व कळते. ते सर्वज्ञ आहेत. त्यांना काही सांगावे लागत नाही. ते सर्वशक्तीमान आहे. प्रारब्धभोग जरी विरूद्ध असले तरी भगवंतांच्या कृपेने ते दूर होतात, अनुकूल होतात अशी भगवंताची शक्ती आहे. मग आपण चिंता कशाला करायची? भक्तांची सर्व चिंता भगवंतानाच आहे असे सर्व संतमहात्मे सांगताहेत.

***प्रश्न : महाराज, धर्माचरण करणाऱ्यांना जगात न्याय मिळतोच असे दिसत नाही?***

उत्तर : धर्म हा काही दिसणारा नाही. शास्त्राद्वारेच आपल्याला धर्माचे ज्ञान होते. शास्त्र ही ईश्वराची वाणी आहे. धर्माचरण का करायचे? व्यवहार अनुकूल व्हावा, राज्य मिळावे, संपत्ती मिळावी म्हणून धर्माचरण करायचे का? काही फळ मिळावे म्हणून धर्माचरण करणे ही व्यापारी वृत्ती झाली. धर्माचा व्यापार केल्यासारखे झाले धर्माचरण करावे ही ईश्वराची आज्ञा आहे अशा श्रद्धेने धर्माचरण केले पाहिजे. धर्मराजांची तशी निष्ठा होती. संयमी राहून, तितिक्षासंपन्न राहून, सर्व सहन करून धर्माचरण करायचे, धर्माविरोधी आचरण

करायचे नाही अशी धर्मराजांची वृत्ती होती. राज्य गेले म्हणून ईश्वर विरोधी आहे असेही वाटले नाही. ईश्वराने सांगितले म्हणून धर्माचरण करीत संयमाने रहायचे ही भूमिका धर्मराजांची होती. म्हणूनच वनवासांतही ते समाधानात राहू शकले. या वृत्तीमुळेच भगवान श्रीकृष्णांचे प्रेम त्यांना प्राप्त झाले. त्यामुळेच त्यांना भगवंतांचे सहाय्य लाभले, सर्व बंधूही अनुकूल झाले आणि शेवटी सर्वांनाही फलप्राप्ती झाली.

***प्रश्न : महाराज, धर्माचरणाने सर्व साधते असे म्हणता येईल का?***

उत्तर : धर्माचरणाने ज्ञानशक्तीचाही पुष्कळ विकास होतो. अर्थ, कामही त्याच्या मागे येतात. आंब्याचे झाड हे आंब्याचे फळ मिळवण्यासाठी लावलेले असते.छाया व गंध हे त्याच्या अनुषंगाने आपोआप मिळतात. छाया मिळावी, गंध मिळावा म्हणून कोणी आंब्याचे झाड लावीत नाही. तसे धर्माचरणामुळे अर्थ व काम प्राप्त होतात. पण अर्थ आणि काम प्राप्त व्हावे म्हणून धर्माचरण करायचे असे नाही. अर्थ व काम हे धर्माचरणाच्या अनुषंगाने आपोआप येतात.

धर्माचरणामुळे साधते याचा अर्थ असा की धर्माचरणाने मनाचा निग्रह होतो, सत्कर्माबद्दल प्रेम वाढत जाते, संयम प्राप्त होतो, वैराग्य प्राप्त होते, निरहंकार वृत्ती निर्माण होते,मन आकांक्षारहित होते. त्यामुळे भगवंताची कृपा होऊन साक्षीस्वरूपापर्यंत बुद्धी जाते. त्या साक्षीस्वरूपाचा आनंद एकदा सापडला म्हणजे त्या आनंदापुढे दुसरे काहीच महत्त्वाचे वाटत नाही.

***प्रश्न : बुद्धी कर्मानुसारिणी असते असे शास्त्रकार सांगतात. मग बुद्धी देणारा परमेश्वर आहे असे कसे म्हणतात यात विसंगती नाही कां ?***

उत्तर : बुद्धी कर्मानुसारिणी असते असाही एक सिद्धांत आहे. माणसाची जशी कर्मे झाली असतील त्याप्रमाणे बुद्धी उत्पन्न होते. माणसाने जशी कर्मे केली तशी त्याची बुद्धी घडते. परंतु ईश्वरदत्त बुद्धी ही वेगळी मानावी लागते. ईश्वराने दिलेली बुद्धी वेगळी असते.

अनेक जन्मांची कर्मे त्या सर्वसाक्षी बुद्धीप्रेरक भगवंतासमोर असतात. त्या कर्मांची फळे देतांना परमार्थाला अनुकूल अशी बुद्धी भगवंत भक्ताला देऊ शकतो. जीव कर्मानुसारिणी बुद्धी घेऊन आलेला असला तरीसुद्धा पारमार्थिक

बुद्धीला प्रेरणा देण्याची शक्ती भगवंताजवळच आहे. तुलसीदास कर्मानुसारिणी बुद्धी घेऊन आलेले विद्वान असूनही आरंभाला पत्नीच्या आसक्तीतच सापडले होते. पत्नीला कधीही माहेरी पाठवीत नव्हते. पण पत्नीच्याच एका वाक्याने ते निवृत्त झाले. ही परमार्थाला अनुकूल बुद्धी भगवंतानेच त्यांना दिली ना?

***प्रश्न : महाराज, ईश्वरदत्त बुद्धी प्राप्त व्हावी म्हणून आम्ही काय करावे?***

उत्तर : ईश्वराची प्रार्थना करायची. तळमळ लागली पाहिजे. म्हणजे ईश्वर ती बुद्धी देतो.

कालिदासासारख्या ज्ञानी महात्म्यानेही भगवंताची प्रार्थना केली आहे. "आमच्या मनांतील सर्व दोष दूर व्हावेत आणि आमची बुद्धी शुद्ध व्हावी, सन्मार्गाचे आम्हाला आलोचन करता यावे, अशी देवाने आम्हाला बुद्धी द्यावी."

ही कालिदासांनी केलेली प्रार्थना प्रसिद्ध आहे.

***प्रश्न : योगशास्त्रकार सांगतात की योगशास्त्र म्हणजे पुरुषप्रयत्न आहे. योगाभ्यास करणे म्हणजे योगामार्गात सांगितलेले प्रयत्न करणे. साधकाने प्रयत्न करूनच योगाभ्यास करावा लागतो. मग योगाभ्यासात ईश्वर कृपा व्हावी लागते कां?***

उत्तर : योगाशास्त्रकार प्रयत्नांचे महत्त्व सांगतात. योगशास्त्र म्हणजे पुरुष प्रयत्न आहे. माणसाने प्रयत्न करूनच योगशास्त्रांतील साधनाभ्यास करायचा आहे.

परंतु त्या अभ्यासात जे प्रतिबंध येतात, अंतराय येतात ते दूर कोण करणार? ते प्रतिबंध उपासक स्वतः दूर करू शकत नाही. भगवंतच ते प्रतिबंध दूर करणार, त्या अडचणी दूर करणार आणि उपासकाचा साधनाभ्यास निर्विघ्न पूर्ण व्हायला मदत करणार.

कर्मानुसारिणी बुद्धी घेऊन मनुष्य कर्म साधनाभ्यास करतो. पण तरीही ईश्वरशक्तीचे महत्त्व मानावेच लागते. वर्तमान काळांतही प्रत्येकाची कर्मे घडतच असतात. परंतु कोणत्या कर्मांना माणसाला प्रवृत्त करायचे हे भगवंतच ठरवतो व त्या कर्मांचे फळ केव्हा द्यायचे हेही भगवंतच ठरवतो. कर्मामध्येसुद्धा कमीजास्तपणा हा भगवंताच्या संकल्पाप्रमाणेच होऊ शकतो.

*प्रश्न : महाराज, इंद्रियजन्य सुखदुःखे खरी नाहीत असे का म्हणतात ?*

उत्तर : इंद्रियांचा आणि विषयांचा संबंध आला म्हणजे सुख आणि दुःख निर्माण होते. इंद्रियांचा जेव्हा अनुकूल विषयांशी संबंध येतो, तेव्हा माणसाला सुख होते आहे असे वाटते. परंतु इंद्रियांचा प्रतिकूल विषयांशी संबंध आला की माणसाला दुःख होते आहे असे वाटते. परंतु इंद्रियजन्य सुखे काय! आणि दुःखे काय! ती विनाशीच आहेत. ती जाणारी आहेत, नाहीशी होणारीच आहेत. म्हणून ती सुखे त्याज्य आहेत, हे लक्षात आले म्हणजे विवेक झाला. विवेक झाला की वैराग्य प्राप्त होते. ही सुखेदुःखेही भासणारी आहेत. ती खरी सुखे नव्हेतच.

*प्रश्न : महाराज, परमेश्वर भवहारक आहे असे म्हणतात. भवहारक म्हणजे काय?*

उत्तर : भगवान भवहारक आहेत. ते भवाचा संहार करतात. म्हणजे काय? इंद्रियांनी भासणारी सुखे ही विनाशी आहेत म्हणून त्याज्य आहेत. हे ज्ञान भगवंतच देतात. भव म्हणजे संसार. इंद्रियांनी मिळणाऱ्या या संसारातील त्या सुखांचे चिंतन करणे, त्यातच अडकून पडणे हा दोष झाला. त्या भगवंताचे चिंतन करण्यातच खरे सुख आहे. भगवंत अविनाशी आहेत, नित्य आहेत, आनंदरूप आहेत. विवेकानेच हे समजून घ्यायचे आहे. हे ज्ञान भगवंतच देतात. म्हणून भगवंत भवहारक आहेत असे सांगतात.

*प्रश्न : महाराज, शुद्ध अहम् म्हणजे काय?*

उत्तर : मी कोण आहे हे प्रथम समजून घेतले पाहिजे. भगवान रमणमहर्षी हेच सांगायचे. मी कोण आहे याचा अभ्यास करा. मी देह आहे का? मी मन आहे का? मी बुद्धी आहे? तो अहम्, तो मी सापडत नाही.

वेदान्तशास्त्रामध्ये त्या शुद्ध अहम्चे स्वरुप आहे. देह, मन, बुद्धी या सर्वांच्या पलीकडे जाऊन तो सर्वसाक्षी जो 'मी' आहे, त्या 'मी' पर्यंत पोचायचं आहे. मी देह नाही, मन नाही, बुद्धी नाही. मी आहे आत्मा. तोच शुद्ध अहम्.

*प्रश्न : महाराज, शुद्ध अहम्पर्यंत कसे पोचायचे?*

उत्तर : ईश्वराची प्रार्थना करायची. ईश्वराचे सहाय्य मागायचे. ईश्वराची कृपा

व्हावी लागते. त्या सर्वसाक्षी 'मी' पर्यंत पोचणं ईश्वराच्या सहाय्याने शक्य आहे. त्या भूमिकेपर्यंत जाताना अनेक प्रतिबंध येतात - शारीरिक व्याधी, मानसिक दुःखे, अनुकूल प्रतिकूल प्रसंग - परंतु सगळे अंतराय, सगळी विघ्ने ईश्वरच दूर करतो आणि तेथपर्यंत पोचवतो.

***प्रश्न : महाराज, "योग सन्निकर्ष" म्हणजे काय?***

उत्तर : इंद्रियांनी ज्ञान होते. पदार्थाचे ज्ञान करुन देणे इंद्रियांचे कामच आहे. परंतु शास्त्रकार 'योग सन्निकर्ष' मानतात.

योग्याभ्यास म्हणजे धर्माचरण करणारे महात्मे असतात. त्यांना त्या धर्माचरणाचे फळ मिळते. त्यांची प्रज्ञाशक्ती एवढी वाढते की जे इंद्रियांनीही जाणता येत नाही, ते सुद्धा या महात्म्यांना जाणता येते. इंद्रियांच्या शक्तीच्या पलीकडील ज्ञान त्यांना होते. अतींद्रिय पदार्थाचेही त्यांना ज्ञान होऊ शकते. असे महात्मे काही विचारल्याबरोबर लगेच सांगून टाकतात "अमूक झालेले आहे. अमुक होणार आहे." इतरांचे भविष्य तर ते सांगतातच, परंतु स्वतःचेही भविष्य त्यांना कळते. आपण केव्हा जाणार आहोत, कसे जाणार आहोत. स्वतःच्या मृत्युबद्दलही ते जाणू शकतात.

शास्त्रकारांनी हा एक सन्निकर्ष वेगळा मानला आहे. ईश्वराची आज्ञा म्हणून धर्माचरण व्यवस्थित चालू राहिले तर धर्माचे फळ मिळते आणि हा एक स्वतंत्र सन्निकर्ष प्राप्त होतो असे सांगतात.

***प्रश्न : संसारातील आघात, सुखदुःख सहन करायचं धैर्य कसं प्राप्त होतं महाराज?***

उत्तर : भक्तीने ते धैर्य प्राप्त होतं. परमेश्वराबद्दल अत्यंत प्रेम लागलं की तिकडेच मन आसक्त होतं. ज्याच्या अंतःकरणात ईश्वरप्रेम निरंतर राहिलं आहे, त्याचं मन संसारामध्ये कधी जातच नाही. संसारात अनुकूल प्रतिकूल घटना जरी घडत असल्या तरी अंतःकरणात ईश्वरप्रेमाची आसक्ती आहे. कर्माप्रमाणे जशी सुखदुःख मिळायची असतील ती मिळत जातात. ईश्वरप्रेमामध्ये ज्याचं मन स्थिर होतं, त्याला संसारातील कोणतेही आघात सहन करायचं धैर्य प्राप्त होतं.

***प्रश्न : महाराज अनासक्त कसं व्हावं?***

उत्तर : आसक्ती सुटायची कठीण असते. कारण सगळेही विषय आहेत. त्यांना सोडून अनासक्त कसं रहायचं? अवधूतांनी यदुराजाला सांगितलं होतं, "आकाश तत्त्वाला गुरू मानलं. आकाश सर्व ठिकाणी आहे. सर्वही घडामोडी आकाशामध्ये चाललेल्या आहेत. पावसाच्या धारा पडताहेत. ऊन तापतंय. पण आकाशातत्त्व असंग आहे. त्याला कशाचाच संबंध होऊ शकत नाही."

स्वाभाविक असंगवृत्तीचं असं चिंतन केलं तर कुणाचाही प्रभाव आपल्यावर पडणार नाही. गुणही नाही, दोषही नाही. आत्मतत्त्व, ब्रह्मतत्त्व निर्दोष आहे, निर्गुण आहे. त्यांचं चिंतन सुरू केले तर आसक्ती जाते.

***प्रश्न : महाराज, जीवनांत सुखं मिळवण्याकरता माणसाला प्रयत्न करावा लागतो का त्याला जीवनांत सुख आपोआप मिळतं?***

उत्तर : नाथमहाराज सांगतात, "जे संचित असेल त्याप्रमाणं सुखदुःख मिळतं. पूर्वीचं जे कर्म आहे, पूर्वजन्मातलं केलेलं कर्म आहे, त्याला प्रारब्ध म्हणतात. जे पूर्वकर्म फलोन्मुख झालेलं असेल ते जर सुखाला अनुकूल असेल तर सुख आपोआप मिळतं. तशा घटना आपोआप घडतात. पण आपण प्रयत्नालाच प्राधान्य देतो. जीवनांत सुख मिळावं म्हणून माणसाला प्रयत्न करायची जरुरी नाही."

अवधुतांनाही अजगरवृत्ती सांगितली होती. काहीही करायचं नाहीये. जे मिळायचं ते मिळतं. प्रल्हादजी म्हणाले होते, सुखाकरता प्रयत्न केला जातो तो काही बरोबर नाही. दुःखाकरता प्रयत्न कोणी करीत नाही. तरी दुःख मिळतं. तसंच सुखही प्रयत्न केला नाही तरीसुद्धा मिळतं म्हणाले.

पण तितकं धैर्य पाहिजे. तेवढा अधिकारी पाहिजे. तशी बुद्धी घडली पाहिजे.

***प्रश्न : महाराज, साधकाने बालवृत्तीचा अभ्यास करावा असे का सांगतात?***

उत्तर : दोन-चार महिन्यांच्या बालकाला कोणतीही चिंता नसते. मानअपमान नाही. घरांत कोणी उपाशी आहे, जेवलाय, आजारी आहे, काही त्याला नाही.

आनंदामध्ये खेळतो. भूक लागली की रडतो. दूध घातले की आनंदाने खेळतो. म्हणून बालवृत्ती सांगतात.

चिंता करून काय करायचं? काही दुखायला लागलं तर औषध घेतल्याबरोबर दुसऱ्या मिनिटाला बरं होतं कां? प्रत्येकाचं कर्म आहे, त्याप्रमाणे सुखदुःख आहे. तितीक्षा पाहिजे. सहन करायला हवं. मन सहनशील पाहिजे. म्हणजे जो मार्ग पत्करला आहे, त्यात यश मिळते.

***प्रश्न : महाराज, शास्त्रकार कर्माला भक्तीची जोड द्यायला का सांगतात?***

उत्तर : केवळ कर्म हे सिद्ध रहात नाही. ईश्वराला ते कर्म निवेदन करायचं, अर्पण करायचं, प्रार्थना करायची. कर्माबरोबर भक्ती उपासनाही जरुरी आहे.

ईश्वराच्या भक्तीशिवाय कर्महीं व्यवस्थित होत नाही, पूर्ण होत नाही. म्हणून शास्त्रकारांनी कर्म आणि भक्ती यांचा समुच्चय सांगितला आहे. ईश्वराची आज्ञा म्हणून कर्म करतो, या भावनेनं निष्काम कर्म केलं तर कर्मयोग हा स्वतः भक्तीयोगच होतो.

***प्रश्न : महाराज, समर्थ सांगतात, "सर्वांमुखी मंगल बोलवावे." म्हणजे इतरांकडूनही परमेश्वराची भक्ती करून घ्यायची कां?***

उत्तर : सर्वांकडून ईश्वराचं मंगल नाम करवून घ्यावं, मंगल चरित्र सांगावं हा आदेश समर्थांनी दिला आहे. पण कोणाला - ज्यांचा वैयक्तिक साधनाभ्यास पूर्ण होऊन मनामध्ये काही अभिमान राहिलेला नाही. फळाचीही इच्छा नाही. अशी बुद्धी अवस्था ज्याला प्राप्त झाला आहे, त्याला हा आदेश आहे. स्वतःची मानसिक शुद्धी ज्यांची झालेली नाही त्यांना नाही. स्वतःची बुद्धी शुद्ध झालेली नसेल आणि इतर लोकांच्याकरता प्रयत्न करायला लागला तर स्वतःचाही उद्धार नाही आणि लोकांचाही उद्धार नाही.

***प्रश्न : महाराज, व्यावहारिक प्रयत्न करू नका असे सांगून संत समाजाला निष्क्रीय करतात असे काहीजण म्हणतात. ते बरोबर आहे कां?***

उत्तर : तुम्ही नुसतं ईश्वराचं भजन करा, व्यावहारिक प्रयत्न करू नका असे संतांनी कधीही सांगितलेले नाही. संतांनी प्रयत्न करायलाच सांगितले आहे. परंतु व्यावहारिक प्रयत्न जरी झाला तरीसुद्धा ईश्वराची जरुरी आहे असे संत

सांगतात. अर्थ आणि कामाकरता व्यवहारात तुम्ही काय प्रयत्न करायचे ते करा. पण भगवंताचे अधिष्ठान पाहिजे हे विसरु नका. "स्वस्थ रहा, कर्म सोडून द्या" असे संत सांगत नाहीत. व्यावहारिक कर्म करतांनाही भगवंताचं अधिष्ठान घेऊन चला असं ते सांगताहेत. पारमार्थिक प्रयत्न हा तर कितीतरी मोठा प्रयत्न आहे. अनेक जन्म करावा लागतो.

*प्रश्न : महाराज, माणसाच्या संसारांत व्यावहारिक अनुकूलता नसली तरी माणसाला शांती मिळू शकते कां?*

उत्तर : संसारांत जास्ती व्यावहारिक अनुकूलता असावी कां जास्ती व्यावहारिक प्रतिकूलता असावी हा मोठा विचार आहे. जीवाला जास्ती अनुकूलता हवीशी वाटते. पण खरे जे महात्मे असतात, ईश्वराची भक्ती करणारे जे असतात त्यांना व्यावहारिक अनुकूलता नको असे वाटते. काही जरूरी नाही म्हणतात. तुकाराममहाराजांच्या घरी काय होते? काही नव्हते. शिवाजीमहाराजांनी आणून दिलेलंही परत करून टाकलं. नको म्हणाले. हे विष आहे, बुद्धी केव्हा बदलेल याचा नेम नाही म्हणाले. दारिद्र्य जरी असले तरीसुद्धा त्यांच्यासारख्या महात्म्यांना शांती प्राप्त करून घेता येते. ईश्वराचे स्मरण, उपासना करीत राहिले की हे होतं.

*प्रश्न : म्हणजे ऐहिक सुखाच्या मागे लागायचं नाही असे कां?*

उत्तर : ऐहिक सुखांनी, स्वर्गादिक सुखांनी तात्कालिक समाधान मिळतं. पण ते टिकत नाही. ऐहिक सुखांनी कायमचं समाधान मिळत नाही. बुद्धीचं परिवर्तन होणं, बुद्धी शांत होणं, समाधान बुद्धीमध्ये होणं हे महत्त्वाचं आहे.

पूर्ण समाधान हवं. पूर्ण सुख, कायमचं सुख ऐहिकापासून मिळणार नाही अशी बुद्धीची खात्री झाली की ती बुद्धी उपासनेकडे वळते. उपासनेने वासना जातात. मग ज्ञान झालं की त्याचं फळ पूर्ण समाधान, मोक्ष, हे सगळं प्राप्त होतं. मनाची बुद्धीची अशी तयारी व्हायला अनेक जन्म जावे लागतात.

*प्रश्न : महाराज, अध्यात्मशास्त्रावरील पुष्कळ ग्रंथ वाचले म्हणजे परमार्थ साधेल का ?*

उत्तर : अध्यात्मशास्त्रावर अनेक ग्रंथ आहेत. पण हे ग्रंथ मध्यम

अधिकाऱ्यांसाठी आहेत. उत्तम अधिकाऱ्यांसाठी सद्गुरूंचा शब्द पुरेसा आहे. 'तू देह नाहीस, तू तर आत्मा आहेस' असे सद्गुरूंनी उत्तम अधिकाऱ्यांना सांगितले की त्याला बोध होतो. कापराला नुसती काडी लावली तरी तरी कापूर चटकन पेट घेतो. तसे उत्तम अधिकाऱ्याला सद्गुरूंच्या शब्दानेच ज्ञान होते आणि ज्ञान व अज्ञान नाहीसे होऊन तो साक्षात्कारापर्यंत जातो.

पण असे उत्तम अधिकारी फार थोडे असतात. पेटलेल्या काडीचा स्पर्श झाला की कापूर चटकन पेट घेतो. तसे लाकडाचे होत नाही. लाकडं पेटता पेटत नाही. भिजलेले लाकूड तर नाहीच नाही.

***प्रश्न : म्हणजे महाराज, ज्ञानाच्या मार्गापेक्षा श्रद्धेच्या मार्गाने लौकर साक्षात्कार होतो का?***

उत्तर : शास्त्रांचा सांगोपांग अभ्यास केल्याशिवाय ज्ञान होत नाही. काही संदेह राहतातच. एखादे वाक्य वाचून काहीतरी कल्पना करुन घ्यायची हे चूकच. शब्द वाचायचे तर खूप वाचावे लागेल. तेवढा वेळ व बुद्धी कोणाला आहे? सद्गुरूंवर पूर्ण श्रद्धा ठेवून त्यांच्या उपदेशाप्रमाणे वागलं तर लौकर पुढे जाता येतं.

ज्ञानाचा मार्ग फार अवघड आहे. ज्ञानमार्गावरुन साक्षात्कारापर्यंत जायला खूपच वेळ लागतो. श्रद्धेचा मार्ग त्या मानाने खूप सोपा आहे, कमी वेळात साक्षात्कारापर्यंत नेणार आहे.

***प्रश्न : काही माणसे ईश्वर मानतात. पण तो काही जणांना सुख देतो व काहीना दुःख. म्हणून ईश्वर निर्दय आहे असे ते लोक म्हणतात.***

उत्तर : ईश्वर निर्दय आहे, विषम आहे असे म्हणता येणार नाही. सृष्टी कर्मसापेक्ष आहे. ज्याचे जसे कर्म असेल तसे त्याला फळ मिळते. ईश्वर जीवाचे कर्म पाहतो व कर्माप्रमाणे अलिप्तपणे फळ देतो. मग ईश्वर निर्दय आहे किंवा विषम आहे असे कसे म्हणता येईल?

***प्रश्न : मीराबाई म्हणतात –***

> ***"मोहे लागी लगन गुरुचरणकी,***
> ***भवसागर सब सुख गये है,***

*माया है सब सपननकी।"*
*माया है सब सपननकी असे कां म्हटले आहे?*

उत्तर : स्वप्नात सारे काही दिसते. पण ते सारे मिथ्या असते. जागेपणसुद्धा एक स्वप्नच आहे. नसलेले भासू शकते हे समजून घ्यायला हवे. स्वप्न खरे आहे का? स्वप्नात आपल्याला रस्ते दिसतात, शहर दिसते, वृक्ष दिसतात. पण जागे झालो की ते सारे नाहीसे होते. म्हणजे जे नव्हतेच ते आहे असे भासत होते.

जागेपणी तरी काय वेगळे असते? जागेपणी मायेमुळे जग भासते. परंतु साक्षात्कार झाल्यावर सारे काही नाहीसे होते. अज्ञानामुळे जग भासते. अज्ञानाचे आवरण आहे म्हणून विश्व निर्माण झाल्यासारखे भासते. पण एक ब्रह्मच खरे आहे. बाकी सारी माया आहे, स्वप्नच आहे.

*प्रश्न : "भवसागर सब सुख गये है" असे मीराबाईंनी का म्हटले आहे?*

उत्तर : त्यांच्या मनांतून संसार मावळून गेला आहे. चित्त भगवंताच्या चरणी सद्गुरूंच्या चरणी स्थिर झाले आहे.

*प्रश्न : महाराज, परमार्थ करायचा म्हणजे नेमके काय करायचे?*

उत्तर : प्रपंचात अनासक्त वृत्तीने रहाणे हाच परमार्थ. परमार्थ म्हणजे दुसरे तिसरे काही नाही. भरताने रामाकरिता राज्य केले, रामाच्या पादुका सिंहासनावर ठेवून राज्य केले. त्याच वृत्तीने प्रपंच करीत रहायचे. आसक्ती ठेवायची नाही.

*प्रश्न : महाराज, प्रपंचात अनासक्त वृत्तीने कसे रहाता येईल ?*

उत्तर : आहे त्या परिस्थितीत समाधान मानून रहायचे. कशाचाही त्रास करून घ्यायचा नाही.

समाधान हे मानण्यावर आहे. प्रतिकूल परिस्थितीतही त्रास करून न घेता समाधान मानून रहाता येतं. तसं रहायचं. नामस्मरण अखंड चालू राहिलं पाहिजे. तिकडे लक्ष लागलं की इकडचं लक्ष कमी होतं. प्रार्थना करीत रहायचे. नामस्मरण करायचे. म्हणजे साधतं.

*प्रश्न : महाराज, प्रतिकूल परिस्थितीतही शांती कशी मिळवायची?*

उत्तर : शांती फक्त भक्तीनेच मिळते. भक्ती म्हणजे भगवंताचे प्रेम असले की मन शांत होतं. म्हणून भगवंताचे गुणगान, त्याचे गुणवर्णन करायचं. त्यानच

शांती मिळते. वैराग्य किंवा ज्ञान यामुळे शांती मिळत नाही. व्यासांनी महाभारत आणि इतर ग्रंथ लिहिले. पण त्यांना शांती मिळाली नाही. ते अशांतच होते. तेव्हा नारदानं त्यांना सांगितले, "तुम्हाला शांती हवी असेल तर वैराग्य किंवा ज्ञान यामुळे शांती मिळणार नाही. तुम्ही भक्ती करा." मग व्यासांनी भगवंताचे गुणवर्णन करणारे भागवत लिहिले. तेव्हाच त्यांना शांती मिळाली.

***प्रश्न : महाराज, बुद्धीवादाचेही महत्त्व आहे नां? बुद्धीवाद टाकता कसा येईल?***

उत्तर : शास्त्राचं किंवा महात्म्यांचं काय म्हणणं आहे ह्याचा पूर्ण विचार केल्याशिवाय वाटेल ते बोलणं हा बुद्धीवाद ठरत नाही. ज्या बुद्धीवादानं आपलं स्वतःचं हित साधता येईल, समाजाचं हित साधता येईल आणि दुसऱ्यांना योग्य मार्गदर्शन करता येईल तो खरा बुद्धीवाद आहे.

संतांचा बुद्धीवाद वेगळा आहे. पण तो बुद्धीवादच आहे. ज्ञानी महात्म्यांनी जे अनुभव घेऊन सांगितलं तो बुद्धीवादच नाही का? सगळं नाशवंत आहे, म्हणून देवाची भक्ती करावी त्यानेच समाधान मिळेल, पूर्ण सुख मिळेल असं ते सांगताहेत. तो बुद्धीवादच आहे. संतमहात्म्यांच्या मार्गदर्शनाप्रमाणे शुद्ध बुद्धी केली, ईश्वरभक्ती केली तरच सर्वांचे कल्याण आहे.

***प्रश्न : महाराज, संसारात राहूनच परमार्थ करावा, संसार सोडू नये अशीच आपली आज्ञा आहे कां?***

उत्तर : आपल्याला संसारातच रहायचंच. संसार सोडून आपण जाणार कुठे? संसार म्हणजे नुसतं घरदार नव्हे. संसार केवळ बाहेरच आहे असं नाही. संसार मनामध्येही आहे. मन संसारातच लागलेलं आहे ना? त्यामुळे घरदार सोडून गेलं तरी मनातला संसार जात नाही.

मनात जो संसार आहे तो कमी कमी होत गेला पाहिजे. संसार वासनारुपाने आतबाहेर मनात सगळीकडे भरलेला आहे. वासनेत गुंतल्यामुळे भगवंताकडे लक्ष लागत नाहीये. म्हणून साधूसंत ईश्वरभक्तीचा मार्ग दाखवतात. मनामध्ये ईश्वरभक्ती, ईश्वराबद्दलचे प्रेम निर्माण होत गेलं की वासनारूपाने आतबाहेर भरलेला संसार कमी कमी होत जातो. संसाराची माया कमी कमी होत जाते.

इकडचं लक्ष कमी कमी होत जातं. ईश्वराकडे मन लागलं की संसारांतून मन आपोआप बाजूला होतं.

*प्रश्न : एका संतकवीने म्हटलंय -*

**धनसंपत्तीसे भरा हुआ तू।**
**अपनेको पहचान।**
**मोहमायासे दूर चला जा।**
**ओ मूरख नादान।**

**यातलं दूर जाणं म्हणजे .........**

उत्तर : दूर जाणं म्हणजे मनाने दूर जायचं. मनानं अलिप्त व्हायचं. म्हणजे आत्मस्वरूपाची खरी ओळख होते गुरूकृपेनं. शरीराने कुठंही राहिलं तरी काय त्याचं?

***प्रश्न : देवाकडे काही मागायचं नाही असंच का महाराज?***

उत्तर : भगवत् भक्त हे देवाकडे काहीही मागत नाहीत. भगवंताचे अखंड चिंतन रहावे अशी त्यांची इच्छा असते. मनातील वासना नाहीशा झालेल्या असतात. मग देवाकडे काही मागावं अशी इच्छा मनांत कशी निर्माण होणार? आहे त्यात समाधान मानूनच भगवद्भक्त रहातात. भगवंताने ठेवले आहे तसे रहातात. आहे त्यात समाधानानं रहातात.

***प्रश्न : भक्तीमुळे दैवी संपत्तीचा न मागताही आपोआप लाभ होतो, तीच खरी संपत्ती असे का म्हणतात महाराज?***

उत्तर : भक्तीमुळे मनांतील दुर्विचार कमी होत जातात. वासना कमी कमी होत जातात. मन शुद्ध हो जातं. पवित्र होत जातं. शुद्ध मन झालं की भक्ती श्रद्धेने अखंड चालू रहाते. देवांचे सान्निध्य लाभते आणि भगवद्भक्तांना दैवी संपत्तीचा लाभ होतो. त्यांच्या द्वाराने इतरत्रही त्या दैवी संपत्तीचा प्रसार होतो.

***प्रश्न : कुंतीने भगवान कृष्णाकडे दु:ख मागितले.कुंतीचे हे मागणे जगावेगळेच नाही का?***

उत्तर : कुंतीची बुद्धी कशी आहे? लोकदृष्टीने हे अगदी वावगं आहे. कुंतीचं मागणं चुकीचं आहे असे म्हणू आम्ही संसारी लोक. आम्हाला नेहमी

संकटाचाच प्रसंग आठवतो. नेहमी आम्हाला तुम्ही वनवासात ठेवा म्हणते आहे कुंती.

आमच्यासारखा संसारी म्हणणार, कुंतीला एकदम एवढे सुख मिळालं म्हणून त्याच्यामध्ये काहीतरी वेडासारखे मागितलं. कारण सांगते आहे ती. वनवासात आम्ही असतांना तुमची आठवण आम्हाला नेहमी होत होती. ती होणार नाही. संसारामध्ये उत्कर्ष झाला, अभ्युदय झाला, सगळं मिळालं ईश्वराच्या कृपेनं. पण ते मिळाल्यावर ती बुद्धी राहणार का? अहंकार निर्माण झाला तर योग्य कर्म त्या बुद्धीकडून होईल असं सांगताच येणार नाही. हा तिचा विचार आहे. त्यापेक्षा वनवास बरा. हा मोठा विवेक आहे. तो विवेक बुद्धीमध्ये उत्पन्न होणं ही ईश्वराची कृपा आहे.

***प्रश्न : महाराज, आपण एकदा सांगितले होतंत की बाह्यपूजेपेक्षा अंतःपूजा अधिक पुण्यदायी असते. अंतःपूजा म्हणजे काय महाराज?***

उत्तर : व्यासांनी देवीगीतेमध्ये बाह्यपूजा आणि अंतःपूजा असे दोन अर्चनाचे प्रकार सांगितले आहेत. दक्षाला उपदेश करतांना हा सिद्धांत मांडला आहे.

अंतःपूजा म्हणजे काय? मनाने चिंतन करायचे. युक्तायुक्त विचार करायचा. विवेक, वैराग्य, शम, दम, श्रद्धा, तितिक्षा, उपरती वगैरे ही आरतीची साधने म्हणून हृदयात मांडलेली आहेत. असे चिंतन करायचे मग बाह्य जग, व्यवहार याचा विसर पडतो. वृत्ती आत्माकार झाली. ही अंतःपूजाच आहे. अंतःकरण सात्त्विक झाले पाहिजे. सात्विक अंतःकरण म्हणजे प्रसन्नता. तो मोठा प्रसाद आहे. मोठीमोठी दुःखे आली तरी मन प्रसन्न आहे. सुखंही आली तरी मनावर कोणताही परिणाम होत नाही. ही जी स्थिती आहे त्याला समस्थिती असे म्हणतात. ब्रह्मप्राप्ती झाल्यावर ही समस्थिती साधकाला प्राप्त होते. अंतःकरणात कोणतेही विकार नाहीत. अंतःकरण पूर्णपणे प्रसन्न आहे. म्हणून चिंतन चाललंय.

काही बाह्य साधने - निरांजन, तबक, फुले, गंध, चंदन, वाती, तूप काहीही नाही. इथे अंतःकरणांतच सर्व आहे. मनानेच साधनरुपे धारण केली आहेत. सद्गुरू-वासुदेवानंदसरस्वती-स्वामीमहाराजांनी या साधनांचे वर्णन एका

आरतीत केलंय. हृदयाच्या निरांजनात विवेकांचे तूप (स्नेह) आहे. मीच चैतन्यरूप आहे, ब्रह्मरुप आहे हे ज्ञान ज्योती झाल्या आहेत. आपल्या हातून घडलेली कर्मे अंतःपूजेत जळून जाताहेत. कर्मे जळून गेल्यामुळे त्यांचे संस्कार मनांत काहीही उरत नाही आहेत. चांगली वाईट सारी कर्मे जळून जात आहेत. वासना संस्कार सारे जळून जाते आहे. आरतीच्या प्रकाशाने अज्ञान व अहंकार यांचा अंधःकार नाहीसा होतो आहे.

बाह्यपूजेमध्ये आपली कर्मे जळून जातीलच असे नाही. बाह्यपूजेमध्ये पुण्य आहे. ती फलदायी आहे. पण अंतःपूजा अधिक पुण्य देणारी आहे, अधिक फलदायी आहे.

***प्रश्न : ही अंतःपूजा आम्हाला कशी काय करता येईल महाराज?***

उत्तर : अंतःकरण संसारापासून बाजूला झाले, अखंड भक्ती करत राहिले म्हणजे ही अंतःपूजा साधते. या अंतःपूजेमध्ये ईश्वराचे अखंड चिंतन करायचे आहे. या अंतःपूजेमुळे जीवभाव संपून जातो. जन्ममृत्युही संपतात आणि खरी शांती पूर्णसमाधान प्राप्त होतं. 'मी' जातो. फक्त ब्रह्मच आहे ही स्थिती प्राप्त होते. फक्त आनंद उरतो. निखळ आनंद. आनंदातच मग्न आहेत.

***प्रश्न : महाराज, "मैत्रीकषणामूदितोपेक्षानाम् सुखदुःख पुण्यापुण्य विषयनाम् भावनातश्चितप्रसाद्म" असे योगसूत्रकार सांगतात. या सूत्राचा अर्थ सांगावा अशी प्रार्थना आहे.***

उत्तर : मनानेच मनाला कसे घडवावे ते इथे योगसूत्रकार सांगतात. जे लोक पुण्यवान आहेत त्यांना पाहिल्यावर मनाला समाधान वाटले पाहिजे. त्यामुळे मनाला शांती मिळते. हा एक अभ्यास आहे. आपल्याकडून पुण्य घडत नाही. पण पुण्यकर्म करणारी मंडळी आहेत, त्यांना पाहून आनंद वाटायला लागला म्हणजे मन तयार झाले. पुण्यवान माणसाला पाहिल्याबरोबर आनंद वाटला पाहिजे. पुण्य दिसले की प्रथम प्रयत्नपूर्वक आनंद व्यक्त करावा. पुढे त्याची सवय लागते आणि मन शुद्ध होत जाते, प्रसन्न होत जाते.

पापकर्म करणारे जे आहेत त्यांच्यावर रागावून उपयोग नाही. भ्रष्टाचार झाला, दुसऱ्याला फसवतात, लुबाडतात असले लोक दिसले तर त्यांच्यावर

रागावून काय उपयोग? त्यांच्याबद्दल उपेक्षा करायची. सांगून पहायचं. नाही ऐकलं तर नाही ऐकलं. त्याच्याबद्दल रागावलं, प्रतिकार करायचा प्रयत्न केला तर अशांती होणार. पाप करणाऱ्यांबद्दल अनादर ठेवू नये, त्यांचा द्वेष करु नये आणि तिरस्कारही करू नये. भगवंत त्याला शासन करतील हा विचारही मनांत आणू नये. उदासीनता, उपेक्षा धारण करावी. त्यांची कींवही करू नये आणि त्यांच्यावर दयाही करू नये. नाहीतर आपले मन अशुद्ध होईल. मनात अप्रसन्नता निर्माण होईल. म्हणून त्यांच्याबद्दल उपेक्षा वृत्तीचा अभ्यास करायचा.

पूर्वपुण्य करून आल्यामुळे जे लोक सध्या सुखात आहेत, त्यांच्याशी मैत्रीने वागायचा प्रयत्न करायचा. दुर्योधनाला ते कधीच साधलं नाही. म्हणून त्याला समाधानही मिळालं नाही. पांडवांना ते साधलं म्हणून ते समाधानी राहिले. त्यामुळे पांडवांबद्दल साऱ्यांनाच आदरबुद्धी होते. रामचंद्रांनी भावांनाच मोठेपणा दिला. मी नावाचाच राजा आहे, तुम्हीच हे राज्य करीत चला म्हणाले. असं हे कौशल्य आहे. सुखी मनुष्य पाहिल्यावर तो आपलाच आहे, आपला मित्रच आहे असा अभ्यास झाला की मन चांगलं तयार होतं. सुखी माणसाबद्दल प्रेम बाळगले, आदर ठेवला की मनातून मैत्री वाढून आपले मन शुद्ध होत जाते, शांत होत जाते आणि साधक प्रसन्नचित्त रहातो. मैत्री केल्यामुळे मनांत मत्सर, असूया, खेद वगैरे भावना निर्माण होत नाहीत आणि अंतःकरण शुद्ध राहते.

दुःखी मनुष्य दिसल्यावर मनात करूणेची भावना करावी. बरेच दुःख होत आहे त्याला. त्याला दुःख नसते तर बरे झाले असते. त्याच्या दुःखनिवृत्तीकरता शक्य तो उपाय करावा. काही शक्य नसेल तर निदान त्याच्या दुःखाचा परिहार होऊन तो सुखी व्हावे अशी मनोभावे इच्छा करावी. अशी भावना वारंवार केली की तशी मनाला सवय लागते आणि दुःखी मनुष्ये पहाताच खरोखरी मनात कारूण्यभाव निर्माण होतो. असा कारूण्यभाव उत्पन्न होण्याइतकी बुद्धी शुद्ध झाली की साधक प्रसन्नचित्त होतो. दुःखी माणसाशी नुसते प्रेमाने बोलले, सांत्वनाचे शब्द उच्चारले तरी मन शांत व शुद्ध होते व चित्त प्रसन्न होते.

असे मन बनवत गेले की वाटते सर्वांचे कल्याण व्हावे. सर्व सुखी व्हावेत. सर्व निरोगी रहावेत. कोणालाही दुःख मिळू नयेत. या भावना मनात वाढत गेल्या की तसा स्वभाव बनतो. त्यामुळे मन शुद्ध होते, निर्मळ होते आणि सत्त्वगुणांची वाढ होऊन साधनाभ्यास चांगला चालू रहातो.

***प्रश्न : "ठेविले अनंते तैसेचि रहावे ।***

***चित्ती असू द्यावे समाधान ।"***

***असे तुकाराममहाराज सांगतात. या वचनाचा नेमका अर्थ काय महाराज?***

उत्तर : भक्तीमध्येसुद्धा ईश्वराची इच्छा आहे. त्या इच्छेप्रमाणे रहाणे ही फार मोठी भूमिका आहे. संसारातच चित्त असले तर मनात भक्ती असूनही ही भूमिका मिळणार नाही. त्या अनंताची इच्छा आहे तसंच राहिलं पाहिजे. पण आपण विचार करीत बसतो. असं का झालं? स्वतःच्या कर्तृत्वाचा एक अभिमान असतो. म्हणूनच वाटत रहातं 'मी इतकं केलं, इतका विश्वास ठेवला आणि ईश्वराने असं का केलं, असं का नाही केलं ईश्वराने?'

पण खऱ्या भक्ताला असे वाटणारच नाही. धर्मराज म्हणाले मी धर्माने वागले म्हणून राज्य गेलं असं नाही. वनवासांत रहाणेही ईश्वराची कृपाच झाली आहे म्हणाले. सत्कर्मे करीत राहिले. श्रद्धा ठेवून राहिले. म्हणूनच वनवासातही समाधानात राहिले.

ही सुद्धा चांगली स्थिती आहे. देवाने दिलेली स्थिती चांगलीच आहे असे भक्ताला वाटते. "जैसी स्थिती आहे । तैशापरी राहे कौतुक तू पाहे संचिताचे ।" असे संत सांगताहेत. ईश्वराच्या इच्छेप्रमाणे रहावे. असं व्हावं ही ईश्वराचीच इच्छा आहे. अशी भूमिका असेल तरच समाधान मिळते.

***प्रश्न : महाराज, "ब्रह्म सत्य जगन्मिथ्या" असं श्रीशंकराचार्य महाराज सांगतात, याचा अर्थ सांगावा अशी प्रार्थना आहे?***

उत्तर : हे सगळं विश्व कल्पित आहे. भासतंय, दिसतंय म्हणून ते विश्व खोटं आहे असे म्हणता येत नाही. विश्व सत्य वाटते आपल्याला. पण त्या विश्वाला निर्माण करणाऱ्या परमात्म्याच्या अधिष्ठानानेच विश्व निर्माण झालं आणि

विश्वाभास दिसतो आहे. जो मूळ सत्यस्वरुपी परमात्मा, त्याने ही सर्व रुपे धारण केलेली आहेत. एक असतांना अनेक रुपांनी तो भासतो आहे. जीव वेगळे नाहीयेत. जीवनरुपाने प्रवेश करून तोच भगवंत सगळीकडे प्रकाशित झाला आहे. जग विनाशी आहे. तर्क रुपाने जग राहू शकत नाही म्हणून जग सत्य आहे असेही म्हणता येत नाही.म्हणून जग मिथ्या आहे असे म्हटले आहे.

शुद्ध सत्त्वगुणाचा उदय झाल्यावर, अनेक जन्मांचा अभ्यास झाल्यावरच हे समजते आणि "सकलमिदं अहंच वासुदेवः" ही वृत्ती निर्माण होते. वासुदेवाशिवाय काही नाहीच. कुठलं जगबिग? काही नाही. अशी स्थिती निर्माण होते. अंधारात दोरी पडलेली आहे आणि साप दिसायला लागला. साप खरा आहे असे म्हणतो आपण त्या वेळेपुरते. पण दिवा आणला, दोरी बघितली. गेला साप.

तो मूळ परमात्माच फक्त सत्य आहे. जगांत दुसरे सत्य काही नाही. असे असले तरीही जो मूळ सत्यस्वरूपी परमात्मा आहे त्याचं सत्यत्त्व विश्वावर आपल्याला भासायला लागतं आणि मग विश्व खरे आहे असे आपल्याला वाटते. परंतु विश्व एक आभासच आहे. तो परमात्माच फक्त सत्य आहे, टिकणारा आहे. त्याच्या स्वरूपात काही बदल नाही, निर्विकार आहे तो परमात्मा. परमात्म्यालाच ब्रह्म म्हणतात. तोच सत्य आहे. बाकी सारे मिथ्या आहे.

***प्रश्न : महाराज, "ब्रह्म सत्य जगन्मिथ्या" हा अनुभव मला केव्हा येईल?***

उत्तर : (श्रीदत्तमहाराजांनी क्षणभर माझ्याकडे रोखून बघितलं आणि त्यांनी उत्तर दिलं) "तो अनुभव येईपर्यंत तुम्ही सेवा करीत रहा."

***प्रश्न : महाराज, श्रीतुकाराममहाराज 'हेचि थोर भक्ती आवडते देवा। संकल्पावी माया। संसाराची' असे सांगतात. या वचनाचा अर्थ काय महाराज?***

उत्तर : संसाराची माया कमी कमी करणेही ईश्वराची भक्ती आहे. 'संसार माझा

आहे' हे सुटलं पाहिजे. हे एकदा सुटलं की मग त्या चित्तात ईश्वराशिवाय दुसरे काही रहातच नाही. हीच थोर भक्ती आहे असे सांगताहेत.

***प्रश्न : महाराज, भक्तीनेच अंत:करण निर्मल होते असे संतमहात्मे सांगतात म्हणजे काय?***

उत्तर : भक्तीनेच आपले अंत:करण निर्मल होते. भगवंत भक्ताच्या अंत:करणात रहातात व ते भक्ताचे हृदय शुद्ध करतात असे भागवतात सांगितले आहे.

***प्रश्न : महाराज, ईश्वर मूर्तीरुप नाही असे शास्त्रकारच सांगतात ना?***

उत्तर : ईश्वर केवळ मूर्तीरूप नाही हा महत्त्वाचा सिद्धांत आहे. ईश्वर सर्वत्र आहे. पांडुरंगानी ते जाणण्यासाठी नामदेवांना विसोबा खेचरांकडे पाठवून दिले. पण ईश्वर मूर्तीरूप नाही असे आरंभाला म्हणायचे नाही. संपूर्ण विश्वच जिथे ईश्वराचे रुप आहे, तिथे मूर्ती ही ईश्वराचे स्वरुप नाही असे कसे म्हणायचे? सर्वत्र ईश्वर भरलेला आहे ही भूमिका पुढे येते. प्रारंभाला मूर्तीपूजाच सांगतात.

***प्रश्न : महाराज, मनातील चिंता आम्ही कशा दूर कराव्यात?***

उत्तर : संसाराबद्दल ममता असली, माझं माझं म्हणून मनात असलं की चिंता लागते, काळजी लागते. संग नाही, ममता नाही असं झालं की चिंता रहात नाही. संसाराची आसक्ती सुटली की चिंता जातात.

***प्रश्न : महाराज, भक्ती करीत राहिले म्हणजे आपल्या हातून पूर्वी जी पापे झालेली आहेत त्या पापांचा नाश होतो का?***

उत्तर : भक्ती करणाऱ्या जीवाच्या हृदयात भगवान प्रकट होतात आणि पापक्षय करतात. त्यामुळे भक्ताचं काहीही पूर्वपाप शिल्लक रहात नाही.

***प्रश्न : महाराज, भक्तीने फक्त याच जन्मात आपल्या हातून झालेली पापे नष्ट होतात कां. पूर्वजन्मातील पापेही जातात ?***

उत्तर : भगवंत सर्वज्ञ आहेत. त्यांना सर्व ज्ञान आहे. त्यामुळे पूर्वजन्मातील पातकेही भक्तीमार्गामध्ये आड येऊ नयेत याची चिंता त्यांना असते. म्हणून भक्ताची जी जी दूरिते, पापे आहेत - या जन्मातली, मागच्या जन्मातली ती सारी भगवंत नष्ट करतात.

***प्रश्न : सर्व साधनांचे फळ भक्तीच आहे असे कां म्हणतात महाराज?***

उत्तर : सगळी साधनं - तीर्थयात्रा, अनुष्ठाने, व्रतवैकल्ये, दानधर्म, यज्ञयाग, योगाभ्यास - भक्तीसाठीच आहेत. भगवंताबद्दल प्रेम उत्पन्न झालं तरच या साधनांचा उपयोग झाला असं म्हणता येईल. नाहीतर ते नुसते निरूपयोगी श्रम आहेत असे सांगतात.

***प्रश्न : महाराज, तुकाराममहाराजांसारखे संतमहात्मे अनुकूल परिस्थिती, सुखाची परिस्थिती का नाकारतात ?***

उत्तर : अनुकूल परिस्थिती आली, सुखाची परिस्थिती आली म्हणजे मनुष्याचा अहंकार वाढतो. अहंकार ही फार मोठी ग्रंथी आहे. जन्माचा अहंकार, ज्ञानाचा अहंकार, संपत्तीचा अहंकार- सत्तेचा अहंकार. जर अहंकारात जीव गुरफटून गेला तर भगवंताचे स्मरण होत नाही. ईश्वराचे स्मरण, दर्शन दुःखाच्या अवस्थेत, प्रतिकूल परिस्थितीतच जास्त होते. म्हणूनच कुंती "विपदः सन्तु वः शश्वत् ।" असे मागणे मागते. आमच्यावर संकटांचे प्रसंग वारंवार यावेत. दुःखामध्येच आम्हाला ठेवावे असे मागणे कुंती मागते.

***प्रश्न : समाधीतून व्युत्थान दशा का येते महाराज?***

उत्तर : योगाभ्यासाने समाधी प्राप्त होते. त्याकरिता प्राणायामाचा प्रत्याहाराचा अभ्यास आहे. इंद्रियांना आपापल्या स्थानात आणायचा प्रयत्न प्रत्याहाराच्या अभ्यासात करावा लागतो. वासनांमुळे व्युत्थान येतं. वासना सूक्ष्म रूपाने का होईना शिल्लक असल्या की प्रारब्धामुळे व्युत्थान दशा येते. ते प्रारब्ध समाधी दशेतून जीवाला बाहेर ढकलतं आणि व्युत्थान दशा येते. व्युत्थान दशा बंद करता येत नाही.

***प्रश्न : समाधीअवस्था उतरल्यानंतर महनांत वासना येतात. आम्ही मन कसं आवरायचं महाराज?***

उत्तर : समाधीतून व्युत्थान दशा आली तरी ईश्वरकृपा असली की वासनांकडे गेलेलं मन विचारांनी आवरावेसे वाटते. मन आसक्त होऊ द्यायचं नाही एवढं जपायचं.

भगवान श्रीकृष्ण भगवद्गीतेत सांगतात राग आला हरकत नाही. व्यवहारात जोवर अंतःकरण आहे, व्युत्थान दशा जोवर संपलेली नाही, तोवर राग यायला हरकत नाही. पण तो आवेग उत्पन्न होता कामा नये. आवेग आवरला पाहिजे. रागाचा अतिरेक होऊ नये एवढं जपलं पाहिजे. हे ज्याला साधलं तो योग आहे. राग, लोभ जो आवरु शकला तो योगी आहे. तो सुखी आहे. व्युत्थान दशेत सगुण भक्तीने विकार आवरण शक्य होतं, सोपं होतं. निर्गुण समाधी अवस्था साध्य झाली तरी ती टिकवायला सगुणांची भक्ती कितीतरी उपयोगी आहे.

***प्रश्न : भक्तीनेच मन व इंद्रिये आवरणे सोपे होते असे कां म्हणतात महाराज?***

उत्तर : खरी भक्ती जर उत्पन्न झाली तर अंतःकरण तन्मय होऊन जाते. मग मनाला इंद्रियांना आवरण्याची जरुरी भासत नाही. डोळे मिटायला नको, काही नको. समाधी अवस्थासुद्धा नको वाटते. त्यामुळे खरे ज्ञानी जे असतात ते कधीही भक्तीमार्ग सोडत नाहीत. भगवंताचे ध्यान करणे, नामस्मरण करणे यातच ते रंगून जातात. "पडिले वळण इंद्रिया सकळा" हे वळण त्यांनी इंद्रियांना लावले.

***प्रश्न : महाराज, निव्वळ भक्तीने मोक्ष मिळेल का? कां मोक्ष मिळवण्यासाठी ज्ञानाची आवश्यकता आहे?***

उत्तर : भगवत् भक्ती अंतःकरणामध्ये वाढत राहिली तर त्या भक्तीच्या प्रभावाने मोक्ष मिळू शकतो. मोक्ष म्हणजे सर्व दुःखांची कायमची निवृत्ती. भक्तीने ती सुद्धा प्राप्त होते असे सांगतात.

***प्रश्न : महाराज, जगांत कोणताही जीव निर्माण होतो तो निसर्ग निर्माण करतो असे बुद्धीवादी सांगतात -तसंच असंत का ?***

उत्तर : जीवन निर्माण करणारा कोण आहे? गर्भामध्ये तो जीवात्मा कसा येतो? तो गर्भ कसा वाढतो? नऊ महिन्यांपर्यंत त्याचे पोषण कोण करतो? त्याचे नुसते निसर्ग हे उत्तर नाहीये. निसर्ग म्हणजे काय? निसर्ग शब्दाचा अर्थ काय? बुद्धीवादाने विचार करायचा म्हटले तर त्या बुद्धीवादाने ही सगळी कार्यकारण

मीमांसा दाखवता आली पाहिजे! जर ईश्वर कोणीच नाही तर जग झालेच कसे? साधा विचार म्हणजे गर्भामध्ये तो गर्भ तयार कसा होतो? याला बुद्धीवाद उत्तर देऊ शकत नाही. कार्य हे कारणावाचून कसे उत्पन्न होईल?

हे सगळे विचार करून अनुभवाने साधुसंत सांगताहेत. ईश्वराचे कर्तृत्त्व आहे. सर्वही सृष्टीच्या कार्याचा कर्ता ईश्वर आहे. संरक्षणकर्ताही तोच आहे. उपसंहारकर्ताही तोच. ही ईश्वराची शक्ती त्यांनी मान्य केली, अनुभवली आणि मग लोकांपुढे ठेवली आहे.

***प्रश्न : तुकाराम महाराज म्हणतात, "वेदांचा तो अर्थ आम्हासीच ठावा।" असे का म्हटले आहे त्यांनी , महाराज ?***

उत्तर : पुष्कळ पंडित वेदांतील शब्दांच्या बाह्य अर्थाकडे लक्ष देतात, शास्त्रार्थ करतात आणि वादविवादही करतात. त्यांना वेदांचा अर्थ समजला आहेच असे म्हणता येणार नाही. वेदांचा खरा अर्थ परमात्मा हा आहे. सर्वत्र भगवान एक आहे ही भूमिका आली म्हणजेच वेदांचा अर्थ समजून घेतला. तुकाराम महाराजांनी तो समजून घेतला आहे. त्याप्रमाणे त्यांचे आचरण आहे.

***प्रश्न : महाराज, म्हणजे ज्ञानाचे फळ भक्ती हेच आहे असं तुकाराजमहाराजांना म्हणायचं आहे कां या वचनात?***

उत्तर : ज्ञान झाल्यावर स्वधर्माचे आचरण केलं पाहिजे. आचरण करणं हे ज्ञानाचे पुढचं फळ आहे. ज्ञान झाल्यावर ईश्वराची खरी भक्ती करावीशी वाटते. कर्तव्यकर्म करून जो लाभ होईल, त्यात संतोषाने रहावेसे वाटते. अपेक्षा नाही, वासना नाही, काही नाही. साधू वृत्तीने रहाताहेत. सर्व भूतांबद्दल प्रेम बाळगताहेत. तेच खरे ज्ञानी. तुकाराममहाराज हेच सांगताहेत.

***प्रश्न : धर्माचरणानेच उन्नती होते का महाराज?***

उत्तर : उन्नती या शब्दाचा अर्थ काय ते अगोदर समजून घेतलं पाहिजे. पैसा मिळणं, कीर्ती मिळणं, सत्ता मिळणं ही खरी उन्नती नाही. खरी उन्नती म्हणजे आपले हित कशात आहे हा विवेक होणे. जे आपल्याला प्रिय वाटते, आवडते त्यात आपले हित असेलच असे नाही. धर्माचरणानेच हिताचा विचार करण्याची बुद्धी प्राप्त होते.

*प्रश्न : महाराज, जगात विषमता का आढळते? ईश्वर सर्वशक्तीमान आहे तर तो सगळ्यांनाच ज्ञानी, सुखी करू शकत नाही का?*

उत्तर : ईश्वराने स्वत:च्या इच्छेने सृष्टीची रचना केलेली नाही. जीवाचं कर्म जसं होते तसे फळ जीवांना मिळते व त्याप्रमाणे सृष्टीची रचना होते.

आधुनिक काळात शिक्षणक्रम आखून सर्वांना रोजगार द्यायचा प्रयत्न केला जातो. पण सर्वांना सारख्या नोकऱ्या मिळत नाहीत. ज्याचे जसे शिक्षण, योग्यता तशी नोकरी त्याला मिळते. ही विषमता आधुनिक बुद्धीवादाने मान्य केलीच आहे ना? आपली उन्नती करुन घेण्यासाठी कर्तव्यकर्म करुन योग्यता ज्याची त्याने मिळवायची असते. शिक्षण न घेतलेल्याला मोठा पगाराची नोकरी मिळते का? ज्ञानाप्रमाणे, योग्यतेप्रमाणे, कर्माप्रमाणे रोजगार मिळतो. सगळेच राष्ट्रपती होत नाहीत.

प्रत्येकांचे जे पापकर्म किंवा पुण्यकर्म असेल त्याप्रमाणे फळ मिळणं म्हणजे सृष्टीची रचना आहे. ही सृष्टीरचना विषमच असणार. कारण सगळ्यांची कर्मे सारखी नाहीत, पुण्यही सारखी नाहीत आणि सगळी पापही सारखी नाहीत. कर्मामध्येही पुष्कळ फरक आहे. त्याप्रमाणे विविधता, वैषम्य अपरिहार्य आहे.

*प्रश्न : महाराज, संतमहात्म्यांच्या चरणस्पर्शाने बुद्धी बदलू शकते का?*

उत्तर : असेही संतमहात्मे असतात. त्यांच्या शरीराच्या स्पर्शाने किंवा केवळ त्यांच्या दृष्टिपातानेही बुद्धीचे परिवर्तन होऊ शकते. हे सगळे त्यांच्या धर्माचरणाचे,त्यांच्या तपाचे सामर्थ्य आहे.

*प्रश्न : महाराज, "मौनम् सर्वार्थसाधनम्" असे का म्हणतात?*

उत्तर : साधनाभ्यास करणाऱ्याने वाणीचा निरोध करावा असे सांगतात - खरेही नाही आणि खोटेही नाही, चांगलेही नाही आणि वाईटही नाही, बोलायचेच नाही. त्यामुळे साधनाभ्यास चांगला होतो.

*प्रश्न : महाराज, भस्मधारणाचे काय महत्त्व आहे ?*

उत्तर : नामस्मरणाने जशी पापे जातात तशीच भस्मधारणानेही जातात. या जन्मातही तर जातातच. पण गतजन्मातलीही जातात. शास्त्रानुसार यज्ञयाग केल्यावर जे भस्म मिळते ते धारण करावे. शरीराच्या निरनिराळ्या अवयवांना

श्रद्धेने लावावे. पापक्षय होतो. तीर्थस्नान, जपजाप्य इत्यादी कर्मापेक्षाही भस्मधारण अधिक फल देणारे आहे.

***प्रश्न : नातेसंबंध किंवा स्नेहसंबंध ही मायाच आहे का महाराज?***

उत्तर : पितापुत्र, बंधूभगिनी, पतीपत्नी हे नातेसंबंध अनयिमित असतात. पूर्वजन्मी कोणते संबंध होते, ते कुठे आठवते? या जन्मापुरते संबंध असतात. म्हणूनच ते अस्थिर असतात. परंतु हा जीवात्मा चैतन्यरूप आहे, सर्वव्यापी आहे. वृत्ती अंतर्मुख झाली की बाह्य जगाचा विचार बंद होतो आणि आत्माराम कसा आहे याचा विचार सुरू होतो. मग संसारभ्रम दूर होतो आणि खऱ्या आत्मस्वरूपाचे ज्ञान होते.

***प्रश्न : महाराज, आहारौ सत्त्वशुद्धी असे शास्त्रकारांनी सांगितले आहे त्याचा अर्थ काय, महाराज?***

उत्तर : उपनिषदकार सांगतात आपण जे अन्न खातो त्यापासून मन तयार होत असते. जे अन्न पवित्र असेल, शुद्ध बुद्धीने तयार केलेले असेल, तर त्या अन्नाच्या सेवनाने तयार होणारे मनही शुद्ध, निर्भय आणि सात्त्विक होते. अन्न नुसते उदरभरणासाठी नाही. वाटेल ते अन्न भक्षण करून मनाची तयारी होणार नाही. शुचितेने पवित्र भावनेने स्वयंपाक झाला व ते अन्न पवित्र भावनेने पोटात गेले तरच मन पवित्र होते आणि मानसिक शक्तीचा विकास होतो.

***प्रश्न : महाराज, सत्कर्म करतानाही ईश्वराची प्रार्थना करून ते कर्म कराव असे संतमहात्मे सांगतात. सत्कर्म करतांनाही ईश्वराची प्रार्थना कशाला करायची?***

उत्तर : समजून कर्म केले तरीसुद्धा त्यात चुका राहू शकतात. ईश्वराची इच्छा असेल तरच कर्म निर्दोष होते. कोणतेही कर्म ईश्वराच्या इच्छेनेच पूर्ण होतं. ईश्वराची कृपा असल्याशिवाय कर्म पूर्ण होणारच नाही. म्हणून कोणतेही कर्म करतांना ईश्वराचे स्मरण ठेवायचे व त्याच्याच शक्तीने, त्याच्याच स्मरणाने, त्याच्याच कृपेने ते कर्म पूर्ण होऊ दे, निर्दोष होऊ दे अशी प्रार्थना करायची.

***प्रश्न : महाराज, श्रद्धा असेल तरच सत्कर्माचे फळ मिळेल असे शास्त्रकार सांगतात? फळ ईश्वरशक्तीमुळे मिळते का श्रद्धेमुळे मिळते?***

उत्तर : श्रद्धा दृढ पाहिजे. फळ मिळेल की नाही असा संशय मनांत आला तर फळ मिळायचें नाही. अश्रद्धेने फळ मिळत नाही म्हणतात.

*प्रश्न : म्हणजे निव्वळ कर्मशक्तीचे फळ नाही असेच कां?*

उत्तर : कर्माचे फळ नाही असे नाही. परंतु ते फळ सद्गुरुंच्या आज्ञेचे आहे अशी श्रद्धा असेल तर फळ जास्त आहे. कर्म कमीजास्त होणं, फळ लगेच मिळणं हीही कृपाच आहे.

***प्रश्न : सद्गुरूंचे दर्शन घेतले की झाले. मग वाचन, तीर्थयात्रा वगैरे करायची गरज रहात नाही असे म्हणतात. तसे म्हणता येईल का?***

उत्तर : चोवीस तास तशी भावना टिकते कां? तशी रहात नाही. म्हणूनच वाचनबिचन आहे. वाचनाने सिद्धांतही समजतात.

*प्रश्न : महाराज, विदेही अवस्था म्हणजे काय?*

उत्तर : जागृती, स्वप्न व गाढ झोप या मनाच्या या तीन अवस्थांपेक्षा वेगळी एक चौथी अवस्था आहे मनाची. त्या अवस्थेत पूर्ण आनंद आहे. ध्यान सुरू झाले आणि ईश्वराच्या ठिकाणी मन अत्यंत स्थिर झाले की ही अवस्था प्राप्त होते आणि पूर्ण आत्मानंद प्राप्त होतो. या अवस्थेत मनांत काहीही वासना नसतात. ते मन आत्मस्वरूपाच्या ठिकाणी स्थिर होऊन बसलेले असते. बाहेर जातच नाही ते. परमेश्वर आनंदस्वरूप असल्यामुळे त्या आनंदस्वरूपात एकदा मन स्थिर झाले की मग मन बाहेर पडण्याची शक्तीच संपलेली असते. पूर्ण विदेही अवस्था आहे ही.

***प्रश्न : महाराज, आत्मानंदाची अवस्था प्राप्त करून घेण्यासाठी आम्ही काय करावे ?***

उत्तर : ही अवस्था प्राप्त करून घेण्यासाठी नारदांनी तीन साधने सांगितली आहेत. भूतदया, संतोष आणि संयम (म्हणजे इंद्रियनिग्रह).

***प्रश्न : महाराज, आमच्या मनांत भूतदया कशी निर्माण होईल?***

उत्तर : आमच्या मनात अनेक प्रकारचा अहंकार असतो. चांगल्या कुळात जन्म,उत्तम ऐश्वर्य, संपत्ती, ज्ञान, प्रतिमा, कीर्ती, सत्ता वगैरे. या साऱ्यांमुळे

मनांत अभिमान उत्पन्न होतो. या अभिमानामुळे ईश्वराचे स्मरण रहात नाही आणि ईश्वराबद्दल कृतज्ञता वाटत नाही. स्वतःच्या अहंकारात निमग्न असेपर्यंत दुसऱ्याच्या दुःखाची कल्पना येत नाही. अभिमानादि विकार जेव्हा मनांतून पूर्णपणे जातात, तेव्हाच खरी भूतदया उत्पन्न होते. "दया सर्व भूतेषु।" सर्वांबद्दल दया उत्पन्न झाली पाहिजे. भागवतात उदाहरणे दिली आहेत.

द्रौपदीच्या भावाला व पाच मुलांना कपटाने रात्री मारणाऱ्या अश्वत्थाम्याला कृष्णार्जुनांनी पकडून द्रौपदीसमोर आणलं आणि विचारलं, "याला काय शिक्षा करायची?" शोकाकुल द्रौपदी रडायची थांबली. तिने अश्वत्थाम्याला नमस्कार केला नि पांडवांना सांगितले, "सोडून द्या त्याला. जीवदान द्या त्याला."

वृत्ती निर्वैर झालेली आहे. धर्मज्ञ आहे. भगवद्भाव आहे. तिच्या या उद्गारांनी सर्व चकीत झाले आहेत.

द्रौपदी कारण सांगते आहे. "अश्वत्थाम्याची माता अद्याप जिवंत आहे. पती द्रोणाचार्य तर गेलेच. याला जर तुम्ही मारलंत तर तिचे आभाळ फाटेल. पुत्रशोकाचे दुःख किती आहे ते मी आज अनुभवले आहे. ते दुःख त्या माऊलीला होऊ नये एवढीच माझी इच्छा आहे. म्हणून त्याला जीवदान द्या."

केवढा संयम आहे? अशा शोकाकुल अवस्थेतही दुसऱ्यांच्या दुःखांचा मनांत विचार येतो आहे. त्याच्या आईला दुःख देऊ नका ही अंतःकरणवृत्ती तयार करायला किती काळ लागेल? सद्गुरूंच्या कृपेनेच अंतःकरण असे निर्दोष होऊन जाते आणि विवेक जागृत होतो. अशाच ठिकाणी दया उत्पन्न होणार. दया या भावनेचा जेवढा विकास होत जाईल तेवढी आमची भूमिका उंच उंच होत जाईल. तसा तसा तो जीवात्मा ईश्वरस्वरूप होईल.

***प्रश्न : महाराज, आम्ही संतोषाचा कसा अभ्यास करायचा?***

उत्तर : संतोष हा मोठा गुण आहे. ज्याला ईश्वराच्या जवळ जायचंय, त्याला संतोष अत्यंत आवश्यक आहे. ईश्वरावर सर्व भार घालायला शिकलं पाहिजे. धनधान्य, संपत्ती जे काही जवळ आहे ते सारे ईश्वराचे आहे. मग समाधान रहाते.

"ठेविले अनंते तैसेचि रहावे। चित्ती असो द्यावे समाधान॥" हा संतोष आहे. देवानं दिलं म्हणून आनंद नाही किंवा दिलं नाही म्हणून दुःख नाही. देवाच्या आज्ञेचे फक्त पालन करायचे हे साधकाचे कर्तव्य आहे. त्यासाठी संतोष वृत्तीचा अभ्यास आहे.

***प्रश्न : महाराज, मनांतले विकार आम्ही कसे घालवायचे ?***

उत्तर : त्यासाठी गुरूभक्ती सांगितली आहे. सद्‌गुरू ईश्वरस्वरूप आहेत. तशी सद्‌गुरूंच्या ठायी भक्ती निर्माण झाली की मनांतले विकार जातात.

***प्रश्न : महाराज, हेयोपादेय विवेक म्हणजे काय?***

उत्तर : मनाची स्थिरता करायची आहे. त्यासाठी काय ग्राह्य आहे आणि काय अग्राह्य आहे हे मनाला समजले पाहिजे. काय घ्यायचे आणि काय टाकायचे याचा विवेक म्हणजे हेयोपादेय विवेक असे म्हणतात.

'हेय' म्हणजे घ्यायचे काय? आणि 'उपादेय' म्हणजे टाकायचे काय? हे अगोदर समजले पाहिजे. ते निश्चित ज्ञान झाल्यानंतर मग मन त्याप्रमाणे वागायला लागतं. पण हे मनाच्या पुढे मांडणारा कोणीतरी पाहिजे नां? ज्ञानीमहात्मे तेच सांगताहेत.

***प्रश्न : महाराज, प्राणायाम केल्याने मन स्थिर होते असे सांगतात. प्राणायामाने मन स्थिर कसे काय होते ?***

उत्तर : प्राणायाम हे एक शास्त्र आहे. रोज चोवीस तासांत २१६०० वेळा श्वासोच्छ्वास होतो. २१६०० वेळा श्वास घेतला जातो आणि २१६०० वेळा श्वास सोडला जातो. प्राणाचे हे कार्य चोवीस तास चालू असतं. झोपेतही चालू असतं. श्वास आत घेणं आणि बोहर सोडणं याला पूरक आणि रेचक असे म्हणतात. मध्ये काही वेळ प्राण स्थिर करायचा असतो. त्याला कुंभक असं म्हणतात. प्राण स्थिर झाला की मनही स्थिर होतं. प्राणवायू थोडा वेळ जर स्थिर झाला तर मनांत विचार यायचं बंद होतं. अशी ही प्राणाची शक्ती आहे.

बहिर्कुंभक आणि अंतर्कुंभक असे दोन मार्ग आहेत. बहिर्कुंभक म्हणजे श्वास बाहेर गेल्यावर प्राण स्थिर करणे आणि अंतर्कुंभक म्हणजे श्वास आत घेतल्यावर प्राण स्थिर करणे. कुंभक म्हणजे प्राण स्थिर झाल्यावर बाहेरचे

सगळे व्यवहार बंद झाले. मन स्थिर झाल्यावर मनामध्ये नवीन विकार उत्पन्न होणं आणि आधीच्या विकारांत भर पडणं बंद होतं. आणखी जे जे काही जुने संस्कार मनावर असतील ते प्राणायामाने कमी कमी होत जातात. असा दुरितक्षय होतो. मन या मार्गाने स्थिर झाल्यावर मानसिक शक्तीचा पुष्कळ विकास होतो. मानसिक शक्ती खूप वाढते.

***प्रश्न : प्राणायाम फार लोक करतांना दिसत नाहीत महाराज. असे कां?***

उत्तर : प्राणायाम हा मार्ग सर्वांसाठी नाहीये. सगळीच औषधे सगळ्यांनाच लागू पडत नाहीत. प्राणायामाचा अभ्यास चांगल्या माहितगार योग्याच्या मार्गदर्शनाखाली करावा लागतो. त्याच्या देखरेखीखाली करावा लागतो. नुसतं पुस्तकं वाचून, नाक दाबून, तोंड दाबून धरणं आणि प्राणवायू कोंडून ठेवणं म्हणजे प्राणायाम नव्हे. शरीरामध्ये कितीतरी सूक्ष्म नाड्या आहेत. प्राणवायूचा आतबाहेर त्या सगळ्यांतून संचार चालू आहे. कुठे एखाद्यावेळी तो भलत्या मार्गाने जाऊन जर भलत्याच नाडीत शिरला तर अनिष्ट परिणाम होतात. कोणत्या तरी चुकीच्या नाडीत प्राण कोंडून बसला तर खूपच हानी होते. त्याला विरोध केला तर तो प्राणवायू कुठे तरी जाऊन बसून वेड लागायची पाळी येते.

म्हणून योग्य मार्गदर्शन करणाऱ्यांच्या सान्निध्यांत राहून तो अभ्यास करावा लागतो. तसे योग्य मार्गदर्शक आज खूपच कमी आहेत.

***प्रश्न : महाराज, काही वेळा मन एकदम अशांत होते. अशा वेळी काय करावे ?***

उत्तर : जेव्हा चित्त अशांत होईल तेव्हा आपल्या नित्य वाचनातील ज्ञानेश्वरीसारखा ग्रंथ उघडावा. जें पान निघेल त्यावर आपणास हवा असलेला उपदेश असतो. ज्ञानेश्वरीचे वाचन, मनन करणे म्हणजे श्रीज्ञानेश्वरमहाराजांच्या सहवासात जाण्यासारखेच आहे.

***प्रश्न : परमार्थाचे ग्रंथ सोडून इतर काही ग्रंथ वाचले तर त्या वाचनामुळे साधनेला विरोध होतो कां?***

उत्तर : व्यवसायानिमित्ताने काही वाचले तर साधनेला विरोध असा होत नाही. परंतु असे व्याप वाढले की जी साधायला पाहिजे ती अंतर्मुखता साधली जात नाही. त्यामुळे साधनाभ्यासाला गती यावी तशी येत नाही.

***प्रश्न : अंतर्मुखता कशी साधेल?***

उत्तर : नोकरी व्यतिरिक्त दुसरे काहीही करू नये. द्रव्यार्जनाच्या मागे लागले नाही की साधते.

***प्रश्न : महाराज, सद्‌गुरूंचा सहवास फार कमी वेळ मिळतो ही मोठी खंत आहे. मुंबईला वास्तव्य असल्यामुळे व नोकरीमुळे वारंवार पुण्याला येता येत नाही.***

उत्तर : सद्‌गुरूंचा प्रत्यक्ष सहवास जरी लाभला नाही तरी मनाने सदैव सद्‌गुरूंच्याजवळ असलं म्हणजे झालं.

***प्रश्न : सद्‌गुरू सतत बरोबर आहेत, सदैव सहाय्य करीत आहेत असा भाव ठेवणे चांगले ना?***

उत्तर : ते तसं आहेच.

***प्रश्न : महाराज, मनाला अनेक वेळा बेचैनी येते.***

उत्तर : मन बेचैन होणे हे साधकाच्या दृष्टीने चांगले लक्षण आहे. शांतपणे बसून आत्मपरीक्षण करावे व आपल्यात कोणते दोष आहेत ते पहावे. ते दोष दूर करण्याचे प्रयत्न करावेत. आपणाजवळ ते दोष दूर करण्याचे सामर्थ्य नसेल तर सतत ईश्वराजवळ प्रार्थना करावी म्हणजे होतं.

***प्रश्न : महाराज, स्वतःवर गुरूकृपा आहे हे साधकाने केव्हा समजावे?***

उत्तर : साधनाभ्यास निरंतर होतो आहे हीच गुरूकृपा आहे. ऐहिक कामनांची पूर्ती म्हणजे गुरूकृपा नव्हे.

***प्रश्न : साधनाभ्यासही गुरूकृपेनेच होतो ना ?***

उत्तर : कर्तृत्वशक्ती ईश्वराची आहे. आपलं काहीही नाही. असे साधनेतच आहे असे नव्हे. प्रत्यक्ष व्यवहारातही ईश्वराची शक्तीच कार्य करीत असते.

***प्रश्न : मधूनमधून तीर्थस्थानी राहून साधना करावी असे खूप वाटते. पण नोकरीच्या कामामुळे आणि संसाराच्या जबाबदाऱ्यांमुळे जमत नाही. महाराज काय करावे?***

उत्तर : तीर्थस्थानी राहून साधना करणे चांगलेच. पण जमत नसेल तर तळमळीने

देवाची प्रार्थना करावी व घरीच राहून साधना करावी. तळमळ किती आहे यावर सर्व अवलंबून आहे. तळमळ असेल तर कुठेही होतं.

***प्रश्न : महाराज, साधना केली म्हणजेच दृष्टांत होतात कां ?***

उत्तर : आपण साधना केली ही समजूत बरोबर नाही. त्यामुळे अहंकार येतो. उत्तम साधना असेल तरच खरे दृष्टांत होतात. नाहीतर मानसिकच असतात. अशा मानसिक दृष्टांतात साधक गुंतत गेला तर ते बरोबर ठरणार नाही. दृष्टांत झाला, कृपा झाली तरी त्याचा उल्लेख न करणेच चांगले.

***प्रश्न : महाराज, दुःख भोगावे लागले म्हणून काही लोक ईश्वराला दोष देतात.***

उत्तर : सगळेही जीव स्वकर्म सूत्राने बांधले गेलेले आहेत. सुखदुःख देणारा दुसरा कोणीही नाही. कर्मानुसार सगळे चालले आहे. केलेल्या कर्माचे फळ म्हणून जे सुखदुःख वाटाला येते. तेच प्रत्येकाला भोगावे लागते. जीवाच्या हातून जे कर्म घडलेले असेल - पाप म्हणा, पुण्य म्हणा - त्याचे फळ त्या जीवाला निश्चित मिळते. त्याबद्दल ईश्वराला काय म्हणून दोष द्यायचा?

पण लोक अहंकार धारण करतात आणि आपले केलेले कर्मही कबूल न करता ईश्वराला दोष देतात. ईश्वर जीवांचे नियमन स्वतःच्या इच्छेप्रमाणे करीत नाही. जीवांची कर्मे पाहून अलिप्त मनाने त्या कर्मांचे फळ देतो. म्हणून कोणताही दोष ईश्वराच्या ठिकाणी नाही.

***प्रश्न : जे धन मिळते ते ईश्वरप्रसादामुळेच मिळते असे शास्त्रकार सांगतात? याचा अर्थ काय महाराज?***

उत्तर : ईश्वराच्या प्रसादाने धन मिळाले हीच बुद्धी खरी आहे. अशीच भावना पाहिजे. आम्ही हे केलं ते केलं म्हणून आम्हाला धन मिळालं ही बुद्धी उपयोगाची नाही. मी केलं म्हणून धन मिळालं हा अहंकार आहे.

***प्रश्न : महाराज, तहानभूक नाहीशी करणारे मंत्र असतात काय?***

उत्तर : तहानभूक नाहीशी करणाऱ्या मंत्रविद्या आहेत. रामचंद्र आणि लक्ष्मणांना विश्वामित्रांनी बला आणि अतिबला अशा विद्या दिल्या आणि त्यामुळे त्यांची तहानभूक नाहीशी झाली असे सांगतात. पण या मंत्रविद्यांशी ईश्वरशक्तीचा काही संबंध नाही.

***प्रश्न : महाराज, लोखंडाचे सुवर्णात रुपांतर करणारा परीस खरोखरीच असतो काय?***

उत्तर : लोखंडाचे सुवर्णात रूपांतर करणारा परीस काय किंवा सर्व इच्छा पूर्ण करणारा चिंतामणी काय? आपण नुसती नावे ऐकतो. काव्यामध्ये असलं वर्णन आलेलं आहे. कवीकल्पना आहे असं म्हणायचं आणि सोडून द्यायचं.

***प्रश्न : महाराज, श्रीज्ञानेश्वरमहाराजांचे आजही दर्शन होते काय?***

उत्तर : श्रीज्ञानेश्वरमहाराजांचे आपल्याला दर्शन व्हावं अशी तळमळ असणारे जे कोण भक्त आहेत त्यांना त्यांचे दर्शन आजही होऊ शकतं. ज्ञानेश्वरमहाराज समाधीमध्ये जाऊन राहिलेले आहेत. त्यांच दर्शन घेणारी योग्य मंडळी अजून आहेत. तितकी आणखी तळमळ मनामध्ये पाहिजे. मग दर्शन होतं.

***प्रश्न : सद्गुरूंच्या पायावर मस्तक ठेवलं की पापक्षय होतो का?***

उत्तर : सद्गुरूंच्या पायावर मस्तक ठेवायला मिळालं तरी त्या स्पर्शाने आपला दुरितक्षय होतो. त्यांच्या दृष्टीचाही महिमा आहे. त्यांची दृष्टी आपल्यावर पडली तरी दुरितक्षय होतो. त्याच्या नामसंकीर्तनाचाही महिमा आहे. सद्गुरूंच्या नामसंकीर्तनानेही दुरितक्षय होतो. कोणत्याही उपायाने का होईना सद्गुरूंच्या ठिकाणी आपल्याला मन स्थिर करता आलं पाहिजे.

***प्रश्न : महाराज, अनेक लोकांना असं वाटतं की सद्गुरूंची भक्ती केली तर भौतिक सुखं मिळावी.***

उत्तर : भगवंतांची, सद्गुरूंची भक्ती केल्यावर काहीतरी मिळावं असं वाटणं स्वाभाविक आहे. जीवात्मा वासनामयच असतो. सद्गुरूंनी काहीतरी द्यावे असे त्याला वाटलं. हरकत नाही. उपभोग घ्यायची इच्छा अगोदर ईश्वराच्या कृपेने पूर्ण झाली की भजनाकडे आपोआप लक्ष जातं. इतकं देव देतोय. थोडसं त्याच्याकरिता करायला पाहिजे असं वाटतं. ज्ञानेश्वरमहाराज सांगतात

अथवा हे चित्त । मनबुद्धीसहीत । माझ्या हाती अचुंबित । न शकसी देवों ॥
तरि गा ऐसे करी । यया आठा पाहारामाजी । मोटके निमिषभरी देतु जाय ॥

जर तुला तुझे चित्त सकलवासनारहीत करुन माझ्या हाती देता येत नसेल तर अर्जुना तू असे कर. या आठ प्रहरांमध्ये एक क्षणभर तरी तू तुझे चित्त मला दे.

"मोटके निमिषभर देई" एक निमिष तरी दे. ते निमिष देऊन जर भक्ती वाढत गेली तर हळूहळू बुभुक्षा शांत होत जाते आणि मुमुक्षा निर्माण होत जाते. मग वैराग्य. मगच भगवंताचा खरा प्रसाद मिळतो.

***प्रश्न : महाराज, प्रतिमापूजन कनिष्ठ आहे असे शास्त्रकार सांगतात ना?***

उत्तर : प्रतिमापूजन कनिष्ठ आहे असे सांगतात. पण प्रतिमापूजनातसुद्धा अभ्यास कोणता आहे? परिच्छिन्न१ मूर्तिमध्ये परमात्मा अपरिच्छिन्न२ **तळटीप :- १परिच्छिन्न - मर्यादित, सीमित २. अपरिच्छिन्न - अमर्यादित, असीमित** आहे हाच नां? अपरिच्छिन्न परमात्म्याचे स्वरूप मनात यायला किती वेळ लागेल?

प्रतिमापूजन कनिष्ठ असले तरी त्याज्य नाही. कुठेच चित्त लागत नसेल आणि प्रतिमेच्या ठिकाणी चित्त स्थिर होत असेल तर त्याचेही फळ मिळतेच. प्रतिमेतही परमात्माच आहे अशी दृढ भावना झाली तर फळ मिळणारच. आरंभाला ज्याला भक्तीमार्गात प्रवेश करायचा आहे त्याला प्रतिमापूजन हाच मार्ग श्रेष्ठ आहे. सर्व भूतांच्याठायी प्रेम उत्पन्न होणं ही भक्तीची उच्च भूमिका आहे. परंतु तितकी भूमिका यायला वेळ लागतो. हळूहळूच तो अधिकार प्राप्त होणार. तोपर्यंत प्रतिमेच्या ठायी भक्ती योग्यच आहे. तीच भक्ती पुढे उत्तम भूमिकेपर्यंत नेऊ शकते.

***प्रश्न : महाराज, तीर्थयात्रेचेही महत्त्व असते कां ?***

उत्तर : तीर्थयात्रेचेही एक महत्त्व आहे. पवित्र स्थानी गेल्यावर सर्व पापे तरून जातात. सर्व पापांचा क्षय होतो. म्हणून सर्व नद्यांना तीर्थ म्हटलेले आहे. गंगा, गोदावरी वगैरे महानद्या तीर्थरूप आहेत. त्या ठिकाणी स्नान केलं की दुरितांचा क्षय होतो आणि कर्मानुष्ठानही अधिकाधिक प्रभावी होते. म्हणून तीर्थयात्रा चित्तशुद्धीला कारण होते. ज्ञान झाल्यावरही तीर्थयात्रा करावी असे सांगतात. ज्ञानी भक्तानेही तीर्थयात्रा करावी. त्यामुळे सर्वत्र भगवत् स्वरूप पहाण्याचा अभ्यास होतो असे शास्त्रकारांनी सांगितले आहे.

***प्रश्न : महाराज, योगाभ्यासाचे फळही सद्गुरूकृपेशिवाय मिळत नाही असे कां सांगतात?***

उत्तर : शास्त्रकारांनी योगाभ्यास सांगितला, प्राणायामादिकांनी मनाचा निग्रह

करायला सांगितला. पण ईश्वराचे अधिष्ठान पाहिजे असे योगशास्त्रकार सांगतात. सद्‌गुरूंची कृपा असल्याशिवाय नुसत्या तपसाधनांनी किंवा योगाभ्यासाने मोक्ष मिळत नाही म्हणतात.

***प्रश्न : महाराज, गुरूकृपा झाल्याशिवाय सद्‌गुरू ईश्वरस्वरूप आहेत हे कळत नाही असे का सांगतात?***

उत्तर : ईश्वरस्वरूप सद्‌गुरू आहेत हे कळायला वेळ लागतो. अंतःकरण संसारातच आसक्त असेल तर ते ज्ञान होत नाही. ज्यांच्या मनामध्ये संसाराच्याच अशुभ वासना भरून राहिलेल्या आहेत, त्यांना गुरुस्वरूप समजत नाही. सद्‌गुरू आपल्याप्रमाणेच आहे असे वाटते. तेही बोलतात, चालतात, पहातात असे वाटत. आम्ही जसे वागतो तसे तेही वागतात असे वाटते. पण कृपाप्रसाद झाला की कळून येते सद्‌गुरू हे ब्रह्माविष्णुमहेशात्मक त्रिमूर्ती आहेत. मगच सेवा घडते. दास्यभक्ती घडते.

***प्रश्न : महाराज, दास्यभक्ती म्हणजे काय? सद्‌गुरूंच्याबरोबर राहून त्यांची सेवा करणे म्हणजेच दास्यभक्ती असे म्हणता येईल का?***

उत्तर : गुरूंच्याबरोबर राहिले म्हणजेच दास्यभक्ती होते असे नाही. कर्मयोगाचे आचरण करणे, वर्णाश्रमधर्माप्रमाणे आचरण करणे ही सुद्धा दास्यभक्तीच आहे. ईश्वराच्या आज्ञेचे पालन करणे या भावनेने घडलेला कर्मयोग दास्यभक्तीच आहे. स्वामींची आज्ञा पालन करणे हे दासाचे कर्तव्यच आहे ना ! मग देवाने जसे वागायला सांगितले तसे वागणे ही दास्यभक्तीच नाही का ?

***प्रश्न : महाराज, इशावास्योपनिषदांत सांगितले आहे "तददूरे तद्विन्तिके" भगवंत जवळही आहे आणि दूरही आहे. याचा समन्वय कसा करायचा?***

उत्तर : यात विसंगति नाही. भगवंत जवळ आहे पण कोणाला! श्रीज्ञानेश्वरमहाराज सांगतात.

म्हणोनि थोरपण पऱ्हा सांडिजे । व्युत्पत्ति आघवी विसरिजे ।
जैं जगा धाकुटे होईजे । तै जवळीक माझी ।।९.३७८।।

"आपल्या ठिकाणचा मोठेपणा दूर टाकून द्यावा. शास्त्राध्ययन केल्याचा

अभिमान टाकून देऊन जसे काही आपण शास्त्राध्ययन केलेच नाही अशी वृत्ती ठेवावी.जगतात अशा प्रकारचा सर्व प्रकारे लहानपणा जेव्हा घ्यावा, तेव्हाच माझी जवळीक अनुभवाला येते" असे श्रीज्ञानेश्वरमहाराजांनी स्पष्टपणे सांगितले आहे.

जवळ आहे परमात्मा. पण धाकटं व्हायला हवं. निरहंकार व्हायला हवं. थोरपणा सांडायला हवा.

जीवाला जेव्हा अहंकार असतो, स्वकर्तृत्व जो मानतो, त्याला भगवंताची जवळीक कशी काय अनुभवता येणार? त्याला भगवंत दूर आहे असेच अनुभवाला येणार. ज्याला स्वतःचा अहंकार आहे, स्वतःचे सामर्थ्य जो मानतोय त्याला भगवंत दूरच आहे.

***प्रश्न : महाराज, सद्गुरूंच्या दर्शनाने त्रिविध फळे मिळतात असे शास्त्रकार सांगतात. ही त्रिविध फळे कोणती?***

उत्तर : सद्गुरूंच्या दर्शनाने पापही जातं, तापही जातो आणि दैन्यही जाते असे सांगतात. पूर्ण विश्वास असेल तर तीनही फळे मिळतात. फळाची इच्छा असेल तर सद्गुरू फळ देतात. कामनेप्रमाणे फळ मिळते. पण फळाची कामनाच नाहीशी होणे हे मोठे फळ आहे. सद्गुरूंचे सामर्थ्यच असे असते की, ज्या फळाची इच्छा निर्माण होते ती इच्छाच नाहीशी होते. आत्मानंद मिळाल्यावर काही इच्छा रहातही नाही आणि होतही नाही.

***प्रश्न : महाराज, भक्ताने पुरेशी पुण्यकर्मे केली, प्रारब्ध चांगले असले म्हणजेच भक्तीवर ईश्वराची कृपा होते कां?***

उत्तर : ईश्वराची कृपा प्रारब्धाने होते असे काही लोक म्हणतात. पण ईश्वराची कृपा स्वतंत्र आहे. कर्माला प्राधान्य आहे. पण ईश्वराच्या कृपेचे फळ प्रारब्धाने मिळाले असे म्हणता येणार नाही. त्या कृपेचेही सामर्थ्य आहे. ईश्वरकृपा ही स्वतंत्रच आहे.

***प्रश्न : महाराज, ओंकाराचे एवढे महत्त्व का सांगतात?***

उत्तर : ओंकाराचे महात्म्य मांडुक्योपनिषदात सांगितले आहे. ओंकार हे भगवंताचे प्रिय असे नांव आहे. प्रत्येक माणसाला एक स्वतंत्र नाव असते.

पण त्या नावाने हाक मारण्यापेक्षा अण्णासाहेब, बाबासाहेब अशा नावाने हाक मारलेलं त्याला अधिक आवडते. तसे भगवंताला ओंकार हे अत्यंत प्रिय नांव आहे. त्या ओंकाराच्या उपासनेने भगवंताचे साक्षात दर्शन अधिक लौकर होते. अधिक लौकर साक्षात्कार होतो म्हणतात.

***प्रश्न : महाराज, संतमहात्म्यांची वाणी खरी ठरते असे म्हणतात. तसे कां होते?***

उत्तर : संतमहात्मे असत्य कधीच बोलत नाहीत. शिवाय त्यांच्या शब्दाचेही सामर्थ्य असते. त्यांची वाणी लोकांना कदाचित व्यावहारिक दृष्टीने पहाता असत्य वाटली तरीही त्यांच्या वाणीतून जे निघते तसेच घडून येते. महात्म्यांची ती सिद्धी आहे.

मनातले सगळे विकार महात्म्यांनी पूर्णपणे दूर केलेले असतात. त्यांच्या मनांत परमात्म्याचं अखंड अनुसंधान चालू असते. त्यामुळे महात्म्यांच्यात मनाची अशी शक्ती निर्माण होते की जो संकल्प होईल, त्याप्रमाणे कार्य घडते. जो शब्द निघेल त्याप्रमाणे कार्य होतं.

ती शक्ती आमच्याजवळ नसते म्हणून आम्हाला सगळं खोटं वाटतं. पण ही शक्ती खरी असल्याचे दाखवणारी कितीतरी उदाहरणे आहे. 'म्हशीला दूध नाही' बाई म्हणते आहे. 'नुसती बांधली आहे तिला दूध येत नाही.' पण नरसिंह-सरस्वती स्वामीमहाराज म्हणतात, 'अहो, ती दूध देणारी म्हैस आहे.' महात्म्याचा शब्द आहे. ती जर हट्टाने म्हणाली असती 'नाही देत म्हैस दूध. तुम्ही काय सांगता !' तर स्वामीमहाराज निघून गेले असते. पण तो महात्मा सांगतो आहे. म्हणून ती म्हशीजवळ गेली आणि दूध मिळालं. अशी महात्म्यांच्या शब्दात शक्ती असते. त्यांच्या मुखातून निघणाऱ्या वाणीप्रमाणे होतं.

***प्रश्न : महाराज, दैवयोगाने संतांचे दर्शन घडले असे पुष्कळच म्हणतात याचा अर्थ काय?***

उत्तर : प्रत्येकाचे कर्म असते. ते कर्म फलोन्मुख झाले म्हणजे त्याला दैव असे म्हणतात. पूर्वसंस्कार पूर्वप्रज्ञा आधीच्या जन्मात अमूर्त असते. जीवांचे कर्म

फलाभिमुख झाले की दैव म्हणतात. दैव याचा अर्थ पूर्वी आपल्या हातून घडलेली कर्मे.

दैव आणि प्रयत्न वेगळे आहेत असा त्याचा अर्थ नाही. पूर्वी केलेला प्रयत्न म्हणजे दैव आणि चालू असलेला प्रयत्न म्हणजे कर्म असे म्हणतात. जे जे कर्म घडलेले आहे त्याचे फळ निश्चित मिळते.

नामदेव महाराज सांगतात की आम्ही खूप प्रयत्न केले तेव्हाच आम्हाला संतसंगती मिळाली आणि ईश्वराचे दर्शन झाले. दैवयोगाने संतांचे दर्शन झाले याचा अर्थ सत्कर्मे केली, पुण्यकर्मे केली, प्रयत्न केला म्हणून संतमहात्म्यांचे दर्शन झाले.

***प्रश्न : महाराज, भगवंतांना काय कमी आहे म्हणून भक्ताने त्यांना काही द्यायचं, त्यांची पूजा करायची ?***

उत्तर : भगवंतांना काहीच कमी नाही. द्यावं घ्यावं कशाचीही इच्छा नाही, आत्मानंदामध्ये निमग्न आहेत. कोणाकडूनही पूजाअर्चा व्हावी याची काहीही अपेक्षा नाही. पण भक्त पूजा करतात. त्याकरिता प्रल्हादजींनी एक सिद्धांत मांडला आहे. परमात्मा बिंब आहे. विश्व म्हणजे त्याचं प्रतिबिंब आहे. आरशामध्ये जसे प्रतिबिंब दिसावे तसा विश्वरूपी परमात्मा आहे. सर्व जीवात्मे म्हणजे बुद्धीमध्ये असलेले परमात्म्याच्या बिंबाचे प्रतिबिंब. त्या प्रतिबिंबाला जर मिळायचे असेल तर अगोदर बिंबाला अर्पण करावे लागेल. बिंबाच्या कंठात रत्नाची माळ घातली की प्रतिबिंबाच्या कंठात ती माळ दिसते. त्याप्रमाणे आपण सगळेच ईश्वराचे प्रतिबिंब आहोत म्हणाले. ईश्वराला दिले म्हणजे आपल्याला मिळेल. त्या शिवाय मिळू शकणार नाही. नरसिंहाची स्तुती करतांना प्रल्हादजींनी हा सिद्धांत मांडला आहे.

संत सांगतात, भगवंत भक्तीचे भुकेले आहेत. भक्तीशिवाय भगवंतांना दुसरे काहीही नको आहे. भगवंतांना भक्तीच प्रिय आहे. त्यांना बाह्य धनाची कोणतीच अपेक्षा नाही.

***प्रश्न : महाराज, प्रत्याहार म्हणजे काय?***

उत्तर : इंद्रियांच्या द्वारा आपले मन बाह्य विषयांकडे जाते. त्या विषयांशी

संबंध आल्यावर ते विषय संस्कार रूपाने पुन्हा आंत येतात. आत आल्यावर त्या संस्काररूपाने मन परत बाहेर जाते. असे सारखे चाललेलं असतं. म्हणून भगवंत अर्जुनाला सांगतात, 'बाहेर असणाऱ्या विषयांना बाहेरच ठेव'.

बाहेरचे विषय बाहेर ठेवायचे याचा अर्थ इंद्रियांचा निरोध करायचा. वारा आत येते. खिडक्या बंद झाल्या की बाहेरचा वारा आत येत नाही. तसे मन बाहेर जायचं बंद झालं की विषय आत येण्याचं बंद होतं. संस्कार नाही. वासना नाही. काही नाही. ते विषय बाहेरच्या बाहेरच राहिले. यालाच प्रत्याहार म्हणतात असे शास्त्रकारांनी म्हटले आहे.

***प्रश्न : महाराज, वैराग्य कसे साधावे?***

उत्तर : संसारामध्ये दोष काय आहेत हे समजलं म्हणजे होतं. ती दोषदृष्टी उत्पन्न झाली की हे मला नको आहे अशी त्याच्यापासून निवृत्ती होते. पंचदशीकार सांगतात दोषदृष्टी निर्माण झाली पाहिजे म्हणजे वैराग्य येतं. संसारामध्ये सुख नाही. टिकणारा एकही विषय यात नाही. हा जर विचार मनांत आला तर हे सुख नकोय, टिकाऊ नाही असे वाटेल. अन्नात विष आहे समजल्यावर ते कोणीही टाकूनच देणार. असला संसार करुन काय करायचं असं वाटणं म्हणजे वैराग्य. त्यासाठी पूर्वसुकृतही हवं आणि ईश्वराची कृपाही हवी.

***प्रश्न : महाराज, कलीयुगात खरे अधिकारी संन्यासी थोडेच कां असतात?***

उत्तर : शंकराचार्यांनी अवतार धारण करून संन्यास घेतला. संन्यासाश्रमही असू शकतो आणि तो उच्च श्रेष्ठ आश्रम आहे हे त्यांनी जगापुढे मांडलेले आहे. सर्वही विषय सोडून द्यायचे, विषयांचा परित्याग करायचा आणि तोही केवळ आत्मचिंतनाकरता. दुसरं काही नाही. आत्मानात्मविवेक अखंड चालू आहे. सृष्टी व्यक्त कशी झाली?, त्याचा अध्यारोप कसा आहे?, पुन्हा अव्यक्त कशी होते आहे?, त्या मूळ अधिष्ठानाचे चिंतन अखंड चालू आहे. देहासक्ती नाही. मन चिंतनात तल्लीन झालेलं आहे. ही भूमिका केवढी मोठी आहे. तसा अधिकार असल्याशिवाय आणि सद्गुरुंची कृपा झाल्याशिवाय ही भूमिका

येणार नाही. ती भूमिका असलेले, अधिकार असलेले संन्यासी आजही आहेत. थोडेच असतील पण आहेत.

***प्रश्न : संन्यासी जो आहे त्याने एका ठिकाणी तीन दिवसांपेक्षा जास्त राहू नये असे सांगतात. परंतु आजकाल बहुतेक संन्याशांचे वास्तव्य एकाच ठिकाणी असते.***

उत्तर : संन्याशांमध्ये चार भेद आहेत - कुटीचक, बहुचक, हंस आणि परमहंस. संन्यास घेतला तरी आपल्याच घरात रहाणारा, फिरू न शकणारा अशक्त प्रवृत्तीचा संन्यासी तो कुटीचक संन्यासी. घरात न राहता गावातच एका मंदिरात रहातो आहे त्याला त्रिकालस्नायी धर्म सांगितला आहे. भिक्षाटन करावे, ब्रह्मचिंतनात रहावे, इंद्रियनिग्रह करावा. वेणुदंड हातात धारण करावा. मृत्तिमेचे वा काष्ठाचे पात्र वापरावे. एकदाच भिक्षा मागून त्या अन्नाचे सेवन करावे. अखंड ब्रह्मचिंतन करावे. तीर्थक्षेत्र संचार करावा. पावसाळा सोडून एरव्ही कधीही तीन दिवसांपेक्षा जास्त एका ठिकाणी राहू नये. हा नियम त्या संन्याशांकरिता आहे. परंतु जर संन्याशांमध्ये असा संचार करण्याचे सामर्थ्य नसेल तर एखाद्या क्षेत्रात भगवंताचे ध्यान करीत रहायला शास्त्रकारांची अनुमती आहे.

***प्रश्न : महाराज, अनुभव कोणाला सांगू नयेत असे कां सांगतात?***

उत्तर : नामस्मरण करणाऱ्या भक्तांना चांगले अनुभव येतात. चित्तवृत्ती सात्त्विक होते. दर्शनेही होतात. पण हे कोणाला सांगू नये. इतरांना काय उपयोग? ते नामाकडे वळणार आहेत कां? दुर्जनांना सांगणे हा नामापराध आहे असे म्हणतात. तो उलट जास्तच निंदा करणार. जास्तच टिंगल करणार. बुवाबाजी चालली आहे म्हणणार. परीक्षा करण्याकडेच जर त्याची बुद्धी गेली, चिकित्सा करण्यातच जर वेळ गेला तर त्याचं होणार तरी कसं? जो तशा प्रकारचा भक्त आहे त्याच्याजवळ बोलायला हरकत नाही. पण आपण पुढे गेलो असे वाटता कामा नये.

असेही भक्त असतात की कोणाला काही सांगत नाही. ईश्वर दयाळू वगैरे सांगतात. पण स्वतःवर काय दया झाली आहे हे ते कोणाला सांगत नाहीत.

*प्रश्न : महाराज, भगवद्गीतेत सांगितले आहे, '*
*या निशां सर्वभूतानाम् तस्यां जागर्ती संयमी।*
*यस्यां जाग्रती भूतानि सा निशा पश्यतो मुनेः।।'*
*या श्लोकाचा अर्थ काय?*

उत्तर : ''या निशा सर्वभूतानाम'' या शब्दांमध्ये निशा या शब्दाचा अर्थ रात्र असा करता येणार नाही. निशा या शब्दाचा अर्थ वेगळाच आहे. जीव जे असतात त्यांना आत्मस्वरूपाची जाणीव होत नाही. जीव अविद्येने अज्ञानाने ग्रासलेले असतात.त्या अविद्येमुळे जीवांना आत्मस्वरुप जे आहेत ते भासत नाही. जीवांचे लक्ष भौतिक पदार्थांकडेच असते. जीवांनात आत्मस्वरुप जे आहेत ते भासत नाही. जीवांचे लक्ष भौतिक पदार्थांकडेच असते. जीवांना आत्मस्वरूपाचे भान नसते. त्या बाबतीत ते निद्रिस्त असतात. तेव्हा आनंदघन आत्मा जो आहे त्याच्या संदर्भात जीवांची रात्र आहे. काही नाही. अंधार आहे.

तस्यां जाग्रती संयमी याचा अर्थ समजून घेतला पाहिजे. जीवांना आत्मस्वरूपाचे भान नसते. त्या आत्मस्वरूपाच्या बाबतीत ते निद्रिस्त म्हणजे झोपलेले असतात. परंतु ज्ञानी महात्म्यांचे तसे नसते. या संयमी महात्म्याला म्हणजे ज्ञानी महात्म्याला ते आत्मस्वरुप परिपूर्ण भासते. त्याला सर्वत्र आत्मस्वरुपच दिसते.

'यस्यां जाग्रती भूतानि' यात जाग्रती म्हणजे आम्ही जीव जागे आहोत असा अर्थ नाही. ही सारी सृष्टी अविद्यात्मक आहे. त्या ठिकाणी सर्व जीव आम्ही जागे आहोत असे म्हणतात. ज्या ज्ञानी महात्म्याला आत्मस्वरूप पहायला मिळते त्यालाच केवळ ही सृष्टी अविद्यारूप अशी रात्र वाटते असा त्याचा अर्थ आहे.

निद्रा हा अविद्येचा परिणाम आहे. पण ज्या ज्ञानी महात्म्यांची अविद्याच नाहीशी झाली आहे त्याला सृष्टी म्हणजे काय? आत्मस्वरुप परमात्म्याला अविद्या मुळीच नसते. अशा आत्मस्वरुप परमात्म्याला रात्र नाही, स्वप्न नाही, सुषुप्तीही नाही. काही नाही. त्याला अविद्याच नाही. मग सुषुप्ती, निद्रा, हे

अविद्येचे विकार त्याला कोठून भासणार? असा ज्ञानीमहात्मा सदैव जागाच असतो. त्याला अविद्येची निद्रा कधीच नसते.

सर्व जीवांना जग खरे वाटते. तेथे ते ज्ञानी महात्मे जागृत असतात. परंतु ज्ञानी महात्म्यांच्या मनातून जग नाहीसे झालेले असते. जग ही माया आहे, स्वप्न आहे अशी खात्री पटल्यामुळे ज्ञानी महात्मा आत्मस्वरुपातच मग्न असतो.

***प्रश्न : महाराज, आत्मा मृत्युनंतर कोठे जातो ?***

उत्तर : आत्म्याला जाणे येणे असे काही नाही. आत्मा हा परमात्म्याचा अंश आहे अशी अगोदर बुद्धी असते. एकत्त्वबुद्धी पुढे येते. स्वर्ग लोकाला जातो आणि नरकाला जातो म्हणजे लिंग शरीर जाते. लिंगशरीराला गती किंवा अगती आहे. पण लिंग शरीराशी किंवा लिंगशरीर यांचा तादात्म्यध्यास घेऊन आपण बसतो.

आत्मा पाण्यात पडलेल्या प्रतिबिंबाप्रमाणे असतो. पाणी हलल्यावर पाण्यात पडलेले प्रतिबिंबही हलू लागते. पाणी शांत झाले की प्रतिबिंबही शांत होते. म्हणजे हलणे हा पाण्याचा विकार आहे. पण तो प्रतिबंबाच्या ठिकाणी दिसतो. तसे आत्मा हा सर्वव्यापी परमेश्वराचा अंश आहे. त्याला जाणे-येणे, गती-अगती असे काही नाही. मृत्यु झाला म्हणजे सूक्ष्म शरीर किंवा लिंग शरीर यांचा स्थूल देहाशी असलेला संबंध सुटतो.

***प्रश्न : महाराज, सूक्ष्म शरीर म्हणजे काय?***

उत्तर : आपल्या स्थूल शरीरात एक सूक्ष्म शरीर असते असे वेदान्त ग्रंथात सांगितलेले आहे. पाच ज्ञानेंद्रिये, पाच कर्मेंद्रिये, पंचप्राण, मन आणि बुद्धी असे सतरा पदार्थ या सूक्ष्म शरीरात असतात. सूक्ष्म शरीरालाच लिंगदेह म्हणतात. जागृतीत व स्वप्नात जे ज्ञान होते ते मनाद्वारेच होत असते. मन सूक्ष्म शरीरातच असते. अनुभवातून येणारे संस्कार सूक्ष्म शरीरात साठवले जातात. वासनाही सूक्ष्मशरीरातच साठून राहतात.

कर्माचे फळ म्हणजे सुख व दुःख. या सुखदुःखांचा अनुभव सूक्ष्म शरीरातच येत असतो. म्हणून सूक्ष्म शरीर सुख व दुःख यांच्या अनुभवाचे कारण आहे असे सांगतात.

***प्रश्न : महाराज, सूक्ष्म शरीर जड असते कां चेतन असते?***

उत्तर : सूक्ष्म शरीर जडच असते. ते चेतन नसते. आत्मा फक्त चेतन असतो. स्थूल देह जसा जड असतो तसा सूक्ष्म देहही जडच असतो.

***प्रश्न : महाराज, डॉक्टर लोकांना सूक्ष्म देह सापडतो का?***

उत्तर : सूक्ष्म शरीर अव्यक्त असते. ते डॉक्टर लोकांना कसे सापडणार ? डॉक्टर लोक आत्मा तरी कोठे मानतात? पण उपनिषदांत ऋषींनी हे सगळे सविस्तर मांडून ठेवले आहे. शास्त्रकारांनी सूक्ष्म देहही सांगितला आहे आणि आत्माही सांगितला आहे. प्रत्यक्ष प्रमाण नसले तरी शब्द प्रमाण आहे.

***प्रश्न : महाराज, स्थूल देहाबरोबरच सूक्ष्म शरीराचाही नाश होतो काय?***

उत्तर : नाही. स्थूल शरीराचा नाश होतो. पण सूक्ष्म शरीर मात्र मोक्षापर्यंत टिकते. स्थूल शरीराला मृत्यु आहे. मोक्षापर्यंत ते राहू शकत नाही. पण सूक्ष्म शरीराचे तसे नसते. स्थूल शरीर नष्ट झाले तरी सूक्ष्म शरीर तसेच रहाते. मोक्ष मिळाल्यावरच सूक्ष्म शरीराचा नाश होतो.

स्थूल शरीराचा सूक्ष्म शरीराशी संबंध होणे म्हणजे जन्म आणि स्थूल शरीराचा सूक्ष्म शरीराशी संबंध सुटणे म्हणजे मृत्यु. मुक्तीपर्यंत जन्म व मृत्यु अशी परंपरा चालू रहाते.

***प्रश्न : महाराज, आत्म्याचा व सूक्ष्म शरीराचा संबंध काय?***

उत्तर : जसे स्थूल शरीर जड आहे, अचेतन आहे तशी सूक्ष्म देहही अचेतन आहे, जड आहे. त्यांना चालवणारा कोणीतरी लागतोच. रथ आपोआप चालत नाही. त्याला ओढून नेणारे घोडे व त्यांचा सारथी चेतन असतो म्हणूनच रथ चालू शकतो. तसे स्थूल शरीराला व सूक्ष्म शरीराला प्रवर्तक कोणीतरी चेतन असावा लागतो.या साऱ्यांचा चेतन आत्मा आहे.

वस्तुतः आत्मा असंग आहे, विशुद्ध आहे, आनंदस्वरूप आहे. आत्म्याला सुखदुःख असे काही नसते. स्फटीक स्वच्छ शुभ्र असतो. पण लाल फुलावर ठेवला की लाल भासतो. तसे सूक्ष्म शरीरांतील सुखे व दुःखे आत्म्यावरच भासतात. वस्तुतः आत्मा संसाररहीत आहे. शुद्ध ब्रह्मरूप आहे.

*प्रश्न : महाराज, सूक्ष्म शरीर आत्म्याप्रमाणे सत्यच मानतात का?*

उत्तर : आत्मा शुद्ध ब्रह्मरूप आहे. म्हणून आत्मा सत्य आहे. तसे सूक्ष्म शरीर सत्य नाही. सूक्ष्म शरीर सत्य मानत नाहीत. आत्मज्ञान झाले की अज्ञान जाते. तसेच त्या अज्ञानाबरोबर येणारे सर्व संस्कार जातात. म्हणून आत्मज्ञानानंतर सूक्ष्म शरीराचा भास नाहीसा होतो.

*प्रश्न : महाराज, आत्मा अकर्ता आहे असे कां म्हणतात ? स्थूल शरीर व सूक्ष्म शरीर जागृतीत व स्वप्नांत सतत कर्म करीत असतेच की मग आत्मा अकर्ता कसा?*

उत्तर : आत्मा सर्व कार्यात स्वयंप्रकाशच आहे असे उपनिषदांत सांगितले आहे. जागृतीतही तोच प्रकाशक व स्वप्नांतही तोच प्रकाशक आहे. जागृतीत स्थूल शरीराचे कार्य प्राधान्येकरून आहे तर स्वप्नावस्थेत सूक्ष्म शरीराचेचे प्राधान्य आहे. स्वप्नात केवळ अंतःकरणच कार्य करते. देश व काळ सर्व आपणच बनते व कार्य करते.

सूर्यप्रकाशाच्या योगाने सर्वही प्राणी आपापली कार्ये करीत असतात. म्हणून काही त्या कर्माचा लेप संबंध सूर्याला लागत नाही. तसे स्थूल शरीरांच्या किंवा लिंग शरीराच्या कर्मांनी आत्मा लिप्त होत नाही. आत्मा हा सर्वांचा साक्षी आहे. 'अकर्तृत्वे सति बोधत्वम्' हे साक्षीचे लक्षण आहे. आत्मा सर्व व्यवहारात साक्षी आहे. घडलेले सारे तो जाणतो. पण तो स्वतः काहीच करीत नाही. तो अकर्ता आहे. तसा वादी किंवा प्रतिवादींच्या कोणत्याही कार्याशी साक्षीदाराचा काहीच संबंध नसतो. साक्षीदार सर्व जाणतो. त्याला सर्व माहीत असते. पण तो अकर्ता असतो. वादी व प्रतिवादींच्या कर्माशी साक्षीदाराचा काही संबंध नसतो. तसे शरीराने, वाणीने किंवा मनाने केलेल्या चांगल्या वाईट कोणत्याही कर्माचा संबंध केव्हाही आत्म्याशी नसतो. आत्मा अकर्ताच असतो.

*प्रश्न : महाराज, सुख व दुःखे आत्म्यापर्यंत पोचत नाहीत का?*

उत्तर : सुख म्हणजे काय ! शब्द, स्पर्श, रूप, गंध व रूचि या पाच विषयांची अनुकूलता म्हणजे सुख ! स्वतःच्या इच्छेप्रमाणे विषयांची प्राप्ती झाली की

सुख वाटते. उन्हाचा ताप झाला तर थंडगार पाणी मिळाले की मी सुखी आहे असे वाटते. पण कडक थंडी पडली असता थंडगार पाणी प्रतिकूल वाटते आणि ते पुढे आले तर दुःख वाटते म्हणजे विषय एकच. पण मनात जशा अनुकूल किंवा प्रतिकूल वृत्ती होतात तसे सुख किंवा दुःख मनालाच होते.

विषय किंवा काळ एकच असला तरी एका मनुष्याला सुख मिळते तर दुसऱ्याला दुःख मिळते. ताप आल्यावर अन्नाची वासना गेल्यामुळे रोगी माणसाला अन्न प्रतिकूल वाटते व ते अन्न पुढे आले की दुःख होते. पण निरोगी माणसाला भूक लागली असल्याने तेच अन्न अनुकूल वाटते, हवेसे वाटते व ते अन्न पुढे येताच तो सुखी होतो.

सुखदुःख सगळे मनावरच असते. पण आत्मा सदैव आनंदरूप असतो. त्याला सुखदुःख असे काही नसते. सुखदुःख हा मनाचा खेळ आहे. नित्य आनंदस्वरूप आत्म्याचा व त्यांचा काही संबंध नाही.

***प्रश्न : महाराज, आत्मज्ञानी पुरुषाचे देह ठेवणे व सामान्य माणसाच्या देहाचा मृत्यु यात काही फरक असतो कां?***

उत्तर : जन्म आणि मृत्यु म्हणजे काय हे समजून घेतले पाहिजे. जेव्हा स्थूल शरीराचा सूक्ष्म शरीराशी संबंध येतो तेव्हा जन्म झाला असे आपण म्हणतो. जेव्हा स्थूल देहाचा संबंध सूक्ष्म शरीरापासून सुटतो तेव्हा मृत्यु झाला असे आपण म्हणतो. अशी ही जन्म आणि मरण यांची परंपरा मुक्तीपर्यंत अखंड चालू असते.

सामान्य माणसाचा स्थूलदेह नष्ट झाला तरी अनेक जन्मांचे संस्कार अंतःकरणात रहातात आणि ते संस्कार असलेले अंतःकरण घेऊन सूक्ष्म देह नव्या स्थूल देहाशी संबंध घेतच रहातो. मृत्युनंतर जन्म. जन्मानंतर मृत्यु असे चाललेले आहे.

पण गुरूकृपेने आत्मज्ञान झाले की जन्ममरणाच्या परंपरेतून सुटका होते. 'नतस्य प्राणा उत्क्रामन्ति अत्रैव समवनीयते' असे उपनिषदांत सांगितले आहे. आत्मज्ञानी पुरुषाची सर्व इंद्रिय, मन, बुद्धी येथेच शरीरातच ब्रह्मलीन होतात असे श्रुती सांगतात. ब्रह्मसाक्षात्कार झालेल्या महात्म्याचे सूक्ष्म शरीरही येथेच

संपते. म्हणून जन्म व मृत्युही येथेच संपतात. म्हणजे तो जन्ममरणरूप संसारातून कायमचा मुक्त झाला.

***प्रश्न : महाराज, 'अहं ब्रह्मास्मि' हा अनुभव प्रत्यक्ष येण्यासाठी साधकाने काय करावे?***

उत्तर : आचार्य सांगतात 'अहं ब्रह्मास्मि' असे घोकून होत नाही. बुद्धीतील सर्व दृश्याचा विलय होऊन ब्रह्मच बुद्धीत शिल्लक राहिले पाहिजे. तरच आत्मस्वरूपाचा साक्षात्कार होतो. पूर्वसुकृताने सद्गुरूंची भेट होते. सद्गुरूंच्या मुखांतून ज्ञान श्रवण करावे. नंतर श्रद्धेने त्याचे मनन, चिंतन, निदिध्यासन करावे. म्हणजे तेथवर पोचता येते. मगच साक्षात्कार.

तू देह नाहीस, तू इंद्रिये नाहीस, तू मन, बुद्धी नाहीस. बाह्य दृष्याचा विलय झाल्यावर शेवटी उरते ते ब्रह्म, सत्, चित् व अनंतस्वरुप आहे आणि तेच तू आहेस. तोच साक्षात्कार. मगच मुक्ती मिळणार.

सर्व संतमहात्मे हेच सांगत आले आहेत. स्वतः अनुभव घेऊन त्यांना ते सांगितले याला महत्त्व आहे. केवळ तर्काने किंवा युक्तीने नाही सांगितलं.

***प्रश्न : महाराज, मनांतील विकार गेल्याशिवाय उद्धार होत नाही म्हणतात. मनातील विकार आम्ही कसे घालवावे?***

उत्तर : उपनिषदकार सांगतात बालान् म्हणजे रागद्वेषादि विकारांनी शून्य असे ज्यांचे अंतःकरण झालेले आहे ते भगवंताला आवडतात. संसारात गुंतलेल्या माणसाच्या मनांत अनेक विकार कामना असतात. मनांत उत्पन्न होणारे अनुकूल विषय हवे आहेत असे वाटते. हे मला पाहिजे आहेत. मनांत उत्पन्न होणारे काही विषय प्रतिकूल असतात. हे प्रतिकूल आहे. हे मला नकोय. हा मनुष्य चांगला आहे. हा आपल्या भेटावा. तो चांगला नाही तो भेटू नये. तो मला अनुकूल आहे. त्याची मैत्री मला मिळावी. तो मनुष्य मला प्रतिकूल आहे. तो शत्रू आहे. त्याची मैत्री मला नको. हे रागद्वेष जिंकावे लागतात. त्यासाठी दैवी संपत्ती वाढवावी लागते. दैवी संपत्तीने हे सगळे विकार नाहीसे होतात. भगवद्गीतेच्या सोळाव्या अध्यायात भगवंतांनी दैवी संपत्तीचे वर्णन केले आहे. ही दैवी संपत्ती प्राप्त करून घेऊन सगळे मनातले विकार ज्याने जिंकले आहेत त्यालाच मोक्ष मिळतो.

***प्रश्न : महाराज, संसारांतील सुखसाधने जमवली तरी खरा आनंद मिळत नाही असे म्हणतात. याचा अर्थ काय?***

उत्तर : माणसाला सारखं वाटत राहतं काहीतरी आपल्याजवळ कमी आहे. सतत हे पाहिजे ते पाहिजे असे होत असते. म्हणून त्याच्या मनाला शांती नाही. धन वगैरे विषयांचा संग्रह करायचा आणि त्याचा उपभोग घ्यायचा असा माणसाचा प्रयत्न चाललेला असतो. कारण त्यानाच सुखाचं साधन आम्ही समजतो.

पण अकाम महात्म्याजवळ काहीच नसते. राज्य नाही, सत्ता नाही, कोणताही संग्रह नाही.सुखाची साधनं काहीही नाहीत. तरीही त्यांच्याजवळ इतका आनंद असतो की त्याच्याजवळ गेल्यावर जीव आपली दुःख विसरून जातो. त्यांच्या नुसत्या सान्निध्यात आल्याबरोबर दुःखे जातात असा अनुभव येतो.

***प्रश्न : महाराज, प्रत्येक माणसाच्या सर्व कर्मांचे फळ ईश्वर त्याला देतो म्हणतात. पण सर्व कर्मे लगेच फलोन्मुख होत नाहीत. कर्म झाल्यावर त्याचे फळ मिळेपर्यंत त्या कर्मांची नोंद कोठे होते? ह्या नोंदी कोण ठेवतो?***

उत्तर : जीवात्म्याकडून जे जे कर्म झालेलं आहे. ते फळ दिल्याशिवाय कर्म नाहीसे होत नाही. आपण समजतो पापकर्म म्हणा किंवा पुण्यकर्म म्हणा. त्या सर्व कर्मांचे फळ भोगावेच लागते. आपण करून गेलो. संपलं ते कर्म.आता आपल्याला कोण विचारणार आहे? परंतु कर्म तसं संपत नाही. जन्म घेणं व त्या जन्मामध्येसुद्धा सुखदुःखाचे अनुभव घेत रहावे अशी कार्यशक्ती सतत कार्यान्वित आहे. त्यामुळे सृष्टी चालू आहे.

लोक विचारतात, ही जी कर्म झालेली आहेत, ही कुठं रहातात? त्यांची नोंद कोणी ठेवली? एवढं लिहून ठेवणं शक्य आहे काय असेही म्हणतील. एका माणसाचीच एका जन्मातली कर्म कितीतरी होतात. रोज मानसिक कर्मे आहेत, वाचिक कर्मे आहेत, कायिक कर्मे आहेत.

मन अत्यंत सूक्ष्म आहे म्हणतात. पण त्याच्यामध्ये या सगळ्या वासना आहेत. सूक्ष्म शरीर ज्याला म्हणतो त्यातलं मन मुख्य आहे. तर या सर्व कर्मांच्या

वासना संस्काररूपाने मनामध्ये साठून रहात असतात. माणसाच्या हातून ज्या मानसिक, शारीरिक किंवा वाचित क्रिया होऊन गेल्या, त्या क्रियांचे संस्कार मनामध्ये साठत रहातात. संस्काररूपाने कर्म मनात रहाते.

कोणते कर्म कोणत्या वेळेला फलोन्मुख होईल हे भगवंत ठरवतो. कोणत्या कर्माचे फळ केव्हा द्यायचं या जन्मात द्यायचे का पुढील जन्मात द्यायचे हे भगवंत ठरवतो. ज्याच्या त्याच्या कर्माप्रमाणे कोणत्या जन्मात घालायचे असा सगळा विचार करून विचारपूर्वक भगवंताचे कार्य चाललेलं आहे.

***प्रश्न : महाराज, सद्गुरूंचे माहात्म्य सांगताना एक संत म्हणतात, सद्गुरू हे भगवंतापेक्षा श्रेष्ठ आहेत. तसे म्हणता येईल का?***

उत्तर : गुरू आणि ईश्वर हे एकच आहेत असे मानून भक्ती झाली पाहिजे. गुरू आणि ईश्वर वेगळे आहेत म्हणायचं ही भेदबुद्धी झाली. ईश्वराला मानायचं नाही. फक्त गुरू श्रेष्ठ आहेत असं म्हणायचं ही भेदबुद्धी झाली. भेदबुद्धी उपयोगाची नाही.

सद्गुरू हे ईश्वराचे स्वरूप आहे. पण आम्हाला हे समजत नाही. कोणाची बुद्धी ईश्वर श्रेष्ठ आहे अशी असते तर दुसऱ्या कोणाला वाटतं सद्गुरू श्रेष्ठ आहेत. परंतु इथे श्रेष्ठ कनिष्ठ व्यवहार उपयोगाचा नाही.

ईश्वराची कार्य आहेत - विश्व निर्माण करणं, त्याचं संरक्षण करणं आणि पुन्हा त्याचा उपसंहार करणं. सद्गुरूंची कार्ये आहेत - जीवांच्या बुद्धीतले दोष काढून टाकणं, त्यांची बुद्धी आणि मन स्थिर करणं आणि त्या बुद्धीमध्ये ईश्वरस्वरूपाचा प्रकाश करणं.

ईश्वराचं कार्य आणि सद्गुरूंचे कार्य वेगळे असले तरी ईश्वर आणि सद्गुरू हे वेगवेगळे नाहीत. फक्त कार्य करणारी रूपं वेगळी आहेत. परमात्माच सद्गुरूरूपाने कार्य करतो आहे. ईश्वरानेच सद्गुरूंचे रूप घेतले आहे आणि त्या रूपाने ईश्वराचे कार्य चाललेलं आहे.

***प्रश्न : महाराज, जीवनमुक्तीची अवस्था प्राप्त झाल्यावरही मुक्त पुरुषांना ईश्वराची भक्ती करावीशी वाटते काय?***

उत्तर : मुक्तांना ज्ञान मिळालेलंच असंत. समाधीसुखही मिळालेलं असतं. पण

ते ज्ञान मिळावं म्हणून त्यांनी ईश्वराची भक्ती केलेलीच असते आणि ज्ञान मिळाल्यानंतर ज्या ईश्वराच्या कृपेने आपण कृतकृत्य झालो, ज्ञानसंपन्न झालो त्या ईश्वराचे ते स्मरण करताहेत. आणि त्या भक्तांचं नैसर्गिक प्रेमही ईश्वरावर असतं. सहेतुक भक्ती नसते ती. ती पराभक्ती असते.

***प्रश्न : महाराज, आत्मनिवेदन भक्ती म्हणजे काय ?***

उत्तर : आत्मनिवेदन ही मोठी भक्ती आहे. आत्मनिवेदन म्हणजे बलीराजाप्रमाणे स्वतःचं शरीरसुद्धा दान करून टाकणं. याचा अर्थ असा. आपल्या घरातील गाय किंवा बैल दुसऱ्याला विकून टाकला मग त्याला चारा घातलाय का, पाणी पाजलंय का ही काळजी आपल्याला रहात नाही. एकदा दिला की देऊन टाकला. तसं ईश्वराला आपला देह समर्पण केला, आत्मनिवेदन केले. यानंतर देहाला खायला मिळेल की नाही, प्यायला मिळेल की नाही ही चिंता नाही. स्वतःची सगळी चिंता सोडून द्यायची. ती चिंताही भगवंतावर सोडायची. ही आत्मनिवेदन भक्ती आहे. ही आत्मनिवेदन भक्ती श्रेष्ठ भक्ती आहे, असे शास्त्रकार म्हणतात.

***प्रश्न : महाराज, सद्‌गुरूंची कृपा झाली तर मनांतून संसार बाजूला होईल काय?***

उत्तर : सद्‌गुरूंची कृपा झाली तर भक्ताच्या मनांतील संसार बाजूला होऊ शकतो. त्याच्या मनांतून संसार जातो आणि मग त्यांच मन ईश्वराच्या ठिकाणी स्थिर होतं. भक्ताची ती सगळी जबाबदारी घेण्याची शक्ती आणि योग्यता सद्‌गुरूंच्या ठिकाणी असते. एकदा भक्ताची बुद्धी ईश्वराच्या ठिकाणी स्थिर झाली की मग त्याचं मन दुसरीकडं जातच नाही. संसार बुद्धीतून मावळून जातो. ज्ञानेश्वरमहाराज एका ओवीत सांगतात- विश्वाभास सगळा मावळून गेला आहे.

***प्रश्न : महाराज, सद्‌गुरूंच्याजवळ जाताच आपोआप शंकांचे निरसन होते असा अनुभव अनेक साधकांना येतो. सद्‌गुरुंच्या दृष्टीमध्ये संशय निवृत्ती करण्याचे सामर्थ्य असते काय?***

उत्तर : सद्‌गुरूंच्या नुसत्या दृष्टीने संशयाची निवृत्ती होते. इतके सामर्थ्य त्यांचं आहे. रमण महर्षींच्याकडे विचारायला गेलेल्या युरोपियन गृहस्थांच्या (पॉल

ब्रॅटन)यांच्या मनातील सगळे संशय रमणमहर्षींच्या नुसत्या दृष्टीक्षेपानेच गेले ना ! शब्दात विचारावंच लागलं नाही. चर्चा नाही, संवाद नाही, काही नाही. नुसत्या दृष्टीक्षेपानेच कार्य होऊन गेलं.

***प्रश्न : महाराज, मी भगवंताचा दास आहे, मी भगवंताचा अंश आहे आणि मी तो परमात्माच आहे, या तीन भूमिका शास्त्रकार सांगतात. या तीन भूमिकांचा समन्वय कसा करायचा?***

उत्तर : तत्त्वज्ञानाची भूमिका आणि उपासकाची भूमिका यात फरक आहे. मारुतीरायांनी रामचंद्रांना सांगितले देहाच्या दृष्टीने पाहिले तर मी तुमचा दास आहे. तुमच्या आज्ञेचं पालन करणं हे माझं कर्तव्य आहे.

मारुतीराय पुढे म्हणतात, जीवाच्या दृष्टीने पाहिले तर मी तुमचा अंश आहे.या देहामध्ये राहणारा मी जीवात्मा आहे. असं जेव्हा वाटतं तेव्हा लक्षात येतं की, तुम्ही किती मोठे आतात आणि मी अंश तो केवढा. समुद्राची लाट ती केवढी असणार? समुद्र केवढा आणि त्या समुद्रावरची लाट केवढी. जीवदृष्टीनेपहाता मी तुमचा अंश असलो तरी मी फारफार लहान अंश आहे.

शेवटी मारुतीराय सांगतात, आत्मदृष्टी उत्पन्न झाली की मग 'मी' नाहीसा होतो. हा 'मी' उरतच नाही. ''सकलमिदं अहंच वासुदेवः।'' ही भूमिका येते.या ज्ञानभूमिकेवर गेल्यावर सगळे ईश्वररूपच आहे याची प्रचिती येते.

परंतु भक्ताच्या भूमिकेवर असणारे महान भक्त कायम भक्तच राहतात. प्रल्हादजी स्वतःला ईश्वर समजत नाहीत. मी तुमचा दास आहे असे म्हणून प्रल्हादजींनी मला तुमची दास्यभक्ती द्या असंच मागून घेतलं. भगवंताशी एकरूप झाल्यावरही असा परमभक्त शुद्ध भक्तीचा आनंद घेत रहातो. अद्वैत भक्ती करीत रहातो.

***प्रश्न : महाराज, सगळेच जर ईश्वराचे अंश आहेत तर विभूती वेगळ्या का सांगतात?***

उत्तर : सर्वही जीव ईश्वराचे अंश आहेत. 'ममैवांशो जीवलोके जीवभूतः सनातनः।' असे भगवान श्रीकृष्णांनी गीतेत सांगितले आहे. परंतु अंश वेगळे आणि विभूती वेगळ्या. ईश्वराच्या शक्तीचा विशेष रूपाने आविर्भाव ज्या ठिकाणी झालेला आहे त्या सगळ्या विभूती आहेत.

***प्रश्न : महाराज, माणसाने सुख मिळवण्यासाठी धर्माने आणि न्यायाने वागावे असे शास्त्रकार सांगतात ते का?***

उत्तर : न्यायाने आणि धर्माने वागणाराच सुखी होतो असे महाभारतात सांगितले आहे. रामायणातही तेच सांगितलंय. न्यायाने वागणाऱ्या धर्मशील महात्म्याला पशुपक्षीही सहाय्य करतात. वानरांनीसुद्धा रामरायाला सहाय्य केलं. धर्माने, न्यायाने वागल्याशिवाय समाधान मिळत नाही. म्हणून धर्माने, न्यायाने वागण्याची बुद्धी ईश्वराकडे मागायची.

***प्रश्न : म्हणजे भौतिक जीवन जगत असतांना पारमार्थिक विचार केलाच पाहिजे असेच शास्त्रकारांना म्हणायचे आहे का?***

उत्तर : परमार्थ दृष्टीने विचार करणारी बुद्धीच कल्याणकारक असते. अशा बुद्धीनेच व्यक्तीचेही कल्याण होते. समाजाचेही कल्याण होते आणि राष्ट्राचेही कल्याण होते. भौतिक दृष्टीने आपण पुष्कळ संग्रह केला तरी तो मृत्युनंतर आपल्याबरोबर काही येत नाही. धन, वैभव, संपत्ती सारे येथेच ठेवून जावे लागते. स्वतःचा देहसुद्धा बरोबर येत नाही. बुद्धी म्हणून जी आहे ती बुद्धी आणि मनच आपल्याबरोबर येते दुसऱ्या जन्मामध्ये. या जन्मामध्ये जे चांगले संस्कार झाले आहेत,जी ईश्वरभक्ती झालेली आहे, जे चांगले धर्माचरण झालेलं आहे तेच पुढील जन्मात बरोबर येते. पुढील जन्मातही तेच संस्कार वाढत जाणारे आहेत आणि ईश्वरसाक्षात्कार त्या बुद्धीनेच होणार आहे.

म्हणून एका जन्मामध्ये इहलोकापुरता विचार करून चालणार नाही. अर्थकामाकरताच प्रयत्न करूनही काही समाधान मिळत नाही. कल्याण होत नाही. परदेशातल्या लोकांना धर्माच्या काही विशेष भावना नाहीत. धर्माचे संस्कार तितके प्रबळ नाहीत. म्हणूनच तेथे समाधान नाही.

***प्रश्न : महाराज, म्हणजे केवळ इहवाद उपयोगाचा नाही, असेच का?***

उत्तर : मोक्ष पुरुषार्थ परदेशात मानतच नाहीत म्हणतात. अर्थ आणि काम हे दोन पुरुषार्थच डोळ्यासमोर ठेवून त्यांचा प्रयत्न चालला आहे. पण केवळ इहवाद उपयोगाचा नाही. केवळ या जन्माचा विचार करून भागणार नाही. काहीतरी परमार्थदृष्टीने, पारलौकीक दृष्टीनेही विचार केला गेला पाहिजे.

पारमार्थिक दृष्टीने विचार केला तर तो व्यक्तीलाही उपयोगी आहे आणि समाजालाही उपयोगी आहे. हाच आमचा धर्म आहे. धर्मानुकूल वागण्याची बुद्धी आली पाहिजे. त्यासाठीच संतांचे प्रयत्न चालले आहेत. ईश्वराचीही तशीच इच्छा आहे. ईश्वरसुद्धा त्यासाठीच अवतार घेऊन पुनःपुन्हा धरतीवर येत आहेत.

***प्रश्न : महाराज, अनेक संतमहात्मे सकाम भक्तीचा पुरस्कार करताना दिसतात. निष्काम भक्तीने जसा भक्ताचा आध्यात्कि फायदा होतो, तसा सकाम भक्तीनेही होतो का?***

उत्तर : मोक्षाची इच्छा करणारे जीव थोडेच असतात. संसाराचीच इच्छा प्रत्येकाच्या मनांत असते. अनंत वासना मनामध्ये असल्यामुळे त्यातच मन गुंतते आणि संसार बरा वाटतो. संसाराबद्दलच्या सगळ्या कामना मनात उत्पन्न होतात. संतमहात्मे त्यांना सांगतात. ईश्वर सगळ्यांची इच्छा पूर्ण करणारा आहे. आपलीही इच्छा ईश्वर पूर्ण करेल.

ईश्वरापासून संपत्ती मिळाल्यामुळे त्या संपत्तीच्या द्वाराने विषयभोग जरी तो घेत राहिला तरी त्या सकाम भक्तीने दुसरे एक कर्म होते. ते म्हणजे मनातल्या वासना हळूहळू कमीकमी होत जातात. ती सकाम भक्तीच आणखी शुद्ध भक्तीच्या स्वरूपात प्रकट होते. म्हणून ईश्वराची सकाम भक्ती करायला हरकत नाही असे मोठे मोठे शास्त्रज्ञही मान्य करतात.

देवाला विसरून जाऊन दुसऱ्या कोणाकडे जायचं, हात पसरायचा आणि काही मिळायचं नाही. मिळालं तर उपकार मानायचे. याच्यापेक्षा देवाला शरण जाणे चांगले, सकाम भजन करणे चांगले. इतर कोणाकडे संपत्ती मागण्यापेक्षा ईश्वराकडे मागणे चांगले. त्या संपत्तीमुळे विषयभोगाकडे लक्ष गेलं तरीसुद्धा ईश्वराच्या कृपेने मनातल्या वासना कमीकमी होत जातात. नंतर त्यांच्या मनांत शुद्ध भक्ती निर्माण होते. पुढे खरा भक्तीयोग त्यांनाही प्राप्त होतो. म्हणून संतमहात्मे सकाम भक्तीचा पुरस्कार करतात. सकाम भक्तीचा पुरस्कार केला असला तरी त्याचा मूळ उद्देश हा आहे.

***प्रश्न : महाराज, मनांत सारख्या वासना व विकार येत असतात. मन आवरता येत नाही. मनाला कसे काय काबूत आणावे?***

उत्तर : मन घोड्यासारखे आहे म्हणतात. घोडेस्वार पटाईत असला म्हणजे नवख्या घोड्यावर बसल्यावर नेहमी लगाम खेचून घेणं असं करीत नाही. अधूनमधून लगाम सोडून देतो. घोड्याला उधळू देतो. घोडा उधळला तरी घोडेस्वार पक्का असल्यामुळे पडत नाही. तो घोड्याला मध्ये खेचून धरतो, पुन्हा मोकळं सोडतो. असं पुष्कळ त्या घोड्याला धावाधाव करायला लावतो. असं करूनच मग घोडेस्वार त्या नाठाळ घोड्याला शांत करतो, ताब्यामध्ये आणतो.

भगवंतांनी उद्धवजींना मनाला काबूत आणण्याचा मार्ग असाच सांगितला आहे. प्रत्येक वेळी मनाचा निग्रह हाही उपयोग नाही. मनात अनंत वासना असतात. त्या वासनांनी मन केव्हा बेकाबू होईल ते सांगता येत नाही. मनाचा निग्रह करण्यासाठी शास्त्रकारांनी योगशास्त्र सांगितले आहे.

प्राणायाम हाही मार्ग सांगितला आहे. प्राणायामानेही मन स्थिर करता येते.

तिसराही मार्ग सांगितला आहे. तत्त्वविचार करण्याचा मार्ग. श्रवण, मनन, निदिध्यासनही सांगितलंय. श्रवण, मनन, निदिध्यासन म्हणजे आत्मानात्मविचार. त्या विचारांनी विषयांचा संबंध सुटतो व मन स्थिर होते. संतांचे ग्रंथ आहेत. त्यांनी दृष्टान्त देऊन आणखी उत्तम प्रतिपादन केलेलं आहे. संतांचे ग्रंथ म्हणजे उत्कृष्ठ मननरुपच आहेत. ऐकतो आपण पुष्कळ. वाचतोही पुष्कळ. पण ते वाचलेलं किंवा ऐकलेलं जे आहे त्याचं पुनःपुन्हा अनुसंधान होणं, आपल्याला जे पटतं तेचयोग्य आहे असा आग्रह उत्पन्न झाल्यावर निर्णायक मनन होणं. त्याकरता अधिकारी महात्म्यांच्या बरोबर मनन करता येईल किंवा समानशील जे आहेत अशा अभ्यास करणाऱ्या साधकांबरोबर मनन करता येईल. मनाची आवड उत्पन्न झाली की ते मन विषयापासून बाजूला होतं.

असे वेगवेगळे मार्ग सांगितले आहेत. कोणाला हा मार्ग आवडतो तर कोणाला तो मार्ग आवडतो.

***प्रश्न : महाराज, असे मनन करताना मनात कोणते विचार असावेत?***

उत्तर : मनन करताना तीन प्रकाराचे विचार मनात येतात. पहिला भाग म्हणजे अहम्, हा जो जीवात्मा आहे तो कोण आहे? जीवात्म्याचे स्वरूप काय हे अगोदर ठरवायचे आहे. जीवात्मा हा मूळ आत्मरूप आहे, परमात्मरूप आहे,

अंशरूप आहे. त्याला येणे जाणे, गती अगती असे काही नसते. सूक्ष्म जे लिंग शरीर आहे त्याला गती किंवा अगती असते. त्या लिंगशरीराशी आत्म्याचा तादात्म्यभास होतो. विकार लिंगशरीरातच असतात. आत्म्याला विकार नसतात. आत्मा पाण्यात पडलेल्या प्रतिबिंबाप्रमाणे असतो. पाणी हलले की प्रतिबिंब हलते. पण मूळ बिंब स्थिरच असते. म्हणजे हलणे हा पाण्याचा विकार आहे. मूळ बिंबाचा नव्हे. तसे आत्म्याला काहीही विकार नसतात. जीवात्मा त्या सर्वव्यापी परमात्म्याचा केवळ अंश आहे.

त्याच्यानंतर हे समोर दिसणारे जे जग आहे ते जग म्हणजे काय आहे? याचा कर्ता कोण आहे? जग आपोआप झालंय का? आपोआप कसं होते? आपोआप होणं शक्य आहे का? असा जगासंबंधी विचार करायचा आहे. ही सृष्टी मायामय आहे. सृष्टी व्यक्त कशी झाली. त्याचा अध्यारोप कसा आहे. पुन्हा अव्यक्त कशी होत आहे. सृष्टीचा व्यक्ताभिव्यक्त विचार समजून घ्यायचा आहे. परमात्म स्वरूपाची जी मायाशक्ती आहे त्या मायेच्या योगाने संपूर्ण जगत उत्पन्न होते. दुसरा भाग झाला.

तिसरा भाग म्हणजे परमात्म्यासंबंधी विचार करायचा आहे. परमात्मा म्हणजे मूळ स्वरुप. त्याला कालाची मर्यादा नाही. ते सत् आहे म्हणजे नेहमीच अस्तित्वात आहे. त्याला जन्मही नाही आणि मृत्युही नाही. ईश्वर कालत्रयातीत आहे. परमात्मा म्हणजे मूळ स्वरूप स्वयंप्रकाशी आहे. आत्मप्रकाशी असल्याने त्याला दुसऱ्या कोणत्याही प्रकाशाची जरुरी नाही. त्याच्याच प्रकाशाने जग प्रकाशित होते आणि आनंदस्वरूप आहे तो. मूळ अधिष्ठानाचे चिंतन करायचे आहे.

हे चिंतन अखंड चालू राहिले पाहिजे. त्याकरिता शरीराकडे लक्ष नाही, देहासक्ती कमी होत गेली आहे असे झाले पाहिजे. मन त्यात तल्लीन झाले पाहिजे.

***प्रश्न : महाराज, भक्ताची दुःखे भगवंत केव्हा दूर करतो?***

उत्तर : जीव अनेक कष्ट भोगत असतात. सुखाच्या इच्छेने त्यांचे प्रयत्न चाललेले असतात. पण सुख मिळालं तरी ते विनाशी असतं. सर्व काळ टिकणारं सुख

कधीच पदरात पडत नाही. कर्म संपत नाही आणि त्यांचे भोग म्हणजे सुखदुःख हे संपत नाही.

पण जीवाने प्रार्थना केली आणि भगवंताला दया आली तर कार्य होतं. भगवंताजवळ पूर्ण सामर्थ्य आहे. जीवाचा संकल्प म्हणजे मनोरथ. पण भगवंताचा सत्य संकल्प असतो. असं व्हावं असं वाटल्याबरोबर कर्म होऊन जातं. अशी भक्ती ज्या परमेश्वराची आहे, त्यांच्या मनात दया उत्पन्न झाली पाहिजे. भगवंताला 'सकलार्तिहरा ॥' असे म्हणतात. सर्वांची दुःखे दूर करणारे. सर्वांची आर्ती दूर करणारा जो परमात्मा आहे त्याला जर दया उत्पन्न झाली तर तो कार्य केल्याशिवाय कसा राहील?

***प्रश्न : महाराज, भगवंताला दया आल्यावर भगवंत भक्ताची दुःखे दूर करतो तसे सद्गुरूंना दया आल्यावर सद्गुरू साधकांची दुःखे दूर करता काय?***

उत्तर : परमात्मा तोच गुरूरुपी आहे. गुरुस्वरूप हे त्याचेच आहे. ईश्वरच सद्गुरूंच्या रूपाने कार्य करतो आहे.

***प्रश्न : महाराज, परमेश्वराचे स्वरूप ज्या महात्म्याने जाणले त्याला हे जग नाहीसं होत असं आपण सांगितले होते. हे कसे काय होते?***

उत्तर : परमात्मा सत् आहे म्हणजे नेहमी त्याचं अस्तित्त्व आहे. जन्मानंतर मृत्यु, मृत्युनंतर जन्म अशी परंपरा ईश्वराला नाहीये. तो कालत्रयातीत आहे, त्रिकालाबाधित आहे. तसेच परमात्मा स्वयंप्रकाश आहे. आत्मप्रकाशी असल्याने त्याला दुसऱ्या कोणत्या प्रकाशाची जरुरी नाही आहे. त्याच्याच प्रकाशाने सर्वही जगत् प्रकाशित होत आहे. तसेच परमात्मा आनंदरूप आहे. अविद्या मायाशक्ती जी आहे त्या मायेच्या योगाने संपूर्ण जगत् उत्पन्न होतं.

एक दृष्टांत सांगतात, अंधारामुळे दोरी काही समजून येत नाही. पण दोरीला पाहिल्याबरोबर साप आठवतो. साप चावला तर मृत्यु येतो हे ऐकल्याचे आठवते. याचे कारण त्या सर्पाबद्दलचे तसे संस्कार बुद्धीवर झालेले असतात. मग त्या दोरीच्या जागी सापच दिसायला लागतो. पूर्वी सापाबद्दलचे बुद्धीवर झालेले संस्कार इतके बलवत्तर असतात की माणूस त्या सापाच्या भीतीने

अर्धमेला होऊन जातो. मग तो माणूस साप दिसला म्हणायला लागतो. साप मला चावला असे म्हणायला लागतो. शंकाविष म्हणतात तसे होते. 'मला साप चावला', 'मला साप चावला' अशी त्याची कल्पना दूर करायला किती प्रयास पडतात, किती खटपट करावी लागते. शंकावीषसुद्धा बाधक आहे.

रज्जूवर साप भासतो आहे. त्याप्रमाणे सर्व विश्वाला अधिष्ठानभूत तो परमात्मा. त्याच्याबद्दल आम्ही अज्ञानी असल्यामुळे सगळे जग भासते आहे, परमात्म्याच्या अधिष्ठानाचं ज्ञान झाल्याबरोबर सगळं अज्ञान गेलं. पुढे पडलेली दोरी स्पष्ट दिसल्यावर मग साप आला नाही, साप दिसलाही नाही, साप चावलाही नाही. काही नाही. दोरी दिसायला लागल्यानंतर पुढची अवस्था आहे ही.

ज्याला परमात्याचं ज्ञान झालं त्याला जग उरतच नाही. संबंध विश्वाला आधारभूत असलेल्या परमात्याचं स्वरूप ज्या महात्म्याने जाणलं त्याला हे सगळं जग नाहीसं होतं. आलेलं असेल तर नाहीसं होईल? आलंही नाही आणि गेलंही नाही. जग नाहीच आहे. जगाला अस्तित्त्वच नाही. एक फक्त परमात्माच आहे. दुसरे तिसरे काहीही नाही.

***प्रश्न : जीवाच्या अज्ञानाने जग आहे असे भासते असे शंकराचार्य-स्वामीमहाराज सांगतात. याचा अर्थ काय महाराज?***

उत्तर : एकच परमात्मा आहे. पण 'अनेकवत् भासति'. अनेक असल्याप्रमाणे जग दिसायला लागलं. ''अज्ञानातजगत् उदित।'' म्हणतात. अज्ञानामुळे सगळं जग मला समोर आलेलं आहे. जग म्हणजे अनेक आहे. एक तत्त्व असतांनासुद्धा अनेकाप्रमाणे वाटायला लागलं ते अज्ञानामुळे, या अज्ञान बुद्धीमुळे शत्रूमित्र, पुण्यपाप, चांगलं-वाईट वगैरे अनेक भास त्यात वाटायला लागले. द्वंद्व भासायला लागले. बुद्धी जशीजशी शुद्ध होईल तसा तसा हा बुद्धीभेद, हे अज्ञान हा भास कमीकमी होत जाईल. बुद्धीतले सगळेही संस्कार कमीकमी झाले की या एकत्त्वाची जाणीव होते. अज्ञान गेलं की झालं. मग एक परमात्मा एकरूपानं पहाणं ही कला किंवा हे खरं ज्ञान ज्ञानी माणसाला म्हणजे महात्म्याला प्राप्त होतं. तोच समजतो की हे मूळ जे जगत् तेच अधिष्ठानरुप परब्रह्मतत्त्व आहे.

***प्रश्न : महाराज, तत्पदार्थ शुद्धी'' म्हणजे काय?***

उत्तर : 'तत्पदार्थ शुद्धी ।' या महावाक्यामध्ये असलेल्या 'तत्' पदार्थाचा अर्थ म्हणजे ईश्वर एक आहे. 'अहम्' ही एकच आहे. तोही एकच आहे. हे समजून घेतलं पाहिजे. मग 'ब्रह्म' आणि 'अहम्' पदार्थ एकच आहे हे ज्ञान होतं.

***प्रश्न : चित्तातून संसार नाहीसा झाल्यामुळेच ज्ञानी महात्मे आनंदात असतात का महाराज?***

उत्तर : आत्मस्वरूप आनंदरूप असते. ज्ञानीमहात्म्यांचे चित्त आत्मस्वरुपाच्या ठिकाणी स्थिर झालेलं असतं. त्यांच्या चित्तातून संसार नाहीसा झाला आहे. काही स्मरणही नाही. चित्तातले सगळे संस्कार गेले आहेत. मग आनंदरूप आत्मस्वरूपातच रहाता येते. आत्मस्वरूपाच्या आनंदाचाच आस्वाद घेत रहाताहेत.

***प्रश्न : महाराज, रसास्वाद हा भयंकर दोष आहे, साधकाने रसास्वाद टाळला पाहिजे असे सांगतात. रसास्वाद म्हणजे काय?***

उत्तर : साधनाकाळात आपल्याकडून काहीतरी साधना होते आहे, त्याबद्दल मनात भ्रांती उत्पन्न होते. माझ्या साधनेत मला असे अनुभव येतात, माझी अशी प्रगती झाली आहे, अशी माझी तयारी झाली आहे, असे विकल्प मनात निर्माण होतात. परंतु हा भ्रम आहे. हाच रसास्वाद. हा भ्रम गेला पाहिजे. मी मोठा उपासक आहे, माझी उपासना अशी चालू आहे, प्रगती आहे असे वाटले तर ते बरोबर नाही. हा भ्रम आहे आणि तो गेला पाहिजे. उत्पत्ती, स्थिती आणि लय करणाराही तोच आहे. सर्वस्वरूपी तोच आहे. त्याच्या खऱ्या दर्शनाने कोणत्याही परिस्थितीत टिकेल असे समाधान मिळते.

ज्यांना प्रगती साधायची आहे ते रसास्वादाच्या मागे लागत नाहीत. आपली प्रसिद्धी आपणच आपल्या तोंडाने करायची, हे व्यवहारात जरी उपयोगी असले तरी परमार्थात हा दोष म्हणून मानला आहे. मला असा अनुभव आला आहे,माझी एवढी प्रगती झालेली आहे असे स्वतःच सांगत सुटायचे, हा दोषच आहे.

आपल्याला जो काही थोडाफार चांगला अनुभव आला त्याची आपल्याच मुखाने प्रसिद्धी करायची हा फार मोठा दोष आहे.

प्रगती शब्दाचा काय अर्थ करायचा, तर साधना व्यवस्थित चालली आहे ही ईश्वराची कृपा आहे याची जाणीव होणे. आपल्याकडे कर्तृत्व घ्यायची काय गरज आहे? या रसास्वादातच सर्व काल निघून जातो. रसास्वाद हा घात करणारा आहे, भयंकर दोष आहे. या रसास्वाद दोषामुळे साधनेत प्रतिबंध निर्माण होतो.

***प्रश्न : महाराज, मगरीने पाय धरल्यावर गजेंद्राने म्हणजे एका प्राण्याने परमेश्वराची प्रार्थना केली हे पुष्कळ लोकांना अशक्य वाटते ?***

उत्तर : गजेंद्राचा पाय मगरीने जेव्हा धरला तेव्हा हत्ती परमेश्वराला शरण गेला. परमेश्वराची स्तुती त्याने केली. त्यात परमात्म्याच्या स्वरुपाचे वर्णन आले आहे. आमच्यासारख्या बुद्धीवाद्याला वाटेल की हत्ती अशी स्तुती करतो काय? शक्ती ही आधी मान्य करावी लागते. आपल्यामध्ये असलेल्या शक्तीचा विकास कसा करून घ्यायचा ती साधना आम्हाला मान्य नाही किंवा सांगण्यावर विश्वास नाही.

वास्तविक हा आपल्या बुद्धीचा दोष आहे. पण तो दोष न समजता आपण ते अशक्य आहे अशी समजूत करून घेतो. असंभावना हा फार मोठा दोष आहे. ही असंभावना गेली पाहिजे आपल्या मनांतून. हे अशक्य आहे ही समजूत मनांत कां आणायची? असंभावना हा दोष बुद्धीतून गेल्याशिवाय परमार्थ साध्य होणे शक्य नाही. संभावना वाटली पाहिजे. हे शक्य आहे असे वाटले पाहिजे. शक्यतेची भावना निर्माण झाली पाहिजे. म्हणजे मग संशय कमी होतो.

संशय दोन असतात. एक असेल असे वाटणे हाही संशयच आणि एक नसेल असे वाटणे हाही संशयच. बुद्धीवाद्याला यातले काहीच मान्य नसते. आहेही मान्य नाही आणि नाही असेही म्हणत नाही. त्यामुळे अर्धवट स्थिती होते. 'संशयात्मा विनश्यति ।' असे असू शकेल, असे घडणे शक्य आहे हे संभावनात्मक ज्ञान आहे. 'निश्चितपणा नाही, शक्यतेचाही अर्धवटपणा अशी स्थिती ही संशयाच्या वरची पायरी आहे.

निःसंशय बुद्धी- त्याच्यानंतर निर्णयात्मक बुद्धी. या निर्णयात्मक बुद्धीनंतर निश्चयात्मक बुद्धी. असा हा बुद्धीचा विकास करायचा आहे.

***प्रश्न : महाराज, शास्त्रकारांना बुद्धीवाद मान्य नाही का?***

उत्तर : शास्त्रकारांना बुद्धीवाद मान्य नाही असे नाही. शास्त्रकारांना, संतमहात्म्यांना बुद्धीवाद मान्यच आहे. त्यांना बुद्धीचे सामर्थ्य माहिती आहे. प्रपंचातही बुद्धीची श्रेष्ठता प्राप्त करुन घेणारे महात्मे आहेत. प्रपंच, संसार समोर दिसत असतानासुद्धा तो बुद्धीच्या सहाय्याने मनातून काढून टाकायचा आहे. फक्त ईश्वराचे आनंदस्वरुप मनात ठेवायचे आहे. बाकी मनातला सगळा संसार काढून टाकायचा आहे. ही बुद्धीची शक्ती शास्त्रकारांनीच सांगितली आहे. पण फलाबद्दल विश्वास असेल, ईश्वराच्या कृपेनं सर्वही प्राप्त होऊ शकतं असा प्रथम विश्वास असेल तरच तसा प्रयत्न करण्याकडे प्रवृत्ती होणार! नाही तर कशी होणार?

आपली शक्ती अगदी कमी आहे हे पक्क समजलं पाहिजे. सर्वात मोठी शक्ती ईश्वराची आहे हेही तितकचं पक्कं समजलं पाहिजे. पूर्णता असलेले महात्मे आजही जगात आहेत हे पटलं पाहिजे. असे ईश्वररूप महात्मे आहेत असा विश्वास असेल तरच त्यांनी सांगितलेल्या उपायांकडे प्रवृत्ती होणार? बुद्धी पूर्ण विकसित झाली पाहिजे. पूर्ण आनंद घ्यायचा. सर्व दुःख कायमची दूर करायची. हे सगळं आणखी बुद्धीनेच करून घ्यायचं आहे. अशी बुद्धी मिळवणं हाच प्रयत्न आहे. पण त्या प्रयत्नांना सुरुवात पूर्ण विश्वास असल्याशिवाय होत नाही.

***प्रश्न : महाराज, संसार विसरून गेल्यामुळंच महात्म्यांना पूर्ण आनंद मिळालेलाअसतो का ?***

उत्तर : नुसता संसार विसरून चालत नाही. अहम् विसरणं मुख्य आहे. अहम् कायम राहिला आणि संसार विसरला असे होत नाही. तो अहम् मनात असतोच. शेवटी महात्मे अहमूही टाकून देतात. काही संबंध नाही. असंग आहेत. आत्मचैतन्य हे असंग आहे. आनदंरूप आहे. कोणाचाही संबंध नाही. हा विवेक पूर्णपणे प्राप्त करूनच महात्मे पूर्ण आनंद मिळवतात.

***प्रश्न : महाराज, यालाच साक्षात्काराची अवस्था म्हणतात का?***

उत्तर : असे संतमहात्मे अगदी पूर्णावस्थेला पोचलेले असतात. कोणताही विकार त्यांच्या मनामध्ये नसतो. सर्वांच्यामध्ये मुख्य म्हणजे जो अहंकार असतो तो अहंकारही या महात्म्यांच्या ठिकाणी नसतो. त्यांची सर्व ठिकाणी परमेश्वर भावना असते. सच्चिदानंदघन परमेश्वर सगळीकडे भरुन राहिलेला आहे याचा ते सतत अनुभव घेत असतात. म्हणूनच त्यांना पूर्ण आनंद मिळत असतो. हीच साक्षात्काराची अवस्था. हीच खरी ज्ञानदृष्टी.

**प्रश्न : आम्हाला ही ज्ञानदृष्टी कशी मिळेल महाराज?**

उत्तर : अशा महात्म्यांची भेट होणे फार कठीण असते. देवाची कृपा असेल तरच महात्मे भेटतात. नाहीतर भेटतच नाहीत. देवाची कृपा झाली तरच महात्म्यांची सेवा घडते आणि त्यांची कृपा होते.

निश्चयात्मक बुद्धीने वागणारा साधक असेल तर महात्मे त्याला मार्गदर्शनही करतात आणि त्याप्रमाणे वागायला जी शक्ती लागते ती शक्तीही देतात. हाच शक्तीपात. अशा महात्म्यांचा संकल्प झाला की साधकाचे कल्याण होते. अशाप्रकारचे महात्मे भेटणे, त्यांनी मार्गदर्शन करणे, त्यांनी साधकाचे कल्याण करायचे ठरवणे हे फार मोठं आहे. देवाची कृपा झाली तर असे महात्मे, मार्गदर्शक भेटतात जे त्याची बुद्धी शुद्ध ठेवतात आणि त्याला शक्ती देऊन त्याच्याकडून करवून घेतात. अदृश्यरूपाने सर्व काही स्वतःच करवून घेतात.

***प्रश्न : महाराज, "कोणाही जीवाचा न घडो मत्सर । वर्म हे सर्वेश्वर पूजनांचे" असे तुकाराममहाराज सांगतात. तुकाराममहाराजांना यांत काय सांगायचे आहे ?***

उत्तर : बाह्यपूजाही आहेच. षोडषोपचार, पंचापचार वगैरे पुष्कळ उपचार आहेत. चतुषष्टी उपचार आहेत. गायन, वादन, नृत्य ही सगळ्या प्रकारांनी देवांची पूजाच आहे. पण तुकाराममहाराज सांगताहेत ही मुख्य पूजा नव्हे. ही खरी देवाची पूजा नव्हे. खरी पूजा वेगळीच आहे.

कोणाचाही मत्सर करू नये. कोणाचाही द्वेष करू नये. कोणाचाही उपमर्द होईल असे बोलू नये. अहंकार असला की इतरांचा अपमान होईल असे बोलायची बुद्धी होते. भीष्माचार्य सर्व धर्माचे सारसुद्धा असंच सांगतात.

भीष्माचार्य सांगतात खरे धर्माचरण कोणते? खरी देवाची पूजा कोणती? आपल्याला जे इतर लोकांचे वागणे प्रतिकूल आहे असे वाटते, तसे आपण स्वतः कधीही वागू नये. आपले वागणे लोकांना प्रतिकूल वाटू नये असंच आपण वागलं पाहिजे. हीच खरी पूजा. हीच खरी देवाची भक्ती आहे.

आपल्याला काय प्रतिकूल वाटते? इतरांनी आपली निंदा केली की ते प्रतिकूल वाटते. कोणी आपल्याला बोलू नये असे आपल्याला वाटते. आपल्या विरुद्ध कोणी वागला की ते आपल्याला प्रतिकूल वाटते. हे जे आपल्याला प्रतिकूल वाटते तसे आपले वागणे असू नये. आपले वागणे इतरांना तसे प्रतिकूल वाटू नये असेच आपण स्वतः वागले पाहिजे,.

तसे वागण्याचा सतत प्रयत्न करणे ही खरी देवाची पूजा आहे. हेच खरे धर्माचरण आहे. हीच खरी देवाची भक्ती आहे.

भीष्माचार्य सांगतात हाच खरा धर्म आहे. हेच धर्म सर्वस्व आहे. तुकाराम-महाराजही तेच सांगताहेत. संयमाने राहणारे महात्मे कितीही अनुकूल परिस्थिती असली तरी कोणाचा उपमर्द करीत नाहीत. निर्भत्सरता हाच त्यांचा खरा स्वभाव बनतो. ते कोणाचाही द्रोह करीत नाहीत. असे वागणे हीच खरी ईश्वराची पूजा, हीच खरी भक्ती.

***प्रश्न : महाराज, भक्ताची ईश्वरावर जर शुद्ध भक्ती असेल तर ईश्वराचा अनुग्रह लौकर होतो का?***

उत्तर : शुद्ध भक्ती असेल, शुद्ध प्रेम ठेवून देवाची भक्ती करता येत असेल तर देवाचा अनुग्रह व्हायला वेळ लागत नाही.

ईश्वर दयाळू आहे. फक्त प्रेमभक्ती पहाणारा आहे. बाकी त्याला काही लागत नाही. दयासागर आहे तो. अशी सुरुवातीपासून निष्ठा पाहिजे. अशी शुद्ध भक्ती, असे शुद्ध प्रेम ठेवून भक्तीला सुरुवात केली तर देवाचा अनुग्रह व्हायला वेळ लागत नाही.

***प्रश्न : महाराज, व्यवहारात कोणी अपमान केला, कोणी बोललं तर मन कसं शांत ठेवावं ?***

उत्तर : कोणी काही बोललं तर त्याचा चांगला अर्थ घेता येईल. तो उपदेश

मानता येईल. "शब्दशस्त्रे झाले क्लेश। संती मानावा उपदेश॥" असे मुक्ताबाई ताटीच्या अभंगात ज्ञानेश्वर-महाराजांना सांगतात. 'बालादपि सुभाषितम ग्राह्यम्।' गुणग्राहक दृष्टी पाहिजे. चांगले कोणचे आणि वाईट कोणचे हे आपल्या बुद्धीने समजून घेता आले पाहिजे. कोणचं ग्राह्य आहे आणि कोणचं अग्राह्य आहे याचा विवेक करता आला पाहिजे. त्यासाठी अभ्यास केला पाहिजे, मार्गदर्शक तसे भेटले पाहिजेत.

***प्रश्न : महाराज, जगांत व्यवहार करतांना साधकाने कसे वागावे म्हणजे त्याला दुःख होणार नाही?***

उत्तर : व्यवहारामध्ये उत्तम वागणारा असेल तर त्याला कधीच दुःख होणार नाही. व्यवहारात कसे वागावे हे नारदांनी सांगितले आहे. नारद सांगतात, जगात तीन प्रकारची माणसे असतात. आपल्यापेक्षा श्रेष्ठ, आपल्या बरोबरीची आणि आपल्यापेक्षा कनिष्ठ.

पहिल्या प्रकारची म्हणजे आपल्यापेक्षा श्रेष्ठ, उत्तम, गुणसंपन्न माणसे. अशी जी श्रेष्ठ माणसे आहेत त्यांच्याशी प्रेमाने व नम्रतेने वागावे, त्यांच्या आचरणाबद्दल आनंद व्यक्त करावा, त्यांची कृपा संपादन करावी. श्रेष्ठ पुरुषांशी विनीत भावाने वागले, त्यांच्या आचरणाबद्दल आनंद व्यक्त केला तर ते संतुष्ट रहातात. त्यांची कृपा संपादन करणं शक्य होतं. मात्र आपल्यापेक्षा श्रेष्ठ कोण हे ओळखण्याची योग्यता आपल्या बुद्धीमध्ये आली पाहिजे. नाहीतर फसण्याचा संभव असतो. चार माणसांशी विचार विनिमय करुनही श्रेष्ठ पुरुषांची निवड योग्य प्रकारे करता येईल.

दुसऱ्या प्रकारचे लोक म्हणजे आपल्या बरोबरीचे लोक त्यांच्याशी प्रेमाने वागावे, मैत्रीने वागावे. मग कोण कशाला दुःख देईल?

तिसऱ्या प्रकारचे लोक म्हणजे कमी दर्जाचे लोक. अशुभ आचरण असेल, अशुभ वासना असतील, ईश्वरभक्ती नसेल, वाटेल तसे वागत असतील, काहीही असेल. अशा लोकांबद्दल दया उत्पन्न व्हावी. अरे असे वागू नकोस, तुझे अकल्याण होईल. व्यसनामुळे आयुष्याचा नाश होईल. सांगून बघावे म्हणजे त्यांच्याबद्दल दया मनात बाळगून त्यांच्या उपयोगी पडता आले तर पहावे. त्यासाठी दयेचा अभ्यास केला पाहिजे. आपल्याबद्दल दया वाटणारा हा मनुष्य

चांगला आहे असे त्यांना वाटले की ते आपल्याला अनुकूल होतील. म्हणजेच विरोध करायचाच नाही कोणाला. असं वागलं म्हणजे दुःख वगैरे होत नाही.

***प्रश्न : महाराज, सत्त्वगुणी बुद्धी ठेवायला एवढे का सांगतात?***

उत्तर : सत्वगुण असला की मनात राजस व तामस विचार येतच नाहीत. तसे झाले की इंद्रियांचा आणि विचारांचा निग्रह करायचा असे काही रहातच नाही.

***प्रश्न : महाराज, अशी सात्त्विक बुद्धी आम्ही कशी मिळवायची?***

उत्तर : सकाळी उठल्यापासून ते निजेपर्यंत आपल्या शरीराने, वाणीने आणि मनाने चांगली कर्मेच करायची. वाईट कर्मे होऊ द्यायची नाही. झोपतांना रोज स्वतःच आपले निरीक्षण करावे. आज किती सत्कर्मे घडली, किती वाईट कर्मे घडली. रोज आत्मनिरीक्षण करावे. आज मी अमक्याला अमुक बोललो, तमक्याची निंदा केली, अमक्याच्या मनाला उद्वेग दिला, असा अन्याय माझ्या हातून घडला. असे रोज झोपताना स्वतःच स्वतःचे निरीक्षण करावे.

उपरती झाली तर सुधारणा होत जाते. माझा सत्त्वगुण वाढला का? का रजोगुणव तमोगुण वाढला? हे रोज स्वतःच बघायचे. स्वतःचे आत्मनिरीक्षण हे मुख्य आहे. अंतःकरण सारखे जे बाहेर जाते ते आत गेलं पाहिजे. त्या अंतःकरणाने परीक्षण केले तर शुद्धी होते. त्यात प्रतिबंध येत असतील तर ते जाणून घेता आले पाहिजेत व दूर कसे होतील हे पहाता आले पाहिजे. अशा आत्मनिरीक्षणानेच आत्मोद्धार होतो. सगळे संतमहात्मे हेच सांगताहेत. भगवान गीतेत सांगताहेत 'उद्धरेत आत्मनात्मानम् ।'

***प्रश्न : महाराज, पापकर्म घडू नये म्हणून काय करावे ?***

उत्तर : मनात अशुभ वासना असल्या की पापाचरणाकडे प्रवृत्ती होते. पण निश्चय केला तन मनाने अशुभ वासना आवरता येतात. राग आला तर आवरता येतो. आपल्या इच्छेविरुद्ध वागणाऱ्याबद्दल राग येणे स्वाभाविक आहे. राग आला की अशांती येते. नाथमहाराज सांगतात, "जरी अंतरी क्रोध आला। तरी तो शांतचि झाला।" राग आवरणे शक्य आहे.

राग येऊच नये ही पुढची पायरी आहे. संतांनी शांतीचा एवढा अभ्यास केला आहे की त्यांना राग येतच नाही. आपला आदर करणाऱ्या मंडळींसमोर

जरी अपमानाचा प्रसंग आला तरी क्रोध ज्याच्या मनात येत नाही त्यालाच संपूर्ण शांती प्राप्त होते असे नाथमहाराज सांगतात. मानापमान सारखे वाटणे हे ज्ञानी माणसाचे लक्षण आहे. गुणातीताचे लक्षण आहे.

***प्रश्न : महाराज, शेवटी गुणातीत व्हायचं म्हणजे सत्त्वगुणही टाकायचा का?***

उत्तर : अगोदर सत्त्वगुण वाढवायचा जास्तीत जास्त प्रयत्न करायचा. सत्त्वगुण वाढला की रजोगुण व तमोगुण आपोआप कमी होत जातात आणि शांती मिळते. शेवटी सत्त्वगुणही टाकून गुणातीत व्हायचे.

***प्रश्न : आपल्यात सत्वगुण वाढतो आहे हे कसे ओळखायचे महाराज?***

उत्तर : सत्त्वगुण वाढू लागला की औदार्य उत्पन्न होते. दुःखात आहेत त्यांना शरीराने, वाणीने व मनाने उपयोगी पडणे, धनदान करणे याला औदार्य म्हणतात. ही सत्त्वगुणाची शुद्धी. म्हणजे आपल्या मनांत लोभ राहिला नाही. माझं माझं असं जर करीत बसलं तर हातून काही दानच होत नाही. धनाबद्दलची आसक्ती कमी होणं, लोभवृत्ती कमी होणं हे सत्त्वगुण वाढल्याचे लक्षण आहे. नाहीतरी पैसा बँकेतच ठेवायचा आणि बँकेत तसाच ठेवून निघून जायचे असेच घडत असते. जरुरीपुरता पैसा ठेवून बाकी पैसा दान करावेसे वाटणे ही बुद्धी सत्त्वगुणानेच येते. त्यासाठी विवेक उत्पन्न व्हावा लागतो. विवेकसंपन्न बुद्धी ही ईश्वराची देणगी आहे. समर्थ सांगतात, "देणे ईश्वराचे." म्हणजे मनुष्याच्या प्रयत्नाने होत नाही. ही देवाची देणगी आहे.

सत्त्वगुण वाढल्याचे आणखी एक लक्षण आहे. शरीराने हिंसा घडत नाही, वाणीनेही हिंसा घडत नाही. रागाच्या भरात दुसऱ्याला बोलणे ही वाणीची हिंसा आहे. आपल्याला कोणी वाईट बोललं तर मनाला लागते. मग आपण दुसऱ्याला वाईट का बोलावे, दुसऱ्याला का दुखवावे? हा संयम आला की मन अहिंसात्मक बनून जाते.

***प्रश्न : महाराज, अहिंसात्मक मन झाल्याने वैरभाव नाहीसा होतो का?***

उत्तर : पतंजली महर्षी सांगतात, "तत्सन्निधौ वैरत्यागः।"

अहिंसात्मक मन झाले की त्या महात्म्याच्या मनात कोणाबद्दलही वैरभाव येत नाही. तसेच त्याच्या सान्निध्यात आलेले परस्परविरोधी स्वभावाचे जीवही

आपापसातील वैरभाव सोडून देतात. ऋषींच्या आश्रमात येणारे पशुपक्षीही आपापसातील वैरभाव सोडून द्यायचे. वाघ, गाय, साप, मुंगूस एकत्र रहायचे. त्या जागेत आल्यावर क्रूर पशूही आपली क्रूरता विसरून जायचे.

***प्रश्न : मन निर्वासन झाले की माणसाची दुःखे नाहीशी होतात का महाराज?***

उत्तर : मन निर्वासन झाले की मनात दुःख रहात नाही, भीतीही रहात नाही. निर्वासन अंतःकरणाचे ते मुख्य फळ आहे. मनात काही इच्छाच राहिली नाही. मग काही मिळालं काय, काही गेलं काय? काये वाटेल मनाला? काही नाही. हर्षही नाही, दुःखही नाही, रागही नाही, विषादही नाही. म्हणजेच तो द्वंद्वाच्या पलीकडे गेला.

***प्रश्न : मन निर्वासन होणे हाच मनोनाश का?***

उत्तर : मन निवार्सन होण यालाच शास्त्रकार मनोनाश असे नाव देतात. इथे मनोनाश म्हणजे मनाचा नाश असा अर्थ नाही. मनोनाश याचा अर्थ मनाची स्थिती बदलणं मनाचा स्वभावच बदलून जाणं. मनोनाश याचा अर्थ मन शांत झालं आहे.त्याची बुद्धी स्थिर झाल आहे. कोणत्याही गुणांत गुंतलेली नाही. सात्त्विक इच्छाही मनांत राहिलेली नाही. सर्व विसरून जायचंय.

***प्रश्न : अशी अवस्था प्राप्त होणे मोठेच भाग्याचे आहे ना महाराज?***

उत्तर : भक्तीने ज्यांनी निर्वासन अंतःकरण करुन घेतलं आहे तेच खरे भाग्यवान आहेत. सांसारिक भाग्य खरे भाग्य नाहीच. ते टिकाऊ नाही. ते केव्हा कमी होईल हे सांगता येत नाही.

निर्वासन अंतःकरण झाल्याने संतमहात्म्यांना जे सुख मिळते, जो आनंद मिळतो तो कायम रहातो. विवेक आहे, वैराग्य आहे. अहंकार राहिलेला नाही. वासनाशून्य अंतःकरण झालेले आहे. तेच खरे भाग्य आहे. सर्व संतमहात्मे तोच अनुभव सांगताहेत.

***प्रश्न : महाराज, हीच स्थितप्रज्ञ अवस्था का?***

उत्तर : याच अवस्थेला स्थितप्रज्ञ अवस्था म्हणतात, सहज समाधी म्हणतात. आत्मानंदात मन स्थिर झालं आहे. पूर्ण आनंद आहे, पूर्ण समाधान आहे.

दुसरीकडे मन जातच नाही. स्मरणच नाही. कोण सुखी आहे आणि कोण दुःखी आहे, याची आठवणही नाही. स्वतःच्या देहाचीही आठवण नाही. अशी ही अवस्था आहे.

***प्रश्न : महाराज, पुराणांमध्ये विसंगती आहेत अशी टीका काही लोक करतात?***

उत्तर : पुराणे रचली आहेत वेदव्यास महर्षींनी. ते साक्षात अवतार आहेत. लोकांचे कल्याण व्हावे यासाठी त्यांनी पुराणे रचली आहेत. लोकांना योग्य मार्गदर्शन करावे, त्याप्रमाणे लोकांनी आचरण करून आपले कल्याण करून घ्यावे यासाठी त्यांनी पुराणे लिहिली. स्वतःला अर्थ आणि काम प्राप्त व्हावेत, यश मिळावे, कीर्ती मिळावी या उद्देशाने त्यांनी पुराणे रचलेली नाहीत. व्यासांची योग्यता, व्यासांची बुद्धीमत्ता यांचा विचार न करता पुराणवाङ्मयात विसंगती आहेत म्हणायचे, समन्वय करता येत नाही म्हणायचे, यात टीका करणाऱ्यांची बुद्धीची घमेंडच दिसते. समन्वय करण्याची बुद्धीमत्ता मिळवण्याचा प्रयत्नही न करता ही टीका आहे.

पुराणवाङ्मयाचा अभ्यास सोपा नाही. नुसतं वाचून आपल्या बुद्धीने अर्थ लावून व्हायचे नाही. पूर्वी पुराणाचार्य असायचे. त्यांचा पुराणवाङ्मयाचा अखंड अभ्यास - चालायचा. परस्परविरोध जिथे दिसतो त्याचा ते समन्वय लावून दाखवायचे. संदेह दूर करायचे.

पुराणाचार्य होणे सोपे नाही. त्यासाठी देवाची कृपा पाहिजे. भगवान शंकराच्या कृपेने मार्कंडेयऋषी पुराणाचार्य झाले. कोणीही चिकित्सक मनुष्य आला तरी त्याला समन्वय लावून दाखवायचे. संदेह दूर करायचे. असे सांगणारे अभ्यास करणारे पाहिजेत.

***प्रश्न : महाराज, ज्ञान मिळाले नाही तरी केवळ भक्तीने आमचं कल्याण करून घेता येईल का?***

उत्तर : ईश्वरस्वरूप सर्वही संत महात्म्यांनी आयुष्यभर भक्तीयोगाचाच अभ्यास केला. आयुष्यभर भक्ती केली भगवंताची. पापक्षय झाल्याशिवाय आत्मज्ञान होणार नाही आणि पापक्षय हा भक्तियोगाने होतो, असाही सिद्धांत भागवतकारांनी सांगितला आहे.

ऐहिक असो किंवा पारमार्थिक असो, आपलं कल्याण करुन घ्यावं असे सर्वांना वाटतं. सर्वांचे प्रयत्न चालू आहेत. पण त्याप्रमाणे आपल्या पदरात काही फळ पडत नाही. जीव हा असमर्थ आहे. इच्छेप्रमाणे त्याला फळ प्राप्त करुन घेता येत नाही. सुख पाहिजे आणि दुःख सगळी जावीत अशी इच्छा आहे. हेच फळ आहे. पण ते आपल्या इच्छेप्रमाणे घडून येत नाही. सद्गुरू वासुदेवानंद सरस्वती-स्वामीमहाराजांनी एका ठिकाणी मुद्दाम उल्लेख केलेला आहे. ईश्वर आहे कशावरून? म्हणाले तुमच्या इच्छेप्रमाणे तुम्ही आपलं कल्याण करून घेऊ शकत नाही म्हणून ईश्वर मनाला पाहिजे आणि त्याची भक्तीही केलीच पाहिजे. नाहीतर काही ना काही आणखी प्रतिबंध उत्पन्न होतात. सुखाला अनेक प्रतिबंध आहेत. केवळ आपल्या सामर्थ्याने काही सुखाला असलेले प्रतिबंध दूर करता येत नाही.

***प्रश्न : महाराज, आपण चांगलं वागलं म्हणजे आपलं चांगलं होईल, आपोआप कल्याण होईल असं काहीजण म्हणतात ?***

उत्तर : मीमांसाकारांचं म्हणणं हेच आहे. ईश्वर ईश्वर कशाला म्हणायचं? काही जरुरी नाहीये. आपण चांगलं वागावे म्हणजे चांगलं फळ मिळते असे मीमांसाकार सांगतात.

पण त्या कर्मांना कुठे ज्ञान आहे? ते अचेतन आहे. चांगलं कर्म केलेले आहे हे जाणणारा कुणीतरी पाहिजे. म्हणजे तो त्याचं फळ देतो. कोणत्या वेळेला कोणत्या कर्माच फळ द्यायच, काय करायचं हे स्वतः आम्हालाही समजत नाही ना ! आम्ही जरी कर्म केली- सत्कर्म किंवा दुष्कर्म केली तरी ते आम्ही विसरून जातो. आणि विसरून जरी गेलो नाही तरी आमच्या कर्माच आत्ता फळ मिळाले पाहिजे असं आम्ही म्हणालो तरी तसं होत नाही. आमच्या इच्छेवर काही अवलंबून नाही. कर्मशक्ती जरी असली तरी त्या कर्मशक्तीला जाणणारा कुणीतरी पाहिजे.अर्थात तो सर्वज्ञ ईश्वर सिद्ध होतो. आपोआप मान्य करावं लागतं.

सर्वांच्याकडून झालेली जी कर्मे आहेत त्याचं त्या ईश्वराला ज्ञान आहे. सर्वांचा तो बुद्धीसाक्षी आहे. अंतर्यामी म्हणतात त्याला. सर्वही जीवांच्या अंतर्यामी तो आहे. प्रेरणा करणारा तो आहे. म्हणजे या जीवाकडून होणारी

सगळी कर्मं त्याला माहिती आहेत. त्या कर्मांचं फळ केव्हा द्यायचं वगैरे सगळं केवळ ईश्वरालाच माहिती आहे.

त्या ईश्वरशक्तीचं ज्ञान ज्यांना झालेलं आहे अशाप्रकारचे महात्मे लोक हे ईश्वराच्या भजनामध्ये संबंश आयुष्य घालवतात. इकडे त्याचं लक्ष नाहीये. संसारांत जरी असले तरी संसारामध्ये काही आसक्ती नाही. सर्वही विश्व ज्यांनी निर्माण केले आहे, तो विश्वाचा मालक आहे. सगळंच त्याचे आहे. परमात्मा श्रीहरी त्याची शक्ती या महात्म्यांनी जाणलेली आहे.

***प्रश्न : महाराज, भक्तीमार्ग सोपा आहे असं काहीजण सांगतात?***

उत्तर : भगवद्भक्तीसुद्धा सोपी नाहीये. फार कठीण आहे. कर्ममार्ग तर कठीणच आहे. ज्ञानमार्ग तर फारच कठीण आहे. योगमार्ग तर त्यापेक्षाही कठीण आहे. भक्तीमार्ग मात्र सुलभ आहे असं म्हणतात. पण नाहीये. भक्ती केव्हा निर्माण होते याबद्दल भगवान सांगताहेत अर्जुनाला -

येषां त्वन्तगतं पापं जनानां पुण्यकर्मणाम् ।
ते द्वंद्वमोहनिर्मुक्ता भजन्ते मां दृढव्रता : ।।७.२८।।

जर सुकृत घडली असली आपल्या हातून तर पापक्षय होतो. आणखी मन आपलं ईश्वराकडेच तन्मय होऊन जातं. प्रेम निर्माण होते. पुण्यकर्म केली पाहिजेत. आणि त्या पुण्यकर्मांनी पापक्षय होतो. आणि नंतर "तेद्वंद्वमोहनिर्मुक्ता भजन्ते" हे भक्तीचे स्वरूप आहे. कोणत्याहीरितीने सांसारीक मोह अंतःकरणात असून उपयोग नाही. म्हणजे ती खरी भक्ती आहे.

ईश्वराची भक्तीही करायची. इकडे संसारही करायचा. संसारात अनुकूलता जर टिकली तर ईश्वराची भक्ती टिकणार. देवाची आमच्यावर दया आहे. आमचं सगळं कल्याण आहे. आमची संकटं दूर करतोय आणि झाली नाही तर मग ईश्वराचं स्मरण नाही. त्या करिता अनन्य मनसः होणं म्हणजे ईश्वराचं स्वरूप, त्याची शक्ती कशी आहे हे समजलं पाहिजे. त्याकरिता असे ज्ञानी महात्मे असतील त्यांची संगती झाली पाहिजे. ते समजावून सांगतात. ईश्वर साक्षात्कार त्यांना झालेला आहे. त्यामुळे ते सांगत आहेत. वाचून नाही नुसतं. त्यामुळे त्यांच्या वाणीमध्येही सामर्थ्य आहे.

पटतं आपल्याला. टिकणं हे निराळं आहे. त्याच्याच कृपेने अखंड स्मरण अंतःकरणामध्ये उत्पन्न होऊ शकते. निरंतर ईश्वरस्मरणावाचून एक क्षणही जाणार नाही, अखंड स्मरण राहील असे त्यांच्याच कृपेने होऊ शकते.

***प्रश्न : महाराज, सद्गुरुंच्या कृपेने ईश्वराचे अखंड स्मरण जर घडले तर त्याचं फळ भक्ताला काय मिळते?***

उत्तर : ईश्वराचं अखंड स्मरण घडलं तर त्याची फळे सांगताहेत भागवतकार

अविस्मृती । कृष्णपदारविंदयो : ।
क्षिणोती अभद्राणि शमं तनोतिच ॥

त्याची सगळी अभद्र दूर होतात. मंगलमय जीवन होते आणि 'शमं तनोतिच' तिथे 'शम' म्हटलेलं आहे. वासना मनातल्या मनात कमी कमी होणं हा शम शब्दाचा अर्थ आहे.

मनातल्या मनांत वासना कमी कमी होत चालल्या म्हणजे पूर्ण शांती आहे.त्याच्या नंतर तिसरं फळ भगवत् स्मरणाच म्हणजे 'चित्तस्य शुद्धिम्' चित्त शुद्ध होणं. स्मरण होण्याला अगोदर चित्त शुद्ध झालचं पाहिजे, त्याशिवाय स्मरण हे होणार नाही. पण त्या स्मरणानंतर होणारी चित्ताची शुद्धी काही विलक्षण आहे. शुद्ध बुद्धी झालेली आहे आणि त्या शुद्ध बुद्धीमुळे ईश्वराची जी आज्ञा आहे त्या आज्ञेपासून केव्हाही बाजूला तो होत नाही. नेहमी ईश्वराज्ञा पालन करण्याकडे त्याचं लक्ष असतं.

***प्रश्न : महाराज, ईश्वराचे अखंड स्मरण रहाणे म्हणजेच पराभक्ती का?***

उत्तर : स्मरणभक्ती अखंड सुरू झाल्यानंतर पदरात पडणारी फळं म्हणजे अभद्राचा नाश, वासनाक्षय आणि चित्तशुद्धी. पण पराभक्ती ही पुन्हा वेगळी आहे. पराभक्ती जिला म्हणतात की दुसरे काहीही मागायचे नाही. ईश्वरस्वरुपाचा साक्षात्कार झाल्यानंतर जी भक्ती आहे ती पराभक्ती आहे. मनांत पूर्ण भक्ती आहे. पण ईश्वराकडे काहीही मागावसं वाटत नाही. कारण मनांत कोणतीच इच्छा राहिलेली नाही. शुभही नाही आणि अशुभही. निष्काम अंतःकरण झालेलं आहे. ईश्वराकडे काहीच मागावसं वाटत नाही. ही पराभक्ती.

*प्रश्न : महाराज, शास्त्रग्रंथ वाचून ज्ञान मिळवले तर त्यातून भक्ती आपोआप निर्माण होईल का?*

उत्तर : अनेक साधक गीता, उपनिषदे, पुराणे असे ग्रंथ वाचतात. त्यातील शब्दांचा अर्थ समजावून घेतात. योग्यप्रकारे अभ्यास केला तर शब्दार्थ समजतो. शब्दांचे अर्थज्ञान होणे हे वाईट नाहीये. परंतु अर्थज्ञानाचे कार्य म्हणजे त्याप्रमाणे प्रेम निर्माण झाले पाहिजे.

ज्ञानभूमिका ही काही वाईट नाहीये. पण केवळ शब्दज्ञानाने प्रेम निर्माण होईल किंवा न होईल हे त्या जीवाच्या पूर्वकर्मावर अवलंबून आहे. ईश्वराची कृपा पाहिजे त्यासाठी. ईश्वरस्वरुपाचे हे ज्ञान म्हणजे त्याची शक्ती केवढी आहे, अनादि व अनंत तो आहे. हे ज्ञान झाल्यानंतर जास्ती प्रेम उत्पन्न व्हावे लागते. परंतु ईश्वराची कृपा झाली तरच त्या ज्ञानातून ईश्वराबद्दल प्रेम निर्माण होत. शाब्दिक ज्ञानापेक्षा खरं ज्ञान जर झालं तरच ईश्वर प्रेम निर्माण होतं. ज्या ज्ञानामुळे ईश्वरभक्ती निर्माण झाली ते निश्चितच खरं ज्ञान आहे. खरा ज्ञानी हा भक्त असतोच. त्याला काही भक्ती करायला सांगायची जरुरी नाही. तो भक्तच आहे विभक्त नाही.

*प्रश्न : महाराज, तुकाराममहाराज म्हणतात, 'मनोवायुरुपा ओंकारस्वरुपा। विश्वाचिया रुपा पांडुरंगा॥' याचा अर्थ काय महाराज?*

उत्तर : तुकाराममहाराजांनी सांगितलंय, ईश्वराचं स्वरूप केवढं आहे, किती मोठं आहे, म्हणजे विश्वरूपी तो आहे. सर्व विश्व म्हणजे त्याचे स्वरूप आहे. त्यात केवळ मानवच येतील असं नाही. मानव आहेत त्याचप्रमाणे सगळे पशुपक्षीही त्याचीच स्वरूपं आहेत- ही वृत्ती अंतःकरणामध्ये उत्पन्न झाली म्हणजे अहंकाराचा काहीही संबंध नाही. निराभिमान होते त्यांची वृत्ती. अभिमान कधी पहायला सुद्धा मिळत नाही. मग तो जीव परमेश्वराच्या कृपेने संसार सागरातून तरुन जातो.

*प्रश्न : महाराज, स्वतःच्या बुद्धीतील दोष स्वतःच जाणून घेऊन दूर करता येणार नाहीत का?*

उत्तर : बुद्धीमध्ये कोणते कोणते दोष आहेत हे बुद्धीनेच समजून घेता आलं तर हरकत नाही, चांगलं आहे. पण तसं सहसा होत नाही.

मनाला स्वतःच्या गुणदोषांचा किंवा इतरांच्या गुणदोषांचा विचार करायचा अधिकार तरी कसा असेल? आणि तो झालेला विचार बरोबर तरी होतो की नाही हे कसं समजायचं?

म्हणून निर्विकार ज्याचं चित्त झालेल आहे, अशा प्रकारचे जे महात्मे आहेत त्यांच्याकडे जावं. संतांचे वाङ्मय वाचावे. हिताचा मार्ग दाखवणारे ते शब्द प्रमाण आहे. त्या शब्दप्रमाण असणाऱ्या शास्त्रांमध्ये सर्वही विचार केलेला आहे.

***प्रश्न : महाराज, व्यवहारात वागतांना संयम ठेवायचा म्हणजे अजिबात क्रोध येऊ द्यायचा नाही असंच म्हणायचं का?***

उत्तर : संयम हा मोठा गुण आहे. संयमाला प्राधान्य आहे. संयमाचा अर्थ क्रोध कमी किंवा अजिबात नसावा असा नाही. अगदी पूर्ण ज्ञानी जो मनुष्य आहे, त्याच्याजवळ कोणतेच विकार नसतात. त्यांचे चित्त निर्विकार झालेलं आहे. कोणताही क्रोध नाही, लोभ नाही. अहंकार नाही. कोणताही विकार ज्याच्या चित्तामध्ये नाही. आनंदपूर्ण असं मन आहे. शुद्ध मन आहे. द्वंद्वातीत अवस्था ही शेवटची अवस्था आहे.

परंतु व्यवहारामध्ये असणारे जे लोक आहेत, त्यांना द्वंद्वातच राहून संसार करायचा असतो. संसार करीत असतांनाही प्रत्येकाने परमार्थाचा थोडातरी विचार केला पाहिजे. त्यातच खरे कल्याण आहे. रागलोभ व्यवहारात जरुर आहेत. व्यवहारापुरते ते पाहिजेतच. मात्र त्यांचा अतिरेक टाळला पाहिजे. अतिरेक कोणताही वाईट. कामक्रोध जरुर हवेत. कामक्रोध नाहीसे होणे हे पुढचे काम आहे. परंतु व्यवहारात रहाणाऱ्याला कामक्रोध आवरता आले पाहिजेत. कामक्रोध आवरणारा तोही सुखी आहे. तोही योगी आहे. समाधी अवस्था त्यालाही आहे.

***प्रश्न : महाराज, गीतेत स्थितप्रज्ञाची जी लक्षणे सांगितली आहेत ती ज्ञानी महात्म्यांना सुद्धा प्रयत्नपूर्वकच मिळवावी लागतात का?***

उत्तर : आत्यंतिक दारिद्र्याच्या परिस्थितीमध्ये दुसऱ्याचे द्रव्य घ्यायचे नाही ही मनाची एक अवस्था आहे. काही आपल्याजवळ नाही. खायलासुद्धा मिळत

नाही.अशा वेळेला अगदी वाईट वाटतं. काही तरी थोडं मिळालं तरी बरे वाटते. वा! खायला नुसती भाजी भाकरी तरी मिळावी, हरकत नाही, असं वाटतं. पण मिळायला लागल्यानंतर ते थांबतं का? मन हे इतकं चंचल आहे, अस्थिर आहे की त्याच्यामध्ये इतके दोष उत्पन्न होतात की नाही? अन्न, वस्त्र निर्वाहापुरतं पाहिजे. पण ते मिळायला लागल्यानंतर जास्ती लोभ निर्माण होतो. याच्यापेक्षा अधिक का मिळू नये? त्यांना जास्ती मिळतं आम्हाला कां कमी मिळतं? मला त्याच्यासारखं कां मिळू नये? ही जी मनाची अवस्था आहे, हा जो स्वभाव आहे हा स्वभाव बदलायचा आहे. त्याच्याकरता विचार करायला पाहिजे, तप केलं पाहिजे. आपला स्वभाव बदलण्यासाठीच ईश्वराची उपासना केली आहे या सगळ्या संतांनी. ईश्वराची कृपा संपादन करून हे विकार त्यांच्या मनामध्ये उत्पन्नच होत नाहीत.

*प्रश्न : तुकाराममहाराज म्हणतात, "सोने आणि माती आम्हा हे मृत्तिके समान हे चित्ती" याचा अर्थ काय महाराज?*

उत्तर : सोनही जमिनीतूनच निघालं आहे, मातीही जमिनीचाच भाग आहे. न्यायशास्त्रकारांनी सुवर्ण हे तेजस म्हणून मानलेलं आहे. त्याचा जो भाग आहे. पिवळा रंग आहे, त्याचं गुरुत्व, जडपणा वगैरे हा सगळा पार्थिव भाग आहे. सोनं आटत नाही, पाणी आटूनजाते. पार्थिव भाग आहे तोही आटून जातो. परंतु तेज मात्र आटत नाही. कितीतरी आणखी अग्निजवळ सोने आणून लावले आहे. तेवढच राहील. पातळ होईल पण पुन्हा ते घट्ट होते. हा दिसणारा जो सोन्याचा भाग आहे, पिवळा रंग आहे, त्याचप्रमाणे जड पदार्थ आहे. वजन आहे. हे सगळे पार्थिव अंश त्याच्यामध्ये आहेत. तेव्हा शास्त्रदृष्टीने पाहिलं तर जमिनीतून निघालेलं सोनं आणि माती याच्यामध्ये अंतर काय आहे? हा जर पक्का मनाचा निश्चय झाला तर सोन्याबद्दल कधीही अभिलाषा उत्पन्न होणार नाही.

माती, सोने हे आम्हा मृत्तिकेसमान, हे नुसतं प्रवचन करीत नाहीत तुकाराम महाराज. ते आपला अनुभव सांगतात. हा एक तत्त्वविचार आहे. प्रत्येक वस्तूचं काय गुढ तत्त्व काय आहे तिथपर्यंत जाऊन विचार केल्याशिवाय आणखी तत्त्वज्ञान होणं शक्य नाही. देहामध्येच आपण थांबून बसलेले आहोत. देहाच्या पुढे जाण्याची आमची काही स्थिती नाही. विचारच आम्ही करीत

नाही. संसार हा देहात्मवादामुळे उत्पन्न झाला आहे. दुःख दुःख जे म्हणतात ते देहात्मवादामुळे उत्पन्न होतं. परंतु तत्त्वविचार करणारे जे महात्मे आहेत त्यांच मन हे शांत आहे. त्यामुळे त्यांना शांती आहे.

***प्रश्न : महाराज, तशी अवस्था, ही शांती कशी काय आम्ही मिळवायची?***

उत्तर : विचार करणारी जी बुद्धी आहे त्या बुद्धीमध्ये रागद्वेषादी विकार राहूच शकत नाहीत. विचाराने सगळं परिमार्जन करता येतं.

ज्ञानयोग म्हणून जो म्हणताहेत, देहापेक्षा काही तरी निराळं आहे. ते आत्मवस्तू, समजून घेतलं पाहिजे. देहापेक्षा आत्मा काही वेगळा आपल्याला दिसत नाही, हे खरं आहे. परंतु अनुमान प्रमाण आहे. तर्काने समजतं. वस्तुतः देहाचा नाश होतो शेवटी. त्याला टाकून देतात. त्या देहामध्ये असा कोणता पदार्थ आहे की ज्या पदार्थामुळे देहाचे व्यवहार व्यवस्थित चालले आहेत? कार्य करविणारा कोणीतरी आहे.

शरीराचं कार्य व्यवस्थित चाललेलं आहे. यावरून याचा एक कोणी तरी नियामक मानलेला आहे, शास्त्रकारांनी शब्द प्रमाण आहे ते ईश्वरतत्त्व म्हणून स्वतंत्र मानलेलं आहे. देहामध्ये राहणारा कोणीतरी मी एक स्वतंत्र, निराळा आहे हेच गीतेमध्ये अगोदर सांगितले आहे. गीतेचा अभ्यास करावा. संतांचे ग्रंथ वाचावेत. त्यांच्या कृपेने देहात्मबुद्धी गेली की ही अवस्था प्राप्त होते.

***प्रश्न : महाराज, योगाभ्यास करुन जर योगसामर्थ्य मिळवले, सिद्धी प्राप्त करून घेतल्या तर त्या योग्याची देहात्मबुद्धी जाईल का?***

उत्तर : सिद्धी म्हणजे काय? सिद्धी याचा अर्थ मानसिक शक्तींचा विकास असा आहे. पातंजल योगशास्त्रात अनेक सिद्धींचे वर्णन आहे. योगाभ्यास करुन त्या सिद्धी निश्चितच मिळवता येतात. पण कितीही सिद्धी मिळाल्या तरी त्यामुळे योग्याची देहात्मबुद्धी जाईलच असे नाही.

***प्रश्न : महाराज, चांगदेव पासष्टीतील पहिल्या ओवीचा गूढार्थ सांगावा अशी प्रार्थना आहे ?***

उत्तर : स्वस्ति श्री वटेषु जो लपोनि जगता भासू।
दावि मज ग्रासु प्रगटीला करी ।।

वटेश्वर चांगदेव त्यांचं नाव. वटेश्वर चांगदेवाचे स्वस्ति म्हणजे कल्याण असो. व्यवहार दृष्टीने सुद्धा त्या ज्ञानाचा किती सुंदर उपयोग झालेला आहे. तुम्ही ज्ञानेश्वरांना लहान समजत असाल. लहानांनीसुद्धा मोठ्यांचं कल्याण व्हावं असं म्हणायला काही हरकत नाही. व्यवहारदृष्टीने काही चूक नाही दोन्ही दृष्टीने. लहान असो ज्ञानेश्वर किंवा मोठे असो. स्वस्ति वाचन केलेलं आहे. कल्याण असो. आणि त्यांची दृष्टी अशी आहे. जो लपोनि जगदाभासु दावि मज ग्रासु प्रगटीला करी.

चांगदेव म्हणजे देह समजत नाहीयेत. आत्मतत्त्व, सर्वत्र एक आत्मा आहे आणि तो सर्वत्र राहातो आहे. तो आत्मा लपलेला आहे. झांकला गेलेला आहे अज्ञानाने, आणि त्यामुळे जगदाभास निर्माण झालेला आहे. तो जर प्रगट झाला,आत्मज्ञान झालं तर हा आभास नाहीसा होईल.

म्हणजे ज्ञानेश्वर सर्वत्र आत्मदृष्टीने पहातात. भौतिक दृष्टीने, केवळ देहदृष्टीने पहातच नाहीत. मी लहान आहे, तू मोठा आहेस हे सगळं देहाचं आहे. चांगदेव अद्यापि शरीरापर्यंतच आलेले आहेत. शरीराच्या पुढे गेलेच नाहीत. आत्मवस्तूपर्यंत जायचं आहे. मी आत्मा आहे, आनंदरूप आहे. मी निर्विकार आहे. मी आणखी असंग आहे, अजरामर आहे, हे सगळं आत्मवस्तूचं ज्ञान आहे.

***प्रश्न : महाराज, देहात्मबुद्धी जावी, देहत्रयातीत आत्मा कसा आहे हे समजून घ्यावं यासाठी आम्ही काय करावं ?***

उत्तर : ज्ञानयोग म्हणून जो आहे त्याचा विचार केला पाहिजे. तत्त्वविचार सारखा झाला पाहिजे. तो तत्त्वविचार करण्याकरता म्हणून बुद्धी आणखी स्थिर बनवली पाहिजे. ज्ञानयोग हा विचाराधीन आहे. चांगला विचार मनाने करता आला पाहिजे. त्या मनाची स्थिती अत्यंत स्थिर बनवली पाहिजे. ती स्थिर बनवण्याकरता आणखी उपाय आहेत. कर्ममार्ग आहे. अष्टांग योगमार्ग आहे, भक्तीमार्ग आहे.

***प्रश्न : महाराज, कर्मयोग, भक्तीयोग, ज्ञानयोग यापैकी कोणता मार्ग आपल्यासाठी आहे हे आम्ही कसं निश्चित करायचे?***

उत्तर : प्राचीन धर्मशास्त्रांनी आत्मोद्धार करण्याकरता भगवत्‌गीतेमध्ये कर्मयोग, ज्ञानयोग, भक्तीयोग आणि अष्टांगयोग असे चार उपाय सांगितलेले आहेत.

उपनिषदामध्ये भगवत्‌गीतेमध्ये यांचे स्पष्टीकरण केलेले आहे. उपाय जरी चार असले तरी सर्व काही त्याचे अधिकारी नाहीयेत. महाविद्यालयामध्ये विद्येच्या शाखा अनेक असतात म्हणून काही प्रत्येक विद्यार्थी सगळ्या शाखेत जाऊ शकत नाही. ज्या विषयांचा अभ्यास करण्याची योग्यता असते त्याच विषयांचा तो अभ्यास करतो. तसंच पारमार्थिक दृष्टीने हे जे उपाय आहेत. कर्म, ज्ञान,भक्ती, अष्टांगयोग वगैरे. यातही अधिकारी आहेत. अधिकार योग्यता पाहिजे. कोणीही कोणत्याही विषयाचा अभ्यास करावा असे नाहीये. "अधिकार तैसा करु उपदेश" संत सांगताहेत.

संतमहात्मे समोरच्या जीवाचा अधिकार, योग्यता ओळखून त्याने कोणता मार्ग स्वीकारावा हे सांगू शकतात. ईश्वराच्या कृपेनेच संतांची भेट होते. त्यांची संगती घडते आणि त्यांच्यापासून मार्गदर्शन मिळू शकते.

***प्रश्न : महाराज, गायत्री मंत्राचे महत्त्व एवढे का सांगतात?***

उत्तर : या गायत्री महामंत्रामध्ये जे ईश्वराचं स्वरुप सांगितलं आहे, त्याचा अर्थ समजावून घेऊन त्याप्रमाणे जर जप झाला तर ती ईश्वराची मोठी उपासना आहे. गायत्रीमंत्राचा अर्थ समजावून घेतला पाहिजे व नियमितपणे त्या मंत्राचा जप केला पाहिजे. अगदी बालवयापासूनच जर हे झालं तर पुढे त्याच्या आयुष्यात त्याला व्यावहारिक कल्याणही साधता येईल आणि पारमार्थिक अधिकारही प्राप्त करून घेता येईल.

***प्रश्न : महाराज, उपासनामार्ग हाच खऱ्या सुखाचा मार्ग आहे असं का म्हणतात?***

उत्तर : केवळ अर्थार्जन करणे आणि विषयभोग घेणे यांत काही समाधान नाहीये. आपल्याला वाटतं पुष्कळ संपत्ती मिळाली, पुष्कळ पगार मिळाला म्हणजे आपण सुखी होऊ. पण किती तरी संपत्ती ज्या देशामध्ये आहे त्या देशातली मंडळी सुखी नाहीयेत. उपासनामार्ग हा खऱ्या सुखाचा मार्ग आहे. व्यक्तिशः आपलं कल्याण करुन घेण्याकरता ईश्वराची उपासना सतत चालू पाहिजे.

संसारात राहूनसुद्धा आपली योग्यता वाढवता येते आणि ईश्वराची उपासना करता येते. ज्ञानेश्वरीसारखे ग्रंथ वाचावे व धर्मशास्त्राची जी आज्ञा आहे

त्याप्रमाणे आचरण करावे म्हणजेच खरे सुख मिळेल हे सर्व संत सांगताहेत.

***प्रश्न : महाराज, ईश्वर शक्ती मानणं व उपासना करणे यातच व्यक्तीचे, समाजाचे आणि राष्ट्राचे कल्याण आहे असं म्हणता येईल का?***

उत्तर : सर्वांच्या बुद्धीला प्रेरणा देणारी शक्ती एक ईश्वरशक्तीच आहे. सर्वांच्याच बुद्धीला ईश्वराचीच प्रेरणा आहे. त्याचंच कार्य आहे. समष्टी म्हणजे ईश्वर आहे हे आपल्या शास्त्रकारांनी सांगितलेलं आहे. शेवटच्या पसायदानामध्ये ज्ञानेश्वर महाराजांनी बुद्धी कशी असावी, कशी बनवावी हेच सांगितलं आहे. बुद्धीचा विकास तसा झाला पाहिजे तरच त्या व्यक्तीचं कल्याण आहे, समाजाचे, राष्ट्राचे कल्याण आहे. असा बुद्धिविकास झाला पाहिजे. 'भूता परस्परे पडो मैत्र जीवाचे' हीच प्रार्थना ज्ञानेश्वरमहाराजांची आहे.

ज्ञानेश्वरमहाराजांनी केलेली प्रार्थना राष्ट्रकल्याण करणारी आहे. परस्परांबद्दलचे ऐक्य नष्ट झालं तर काय भयानक परिस्थिती निर्माण होते ते आपण रोज वाचतोच आहोत पेपरमध्ये. सर्वांनी एकमेकांवर प्रेम करावे असा काय कायदा करणे शक्य होईल का? त्याकरता बुद्धीला प्रेरणा करणाऱ्या ईश्वराची शक्ती जर मान्य झाली, त्याची प्रार्थना झाली तर त्या प्रार्थनेला अनुसरुन सगळ्या मंडळींची बुद्धी एकत्र येऊ शकेल. परस्परांचे सौहार्द्र निर्माण होऊ शकेल.

परस्परांवर प्रेम करायचं म्हणजे त्यात काहीतरी त्याग आलेला आहे. आपल्या स्वतःच्या फायद्याकडे जोपर्यंत लक्ष आहे तोपर्यंत हे प्रेम वगैरे वरकरणी आहे. म्हणून संत महात्म्यांनी जे काय मागायचे ते देवाकडे मागितले आहे. त्यांची जी मागणी आहे ती राष्ट्रहिताची आहे. सर्व समाजाच्या हिताची आहे. केवळ व्यक्तीकरता नाही. संतांनी ईश्वरशक्तीची उपासना करुन शांती मिळते की नाही पहा असे त्यांनी स्वतः अनुभव घेऊन सांगितले. ज्ञानेश्वरमहाराजांनी पसायदानामध्ये सांगितलेला बुद्धिविकास वेगळा आहे.

हल्ली जो बुद्धिवाद आपण पहातो - ईश्वर नाही, परलोक नाही, धर्म नाही, धर्मातीत राज्यपद्धती करुन टाकणं हा बुद्धीवाद नाही. आपल्या बुद्धीला प्रेरणा करणाऱ्या ईश्वरशक्तीची उपासना करणे, ध्यान धारणा करणे, तिचे ज्ञान मिळवणं असं किती तरी संतांनी सांगितले आहे. त्या उपासनेच्या योगाने मानसिक शांती मिळते, आरोग्य लाभते. म्हणून संतांनी हा उपदेश केलेला आहे. कोणी

कबूल करा किंवा न करा. दुसऱ्याची, समाजातल्या लोकांची दुःख त्यांना पहावत नाही. दयाळू असल्यामुळे सर्व जीव दुःखातून दूर व्हावेत असं त्यांना वाटतं आणि तसे ते प्रयत्न करतात. त्या दयेमुळे हा उपदेश ते करीत असतात आणि तो उपदेश ज्यांना पटलेला आहे ते त्या मार्गाने जाऊन शांती व सुख प्राप्त करुन घेतात.

***प्रश्न : महाराज, प्राचीन ऋषीमुनींना बुद्धिवाद मान्य नव्हता असे काहीजण म्हणतात. ते तसे म्हणणे बरोबर होईल का?***

उत्तर : प्राचीन ऋषीमुनी किंवा प्राचीन शास्त्रांचा अभ्यास करणारे केवळ अंधश्रद्धा ठेवणारे नाहीत. तेही बुद्धिवादीच होते. पुष्कळ युक्तिवाद त्यांनी मांडला आहे. ईश्वर नाही म्हणणाराही युक्तिवाद त्यांच्याकडे आहे. ईश्वर आहे असे सिद्ध करणारा युक्तिवादही त्यांच्याकडे आहे. परंतु आधुनिक बुद्धिवादी आम्हाला हे पटत नाहीत हे एकच उत्तर देऊन मोकळा होतो. त्यामुळे हे सगळं अशक्य आहे. असंभवनीय असं वाटतं. आमची बुद्धी इतकी संकुचित झाली आहे की, चमत्कार म्हणून जे वाटतात ते "आम्हाला पटत नाही" उत्तर देऊन आम्ही मोकळे होतो. परंतु वाटेल तितका बुद्धीचा विकास होणं शक्य आहे हेच प्राचीन शास्त्रज्ञ सांगताहेत. प्राचीन शास्त्रज्ञांनासुद्धा बुद्धिवाद मान्य आहे. नुसतं वेदशास्त्राचे अनुसरण करून ते जातात असं नाहीये.

शास्त्राचे संस्कार ज्या बुद्धीवर झाले आहेत तीच बुद्धी जाणू शकते. म्हणून शास्त्रांत सांगितलेले संस्कार आपल्या बुद्धीवर करून घ्या. बुद्धीची सुधारणा करून घ्या आणि नंतर बुद्धीवाद वापरा तुम्ही असे. प्राचीन शास्त्रज्ञ सांगतात बुद्धीवाद नंतर. आधी प्रमाण कोणतं आहे, प्रमेय कोणतं आहे ते समजून घ्या असं शास्त्र सांगते. संत महात्म्यांची त्याकरता आवश्यकता आहे. शास्त्रावर किंवा संतांच्या शब्दावर विश्वास ठेवा एवढंच ते सांगतात. आणि तो विश्वास ठेवून त्यांच्यापासून जर मार्गदर्शन घेतलं त्या आपल्या बुद्धीची सुधारणा कशी करायची, हे समजून येतं.

भौतिक विकास चाललेलाच आहे. पण भौतिक विकासापेक्षा बौद्धिक विकासाला जास्त महत्त्व आहे. तेच शास्त्रे सांगत आहेत. शास्त्र हितैषी आहे. हिताचेच सांगतंय.

***प्रश्न : महाराज, संसारात प्रतिकूलता असली, दारिद्य असले, तरीही समाधानात रहाता येते का?***

उत्तर : तुकाराममहाराजांच्या संसारात काय होते? सगळेच प्रतिकूल होते. असे जरी असले तरीसुद्धा तुकाराममहाराजांनी एकदा "जय जय रामकृष्ण हरी" म्हणून भजनाला सुरुवात केली की सगळं विसरायचे. संसाराचे भान नाही. देहभान सुद्धा नाही. सात सात दिवस भजन करीत बसायचे. अन्न नाही, पाणी नाही. अशा अवस्थेत ते आनंदाने राहू शकतात. सांसारिक परिस्थिती सुद्धा किती विचित्र आहे. सुखाची साधनं म्हणून जी समजली गेलीत ती काही नाहीत तुकाराममहाराजांच्या संसारात तरीसुद्धा आनंद आहे. दुसऱ्यांना आनंद देताहेत.

संसाराकडे लक्ष उेऊनही आपल्या इच्छेने सर्व अनुकूल परिस्थिती येते का हाही विचार केला पाहिजे. सुखासाठी, आपलं दुःख दूर होण्यासाठी आपले किती प्रयत्न चाललेले आहेत. पण त्या प्रयत्नांना आपल्या इच्छेप्रमाणे फळ काही आपण मिळवू शकत नाही हे प्रत्येकाला कबूल करावं लागतं. म्हणून संतांची चरित्रे ही अखंड वाचून, त्याचा निदिध्यास करायचा आहे. म्हणजे मनाची स्थिरता होते. त्या स्थिर मनाला ''नारायण'' विषय मिळाल्यानंतर त्याच आनंदात ते मन निमग्न होते. ''विषय तो त्यांचा झाला नारायण.''

आणि त्यांची उपेक्षा नारायण कधीही करीत नाही हेही तितकंच खरं आहे. ज्यांची तितकी तयारी झालेली आहे त्यांची 'योगक्षेम वहाम्यहम्' ही जबाबदारी त्याने (ईश्वराने) घेतलेली आहे. ईश्वराच्या शक्तिवर पूर्ण विश्वास असल्याने संत महात्मे त्यांच्या अखंड चिंतनात निमग्न असतात. आपण चुकलो, आपला मार्ग योग्य नाही असं कधीही त्यांना वाटत नाही.

***प्रश्न : महाराज, आळंदीला श्रीज्ञानेश्वर समाधी लावून बसले आहेत. समाधी लावून बसल्यावर शरीर तसेच राहू शकते का?***

उत्तर : ज्ञानेश्वरमहाराज बसले आहेत समाधी लावून सातशे वर्ष. त्या समाधी स्थानाची शिळा निवृत्तीनाथांनी लावून ते स्थान बंद केले. प्राण स्थिर झाल्यानंतर शरीर विकल होत नाही. शरीर पडत नाही. शरीर सडत नाही. समाधी लावून

बसलं म्हणजे शरीरामध्ये प्राणवायू स्थिर होतो. तहान भूक संपते. मग समाधी लावल्यावर शरीर अभ्यासाने तसेच राहू शकते. श्रीज्ञानेश्वरमहाराज समाधी लावून बसले आहेत याचा अर्थ ते गेले असा होत नाही. ते नाहीतच असा होत नाही. ते गेले असे का समजायचे? ते तेथे आहेतच.

***प्रश्न : महाराज, समाधीच्या आतील भागाचा फोटो काढला तर श्रीज्ञानेश्वरमहाराज तेथे समाधीमध्ये बसलेलेच आहेत असं दाखवता येणार नाही का?***

उत्तर : खरोखर ज्ञानेश्वरमहाराज आत आहेत की नाही हे बाहेरून आधुनिक उपकरणांच्या सहाय्याने फोटो वगैरे काढून पहावं असं काही लोक मागे म्हणाले होते. पण शेवटी तिथल्या विचार मंडळींनी या संशोधकांना सांगितलं, "तुमच्या उपकरणामध्ये सामर्थ्य असेल. पण जर त्यामध्ये आतला फोटो आला नाही तर ज्ञानेश्वरमहाराज समाधीमध्ये आता नाहीत हेच तुम्ही प्रसिद्ध करणार. आधुनिक विज्ञानाला महत्त्व आहे तुमच्या दृष्टीने. सगळ्यांची खात्री होणार की ज्याअर्थी समाधीमध्ये फोटोत ज्ञानेश्वरमहाराज दिसत नाहीत त्याअर्थी ते तिथे आता नाहीत. म्हणजे किती लोकांचा बुद्धिभेद होणार?"

गुलाबरावमहाराजांची गोष्ट सांगतात. एक फोटोग्राफर आला आणि त्यांना म्हणाला, 'महाराज, तुमचा फोटो काढतो.'

त्यांनी सांगितलं, ''फोटोबिटो काही काढायचा नाही.''

बरं, म्हणाला.

संध्याकाळच्या वेळेला काही मंडळी बाहेर निघाली, हेही निघाले फिरायला. त्या फोटोग्राफरने चौघांचा एकदम फोटो घेतला. बाकीच्या तिघांचा त्यांतून फोटो पुसून महाराजांचा फक्त फोटो ठेवायचा असा त्याचा विचार होता. त्याप्रमाणे त्याने फोटो घेतला. दुसऱ्या दिवशी सकाळी परत आला. महाराज त्या वेळेला पूजा करीत बसले होते. त्यांनी सांगितले महाराज, तुमचा फोटो गेला. बाकीच्या तिघांचे फोटो आले.

म्हणजे विज्ञानाची शक्ती मोठी आहे. परंतु संतांच्या संकल्पाची शक्ती त्याहून मोठी आहे.

*प्रश्न : महाराज, पापी लोकांची उपेक्षा करा असे योगशास्त्रकार का सांगतात? पण भगवान श्रीकृष्णांनी तर अर्जुनाला कौरवांशी युद्ध करायला सांगितले. त्याला असे का करायला सांगितले?*

उत्तर : पापी लोकांची उपेक्षा करावी असे त्यांनी सांगितले आहे. त्याने पापी माणसाची उपेक्षा करायची. आपण जेव्हा आपल्याला चांगली मनोभूमिका मिळावी म्हणून अभ्यास करतो त्यावेळी हे सांगतात. अर्जुनाला भगवंतांनी त्या विशिष्ट वेळी तुला उपेक्षा करुन युद्ध सोडून जाता येणार नाही असे सांगितले. म्हणजे ही महर्षि मंडळी नुसती ''अहिंसा परमोधर्मः म्हणून गप्प बसत नाही.

ज्याला आपली पारमार्थिक उन्नती करून घ्यायची आहे, व्यवहार कमी कमी करत आणायचा आहे, त्याच्याकरता उपेक्षा हा उपाय आहे. मैत्री, करुणा, मुदिता, उपेक्षा वगैरे यांच्या अभ्यासाने मनोवृत्ती पुष्कळ शांत होतात. ह्याने असं केलं, तो तसं बोलला, त्याचे वागणे असे आहे या सगळ्या गोष्टीचा आपल्याला राग येतो, त्याचा उपयोग काय आहे? यावर उपेक्षा हा एकच इलाज आहे. तुम्हाला जर मनःशांती हवी असेल तर तुम्ही उपेक्षेचाच अभ्यास केला पाहिजे. तुम्ही एकटे काही प्रतिकार करू शकत नाही. त्याकरता काळ वेळही पहायला पाहिजे. आपली वृत्ती आधी व्यवहार सोडायला तयार आहे का? हे आधी तपासले पाहिजे.आणि तो व्यवहार सोडण्याच्यादृष्टीने हे सर्व उपाय आहेत.

*प्रश्न : महाराज, आनंद हा आंत हृदयात शोधायचा का बाहेरच्या जगांत शोधायचा?*

उत्तर : शोध केला पाहिजे. पूर्ण सुख बाहेर आहे का आंत आहे? संतमहात्मे सांगतात की तो परमात्मा जर आच्छादित झाला म्हणजे सगळं जग दिसायला लागतं आणि तो परमात्मा जर प्रगट झाला तर सगळं जग व्यापून टाकतो. ज्ञानेश्वर महाराजांनी उपनिषदांचा सिद्धांत या एका ओवीत सांगितला आहे तो असा की, आत्मरुपी परमात्मा आवृत्त आहे. आत्मा आनंदरूप आहे. आत्मरूप स्वतः आनंदस्वरूप असतांना जीवाची बाहेर आनंद शोधायची किती धडपड चाललीये. वैयक्तिक प्रयत्न काय, सामुदायिक प्रयत्न काय, सगळं चाललेलं आहे. पूर्ण सुख आंत असतांना माणसाचा बाहेर सुखाचा शोध चाललेला आहे.

***प्रश्न : म्हणजे महाराज बाहेर संसारात सुख किंवा आनंद नाहीच असे संतांना म्हणायचे आहे का?***

उत्तर : आनंद वाटतो याचा अर्थ तेवढ्या वेळेपुरतं मन शांत झालं. त्या शांत अवस्थेमध्ये मनाची स्थिरता झाल्यावर तो आत्मानंद प्रभावित होतो, प्रतिबिंबित होतो. तोच आनंद मिळतोय. पण तो धनाने, कीर्तीने मिळाला असं आपण समजतो. मन स्थिर झाल्यावर तोच आत्मानंद बाहेरुन मिळतो. बाहेरच्या साधनांनी संसारामध्ये जो आनंद मिळतो तो न टिकणारा आहे. धनाने, कीर्तीने, मानसन्मानाने आनंद मिळतो की नाही? मिळतो. पण टिकतो का? हे विचारल्यावर त्याचे उत्तर नाही असंच द्यावे लागते.

***प्रश्न : महाराज, श्रीज्ञानेश्वरमहाराज सांगतात - '***

> ***'परि मने वाचा देहे ।***
> ***जैसा जो व्यापार होये।***
> ***तो मी करीत आहे ।***
> ***ऐसे न म्हणे ।।''***

***.....माऊलीच्या या उपदेशात काय गूढार्थ आहे?***

उत्तर : मन सगळे वासनांनी भरलेले आहे. त्यामुळे अनंत चिंता मनांत आहेत. धनाची चिंता, मुलाबाळांची चिंता, आप्तेष्टांची चिंता, मम मम वाटणाऱ्या सर्वांची चिंता. याचं कसं होईल? त्याचं कसं होईल? या चिंतांमुळे भक्ती घडत नाही. वासनांमुळे घडणारी कर्मे साहंकार कर्मे होतात. तो अहंकार धरू नका असं ते सांगताहेत. कोणचीही क्रिया शरीराने, मनाने किंवा वाणीने घडते, तरी मी करतो आहे, मी केले आहे, माझ्याकडून झालेले आहे असे समजू नका. प्रेरणा देणारा तो परमात्मा आहे. इंद्रियांना, मनाला, बुद्धीला, शरीराला तो परमात्मा प्रेरणा देतो आहे. त्याच्या प्रेरणेने हे घडले आहे असे त्याच्यावर टाकता आले पाहिजे.

मनाने घडलेली कर्मे अहंकारपूर्वक करु नयेत. कर्मे होऊ देत. कर्मे घडू देत. मनांत येईल तसा वागलो. कोणाला बोललो तरी हरकत नाही. वाणीनेही तसंच चाललंय. देहानेही तसंच चाललंय. पण ते कर्म मी केलयं असं समजू

नका. माझं कर्तृत्त्व आहे एवढं तरी समजू नका. तर ती कर्म जन्माला कारण होणार नाहीत.ती कर्म इथेच संपली. कर्म लगेच संपताहेत.

दुसऱ्याला उद्वेग वाटेल असं बोललो. शब्द आपण उच्चारले .ते आपल्या मनाला लागले. ही शब्दात्मक वाणी आहे. स्तुती केली, निंदा केली, रागावून बोललो. तो शब्दच. शब्द उत्पन्न झाला आणि गेला. संपला तो. असं जर झालं तर कर्म रहाणारच नाही. शरीराचेही कर्म तसेच. ते कर्म झालं आणि संपून गेलं. मागं काही राहिलं नाही. मी केलेलच नाही. मग त्याचे संस्कार मनात राहणारच नाहीत. कर्म संपणारी आहेत. संपून जाताहेत. पापही रहात नाही, पुण्यही रहात नाही.

ज्या कर्माचा अहंकार, अभिमान धरला, ते जीवाला चिकटते. पण अहंकार धरला नाही तर ते परमेश्वराला समर्पण होते असा वेदांताचा सिद्धांत आहे. ज्ञानदेवही तेच सांगताहेत. मनाने, वाणीने आणि देहाने जी क्रिया होईल ती मी केली आहे असे समजू नका. ही एक मुक्तीच सांगितली आहे ज्ञानदेवांनी. समजा हातून काही घडलं. त्यावेळी विचार करावा झालं असं, बोललो मी काही, केलं मी काही. पण इंद्रियांना, मनाला, बुद्धीला प्रेरणा देणारा तो आहे.

केनापि देवेन हृदिस्थितेन। यथानियुक्तोसि तदा करोमी ।।

घडलेलं सगळं त्याच्यावर टाकता आलं पाहिजे. काही चांगलं कर्म घडलं, काही पुण्यकर्म घडलं, कोर्टात काही केस जिंकली. मी केलं असा अभिमान उत्पन्न झाला तर मनाची काय अवस्था होईल? अहंकार जास्तच वाढत जाणार ना? अहंकार कमी होईल का? मी केलंय, कर्तृत्त्व माझं आहे. एवढं तरी समजू नका.तर ती कर्म पुन्हा जन्माला कारण होणार नाहीत. मी ते कर्म केलेले आहे असे वाटले की त्याचे संस्कार त्याच्या वासना मनात कायम रहातात. म्हणजे पुन्हा तसं कर्म करण्याची तयारी करून ठेवली आम्ही. कोणीही आम्हाला बोलला की आम्ही बोलल्याशिवाय रहाणार नाही. मी सहन करणार नाही. हाच अभ्यास आमच्या मनाचा कायम राहिल्यावर पुन्हा कर्माची तयारी आहे. मी कर्म केले असा अहंकार झाला की ते कर्म जन्ममरण कायमचे देणारे ठरते. पण कर्माचे कर्तृत्व आपल्याकडे घेतले नाही की कर्मे संपून जातात. मग मनांत संस्कार रहात नाहीत, मग पापही रहात नाही आणि पुण्यही रहात नाही.

*प्रश्न : ज्ञानदेव सांगतात,*

*करणे कां न करणे । हे आघवे तोचि जाणे ।*

*विश्व चलतसे जेणे । परमात्मेनि ।*

*....या ओवीचा गूढार्थ काय आहे महाराज ?*

उत्तर : ज्ञानराज सांगताहेत, कोणते कर्म करावे आणि कोणते कर्म करू नये याचे ज्ञान आपल्याला नाही. हे ज्ञान फक्त परमात्म्याला आहे. तो सर्वज्ञ आहे. तो पूर्ण ज्ञानसंपन्न आहे. तो चिद्रूप आहे. तो सच्चिदानंदघन आहे. कर्मे कितीतरी होताहेत. सगळं जग निर्माण करणं, संरक्षण करणं. संहार करणं ही ईश्वराची कर्मे चाललेली आहेत.

मूळ विचार हा आहे की कर्तृत्व हे आपले आहे की नाही. माझ्या बुद्धीने सगळे झालेले आहे. माझ्या वाणीने सगळे झालेले आहे. माझ्या शरीराने मी सगळे करतो. हे खरे आहे का? जेव्हा आपण आजारी पडतो, तेव्हा आपण आपल्या शरीराने ते कर्म करू शकतो का? जेव्हा एखाद्याच्या वाणीवर परिणाम होतो तेव्हा त्याला बोलता येते का? जेव्हा एखाद्याची बुद्धी कमी होते, तेव्हा त्याला ते कर्म करता येते कां? पूर्वी करत होता. पण आता करता येत नाही. अपवाद असे सापडल्यावर तो नियम संपला. मी सगळं केलेलं आहे ही फक्त माझी समजूत आहे. वस्तुस्थिती तशी नाही.

संतमहात्म्यांनी ओळखलेले आहे की खरा सिद्धांत वेगळा आहे. कोणच्या जीवाकडून कोणची कर्मे व्हावीत हे जाणणारा तो परमात्मा आहे. 'विश्व चलतसेजेणे । परमात्मेनि' यात ज्ञानदेवांनी वेदान्ताचा फार मोठा सिद्धांत सांगितला आहे.

वेदान्तशास्त्रात परमात्म्याची जी स्वरुपे सांगितली आहेत ती अशी आहेत. विराट स्वरुप आहे. श्रोत्र आत्मा आणि अंतर्यामी आहे आणि परब्रह्म आहे. त्यांत श्रोत्र आत्मा म्हणून जे परमात्म्याचे स्वरुप सांगितले आहे ते समजून घेतले पाहिजे. "हिरण्यगर्भ श्रोत्र आत्मा प्राण इत्य विधियते ।"

व्यवस्था जी केलेली असते, शहराची म्हणा, राज्याची म्हणा. ती कशी असते? ठिकठिकाणी कार्यालये असतात. त्या कार्यालयात काम करणारी माणसे असतात. त्यांना कामे नेमून दिलेली असतात. एका एका कार्यालयात,

एका एका कक्षात कामे चालू असतात. शहराचा एक अधिकारी असतो. त्या शहराची, जिल्ह्याची जी सगळी कामे असतात त्यांची जबाबदारी त्या अधिकाऱ्यावर असते. समष्टी आणि यष्टी. यष्टी म्हणजे एक वैयक्तिक काम एका विशिष्ट पोलीसाकडे दिलेले असते. समष्टी म्हणजे संबंध जिल्ह्यामध्ये काम करणारे पोलीस व इतर कर्मचारी या सर्वांची जबाबदारी जो मुख्य अधिकारी असतो त्याच्याकडे असते.

आपल्या शरीरातसुद्धा अशीच सर्व व्यवस्था असते. कर्मेंद्रिये आहेत, ज्ञानेंद्रिये आहेत. या सर्वांची जबाबदारी घेणारा एक जीवात्मा आपल्या शरीरात आहे. त्या जीवात्म्याकडून त्या त्या इंद्रियाचे काम चालू आहे. शरीरांतील सर्व इंद्रियवर्गाकिडे पाहणारा एक अधिकारी हिरण्यगर्भ म्हणून आहे. ईश्वराचेच स्वरुप आहे तो. सर्व इंद्रियाकडून करता येतात. ते मूळ कनेक्शन आहे.

घरात वीजेचे अनेक दिवे असतात. त्या सर्वांचे मूळ एक विजेचे कनेक्शन असते. जर मूळ कनेक्शन बंद केले तर दिव्याची बटणे दाबली तरी कोणताही दिवा लागत नाही. त्याप्रमाणे संपूर्ण शरीराचा मूळ तो सूत्रात्मा आहे, अधिष्ठाता आहे, नियामक आहे, त्याच्यामुळे चलनवलन होते आहे. म्हणजे मग मी करतो आहे असे कसे म्हणायचे? संतमहात्मे हाच सिद्धांत अनुभव घेऊन सांगताहेत. सर्वमनाचा, सर्व बुद्धीचा, सर्व प्राणांचा नियामक तो परमात्मा आहे. त्याच्यामुळे सगळ्या क्रिया चालू आहेत. मग मी केलेले आहे, माझ्या बुद्धीने केले, माझ्या शरीराने केले, माझ्या वाणीने केले असे कसे समजायचे?

परमेश्वराचे जे सूत्रात्मा आहे, त्याच्या प्रेरणेने हे सगळे चालू आहे. ते का चालू आहे हे आम्ही सांगू शकत नाही. त्याची इच्छा आहे. ती इच्छा त्याला का झाली हेही आम्ही जाणून घेऊ शकत नाही. सर्वांना परमेश्वराची प्रेरणा आहे. त्याच्या प्रेरणेने सर्व झाले म्हटल्यावर पाप किंवा पुण्य हा भेदच मनातून निघून जातो. माझ्या हातून पाप झाले म्हणून कदाचित पश्चाताप झाला तर ते चांगलं आहे. पण पश्चातापही व्हायचं कारण नाही. कर्म करताना मुख्य सिद्धांत लक्षात आहे. परमेश्वराच्या प्रेरणेने हे झाले आहे. परमात्माच चैतन्यरुपाने सूत्रात्मा किंवा हिरण्यगर्भ आहे. विराट स्वरूपही तोच परमात्मा आहे. अंतर्यामी

हे परमेश्वराचे मुख्य स्वरुप आहे. सर्वही मळांचे अधिष्ठान आहे. सर्व परमात्माच चालवतो आहे.

असे असतांना आम्ही अहंकार धारण करतो. मी कर्म करतो असं आपण मानतो आणि ती सगळी कर्म आमच्याच जन्ममरणाला कारण करुन ठेवतो. कर्म जाणारी आहेत, संपणारी आहेत. पण ते कर्म पाठीमागे लागते याचा अर्थ निष्कारण अहंकार. आपली इंद्रिये, वाणी आपल्या ताब्यात नसतात. आपल्या इच्छेप्रमाणे सर्व इंद्रियांकडून कर्म का घडत नाहीत?

अहंकार धारण करुन मी केलेले आहे, मी करणार आहे असं जर म्हणायचं झालं तर मी आहेच की कायम! मृत्युपर्यंत तो अहम् कायम असतो. पण याची इच्छा शेवटपर्यंत पूर्ण का होत नाही. सर्वही कार्य, सर्व इच्छा शेवटपर्यंत आपण पूर्ण करू शकत नाही. याचे कारण काय? निसर्ग हे उत्तर नाही. पळवाट आहे ती. निसर्गाने होते असे उत्तर देता येत नाही. परमात्मा आहे आणि तोच सर्व चालवतो आहे हेच कबूल केले पाहिजे.

ज्ञानेश्वरमहाराजांनी सांगितलंय परमात्माच सर्व करणारा आहे. जीवरुपही तोच बनला आहे. ज्या बुद्धीच्या कायिक वाचिक सर्व कर्मे होतात ते बुद्धीचे स्वरूप परमात्म्याचे आहे. परमात्माच सर्वव्यापी आहे. तोच प्रेरणा देत आहे आणि म्हणून सर्व कर्मे घडताहेत. तोच सर्व विश्व चालवतो आहे. तोच सर्व करणारा आहे. आपण कर्मे सोडूही शकत नाही, कारण तुमच्याकडून कर्मे व्हायची की नाही हे सर्व त्याला माहित आहे. तो नियामक आहे. सर्वांचे नियमन करणे आपल्याला शक्य नाही.

तुम्ही कर्माचा अभिमान जरी स्वतःकडे घेतलात तरीही कार्य त्या परमात्म्याच्याच इच्छेने चालू आहे. प्रपंचात अनेक प्रसंग येतात. उत्तम बुद्धिमान सल्लागार असूनही अनुभवी डॉक्टर असूनही त्यांचे औषध एकाला लागू पडते, तो बरा होतो. पण दुसऱ्याला उपयोग होत नाही. तो मृत्युमुखी पडतो. औषध उत्तम आहे.पण त्या औषधाने सर्व रोगी बरे होत नाहीत. औषध दोषी आहे असं म्हणता येत नाही. कारण दुसऱ्याला ते लागू पडलं आहे. औषध देणाऱ्याला ज्ञान नाही असे म्हणता येत नाही. त्या डॉक्टरने दुसऱ्याला बरे केले आहे. पण ह्याला बरं करु शकला नाही. तर "विश्व चलतसे जेणे । परमात्मोनि ।"

एक तरी ओवी अनुभवावी यापैकी ओवी आहे ही. हा अनुभव घेतला पाहिजे. म्हणजे सगळा अहंकार पूर्ण नाहीसा होतो. नाही. माझं काहीही कर्तृत्त्व नाही.

*प्रश्न : महाराज, शास्त्रकार सत्य बोलावे असे सांगतात. व्यवहारात पूर्ण सत्य शक्य आहे का?*

उत्तर : व्यवहारात सदैव पूर्ण सत्य बोलणे कठीण आहे. केव्हाही कुठेही असत्य बोलणार नाही, संपूर्ण सत्यच बोलेन हा नियम पाळणे व्यवहारात अशक्य आहे. संसारी लोकांना पूर्ण सत्य बोलण्याचे महाव्रत घेणे शक्य नाही. म्हणून शास्त्रकारअल्प नियम करायला सांगतात. अल्पव्रते सांगतात. गुरुवार हा दत्ताचा वार आहे. गुरुवारी असत्य बोलावयाचे नाही. आश्रमात खोटे बोलायचे नाही. म्हणजे तेवढा तरी अभ्यास होतो. देशाची आणि काळाची मर्यादा ठेवूनच व्रतांचे पालन करावे लागते. महाव्रत शक्य नाही. म्हणून अशी अल्पव्रते करावीत. त्याने तेवढा तरी अभ्यास होतो.

*प्रश्न : महाराज, गीतेत भगवंतानी सर्व कर्मे ईश्वराला अर्पण करायला सांगितलीआहेत. आम्ही ते कसे करायचे?*

उत्तर : कर्मे अर्पण करायची म्हणजे हातात घेऊन परमेश्वराला अर्पण करायची असे नाही. कर्तृत्त्व स्वतःकडे घ्यायचे नाही. कर्माचा अहंकार धरायचा नाही. शास्त्र तेच सांगते आहे. सर्व संतमहात्मे अनुभव घेऊन सांगताहेत कर्तृत्व आपले नाही. सर्व ज्ञानशक्ती व क्रिया शक्ती ही परमेश्वराचीच आहे. हे पक्क समजून घेतलं तर अहंकार रहातच नाही.

*प्रश्न : "नर करनी करे, सो नरका नारायण हो जाए ।।" असं सुभाषितकार सांगतात?*

उत्तर : हे काही सुभाषित नाहीये. हे सत्य आहे. बाहेर व्यवहारामध्ये ईश्वर आणि जीव असे दोन विभाग आहेत. यापैकी जीवाची शक्ती परिमित आहे. पण ती अपरिमित होणं शक्य आहे असं शास्त्रकार सांगतात. जीवाची इच्छाशक्ती मर्यादित आहे, ज्ञानशक्ती मर्यादित आहे. अगदी राष्ट्रपती जरी झाला तरी जीवाची शक्ती मर्यादितच राहते. परंतु जीवाची ही शक्ती अपरिमित

होऊ शकते. शास्त्रकारांनी सांगितल्याप्रमाणे आचरण केले तर जीव ईश्वर होऊ शकतो. असे अनेक महात्मेपूर्वी होऊन गेले आहेत. आजही आहेत. प्राचीन महर्षींनी अनुभवाने प्रयोग दिले आहेत. ते प्रयोग केले तर जीव ईश्वर होऊ शकतो. सामान्य जीवही आपली शक्ती ईश्वराइतकी अपरिमित करून घेऊ शकतो.

*प्रश्न : महाराज, भगवान "मत्तःस्मृतिर्ज्ञानमपोहनच।" असं भगवद्गीतेत सांगतात त्याचा अर्थ काय?*

उत्तर : स्मृती राहणं हेही जसं भगवंतांच्या शक्तीचं कार्य आहे तसं स्मृती आच्छादित होऊन जाणं किंवा स्मृती मंद होणं हे सुद्धा भगवंतांच्या शक्तीचंच कार्य आहे. ईश्वराच्या शक्तीनेच स्मरण राहू शकतं. ईश्वराच्या शक्तीनेच विस्मरणही होऊ शकतं. ईश्वराच्या शक्तीनेच बुद्धिमोह होऊ शकतो आणि ईश्वराच्या शक्तीनेच बुद्धिमोह दूरही होऊ शकतो. पण हे आपल्या लक्षात येत नाही. आमची बुद्धी कार्यकारी आहे, आमच्या बुद्धिनेच सगळी कार्य होऊ शकतात असं वाटणं निव्वळ आपला अहंकार आहे. आमच्या बुद्धीची शक्ती फारच मर्यादित आहे. शास्त्रकारांनी अनुभव घेऊन हे सांगितलं आहे.

## तहानभूक तेथे घ्यावे

*प्रश्न : महाराज, महाभारतात असं सांगितलं आहे की दुर्वास ऋषींनी जलस्तंभन विद्या दुर्योधनाला दिली होती. अशा विद्या असतात का ?*

उत्तर : जलस्तंभन करून पाण्यामध्ये दुर्योधन विश्रांती घेण्यासाठी राहिला होता अशी महाभारतात कथा आहे. दुर्वास ऋषींनीच ती विद्या दुर्योधनाला दिली होती.पूर्वी अशा अनेक विद्या होत्या. ऋषीमुनीसुद्धा जलस्तंभन करून डोहामध्ये तपश्चर्या करीत बसायचे. पण या सगळ्या विद्या, हे सगळे प्रयोग नाहीसे झालेत आता. सामान्य विद्या आहेत ह्या. त्यात काय विशेष?

*प्रश्न : महाराज, "ठेविले अनंते तैसेची रहावे" असे तुकाराम महाराज सांगतात. त्यात ते प्रारब्धवादच सांगतात का?*

उत्तर : यात तुकाराम महाराजांनी प्रारब्धवाद सांगितला आहे असं समजण्याचं कारण नाही. संतांचा पूर्ण विश्वास ईश्वरावर आहे. त्या अनंताची शक्ती अपरिमित

आहे. विलक्षण आहे. आमच्या कर्माप्रमाणे आमची व्यवस्था लावणारी ईश्वरीशक्ती आहे. ईश्वराने जशी आमची व्यवस्था लावलेली असेल त्याला आपण मान्यता दिलीच पाहिजे. तिथं विरोध करून काही होणार नाही. अतिरेकीपणा चालणार नाही, असं यात तुकाराम महाराजांना सांगायचंय.

तुकाराममहाराजांसारखे दैवीसंपत्तीसंपन्न जे भगवत् भक्त आहेत, त्यांना नेहमीच जाणीव असते की घडणाऱ्या सगळ्या घटना ईश्वराच्या शक्तीने घडताहेत. म्हणून ते निश्चिंत असतात. संसाराची काळजी त्यांना नसते. पण आम्हाला संसाराची काळजी असते. आमचं कसं होईल? आमच्या मुलांचं कसं होईल? ही जी काळजी वाटते याचा अर्थ ईश्वर शक्तीवरती आमचा पूर्ण विश्वास नाही. काही काही वेळेपुरता बसतो. पुन्हा तो विश्वास कमी कमी होत जातो.

पुष्कळ कार्य आपल्या बुद्धीशक्तीच्या बाहेरची घडून येतात. त्या त्या वेळेला ईश्वरानं केलं म्हणून तर वाचलो. मी ईश्वरानं संरक्षण केलं मानतो पण. आपण प्रार्थना करतो. ईश्वराची पूजा करतो. परंतु पुन्हा काही असं कार्य घडलं म्हणजे माझ्या बुद्धीनं झालं. आम्ही केलं असं म्हणायची आमची तयारी आहे. प्रत्येक वेळेला ईश्वरशक्तीची जाणीव राहणं हीच खरी स्थिरबुद्धी आहे.

***प्रश्न : महाराज, प्रत्येक कर्माचे फळ भोगावेच लागते. फळ दिल्याशिवाय कर्म संपत नाही म्हणतात. मग कर्मच फळ देतें असे म्हणावे का? केवळ कर्म फळ देऊ शकतं का? कर्माचं फळ म्हणजे कर्म हेच फळ देतं असं म्हणता येईल का?***

उत्तर : केवळ कर्मापासून फळ मिळत नाही, असं व्यास महर्षी सांगतात. व्यवहार दृष्टीने पाहिलं तरीसुद्धा एकदा मनुष्य जे कर्म करतो ते कर्मच त्याला फळ देतं असं म्हणता येणार नाही. तो माणूस नोकरीवर वेळच्यावेळी जातो आहे, व्यवस्थित काम करतो आहे, जास्त रजा घेत नाही आहे हे सगळं वरचा अधिकारी पाहतो आणि शिफारस करतो. मगच त्याला बढती मिळते. म्हणजे कर्माचा ज्ञाता कोणीतरी पाहिजे. कर्मवाद मान्य केल्यावर ईश्वरवाद मान्य करावाच लागतो. केवळ कर्म फळ देऊ शकत नाही.

***प्रश्न : महाराज, प्रत्येक जीवाचं कर्म पाहून जर ईश्वर फळ देत असेल तर ईश्वरापेक्षा कर्म जास्त महत्त्वाचं मानलं पाहिजे. कर्मच मुख्य आहे असं मानणं बरोबर होईल का?***

उत्तर : माणसाचं कर्म पाहूनच ईश्वर फळ देतो. माणसानं चांगली कर्मे केली तर चांगली फळं देतो. वाईट कर्म केली तर वाईट फळ मिळतं. प्रत्येक जीवाची कर्मे पाहूनच ईश्वर फळ देतो. कोणाचं कर्म न पाहता आपल्या ईच्छेप्रमाणे ईश्वर फळ द्यायला लागला तर त्याला ईश्वर कोण म्हणेल?

परंतु याचा अर्थ कर्मच मुख्य झालं असा होत नाही. ईश्वरशक्तीचेच महत्त्व मानावं लागतं. कारण माणसाला कोणती कर्म करायला प्रवृत्त करायचं हे ईश्वरच ठरवतो. त्या कर्माचं फळ केव्हा द्यायचं हेही ईश्वरच ठरवतो आणि कर्मामध्येही कमीजास्तपणा हा भगवंताच्या संकल्पाप्रमाणे होऊ शकतो. भगवंताचे संकल्प सत्यसंकल्प असतात. संकल्प झाला की कार्य होऊन जातं. म्हणून कर्मापेक्षा ईश्वराचं महत्त्व जास्त आहे. ईश्वराची शक्ती परिपूर्ण आहे. नित्य आहे, अनंतही आहे.

***प्रश्न : महाराज, संतांचे वागणे, संतांचे आचरण हे स्वतंत्र प्रमाण मानता येईल का?***

उत्तर : श्रुतीस्मृतीत धर्माची प्रमाणं म्हणून सांगितली आहेत. त्याप्रमाणे संतांचं वागणं, संतांचं आचरण हेही प्रमाण आहे. संतांचं आचरण पाहूनच आचारधर्माचं यथार्थ ज्ञान होऊ शकतं. केवळ भाषण, वाचन यांनी बुद्धीला निश्चित मार्गदर्शन होऊ शकत नाही. संतांच्या संगतीत राहिल्यानं त्यांचं वागणं आणि त्यांचं आचरण पहाता येतं आणि आचारधर्माचं यथार्थ ज्ञान करुन घेता येते. म्हणूनच धर्मशास्त्रकार संतांचं आचरण हे स्वतंत्र प्रमाण मानतात. मूळ प्रमाण तर आहेच. पण त्या प्रमाणाला अनुसरून संतमंडळी जे आचरण करतात, ते पाहूनच आपल्या मनावर परिणाम होतो आणि आपल्याकडून तसं आचरण होऊ शकतं. संतांच्या सहवासात यासाठीच तर रहायला सांगतात.

ज्ञानी माणसे, संतमहात्मे पूर्ण विरक्त असतात. ममत्व नाही. अहंकार नाही. काही नाही. सांसारिक कोणाचाही विषय मनामध्ये नाही. निर्विषय

अंतःकरण आहे. त्यांचा शब्द, त्यांची कृती ही ईश्वराचीच आहे इतके त्यांचे प्रमाण मानावे असे वल्लभाचार्यांसारख्या संप्रदायात सांगितले आहे.

***प्रश्न : संतांची चरित्रे त्यासाठीच वाचायची का महाराज?***

उत्तर : वेदव्यासांसारख्यांनी अवतारांची चरित्रे लिहून ठेवली. ऋषीमुनींची चरित्रे लिहून ठेवली ती मुद्दाम जीवांची शुद्धी व्हावी यासाठीच.

नुसतं शास्त्र वाचून ते तसं आचरण करणं जमत नाही. म्हणून संतांची चरित्रं वाचायची. अवतारांची चरित्रं वाचायची. संतांचं आचरण पाहून कसं आचरण आपण करावं याचा आपल्याला बोध होतो.

***प्रश्न : महाराज, संसारांत प्रवृत्ती आणि संसारांतून निवृत्ती असे दोन मार्ग सांगतात. संसारांतच रहातो आहे, बाहेर प्रवृत्ती दाखवतो आहे. पण मनांतून निवृत्त आहे असे वागता येईल का? संसारांत बाह्यतः प्रवृत्ती ठेऊनही आतमध्ये निवृत्ती ठेवता येईल काय?***

उत्तर : सर्वही विषयांकडे प्रवृत्ती आणि सर्वही विषयांपासून निवृत्ती हे दोन विभाग झाले. परंतु बाहेर प्रवृत्ती दिसत असतांनाही अंतःकरणात निवृत्ती असू शकते हाही एक मार्ग आहे. ही स्थिती गुणातीत बुद्धी ज्यांची झाली आहे अशांनाच साध्य होऊ शकते. अनेक संत ऋषीमुनी असं जीवन जगले. आजही असे संत आहेत. बाह्यतः शरीराने ते प्रपंचात वावरत असतात. परंतु आतून मनाने ते पूर्णपणे निवृत्त असतात. त्यांचं आचरण नीट पाहिलं तर ते समजून येतं.

***प्रश्न : महाराज, बाहेर प्रवृत्ती आणि आत निवृत्ती हे आम्हाला कसं साधेल? शरीराने प्रपंचात राहूनही मनात पूर्णपणे निवृत्त रहाणं आम्हाला कसं जमेल?***

उत्तर : प्रपंचात राहूनही अंतःकरणात निवृत्ती हे एक ईश्वराच्या भक्तीमुळेच साधू शकते. याबाबतीत गोपींचं उदाहरण बघण्यासारखं आहे. गोपींच्या भक्तीचं वर्णन नारदांनी पराभक्ती असं केलं आहे. त्या संसारात आहेत, प्रपंचात आपली कर्तव्यकर्मे करताहेत. पण त्यांच्या अंतःकरणात संसार नाहीये. संसारात राहूनही अंतःकरणात जी निवृत्ती आहे ती ईश्वराच्या प्रेमामुळे, भक्तीमुळे उत्पन्न झाली आहे. त्यांच्या अंतःकरणात गोपालकृष्णांचं प्रेम अखंड आहे. त्यांचं ते दिव्य

रुप समोर दिसतं आहे. त्यांच्या लीला समोर आहेत. त्या लीलांचं त्या गोपी सतत चिंतन करीत आहेत. त्यामुळे त्यांच्या अंतःकरणांत अखंड स्मरण आहे. गोपींची अखंड स्मरणभक्ती आहे. गोपालकृष्णांचं फक्त बाह्यरूप पाहून त्यांच्यावर गोपींचं प्रेम होतं असं दिसत नाही.

गोपालकृष्णांच्या ईश्वरी स्वरूपाचं त्यांना ज्ञान आहे. त्यांची ज्ञानपूर्वक भक्ती आहे. ईश्वरस्वरूपाचे ज्ञान, ईश्वरभक्ती आणि पूर्ण प्रेम अंतःकरणात असल्यावर तिथे अंतःकरणात संसार राहीलच कसा? ही अनन्य मनसा भक्ती आहे.

***प्रश्न : ज्ञानी महात्म्यांना हातून होणाऱ्या कर्मांचा संबंध त्यांना पोचतो का ?***

उत्तर : ज्ञानी महात्म्यांच्या अंतःकरणांत पूर्ण निवृत्ती असते. त्यामुळे त्यांच्याकडून घडणाऱ्या कर्मांचा संबंध त्यांना पोचत नाही. ज्ञानामुळे पूर्वी होऊन गेलेल्या कर्मांचा तर नाश झालेलाच असतो. त्यांनी जे ज्ञानरुपी तप केलं आहे. त्यामुळे त्यांचे पूर्वीचे दोष गेलेले असतात. ते प्रपंचात असले तरीही अंतःकरणात पूर्ण निवृत्ती असल्याने त्यांच्या हातून जी कर्मे घडत असतात, त्या कर्मांचा दोष त्यांना लागत नाही.

***प्रश्न : महाराज, अंतःकरणात निवृत्ती साधली म्हणजे होते. संसार, घरदार सोडायलाच पाहिजे असं नाही असं आपलं सांगणं आहे का?***

उत्तर : संसारबंधन सोडणं याचा अर्थ संसार सोडून देणं, घरदार सोडून देणं असा होत नाही. अंतःकरणात पूर्ण निवृत्ती साधणं महत्त्वाचं आहे. अंतःकरणात निवृत्ती साधली म्हणजे झालं. बाहेर प्रवृत्ती असेल, शरीराने तो संसारात असेल तरीही अंतःकरणात पूर्ण निवृत्ती असल्याने त्याचे संसाराचे बंधन सुटलेलेच आहे. तो जीवनमुक्तच आहेत. तो संसारात असला, कर्तव्यकर्मे करीत असला तरी त्याच्या मनांत संसार नाहीच आहे. प्रवृत्ती फक्त बाहेर आहे. आंत तो निवृत्तच आहे. मुक्तच आहे. त्याचं पूर्वकर्मही संपलं आहे. संसारांत आता त्याच्या हातून घडणाऱ्या कर्मांचा दोष त्याला लागत नाहीये. म्हणून त्याला पुन्हा जन्म नाही. जन्ममरणाच्या फेऱ्यातून तो सुटलेलाच आहे.

***प्रश्न : महाराज, सर्व विश्व व्यापून उरलेला परमात्मा आमच्या या लहानशा मनांत सामावू शकेल का?***

उत्तर : भगवंत सर्वव्यापक आहे. सर्वव्यापक म्हटल्यावर ही बुद्धीही त्याचीच आहे. सर्व विश्वरूप आहे ना तो ! विश्वकर्ताही आहे आणि विश्वरूपही आहे. हा महत्त्वाचा सिद्धांत आहे.

न्यायशास्त्राप्रमाणे मन लहान आहे. अणुएवढ्या मनामध्ये त्या ईश्वराचे एवढे महात्म्य, त्याचे वैभव, त्याची शक्ती मला कशी घेता येईल? दरिद्री मनुष्य मेरुपर्वताजवळ गेला आणि त्याला पाहिजे तेवढे सोने घ्यायची मुभा असली तरी तो किती घेऊ शकेल? तसं भगवंताचं अपरंपार वैभव माझ्या अणुएवढ्या मनात साठवू शकणार का मी?

स्वतःला दीन समजणाऱ्या भक्तांच्या हृदयांत भगवंत सामावू शकतो. शुद्ध भक्ती असेल तर बुद्धी मन भगवंताला अर्पण करता येते आणि अशा मनात परमेश्वराचे व्यापक विश्वव्यापी रूप सामावू शकते असे संतमहात्मे सांगतात.

***प्रश्न : महाराज, सर्वव्यापी परमात्म्याला आपली बुद्धी अर्पण करायची म्हणजे आम्ही काय करायचं? बुद्धी त्यानेच दिलेली असते ना?***

उत्तर : परमात्मा सर्वव्यापी आहे. त्यानेच बुद्धी दिलेली आहे. त्यानेच दिलेली बुद्धी, मन त्याला अर्पण करायचे. याचा अर्थ आपल्या मनातून आशा, तृष्णा, वासना काढून टाकायच्या. कोणतीच इच्छा मनात उत्पन्न होऊ द्यायची नाही.

***प्रश्न : महाराज, ईश्वराचे सामर्थ्य इतके आहे की ईश्वरालाच ते माहिती नाही असे सांगतात याचा अर्थ काय?***

उत्तर : 'कर्तुम् कर्तुम् अन्यथा कर्तुम्'' असे ईश्वराचे सामर्थ्य शास्त्रकारांनी मानलेलं आहे. ईश्वरालासुद्धा आपल्या अनंत शक्तीची कल्पना नाही असे मानले जाते. 'यदि वा अंगवेदन वेद' असे वेदांमध्येसुद्धा वर्णन केले आहे. 'आपली माया शक्ती किंवा सामर्थ्य किती आहे हे त्याला तरी कळतं की नाही कोणास ठाऊक?'



श्रीदत्तमहाराज - श्रीवासुदेवनिवासमध्ये दर्शन करतेवेळी



सौ. ताईमहाराज प्रसाद घेतेवेळी श्रीमती नीलाबाई शेजारी निलाताई जोशी



सौ. ताईमहाराजांची "वारुणीशांती" - ५६व्या वर्धापनदिनानिमित्त श्रीवासुदेव निवासच्या भजनी मंडळातर्फे सौ. लेले यांनी शाल व श्रीफळ देऊन सत्कार केला.



रेणुका निवासः श्रीदत्तमहाराज - डॉ. जगमोहन तळवलकर यांच्यासमवेत

याचा अर्थ ईश्वराला अज्ञान आहे असा नाही. ईश्वराची इतकी अनंत शक्ती आहे की आपली शक्ती अनंत आहे इतकंच त्याला माहीत आहे. किती आहे, काय आहे, काही कल्पना नाही. पुष्कळ वाटेल तितकी शक्ती आहे.

***प्रश्न : महाराज, अवतारी पुरुषाचे शरीर आणि सामान्य शरीर यात फरक असतो?***

उत्तर : आपल्या विदर्भ प्रांतातील गुलाबराव महाराज यांनी सिद्धांत मांडलेला आहे. भगवान गोपालकृष्ण महाराज सर्वांनाच दिसत आहेत. आमच्या सारखेच त्यांनाही हातपाय आहेत. आमच्याप्रमाणेच चालताहेत, बोलताहेत. पण त्यांचं शरीर पाचभौतिक नाहीच. कर्मनिर्मित नाही. शुद्धचैतन्य घनस्वरूप आहे. परमात्मचैतन्यच त्या रुपामध्ये दिसते आहे. एवढाच काय तो पाचभौतिक शरीराचा संबंध.त्यांच्या शरीरात अशुद्धी नाही.

अवतारी पुरुषांचे शरीर म्हणजे चैतन्यलीला आहे. ते अत्यंत शुद्ध आहे. त्यामुळे त्यांचे शरीर व आपले शरीर जरी समान दिसले तरी पुष्कळच अंतर आहे.

***प्रश्न : महाराज, अवतारी पुरुष ज्या ठिकाणी रहातात त्या स्थानाला पारमार्थिकदृष्ट्या काही महत्त्व प्राप्त होते कां?***

उत्तर : अवतारी पुरुष ज्या ठिकाणी रहातात, त्या स्थानाचेही महात्म्य वाढते. इतर ठिकाणी सत्कर्म करताना, नामस्मरण, ध्यान करताना प्रतिबंध येण्याचा संभव आहे. आपली कर्मे पुष्कळ प्रकारची असतात. त्या कर्मांमुळे आपला अभ्यास अखंड प्रतिबंधनरहित चालू शकत नाही. अनेक विघ्ने त्यांत उत्पन्न होतात. परंतु अवतारीपुरुष जेथे वास्तव्य करतात त्या स्थानात जाण्याचे आणि नामस्मरण, ध्यान वगैरे करण्याचे मिळालं तर त्या स्थानात प्रतिबंध आले तरी ईश्वराच्या कृपेने दूर होतात. निर्विघ्नपणे आपला अभ्यास चालू रहातो आणि त्या अभ्यासामध्ये जास्ती उन्नती होऊन आत्मसाक्षात्काराची योग्यता आपल्याला प्राप्त होते. संत ज्या स्थानांत रहातात, ती स्थाने संतरूपच होऊन जातात असे सांगतात. त्या स्थानाचे दर्शन घेणे हे संतांचे दर्शन घेण्यासारखेच आहे.

***प्रश्न : महाराज, 'ब्रह्म सत्य जगन्मिथ्या' हे खरे ज्ञान आहे ना? मग हे ज्ञान संपादन केल्यावरही सगुणाची भक्ती करायची का?***

उत्तर : ब्रह्म सत्य जगन्मिथ्या वगैरे सिद्धांत मनातल्या निरनिराळ्या वासना, संस्कार दूर करण्याकरता शास्त्रकारांनी सांगितले आहेत. परंतु भगवंताचे जे स्वरुप समोर दिसतं आहे डोळ्यांनी, त्या स्वरूपाचेही ध्यान करायला हरकत नाही असं भागवताच्या द्वितीय स्कंधामध्ये सांगितले आहे.

रोजची आपली शास्त्राने सांगितलेली नित्यकर्म झाल्यावर काही काळ एकाग्र चित्ताने भगवंताचे ध्यान करावे. थोडावेळ तरी स्थूलरूपाचे ध्यान करावे. त्यावेळेला तत्त्वज्ञान वगैरे बाजूला ठेवायचे. समोर दिसणारे भगवंताचे सगुण साकार रूप म्हणजे साक्षात भगवंताचेच दर्शन आहे असे ध्यान करावे. स्थूलरूपही त्याचेच आहे. शेवटी ध्यानाचेच भक्तीत रूपांतर होते. भगवंताचेच रूप चित्तात स्थिर होते. भगवंताचे पूर्ण सौंदर्य आहे हे एकदा चित्ताला पटल्यानंतर चित्त दुसरीकडे जाईलच कशाला? समोर दिसणारं दृष्य स्वरूप म्हणजे प्रत्यक्ष वैकुंठपती भगवानच आहेत हे समजून येतं.

"तुज सगुण म्हणू की निर्गुण रे।"ही महात्म्यांची भूमिका आहे. सगुणातही तोच निर्गुण परमात्मा आहे. निर्गुण निराकार अनंत तोच आहे. तिथेच चित्त स्थिर झालेले आहे. कारण या बुद्धीभूमिकेवर गेल्यावर चित्त स्थिर होणार ना! हे खरं मानायचं की ते खरं मानायचं अशा मनाच्या अवस्थेमध्ये असेपर्यंत ते अंतःकरण स्थिर कसं होईल? म्हणून भगवंतांच्या समोर दिसणाऱ्या सगुण साकार रूपावरच आपले चित्त स्थिर करायचं.

***प्रश्न : महाराज, सर्व कर्तृत्व परमेश्वराचे आहे, जीव फक्त निमित्त आहे असं सांगतात. जीवाचं निमित्त असणं म्हणजे थोडसं तरी कर्तृत्व जीवाकडे येत नाही का?***

उत्तर : 'निमित्तमात्र भवसव्यसाची' असं भगवान श्रीकृष्ण अर्जुनाला सांगतात. भगवान त्याला उपदेश करताहेत. तो त्या भूमिकेवरच आहे. निमित्तमात्र मी आहे. म्हणजे जीवांनासुद्धा काहीसं कर्तृत्त्व आहे असं ईश्वरानं मान्य केल्यासारखं दिसतंय इथं. लहान, मोठं कोणतेही कार्य करण्याची क्रियाशक्ती माझ्याजवळ

आहे. हिरण्यगर्भ सूत्रात्मा हे ईश्वराचे स्वरूप जे सांगितले आहे. सूत्रात्मा म्हणजे क्रियाशक्ती. समष्टी म्हणजे सर्व सृष्टी. तेव्हा काया, वाचा, मनाने होणाऱ्या सर्वही क्रिया ह्या परमेश्वराच्या आधीन आहेत. तो सूत्रात्मा आहे. हे जरी खरं असलं तरी ''निमित्तमात्र भवसव्यसाची'' हा उपदेश केला म्हणजे काय म्हणायचं ! मी निमित्त आहे. निमित्तही परमात्मा आहे. मी खरा कर्ता नाही.

निमित्त याचा अर्थ 'कर्तुम् अकर्तुम् अन्यथा कर्तुम्' समर्थ सांगतात. मुख्य कर्ता तो वेगळा आहे याचं स्मरण ठेवून असणारं कर्तृत्त्व म्हणजे निमित्तमात्र कर्तृत्त्व. ईश्वर कर्ता आहे अशी भावना ठेवून कर्म केले की निमित्तमात्र कर्तृत्त्व म्हणतात. म्हणजे मी कर्ता आहे हे आरोपिक कर्तृत्त्व आहे. मला उभं केलेलं आहे. नाटक करायचंय, बोलायचंय, तेवढ्यापुरता तो अहंकार आहे. सोडून द्यायचं नंतर.

***प्रश्न : महाराज, काही लोग सांगतात की ईश्वरकृपेने मनांतील सर्व इच्छा व वासना तृप्त करून घ्याव्यात म्हणजे वासना संपतील. म्हणजे वासनाक्षय होईल. वासना तृप्त करून वासनाक्षय होतो का ?***

उत्तर : मनांत ज्या ज्या इच्छा व वासना आहेत, त्या ईश्वरकृपेने पूर्ण करुन घ्याव्यात असे विचार करणारे काही भक्त असतात. विषयांचा उपभोग घेतल्यानंतर सगळ्या इच्छा पूर्ण होतील असं वाटतं त्या भक्तांना. पण तसं होऊ शकत नाही. ज्या विषयवासना मनामध्ये उत्पन्न होतात त्या थांबत नाहीत. तृप्ती नाहीये. भोगाने आणखी तृप्ती होईल, वासनाक्षय होईल हा मार्गच नाहीये.

म्हणून काम, वासना, इच्छा या घालवल्या पाहिजेत. त्या नाहीशा करण्याकरता म्हणून बाह्येंदिय्र आणिं मन यांचा निरोध प्रथम केला पाहिजे. निरोध केल्यानंतर पूर्वीच्या भोगांनी ज्या काही वासना साठल्या असतील त्यांचीच निवृत्ती आणखी राहिलेली आहे. नवीन वासनांची भर काही पडत नाहीये. त्यासाठी इंद्रियांचा निरोध हा प्रथम करायला सांगितला आहे.

***प्रश्न : महाराज, भगवंताचा अवतार ज्ञानी महात्म्यांकरताच असतो असे कां म्हणतात?***

उत्तर : मानव हा ज्ञानाधिकारी आहे. परंतु मानवामध्ये एखादाच या मार्गाचा

अधिकारी होतो. योग्यता असली तरी प्रत्यक्षकार्य करायला सुरुवात करणं, साधन मार्गाचा प्रत्यक्ष अभ्यास करणं, अतिशय कठीण आहे.

मानव जन्म आला असतानासुद्धा दैवी संपत्ती प्राप्त करून घेऊन सगळे मनातले विकार ज्याने जिंकलेले आहेत, त्यालाच मोक्ष मिळतो. आपल्या मनातले सगळे विकार नाहीसे व्हावेत, दैवी संपत्ती ज्याला म्हणतात ते सद्गुण जास्तीत जास्त वाढावेत त्याकरता प्रयत्नशील रहाणारा जो खरा मोक्षाधिकारी आहे, त्याच्याकरता भगवंतांचा अवतार आहे. सर्वसामान्य लोकांकरता नाहीये. श्रेष्ठ पुरुष तो आहे, जो वरच्या वरच्या भूमिकेवर जाऊ शकतो. तो वरच्या भूमिकेवर निघाला आहे, जाणार आहे, त्याला जर काही अडचण आली, तो जर खाली कोसळून पडला तर केवढा अनर्थ होईल? इतक्या भूमिकेपर्यंत गेलेला आणि तो पुन्हा भ्रष्ट झाला. त्याची सुधारणा करायची आहे. अर्जुनाला सुधारण्याकरिता गीता सांगितली. त्याच्या द्वाराने सगळ्यांनाच तो ज्ञानोपदेश झाला. अर्जुन हा मोठा होता ना? "अर्जुना तू परिससी। परिसूनीया अनुष्ठिसी" म्हणतात. नुसतं ऐकून घेणारा नाहीस. प्रत्यक्ष त्याप्रमाणे आचरण करणारा तू आहेस. म्हणून मला सांगावेसे वाटते. असे भगवंत गीतेत म्हणतात.

आचार्यमहाराजांनी तेवढ्यासाठी सांगितले की श्रेष्ठ पुरुष जे आहेत त्यांनी धर्माचं ज्ञान करून घ्यावं आणि आचरण करावे म्हणजे धर्माचा प्रसार होतो, नाही तर होत नाही. इतर सामान्य लोक ज्ञान करून घेण्यालाही असमर्थ आहेत. ऐकून घेतलं तरी त्यातलं रहस्य कळलं पाहिजे नां ! श्रेष्ठ पुरुषाचा जन्म वाया जाऊ नये, त्याची सुधारणा करावी. त्याची सुधारणा केली की बाकीच्यांची सुधारणा आपोआप होते.

म्हणून ज्ञानी महात्म्यांकरिता भगवान अवतार घेतायत, जन्म घेतायत. त्याच्या संरक्षणाकरता भगवान अवतार घेताहेत. मुख्य हेतू हा आहे. "परित्राणाय साधुनाम्" साधुचे आणि ज्ञानी महात्म्याचे संरक्षण करायचं.

असा एक जरी ज्ञानी महात्मा असला तरी त्याच्यासाठी भगवंत अवतार घेतात आणि त्याचं संरक्षण करतात.

***प्रश्न : महाराज, मन मुळात सात्विक असतं असं शास्त्रकार सांगतात. मग त्यात रजोगुण व तमोगुण का येतात?***

उत्तर: पंचमहाभूतांपासून निर्माण झालेले जशी बाहेरचे शरीर आहे तसे मनही पंचमहाभूतांपासून निर्माण झालेलं आहे. पण त्या मनामध्ये पंचभूतांचा सत्वांश जास्ती आहे. मन हे खरे चांगले आहे. ईश्वराला जाणण्याची योग्यता मनाच्या ठिकाणी आहे. त्याकरताच सत्वांश अधिक घालून तयार केलेलं मन हे मानवाला मिळालं आहे.

परंतु पूर्व जन्मामध्ये अधर्माचरण करून आणि तसे संस्कार घेऊन आलेले अनेक जीव असतात. त्या जीवांच्या संगतीमध्ये चांगले मन असलेला जीव सापडला तर त्याचे मन बदलते. त्यांच्या शब्दांचा आणि आचरणाचा त्याच्या मनावर परिणाम होतो.

***प्रश्न : मग आपल्या मनाला कसे आवरावे महाराज?***

उत्तर : संतमहात्म्यांची संगती याकरताच सांगितलेली आहे. ते हिताचा उपदेश करतात. सद्गुरुंच्या, महात्म्यांच्या मनामध्ये दया आहे. कृपा आहे, त्यामुळे ते उपदेश करीत असतात. त्यांच्या शब्दामध्ये सामर्थ्यही असते.

संतांची भेट झाली तर त्यांच्या शब्दांचा परिणाम लगेच होतो. सद्गुरु समजावून सांगतात, मनाची अशुद्धी कशी दूर करायची ते. त्यासाठीच ते उपदेश करतात.

***प्रश्न : महाराज, संतांचे दर्शन घेतले, मार्गदर्शन मिळाले तरी व्यवहारात शिरल्यावर त्या मार्गदर्शनाचा विसर पडतो. पुन्हापुन्हा प्रतिबंध येत रहातात. मग संतांचेमार्गदर्शन वाया गेलं असं म्हणायचं का?***

उत्तर : संत महात्म्यांचं मार्गदर्शन हे फुकट जात नाही. काही प्रारब्ध प्रतिबंधांनी जरी ते स्थगित झालं तरी वेळ आली म्हणजे त्यांच्या संकल्पाने ते पुन्हा उत्पन्न होतं. महात्म्यांच्या संकल्पाने सगळं जगाचं कार्य चाललेलं आहे. ईश्वरालासुद्धा संमती द्यावी लागते त्यांच्या संकल्पाला. कोणत्याही पुण्य कर्मामध्ये त्यांचाच संकल्प आहे. त्याप्रमाणे सगळी कार्य घडतात. निमित्तमात्र आपण सर्वही असतो. ही जाणीव, निरभिमानवृत्ती, खरा कर्मयोग ज्याला म्हणतात ही भूमिका त्यांच्या संकल्पाने मिळते, कृपेने प्राप्त होते.

***प्रश्न : सर्वत्र ईश्वर आहे अशी बुद्धी झाली त्यांनाच महात्मा म्हणायचे का महाराज?***

उत्तर : ज्याची बुद्धी अशी विकसित झाली तोच महात्मा. इथे आत्मा या शब्दाचा अर्थ बुद्धी असा आहे. एवढी विशाल ज्यांची बुद्धी आहे तो. बुद्धीतला सर्व भेद निघून गेलेला आहे, 'वासुदेवः सर्वम्' हे पूर्ण ज्ञान ज्यांना झालेले आहे तोच महात्मा.

***प्रश्न : सर्वत्र ईश्वर आहे अशी बुद्धी झाली होती म्हणूनच विसोबा खेचर शंकराच्या पिंडीवर पाय ठेवून निजले होते का?***

उत्तर : शिवलिंगावर पाय ठेवला म्हणजे चूक झाली हे कोणी ठरवायचं. 'वासुदेवः सर्वम्।' पायही तोच आहे. डोकंही तोच आहे, दृष्यही तोच आहे, पहाणाराही तोच आहे. सर्वच तो आहे. सर्वच ब्रह्म आहे. ही भावना ज्या महात्म्याची झाली आहे. त्याने पाय ठेवले काय नि डोकं ठेवलं काय?

***प्रश्न : अशी बुद्धी महात्म्यांच्या कृपेनेच होते का?***

उत्तर : विसोबा खेचरांच्या कृपेनेच नामदेवांना सगुण साक्षात्काराचे फळ एकदम मिळाले आणि नामदेवांची बुद्धी तत्क्षणीच विकसित झाली. निश्चित एकदा आपल्याला समजल्यानंतरसुद्धा तो निश्चय आपला कायम टिकत नाही ना! बुद्धी अवस्था मिळत नाही असं नाही. पण मिळाली तरी टिकत नाही. ईश्वराची आणि संतमहात्म्यांची एकदा कृपा झाल्यावर त्या बुद्धीमध्ये पुन्हा कधी चांचल्य येत नाही.

***प्रश्न : महाराज, अमानित्व म्हणजे काय?***

उत्तर : अमानित्व म्हणजे निराभिमान वृत्ती होणं आहे. या अमानित्व गुणाचं वर्णन श्रीज्ञानेश्वर महाराजांनी इतकं परकोटीचं केलं आहे की,

पूज्यता डोळा न पहावी । स्वकीर्ति कानी नायकावी ।
हा अमुका ऐसी न होआवी । से चि लोका ।।

'से' म्हणजे सय्. म्हणजे आठवण. आपली आठवण काढण्यासारखी परिस्थिती असूनही आपला सामान्यपणा, आपला साधेपणा पराकोटीचा

पाहिजे. हे खरे अमानित्व. सगळ्यांनीही आपल्याला विसरून जावं अशी मनाची वृत्ती आणि वागण्याची हातोटी याचे नाव अमानित्व. निराभिमान वृत्ती याला म्हणतात.

अभिमान हा मोठा दोष आहे. अभिमानाचे स्थान आसुरी संपत्तीमध्ये आहे. अभिमान असला म्हणजे स्वतःकडून होणाऱ्या दोषांची जाणीवच होती नाही. उलट अभिमान असल्यामुळे मी नेहमी उत्तमच वागतो, माझ्या हातून कधीही चुका होतच नाहीत असंच सारखं वाटत असतं.

लोकांनी मला विसरून जावं. याचा अर्थ असा की आपण केलेले कर्म कदाचित मोठं असलं तरी आपण ते विसरून गेलं पाहिजे. त्यावेळी ते अमानित्व येतं. कीर्ती नको. कीर्तीची इच्छासुद्धा नको ही स्थिती अमानित्व आहे. मी कोण? करणारा कोण आहे?

मारुतीरायांचे उदाहरण पहा. द्रोणागिरी पर्वत उचलून आणला. समुद्र उल्लंघन केला. अशी सगळी कर्मे केली. पण मारुतीराय म्हणतात हे सर्व रामचंद्रांच्या प्रभावाने झाले. मी काही केलं नाही. कर्तृत्त्वाची जाणीवही नाही, स्वतःच स्वतःला विसरल्याशिवाय लोकांनी मला विसरून जावं असं म्हणता येणं शक्य नाही. म्हणून ज्ञानराज सांगतात हा अमुका ऐसी न होआवी । से चि लोका । हे अमानित्त्व.

***प्रश्न : महाराज, आम्ही अमानित्व कसे संपादन करावे ?***

उत्तर : अहंकार, उद्धटपणा, अभिमान असला की मनुष्याच्या हातून फार अन्याय होतो. त्यात त्याचेही कल्याण नाही. इतरांचेही कल्याण नाही, म्हणून अभिमान जाण्यासाठी भगवंताची सद्‌गुरूंची प्रार्थना करावी लागते. ईश्वराची, सद्‌गुरूंची कृपा झाली तरच अमानित्व प्राप्त होते. अमानित्व हेच खरे ज्ञान आहे. मला हे अज्ञान आहे असे ज्ञानदेव सांगतात.

***प्रश्न : महाराज, आमच्या मनांत इच्छा आहेत म्हणून आम्ही कर्मे करतो. मनांत इच्छाच नसल्या तर कर्मे करावीशी वाटणार कशी? वासनाक्षय करायचा म्हणजे आपण काहीच कर्म करायचं नाही असा अर्थ होत नाही का?***

उत्तर : वासनाक्षय हा ममतेचा विषय आहे. 'निर्मम' झाल्याशिवाय वासनाक्षय होत नाही. मोठी भूमिका आहे. ज्ञान झाल्याचे चिन्ह आहे. स्वतःचे, स्वतःच्या मनाचे काहीही नाही. सर्वही कार्य ईश्वरीशक्तीने चाललेले आहे हा एक मोठा विश्वास पाहिजे. हे खरं ज्ञान आहे. हा खरा सिद्धांत कळला पाहिजे.

आपण माध्यम होऊ. कार्य आपल्याकडून ईश्वर घडवून घेईल. कर्तृत्व आपले नाही. मी काही करीत नाही. करवणारा तो आहे. त्याच्या कृपेने सर्व होत आहे. कर्ता मी दिसलो तरी करविता तो आहे. कर्त्यापेक्षा करविता म्हणजे करवून घेणारा मुख्य आहे. हेच खरे ज्ञान आहे.

***प्रश्न : महाराज, महात्मा सर्वसंकल्पसंन्यासी असतो असेही सांगतात आणि तो सर्वभूतहितेरतः असतो असेही सांगतात. महात्मा जर सर्वसंकल्पसंसन्यासी असेल तर तो सर्वभूतहितेरतः कसा काय असतो?***

उत्तर : जे होईल ते भगवंताच्या इच्छेने होईल. म्हणजे स्वतःचा संकल्प नाही. भगवंताने या महात्म्यांना 'सर्वसंकल्प संन्यासी' म्हटले असले तरी पुढे वर्णन करतात. 'सर्वभूतहिते रतः' विरोधी आहे असे वाटेल आपल्याला. परंतु सर्वसंकल्पसंन्यासी जो महात्मा असतो, तोच 'सर्वभूतहितेरतः' अशा भूमिकेवर असतो. सर्वही भूतांचे, प्राणीमात्रांचे हित करणारा हा महात्मा असतो.

मनामध्ये स्वतःबद्दलची किंचित जरी ममता राहिली तर सर्व भूतांचे हित तो करू शकत नाही. स्वतःचे हित पाहून मग त्याला अविरोधी असेल तेवढेच करावे ही बुद्धी असेल तर ती बुद्धी 'सर्वभूतहितेरतः' होऊ शकत नाही.

मी, माझं मन हे नाहीसे व्हावे लागते, तेव्हा मनुष्य सर्वसंकल्पसंन्यासी होऊ शकतो. तो 'सर्वभूतहितेरतः' असतो.

***प्रश्न : महाराज, संतांची परीक्षा पाहणे हा दोष आहे का?***

उत्तर : भागवतामध्ये सत्पुरुष कोणाला म्हणावे याची तीस लक्षणे सांगितली आहेत. ती लक्षणे तपासणाराही तसाच असला पाहिजे. नाहीतर त्याला ही बुवाबाजी वाटेल. कृपाळू, सहनशील, सत्यनिष्ठ, शुद्ध चित्ताचा इत्यादी गुण सांगितले आहेत.

परिक्षा पहाणे हा दोष नाही. स्वतःच्या जन्माचे कल्याण करुन घ्यायचे आहे. त्याकरता संत सत्पुरुषांना तपासून नको का घ्यायला ? खरं आहे हे. पण त्यासाठी आधी काही दिवस संतसंगतीमध्ये राहिले पाहिजे. अनुभव घ्यावा. चांगलं दिसलं, श्रद्धा वाढू लागली, तरच स्वतःचे कल्याण होणार ना?

***प्रश्न : महाराज, संतांचा परमार्थ स्वतःसाठी आहे, समाजासाठी नाही असं काही लोकांना वाटते. संत सामाजिक कार्य करीत नाहीत असा आक्षेप काही लोक घेतात.***

उत्तरः संतांची शिकवण समाजाच्याच भल्यासाठी आहे. समाजाच्या कल्याणासाठीच ते उपदेश करीत आहेत. सर्वांचे कल्याण व्हावे म्हणूनच ते देवाकडे प्रार्थना करीत आहेत. ते स्वतःसाठी काहीच मागत नाहीत.

सातशे वर्षांपूर्वीपासून श्रीज्ञानदेवांचे कार्य अखंड चाललेले आहे. किती लोकांना मार्गदर्शन केले आहे, करतात! यातलं काय स्वतःकरता आहे त्यांचं? ग्रंथरूपाने ज्ञानेश्वरी आहे, अमृतानुभव आहे, चांगदेव पासष्टी आहे. विचार करणारा खरा जो अधिकारी, महात्मा आहे त्याला त्याचे महत्त्व समजून येते. नामदेव त्यांच्या जातीचे आहे म्हणून ते सांगतात? "एक तरी ओवी अनुभवावी."

ज्ञानदेवांनी इतके कार्य केले आहे. इतक्या लोकांना सन्मार्ग दाखविला आहे. तरी आम्ही त्यांचे महत्त्व ओळखू शकतो काय? अलीकडे लोकांना सन्मार्गाला लावण्यासाठी काही सभा घेतल्या असतील. वर्तमानपत्रातून त्याची प्रसिद्धी झाली असेल. पण हे कार्य आणि प्रसिद्धी काही काळापुरते असते. जास्तीत जास्त पाच वर्षे होईल. पुढे काय? काही नाही. अशी काही स्थिती ज्ञानेश्वरमहाराजांच्या कार्याची नाही. त्यांच्या आज्ञेचे पालन करणे अखंड चालले आहे.

***प्रश्न : श्रीज्ञानेश्वरमहाराजांनी फार लहान वयांत समाधी घेतली असे काही लोकम्हणतात?***

उत्तर : श्रीज्ञानेश्वरमहाराजांवर आक्षेप काय तर इतक्या लहान वयातच समाधी

का घेतली? त्यांनी आणखी काही दिवस का राहू नये? काहीतरी आक्षेप घ्यायची सवय झाली आहे ना ! इतक्या लहान वयात त्यांनी एवढे करून ठेवले आहे त्याचा तरी आपण किती उपयोग करून घेतो? मग ते राहिले असते तर काय केलं असतं? काय करायचे हेच समजत नाही.

आज समाजात जी काही सत्प्रवृत्ती दिसते, श्रद्धाभाव दिसतो, सद्भावना दिसते, ती संतांच्यामुळे दिसते. श्रीज्ञानेश्वर माऊलींची पालखी आली म्हणजे सर्व घरातले लहानमोठे, गरीबश्रीमंत, सुशिक्षितअशिक्षित येतात. विद्यार्थी येतात. स्त्रिया येतात. प्रोफेसर येतात. खेडूत तर दिसतातच. काय दृष्य आहे हे? ज्ञानेश्वरांच्याबद्दल केवढी भक्ती आहे? हे असं सातशे वर्ष चालले आहे. लोक सगळं सोडून येतात.

संत म्हणतात आम्हाला काही नको. यश सुद्धा नको. संतांनी खरं ते मनःपासून सांगितले ना! म्हणून त्यांच्या पाठीमागून यश चालत आलेले आहे. त्यांचेच यश व्हायला पाहिजेअसे देवाला वाटते. यशाकरता प्रयत्न करून यश मिळत नाही. दहाव्या अध्यायात देवांनीच सांगितले आहे की हे सगळे माझ्यापासून मिळतं. संतांचं कार्य हेच खरे सामाजिक कार्य आहे आणि तेच सर्वांत महत्त्वाचे आहे.

***प्रश्न : महाराज, "योगक्षेमं वहाम्यहम्" याचा अर्थ काय ?***

उत्तर : आपल्या भक्ताची सर्व जबाबदारी ईश्वराने घेतलेली आहे. मी भक्ताचा सगळा योगक्षेम वहातो. योगक्षेम शब्दाचा अर्थ आपण समजतो की संसारामध्ये सगळी अनुकूलता ईश्वर करून देतो. पण खरा अर्थ असा आहे की, योग म्हणजे आपल्याजवळ जे नाही ते ईश्वर करून देतो आणि क्षेम म्हणजे त्यांचे संरक्षण करणे.

संसारात आपल्याला पुष्कळ पाहिजे असते. तेही मिळते. परंतु खरा पारमार्थिक योगक्षेम वेगळा आहे. परमार्थात आपल्याला काय पाहिजे? आपल्यात पुष्कळ दोष आहेत. त्या दोषांची निवृत्ती ही परमार्थात अपेक्षित आहे. चांगले सद्गुण अपेक्षित आहेत. या सद्गुणसंपत्तीचा परमार्थात उपयोग आहे. चित्ताच्या शांतीला या गुणसंपत्तीचा परमार्थात उपयोग होणार आहे.

दोषनिवृत्ती करून गुणसंपत्ती आहे भक्ताला. त्या भक्ताला दैवीगुण संपत्तीमध्ये स्थिर करावयाचे कार्य भगवंताचे आहे. हे जीवाच्या प्रयत्नाने मिळत नाही आणि टिकतही नाही. कितीही प्रयत्नवादी असला तरी दैवीगुणसंपत्ती मिळणार नाही. त्याला ईश्वराची, सद्गुरूंची कृपाच लागते. तरच ही संपत्ती मिळते आणि टिकते. या ईश्वराने दिलेल्या गुणांचे रक्षणही आपल्या हातात नाही.

आपला काही काळ पारमार्थिक दृष्टीने चांगला जातो. त्यावेळी बरं वाटतं. सेवा घडते आपल्या हातून. सगळं चांगलं चाललेलं असतं. पण पुन्हा सगळं विसरून जातो आपण. नाही टिकवता येत आपल्याला. म्हणून भगवंत ''योगक्षेमं वहाम्यहम्'' असे सांगतात. भगवंतच गुणसंपत्ती भक्ताला देतात. त्या गुणसंपत्तीचे तेच संरक्षणही करतात आणि भक्ताला त्या गुणसंपत्तीमध्ये स्थिर करतात.

***प्रश्न : महाराज, बुद्धीची सुधारणा व्हावी यासाठी कोणती महत्त्वाची साधने साधकाला उपयोगाला येतात ?***

उत्तर : शंकराचार्य-स्वामीमहाराजांनी चार साधने सांगितली आहेत. ध्यान, सज्जनांची संगत, महात्म्यांनी करून ठेवलेल्या ग्रंथांचे वाचन आणि दान.

उपास्य देवतेच्या स्वरुपाचे ध्यान व्हावे, हा बुद्धीला एक संस्कार आहे. तो एकाग्रतेचा अभ्यास आहे. बुद्धीमध्ये असणारे दोष दूर करण्याकरिता ध्यानाचा अभ्यास सांगितला आहे. तसेच सज्जनांची संगती सांगितली आहे. महात्म्यांनी करून ठेवलेल्या ग्रंथांचे वाचन ही सुद्धा त्यांचीच वैचारिक संगती आहे. ''देय दीनजनाय च वित्तम्'' असे आचार्यमहाराजांनी सांगितले आहे. वित्त म्हणजे द्रव्य! धनधान्य! ईश्वरानेआपल्याला जे दिलेले असेल त्यातल्या काहीतरी भागाचा त्याग आपल्याकडून झाला पाहिजे.

***प्रश्न : महाराज, आत्मरूप तर असंग आहे. मग दानाचा एवढा अभ्यास आचार्यमहाराज का सांगतात?***

उत्तर : आत्मरूप जे आहे ते असंग आहे. त्याचा कशाशीही संबंध नाही. अगदी निर्विकार आहे ते. निर्विकार अशा आत्मस्वरुपाचा असा मी आहे हे जर कळले तर सुखही नाही आणि दुःखही नाही. मानापमान नाही. त्यासाठी

हा एक त्यागाचा अभ्यास आहे. आसक्ती कमी करण्याचा अभ्यास आहे. आपल्या मनात ममता आहे. फाटकं वस्त्र असलं तरी ममता आहे. ते सुद्धा आपल्याला सोडवत नाही. ही ममता कमी करण्याचा, आसक्ती कमी करण्याचा त्यागाचा अभ्यास आहे. त्यासाठी आचार्यमहाराज दान सांगतात.

***प्रश्न : महाराज, साधकाने ममता कमी व्हावी म्हणून किती दान करावे?***

उत्तर : दान किती करावे हे शास्त्रकार सांगत नाहीत. मनाने जी वस्तू 'मम' म्हणून मानली आहे त्याबद्दल शास्त्रकारांनी 'इदं न मम' हे विचारसूत्र दिले आहे. ''हे माझे आहे'' ही वृत्ती संपूर्ण गेली पाहिजे. स्वत्व निवृत्ती झाली पाहिजे. दान किंवा त्याग याला म्हणतात. ममता सोडण्याचा आपला अभ्यास झाला तर कशाशीही आपला संबंध नाही हे आपोआप कळून येते. ही मनाची तयारी होण्यासाठी शंकराचार्य-स्वामीमहाराजांनी दान करायला सांगितले आहे.

***प्रश्न : महाराज, पुष्कळ लोकांना अद्वैत सिद्धांत पटत नाही. समोर एवढे दृश्य दिसत असतांना शंकराचार्य-स्वामीमहाराज अद्वैत कसे सांगतात असे त्यांना वाटते.***

उत्तर : श्रीशंकराचार्यांनी जो महत्त्वाचा अद्वैत सिद्धांत मांडला आहे तो ऐकल्यावर एकदम मोठमोठ्या विचारी माणसांनासुद्धा तो सिद्धांत बरोबर नाही असे वाटते. सर्वसामान्य विचाराच्या प्राथमिक अवस्थेत तर अनेक साधकांना तो बरोबर नाही असे वाटते.

खरे जे ज्ञानी-तत्वदर्शी महात्मे आहेत ते म्हणतात, उपास्य आणि उपासक यांच्यात मुळातच अद्वैत आहे. ते दोन नाहीत - एकच आहेत. ''अहं ब्रह्मास्मि'' हा सिद्धांत आहे. ते समजून घ्यावयाचे आहे. पण या सिद्धांतापर्यंत बुद्धी एकदम जाऊ शकत नाही. त्याकरता आरंभाला भेदच आहेत. आपण किती तरी जीव आहोत आणि प्रत्येकाची बुद्धी निरनिराळी आहे. ईश्वर जर एक आहे आणि हे जीव तर अनेक आहेत. मग ईश्वर आणि मी एक कसा? तसेच ईश्वर सर्वज्ञ आहे आणि मी तर अज्ञानी आहे. मग ईश्वर मी आणि एक कसा?

त्याकरिता मुख्य सिद्धांत असा आहे की, आपल्याला ईश्वरदर्शन व्हावे म्हणून प्रयत्न केला पाहिजे. त्यासाठी भक्तीमार्ग आहे. उपासना करणारा हा

भक्त आणि ज्याची उपासना करायची ते उपास्य म्हणजे ईश्वर अशा भेदातूनच उपासना सुरू होते. सगळे संशय दूर व्हावेत, बुद्धीमध्ये तशा प्रकारची योग्यता निर्माण व्हावी म्हणून उपासना सांगितली आहेत. अशा ईश्वराप्रीत्यर्थ केलेल्या कर्मांनी, साधनभक्तीने, मनाला समाधान लाभत जाते.

ईश्वराची स्वरूपे अनेक आहेत. प्रत्येकजण आपापल्या भावनेप्रमाणे त्या प्रिय वाटणाऱ्या ईश्वराच्या रूपाची भक्ती करतो. प्राथमिक भूमिकेवर हीच भावना होते. आपल्यात कोणती भावना निर्माण व्हावी, कोणती भावना वाढावी आणि त्याकरिता साधना कोणती करावी यासंबंधी शास्त्रकारांनी पुष्कळ मार्गदर्शन करून ठेवलेले आहे. त्यासाठीच धर्मशास्त्राची निर्मिती झाली आहे. धर्मानुकूल वृत्ती ठेवून धर्मशास्त्रपालन करीत वागायचे आहे. धर्माचे पालन करीत राहिले आणि बुद्धीचा विकास होण्यासाठी शास्त्रात सांगितलेली साधना करीत राहिले की बुद्धीचा विकास होत जातो. शेवटी ईश्वराची कृपा होऊन ईश्वरदर्शन होते. मग चित्ताच्या सर्व वृत्तींचा लोप होतो. सर्व भावना संपतात.

ईश्वराचे दर्शन घ्यायचे झाले म्हणजे आरंभाला एक मूर्ती करुनच आपल्याला भक्ती करायची आहे. सुरूवातीला ईश्वर सर्वत्र आहे हे आपल्याला कळतही नाही आणि जाणवतही नाही. त्यासाठी सद्‌गुरूंची कृपा व्हावी लागते. ईश्वराचे दर्शन म्हणजे ईश्वर सर्वत्र आहे अशी भावना होणे. पूर्वीच्या भावनेत परिवर्तन हा विकास. 'वासुदेवः सर्वत्रम्।' सर्वत्र-सर्व दिशांना वासुदेव आहे. सर्व ठिकाणी ईश्वर आहे.

याच्याही पुढची भावना म्हणजे 'वासुदेवः सवर्त्रम्।' ईश्वर सर्व देशात नि सर्वकालात आहे एवढेच नव्हे तर सर्वरूपच तो आहे. ज्ञानेश्वर महाराज म्हणतात, देवविश्वात्मक आहे आणि ज्ञानेश्वरीचा कर्ताही तोच आहे. म्हणजे विचार करणारा 'अहम्' जीवही तोच आहे. शेवटी विलीन होऊन गेलं म्हणजे सर्वत्र एकरूप झाला.

'सकलंमिदं अहं च वासुदेवः' हे ज्ञान आहे. दृश्य दिसणारे, मग ते चेतन असो वा अचेतन असो ते सर्व ईश्वरच आहे हेच एकमेव सत्य आहे. मी पाहणारा वेगळा नाही तर मीही ईश्वर आहे. इतकी बुद्धी विशाल झाली पाहिजे. हे अद्वैतज्ञान झाले म्हणजे पूर्ण शांती आहे.

***प्रश्न : महाराज, "दिगंबरा दिगंबरा श्रीपालवल्लभ दिगंबरा" या मंत्राचा अर्थ सांगावा अशी प्रार्थना आहे ?***

उत्तर : सद्गुरू वासुदेवानंद सरस्वती स्वामीमहाराजांच्या परंपरेमध्ये हा अठरा अक्षरांचा महामंत्र आहे. याचे स्पष्टीकरण एका आरतीमध्ये स्वामीमहाराजांनी केलेलं आहे.

'अहं ब्रह्मास्मि।' मी ब्रह्म आहे असं ज्ञान घ्यायचं आहे शेवटी. 'ते ब्रह्म तू आहेस' असंही श्रुतीवाक्य आहे. याचा अर्थ आहे तो या मंत्रामध्ये दाखवला आहे. परब्रह्म सगुणही आहे आणि निर्गुणही आहे असे या मंत्रात ब्रह्मस्वरूपाचे वर्णन केलेले आहे.

आधी निर्गुणाचे वर्णन आहे.

मग सगुणाचे वर्णन आहे आणि सगुण निर्गुण एकच हे सांगितले आहे. दिगंबरा या शब्दाचे दोन अर्थ आहेत. 'दिगंबरा' या पहिल्या शब्दाचा अर्थ म्हणजे वस्त्र नसलेला. म्हणजे उपाधी नसलेला. अहं पदार्थ साक्षी आहे. अहं म्हणजे देह नाही, इंद्रिये नाही, मन नाही किंवा बुद्धीही नाही. या सर्वांचा अहं साक्षी आहे. इथपर्यंत बुद्धी गेली की लक्षात येतं मूळ शुद्ध 'अहं' प्रत्यक्ष 'ब्रह्म' आहे. आपल्या आतील शुद्ध अहम् म्हणजे आत्मा सर्वसाक्षी आहे, निर्विकार आहे, अनंत आहे, अनादी आहे. तो आत्मा म्हणजे ब्रह्मच आहे. पहिल्या दिगंबरा या शब्दाने साक्षी स्वरूपाचे अनुसंधान आहे.

'दिगंबरा' या दुसऱ्या शब्दाचा अर्थ आहे दिशांनी वेढलेला. म्हणजे आकाशासारखा सर्वव्यापी. बाहेर दिसणारे सर्व पदार्थ - झाडे, प्राणी, माणसे, कीटक, चराचर, सर्व वस्तू या ब्रह्मच आहेत. ब्रह्म सच्चिदानंदस्वरूप आहे. त्रिकालबाधित आहे. कोणत्याही काळांत त्याला नाश नाही. जन्म नाही, मृत्यू नाही. स्वयंप्रकाशी आहे. आनंदरूप आहे. मायातीत आहे. मायेने निर्माण झालेल्या भौतिक पदार्थांच्या पलीकडचे आहे. विश्वात होणाऱ्या कोणत्याही व्यवहाराशी त्याचा काहीही संबंध नाही. विश्व निर्माण करण्याची शक्ती ब्रह्माजवळ आहे. पण ती शक्ती स्मरणातही नाही. हे ईश्वरस्वरूप आहे. तेव्हा सर्वव्यापी अशाप्रकारचे जे परब्रह्म स्वरुप आहे ते मी आहे हे चिंतन दुसऱ्या

'दिगंबरा' या शब्दामध्ये आहे. साक्षीभाव जो आहे तो सुद्धा नाहीसा झाला पाहिजे. मी 'साक्षी' आहे आणि 'साक्ष' म्हणजे बाहेरचे विश्व निराळे आहे, असे नाही. साक्ष व साक्षी वेगळे वाटणे हा भ्रमच आहे. हा भ्रम अद्याप शिल्लक राहिला आहे. तोही जायला पाहिजे. अहम् आणि ब्रह्म एकच आहेत.

श्रीपादवल्लभ हेही त्याच्यामध्ये घातलेलं आहे. श्रीपादवल्लभ हे जे सगुण स्वरुप व्यक्त झालं, ते परमात्म्याचे सगुण साकार रुपच आहे. तो विश्वकर्ता विश्वरूपी परमात्मा श्रीपादवल्लभ या रूपाने अवतीर्ण झाला आहे. त्या सगुण साकार रूपाची भक्ती करायची आहे. ही भक्ती उत्कट झाली की सद्गुरूंच्या कृपेने तो भक्त ईश्वररूपच होऊन जातो.

तेच ब्रह्म सगुण अवतार घेऊनच भक्तांचं संरक्षण करते. रक्षण याचा अर्थ भक्तांची बुद्धी शुद्ध करून आपल्या ठिकाणी स्थिर करणं. हे संरक्षण आहे. त्याकरता 'श्रीपादवल्लभ' हे तिसरे संबोधन आहे. 'श्रीपाद' आणि 'वल्लभ' असे दोन शब्द याच्यात आहेत. 'श्रीःपादेयस्य' - ज्याच्या चरणाजवळ श्री आहे. लक्ष्मीयुक्त परमात्मा, शक्तियुक्त परमात्म्याचे स्मरण श्रीपाद या शब्दाने केले आहे. सर्वांना संकटातून मुक्त करून कल्याण करणारा आहे म्हणून तो वल्लभ म्हणजे प्रिय आहे. भक्तांची संकटं तो दूर करतो, आर्त झालेल्या भक्तांचे तो भगवंत संरक्षण करतो,'श्रीपादवल्लभ' या संबोधनामध्ये हे सर्व सुचलेलं आहे.

शेवटी दिगंबरा असे पुन्हा एक संबोधन आहे. ही प्रार्थना केली आहे - हे दिगंबर! ज्याप्रमाणे विष्णुरुपानी त्या गजेंद्राला, द्रौपदीला त्याचप्रमाणे अंबरीष राजाला भेटून त्यांचं संरक्षण केलं त्याप्रमाणे माझंही संरक्षण करा. कारण मी कामक्रोधाने ग्रासलेला आहे. ईश्वराचं स्वरूप, ब्रह्मस्वरूप, दत्तस्वरूप आणि गुरूस्वरूप ही सर्व एकच आहेत. त्यांचं अनुसंधान दिगंबरा या चौथ्या शब्दाने याठिकाणी केलं आहे. आपण खरे ब्रह्मा, गुरू, वासुदेव, दत्तात्रेय, सर्वही आपण आहात. आपण ब्रह्मरूपच आहात. मला आपण प्राप्त व्हा. कारण कामक्रोधांनी मी अगदी ग्रासलेलो आहे. ह्या सर्व विकारांनी पिडलेली आहे. म्हणून मला आपण प्राप्त व्हा आणि त्याचप्रमाणे लवकर मला आपल्याकडे न्या अशी प्रार्थना केलेली आहे.

असा हा एक महामंत्र आहे. सगुण व निर्गुण एकच दत्तस्वरुप आहे. त्यांनी आमचे कामक्रोध वगैरे विकार दूर करावे, अंतःकरणांतील दूर कराव्या आणि कृपा करावी. 'अहम्ब्रह्मास्मि' या अनुभूतीपर्यंत न्यावं अशी प्रार्थना या महामंत्रात आहे. हा सर्व विचार मनांत आणून या मंत्राचा जप करायचा. या मंत्राचा वाणीनं जप करणं ही श्रेष्ठ उपासना आहे.

***प्रश्न : महाराज, दिगंबराची धून चालू असतांना अनेकदा तन्मय अवस्था प्राप्त होते.***

उत्तर : दिगंबराची धून चालू असतांना तन्मय अवस्था प्राप्त होऊ शकते. कारण "दिगंबरा दिगंबरा श्रीपादवल्लभ दिगंबरा" हे शब्द मंत्ररुप आहेत. दिगंबराची धून चालू असतांना तन्मय अवस्था प्राप्त होणे ही ईश्वराची मोठी कृपा आहे. या महामंत्राचं भजन म्हणा, गायन म्हणा ज्या ठिकाणी चालू असेल त्या ठिकाणी ईश्वराचा वास असतो.

***प्रश्न : महाराज, आपण या महामंत्राचे अर्थ सांगतांना एका आरतीचा उल्लेख केलात.***

उत्तर : या महामंत्राचे स्पष्टीकरण स्वामीमहाराजांनी एका आरतीमध्ये केले आहे. ही आरती अशी आहे.

दिगंबरा दिगंबरा श्रीपादवल्लभ दिगंबरा ।
आरती हे तव चरणी राहो ।।
आरती हे तव चरणी राहो ।। नति तति गुरुवरा ।। धृ ।।
दिग्भिरवेष्टितमम्बरमेव प्रत्यग्ब्रमेति ।।
खंब्रह्मेत श्रुतिरपि वदति खंब्रह्मेती श्रुतिरपि वदती दिगंबरा चेति ।।१।।
दिगवत् चाम्बरमेव व्यापक पूर्णब्रह्मेति ।।
सच्चित्सुखधनमायातीतं सच्चित्सुसधनमायातीतं दिगंबरा वदति ।।२ ।।
श्रीपादवल्लभ नाम प्राप्त हि नक्रगजेंद्रमिवा ।।
द्रौपघंबरीषचोर । द्रौपघंबरीषचोरग्रसितब्दिजमेव ।।३ ।।
दिगंबरा गुरु वासुदेव दत्तसत्वंद्रहम् ।।

कामक्रोधग्रतितं मा लभा कामक्रोधग्रसितं मां लभ तथैव झटिति वहा ॥४॥
दिगंबरा--- ।

"दिगंबरा दिगंबरा श्रीपादवल्लभ दिगंबरा ।"

या अष्टाक्षर मंत्रातले पहिले दोन शब्द 'दिगंबरा दिगंबरा' ही दोन संबोधने आहेत. तशी सगळीच संबोधने आहेत. प्रथम 'दिगंबरा दिगंबरा' या दोन शब्दांनी साक्षी स्वरूप आत्म्याचे जे साक्षीरुप आहे, म्हणजे शुद्ध 'अहम्' पदार्थ, जीवात्म जीवाचे शुद्ध स्वरूप याचं अनुसंधान हे पहिल्या शब्दाने आहे. आणि दुसऱ्या 'दिगंबरा' या शब्दाने सर्व व्यापी, सर्व विश्वाचे अधिष्ठान असं जे ब्रह्म आहे त्याला संबोधन आहे. परब्रह्म ज्याला म्हणतात, तो परमात्मा त्याला संबोधन आहे.

***प्रश्न : महाराज, जीवात्मा म्हणजे काय?***

उत्तर : प्रत्येक माणसांत जीवात्मा आहे. जीवात्मा ही एक ईश्वराची शक्ती आहे. आत्मतत्व ही ईश्वरी शक्ती आहे. तीच ब्रह्मतत्व आहे. ह्या सगळ्याही दृश्य किंवा मूर्त पदार्थांनी ती झाकून गेलेली आहे. हे जीवात्म्याचे खरं स्वरूप आहे. तो आनंदरूप आहे. निर्विकार आहे. तो खरा अहम् आहे. पण खरा 'अहम्' समजून येत नाही आपल्याला.

सर्व कार्य करणारा मी आहे. सुखी होणारा, दुःखी होणारा, कामक्रोधादि विकार ज्याला असतात तो मी आहे असं आपल्याला वाटतं. परंतु या सगळ्या विकारांमध्ये सापडलेला जीवात्मा हा खरा 'अहम्' नाहीये. विचार करुन सत्पुरुषांच्या संगतीमध्ये राहून हे वारंवार ऐकून, त्यांच्याकडून योग्यरितीने समजून घेता येतं. देह आत्मा नाही. इंद्रिये हा आत्मा नाही, मन आत्मा नाही. बुद्धी आत्मा नाही. मग खरा आत्मा कोण आहे? ते जे प्रत्यग्ब्रह्म आहे तो खरा आत्मा आहे. म्हणजे साक्षी निर्विकार, स्वयंप्रकाशी, आनंदरूपी आत्मतत्त्व जे आहे ते खरे जीवाचे रूप आहे. खरा मी म्हणजे असा आहे.

**प्रश्न : महाराज, या जीवात्म्याचे अस्तित्व आम्हाला का जाणवत नाही?**

उत्तर : या जीवात्म्यावर पाच कोष असतात. अन्नमय, प्राणमय, मनोमय, विज्ञानमय व आनंदमय असे पाच कोष शास्त्रकारांनी सांगितले आहेत. या पाच कोषांनी आत्मतत्त्व झाकून गेले आहे. ते आत्मतत्त्व म्हणजेच अंतरात्मा.

***प्रश्न : महाराज, अंतरात्म्यापर्यंत आम्ही कसे पोचायचे? त्याचे अनुसंधान कसे करायचे?***

उत्तर : अंतरात्मा म्हणजेच प्रत्यग्आत्मा किंवा प्रत्यग्ब्रह्म. त्याचे दर्शन होण्याकरता मनाचे, बुद्धीचे सहाय्य घ्यायचे. तिथपर्यंत मनाची गती जाऊ शकते. बाहेरून मन हे परावृत्त ज्या वेळेला होईल, त्या वेळेला मन पाचही कोष ओलांडून पलीकडे जाऊ शकते. स्वयंसिद्ध, निर्विकार आत्मतत्त्व आहे हे मनाला समजून येते.

***प्रश्न : महाराज, आम्ही हे असे अखंड अनुसंधान कसे करायचे?***

उत्तर : शुद्ध आत्मस्वरूपाचं ज्ञान होणं आणि मनाने त्याचे अखंड अनुसंधान घडणं ह्याच्याकरता चित्त शुद्ध झालं पाहिजे. आपली बुद्धी शुद्ध झाली पाहिजे. बुद्धीमध्ये असणारे कामक्रोधादि सगळे दोष निघून गेले पाहिजेत. त्याकरता देवांची, गुरूची, संतांची सेवा, सत्कर्माचे आचरण हे सारखे चालू ठेवले पाहिजे. म्हणजे आत्मस्वरूपाचे चिंतन होते.

ईश्वराची प्रार्थना करावी. सर्व जग ज्याने निर्माण केले, सर्व जीवांच्या बुद्धीला प्रेरणा करणारा जो आहे, ज्याच्या शक्तीने या सर्व विश्वाचे कार्य चालले आहे. त्याला मी शरण आलेलो आहे अशी प्रार्थना करावी.

***प्रश्न : महाराज, परमात्मा व जीवात्मा हे एकच आहेत हे आम्हाला कां समजत नाही?***

उत्तर : मी साक्षी आहे आणि साक्ष म्हणजे बाहेर दिसणारे विश्व निराळे आहे पुन्हा हा भ्रम अद्यापि शिल्लक राहिला आहे. तोही जायला पाहिजे. त्यासाठीच हा महामंत्र आहे.

***प्रश्न : महाराज, या मंत्रांत श्रीपादवल्लभ यांचा महाराजांनी का उल्लेख केला आहे?***

उत्तर: महाराजांना श्रीपादवल्लभ यांचं स्मरण झालं कारण श्रीपाद हा श्रीदत्तात्रेयांनी घेतलेला अवतार आहे. गुरूचरित्रांत या अवताराची कथा आलेली आहे. श्रीपादवल्लभ हे भगवंताचे सगुण साकार रूप आहे.

श्रीपादवल्लभ हे नांव जे प्राप्त झालं आहे ते त्यांनी भक्तांचे कल्याण कसे केले त्यावरून प्राप्त झालंय. अवतार हा निर्मोह आहे. त्याला काही मोह नाही. ईश्वर हा सर्वरूपी, सर्वस्वरूपी आणि निर्मोह आहे. भक्तीमार्गाच्या योगाने त्या ईश्वरस्वरूपाची कृपा झाली म्हणजे हे सगळे ज्ञान होते. देहादिकापासून ते मन बाजूला होत होत आत्मस्वरूपाच्या ठिकाणी जाऊन पोचते आणि त्याचे अनुसंधान होऊ लागते.

ईश्वरस्वरूपाच्या ठिकाणी जर अंतःकरण जडलं तर ईश्वराचं दर्शन होते, ईश्वराची कृपा होते. श्रीपादवल्लभ हेच दिगंबर आहेत. जीवात्मरूपी तेच आहेत. तेच परमेश्वरस्वरूप आहेत आणि दोन्ही मिळून परब्रह्मरूपी तेच आहेत. गुरूस्वरुप अशा प्रकारचे दत्तात्रेय आहेत. ईश्वर आणि गुरू हे एकच झालेले आहेत दत्तस्वरूपाच्या ठिकाणी ही भावना साधकाची असावी असे त्यांचे म्हणणे आहे. गुरू आणि ईश्वरस्वरूप असे दत्तात्रेय साक्षात परब्रह्म आहेत.

***प्रश्न : महाराज, या महामंत्रात शेवटी पुन्हा दिगंबरा हे संबोधन आले आहे. ते कां आले आहे ?***

उत्तर : "दिगंबरा दिगंबरा श्रीपादवल्लभ दिगंबरा" या महामंत्रात शेवटी दिगंबरा हे जे संबोधन आहे ती परमेश्वराची प्रार्थना आहे. परमेश्वराला दिगंबरा असे संबोधन केले. दिगंबरा अशी हाक मारली आणि त्या ईश्वराची मागितले. काम-क्रोध-ग्रसित मी आहे. काम, क्रोध, मद, मत्सर या चोरांनी मला आता मारायचे ठरविले आहे. तेव्हा लवकर आपण या आणि मला आपल्याकडे घेऊन चला. या संबोधनामध्ये ही हाक मारलेली आहे.

***प्रश्न : महाराज, निर्गुण परमेश्वराची ज्ञान आणि सगुण साकार भगवंताची भक्ती दोन्ही शेवटी एकाच ठिकाणी जाते का ?***

उत्तर : ज्ञानमार्गही आहे. भक्तीमार्गही आहे. संतमहात्म्यांच्या ठिकाणी ज्ञान व भक्ती दोन्हीही असतात. ईश्वरभक्त संत असतात. त्यांना ज्ञान नाही असं म्हणता येत नाही. त्यांनी सगुणाचे वर्णन केलेले आहे. "तुज सगुण म्हणू की निर्गुण रे। सगुण निर्गुण एकू गोविंद रे।" हा ज्ञानेश्वरमहाराजांचा अभंग आहे. तेव्हा सगुण निर्गुण दोन्ही एक आहेत. ही दृष्टी या आरतीमध्ये दिगंबरा शब्दाचा अर्थ स्पष्ट

करतांना स्वामीमहाराजांनी दिलेली आहे. स्वतः त्यांना तशी दृष्टी होती. म्हणून त्यांच्यातही भेद ते मानत नाहीत. निर्गुण निराकार ईश्वर तोच आहे. सगुणही ईश्वर तोच आहे. त्याचप्रमाणे अवतार धारण करून साकार झालेलाही तोच आहे.

***प्रश्न : महाराज, सगुण परमेश्वराच्या भक्तीपेक्षा निर्गुण निराकाराचे ज्ञान सामान्य जीवाला जास्त अवघड आहे कां?***

उत्तर : निर्गुण निराकार परमात्मा, आत्मतत्त्व आहे हे समजून घ्यायला कित्येक जन्म घ्यावे लागतात. द्वंद्वातीत अवस्थेपर्यंत जायला खूप काळ लागतो.

म्हणून महाराजांनी या महामंत्रामध्ये सगुण साकार परमेश्वराला हाक मारलेली आहे. तो आमच्या सारखा देहधारी परमेश्वर आहे असं समजायला हरकत नाही. पण त्याच्या ठिकाणी जी ईश्वरशक्ती आहे तिची जाणीव करून घेऊन हाक मारावी म्हणजे झाले. श्रीपादवल्लभ स्वरूप हे त्याकरता त्यांनी दाखवलेले आहे. त्याच्याही पुढे जर बुद्धी जाऊ शकली तर तो परमात्मा सच्चिदानंदघन आहे. विश्वरूप तो आहे. विश्वकर्ता तो आहे. तोच जीवरूपही झालेला आहे. मीसुद्धा त्याच्या स्वरूपापेक्षा निराळा नाहीये. तो परमेश्वर आणि मी वेगळे नाहीत. दोन्ही एकच आहेत. तो व मी एकच आहेत. हे ज्ञान होतंय. जो मी आहे तो सुद्धा शेवटी त्या परमेश्वराच्या स्वरूपातच विलीन करून टाकायचा आहे.

***प्रश्न : महाराज, "दिगंबरा दिगंबरा श्रीपादवल्लभ दिगंबरा" या महामंत्राचा रोज किती वेळा जप करायचा?***

उत्तर : किती जप केला तरी तो कमीच आहे. काळ कमी आहे असं वाटलं पाहिजे. आपल्या हातून थोडसं काही सत्कर्म घडलं तरी आपल्याला लगेच त्याचा केवढा अभिमान, अहंकार वाटतो. असंच उत्तरोत्तर सत्मर्क आपल्या हातून व्हावं असं वाटतं. पण खऱ्या भूमिकेत काळाचा विसर पडला पाहिजे.

आपण जर कृपा केलीत तरच मला आपलं स्वरुप समजून येणार आहे. माझं कर्तृत्त्व काहीही नाही अशी अनन्य भावाने प्रार्थना शेवटी केली आहे. अर्थाकडे जर लक्ष देऊन या मंत्राचे पठण झाले तर त्याचे फळ आपल्याला

मिळणारच आहे. हे एक वाणीचे तपच आहे. अर्थ ध्यानात घेऊन जरी पठण नाही घडलं तरी जितका वाणीने जप करता येईल तेवढा करावा. याचेही महत्त्व काही कमी नाही. वाणीच्या तपाचं पर्यवसान मनाच्या तपापर्यंत होते. हेच महाराजांनी याच्यामध्ये सांगितलेले आहे.

"दिगंबरा दिगंबरा श्रीपादवल्लभ दिगंबरा" या महामंत्रांत सद्गुरू वासुदेवानंद सरस्वती-स्वामीमहाराजांनी केवढी मोठी भूमिका आणली आहे. सर्व देव बाजूला करून एका चैतन्यघन परम तत्त्वाची वाणीने प्रार्थना करण्याची फार मोठी भूमिका या महामंत्रात आहे. या महामंत्राचा जप करीत राहिले तर आपल्या बुद्धीची निर्दोषता वाढत जाईल आणि शेवटी जीवभाव नाहीसा होऊन तो जीव मुक्त होईल. परमेश्वरस्वरूप होऊन जाईल. एवढे सामर्थ्य या महामंत्रात आहे.

## - डॉ. शरद्चंद्र कोपर्डेकर यांचे प्रकाशित झालेले संतसाहित्य -

*(डॉ. कोपर्डेकर यांची एकूण ५६ पुस्तके प्रसिद्ध झाली आहेत. त्यापैकी ३५ पुस्तके कॉमर्स, इकॉनॉमिक्स आणि मॅनेजमेंट या विषयावरील आहेत. बाकीची पुस्तके संतसाहित्य विषयक आहेत.)*

### ❋ इंद्रायणी साहित्य प्रकाशन, २७३ शनिवार पेठ, पुणे यांची प्रकाशने

१. श्रीदत्तमहाराज कवीश्वर -चरित्र आणि विचारधन (सातवी आवृत्ती)
(साधकांचे प्रश्न आणि श्रीदत्तमहाराजांची उत्तरे यांचे संकलन विचारधन या नावाने पुढील तीन भागात प्रसिद्ध झाले आहे.)

२. श्रीदत्तमहाराज कवीश्वर - विचारधन भाग -१ (चौथी आवृत्ती)

३. श्रीदत्तमहाराज कवीश्वर विचारधन भाग - २ (तिसरी आवृत्ती)

४. श्रीदत्तमहाराज कवीश्वर यांची विचारसंपदा (विचारधन भाग ३) चौथी आवृत्ती

५. श्रीरामकृष्ण परमहंस - चरित्र

६. स्वामी विवेकानंद - चरित्र

७. श्रीगुलाबरावमहाराज - चरित्र आणि तत्त्वज्ञान

८. श्रीगाडगेमहाराज - चरित्र

९. पातंजल योगदर्शन
(भगवान पतंजलींची मूळ संस्कृत सूत्रे, त्या सूत्रांचा मराठी भावार्थ आणि विवरण)

१०. श्रीरंगअवधूत महाराज - चरित्र (स्वामीमहाराज या अंकात प्रसिद्धी)

११. श्रीचैतन्य महाप्रभू - चरित्र (स्वामीमहाराज या अंकात प्रसिद्धी)

१२. श्रीरमण महर्षी - चरित्र (स्वामीमहाराज या अंकात प्रसिद्धी)

### ❋ श्रीवासुदेव निवास, कर्वेरोड, पुणे यांचे प्रकाशन

१३. गुण गाईन आवडी
(श्रीदत्तमहाराजांची प्रवचने व श्रीदत्तमहाराजांवरील तीन लेख)
(डॉ.सौ. माधुरी पणशीकर यांच्या समवेत संपादित)

**✻ श्री भगवती प्रकाशन, पुणे यांचे प्रकाशन**

१४. आनंदलहरी विचारधन - १ (आवृत्ती संपली)

**✻ साधुवासवानी मिशन, वासवानी रोड, पुणे-१ यांचे प्रकाशन**

१५. साधु वासवानी - चरित्र

**✻ नवचैतन्य प्रकाशन, शशांक सोसायटी, ए-००२, एक्सर रोड, बोरीवली(प), मुंबई-९२ यांची प्रकाशने**

१६. स्वामी शिवानंद (ऋषिकेश) - चरित्र

१७. शिकवण ज्ञानेश्वरीची (ज्ञानेश्वरीचे सार या पुस्तकात सुबोध भाषेत गद्यस्वरूपांत दिले आहे.)

**✻ भारतीय विद्याभवन, चौपाटी, मुंबई यांचे प्रकाशन**

१८. श्रीगुलाबरावमहाराज - चरित्र (इंग्रजी भाषेत)

✻✻✻

**✻ आगामी प्रकाशने-**

१. संत श्रेष्ठ श्रीकृष्णदयार्णव - यांच्या चरित्रावर आधारीत कादंबरी

2. ShriDattamaharaj Kavishwar - A Biography In English

3. Vichardhan
(English translation of selected Answers given by ShriDattaMaharaj Kavishwar)

४. कुंडलिनी योग
(कुंडलिनी योग साधना या विषयाचे तात्त्विक विवेचन आणि साधकांचे निवडक अनुभव - मराठी भाषेतील सुबोध विवरण)

5. Kundalini Yoga
(A treatise on the Theoary & Practice of Kundalini Yoga)